# महानगरपालिका औरंगाबाद

*सर्वसाधारण सभा*

## दिनांक २९-०४-२००० ते ३१-०८-२०००

**रजिष्टर क्र.०१**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
## सर्वसाधारण सभा

| अनुक्रमांक | सर्वसाधारण सभेचा दिनांक | विषय क्र. व ठराव |
|---|---|---|
| १. | २९/४/२००० | विषय क्र :- १ ते २ |
| २. | २/५/२००० | विषय क्र :- ३ ते ४/४ |
| ३. | २०/५/२००० | विषय क्र :- ५/१ ते १४/२ |
| ४. | १४/६/२००० | विषय क्र :- १५ |
| ५. | २०/६/२००० | विषय क्र :- १६/१ ते १७/२ |
| ६. | २६/६/२००० | विषय क्र :- १८/१ |
| ७. | २०/७/२००० | विषय क्र :- १९/१ ते ३८/१२ |
| ८. | २७/७/२००० | विषय क्र :- ३९/१ |
| ९. | २८/७/२००० | विषय क्र :- ------ |
| १०. | १८/८/२००० | विषय क्र :- ४०/१ ते ६९/५ |
| ११. | ३१/८/२००० | विषय क्र :- ७०/१ |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २९/४/२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**शनिवार दिनांक २९/४/२००० रोजी सकाळी १०.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात मा. श्री सुदाम सोनवणे यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील सन्माननिय नगरसेवक उपस्थीत होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | स. सभासद |
| २) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ३) स. स. सौ साजदा बेगम विखार अहमद | -//- |
| ४) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ५) स. स. श्री औतडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ६) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ७) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ८) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| ९) स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| १०) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| ११) स. स. श्री पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १२) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १३) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १४) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १५) स. स. श्रीमती किवलेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १७) स. स. श्री शकील पटेल शे. बुढन पटेल | -//- |
| १८) स.स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १९) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २०) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २१) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २२) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २३) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २४) स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २५) स. स. श्री जविंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २६) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २७) स. स. श्री नकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २८) स. स. श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २९) स. स. श्री अय्युब खॉ सरदार खॉ | -//- |
| ३०) स. स. श्री अब्दुल रशिद अब्दुल सत्तार | -//- |
| ३१) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| ३२) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |

३३) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग -//-
३४) स. स. श्री ॲ कराड भागवत किशनराव -//-
३५) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३६) स. स. सौ. रशिदा बेगम गफफार यार खॉन -//-
३७) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३८) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३९) स. स. श्री स. मुमताज अली मोज्जम अली -//-
४०) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
४१) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
४२) स. स. श्री थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव -//-
४३) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४४) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४५) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४६) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४७) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४८) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४९) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ -//-
५०) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
५१) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
५२) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
५३) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
५४) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
५५) स. स. श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद -//-
५६) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५७) स. स. श्री अशरम मोतीवाला -//-
५८) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५९) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
६०) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे -//-
६१) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
६२) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
६३) स. स. श्री वसंत पाडूंरंग नरवडे -//-
६४) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागिरथ -//-
६५) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
६६) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
६७) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
६८) स. स. श्री गाजी सादोउद्यीन गाजी जहीर अहमद -//-
६९) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
७०) स. स. सौ तफिसउन्नीसा बेगम हबीबखा -//-
७१) स. स. श्री शेख इसाक जैनोद्वीन शेख -//-
७२) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
७३) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
७४) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-

७५) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
७६) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
७७) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान -//-
७८) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
७९) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
८०) स. स. सौ बबीता सुभाष कागडा -//-
८१) स. स. श्री सय्य्द अली सलामी सय्यद मिरा सलामी -//-
८२) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज -//-
८३) स. स. सौ निखत परवीन इजाज अली -//-

**संवाद :-**

**श्री प्रकाश निकाळजे :-** मागील कालावधी महानगरपालिकेचा संपलेला असून आता नवनियुक्त महानगरपालिकेचा पिठासन अधिकारी म्हणून काम करणार याची माहीती द्यावी.

**पिठासन अधिकारी** :- सचिवांनी याबाबत माहीती द्यावी.

**सचिव** :- सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे सभागृहात स्वागत व अभिनंदन करण्यात येते. मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र औरंगाबाद महानगरपालिका सावत्रिक निवडणुकीची तारीख निश्चित केल्याप्रमाणे दिनांक ९/४/२००० रोजी सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आले आहे.

१९९५ ला आालेल्या सर्वात्रिक निवडणुकीत निवडूण आलेल्या सदस्यांची मुदत दिनांक २८/४/२००० ला संपलेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वेय महापौर, उपमहापौर २० (२) अन्वये स्थायी समितीच्या १६ सदस्यांची निवड आणि कलम ५ (२) आणि महाराष्ट्र, महानरगपालिका, नगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची निवडणुका व नियुक्त्या) नियम १९९६ चे नियम क्रमांक ४ च्या तरतुदीनुसार महानगरपालिका, औरंगाबाद व्यतिरिक्त ५ (पाच) नामनिर्देशित सदस्यांची निवड करणेसाठी, मा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण २ मधील नियम क्र. १ (ब) अ आजच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन केलेले आहे. आजच्या सभेत होणा-या निवडणुका संबंधी जा.क्र./मनपा/२०००/१०८ दिनांक १३/४/२००० चे परिपत्रकाद्वारे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४४,४५,४७ व ४९ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे.

**श्री तकीहसन खान:-** या सभेमध्ये मा. महापौर/उपमहापौर व स्विकृत सदस्यांची निवडणूक होणार आहे. तेव्हा या निवडणुकीसाठीची पत्रिका ही उर्दुतून करावी. कारण या सभागृहात बरेचसे सन्माननीय सदस्य हे मराठी न वाचणारे आहेत, हिंदुना त्यांना मराठी येत नाही, लोकसभा निवडणूकी वेळी मतपत्रिका जशी मराठी व उर्दुतून छापल्या जाते. त्याप्रमाणातच या निवडणुकीसाठीची मतपत्रिका तयार करावी. या सर्व बाबी नियमाप्रमाणे असून, मुंबई, ठाणे, महानगरपालिकेमध्ये मतपत्रिका उर्दुतून छापून निवडणूक पार पाडण्याची प्रक्रिया केली जाते. त्यानुसारच या महानगरपालिकेत सुध्दा ही पध्दत अंमलात आणावी.

(या संदर्भात शासनाकडून आलेले पत्र सभागृहात वाचून दाखवितात)
उर्दुतील यादया सर्वांना देणे आवश्यक होते. सन १९८३ पासून १९८८ पर्यंत व पुन्हा १९८९ ते ९३ पर्यंतच्या महानरगपालिकेच्या कालावधीत इतिवृत्त सुद्धा उर्दुतून दिले जात होते.

**पिठासन अधिकारी :-** सर्व प्रथम मी आजच्या सभेमध्ये सर्व नवनिर्वाचित सन्माननिय सदस्यांचे सभागृहात स्वागत करतो व पुढील पांच वर्षासाठी या शहरातील विकास कामासाठी सर्वांनी सहकार्य करावे, व शहराचा विकास घडवून आणावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा. उपमहापौर :-** सर्व नवनिर्वाचित सन्माननिय सदस्यांचे हार्दिक अभिनंदन व गेल्या पांच वर्षाच्या कालावधीत शहराची विकास कामे करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व माजी सन्माननीय सदस्यांचे सुध्दा अभिनंदन व यापुढील पांच वर्षासाठी शहराचा संपूर्णपणे विकास करणेसाठी सर्व सन्माननीय सदस्य महानगरपालिकेस सहकार्य रतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**श्री अफसखॉन :-** मा. महापौर यांच्या बरोबरच सभेस्थळी बसण्यासाठी मा. उपमहापौर यांना नियमाप्रमाणे बसता येऊ शकते काय? माहीती द्यावी.

**सचिव:-** मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम १९४९ चे १९ (२) अन्वये नविन मा. महापौर व उपमहापौर निवडण्यात येईपर्यंत ते पद धारण करतील अशी तरतुद आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे :-** सभा कामकाज नियमावलीप्रमाणे सभेची सुरुवात करावी.

**श्री स अली मिरा सलामी:-** सन्माननीय सदस्य या ठिकाणी कोणत्याही प्रकारे धार्मिक भावनेच्या आहारी कुणी सदस्य जातील असे कृत्य करु नये.

**श्री जयवंत ओक :-** सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनांनुसार सभागृहात रुमाल बांधून आल्यास काही आक्षेप नसावा.

**श्री अफसरखॉन :-** सभागृहात प्रवेश करतांना कोणत्याही पक्षाचे सन्माननीय सदस्यांनी धार्मिक भावना उत्तेजीत होतील, त्याच प्रमाणे धर्माचा वापर करण्याची भाषा या ठिकाणी करु नये.

**श्री स. अली मिरा सलामी :-** जे सन्माननीय सदस्य रंगीत रुमाल घालून सभागृहात बसलेले आहेत. तेव्हा नियमाप्रमाणे सभागृहात असे बसता येते काय? याची माहिति द्यावी.

**श्री अंबादास दाणवे :-** भारतीय संस्कृती ही हिंदू संस्कृती प्रमाणे आहे व त्यानुसारच या ठिकाणी वापर करतात. स. सभागृहात रंगीत रुमाल बांधुन आलेले सन्माननीय सदस्यांवर कुणी आक्षेप घेण्याचा प्रश्नच येत नाही. वर ज्यांना घ्यावयाचा असेल तर त्यांनी घ्यावा. (यावेळी मुर्दाबात मुर्दाबादच्या घोषणांचा आवाज येतो.)

**श्री स. अली मिरा सलामी :-** हिदूं संस्कृतीप्रमाणे आपण सार्वजनिक ठिकाणी काय करायचे ते करावे परंतु, लोकशाही प्रक्रियेत पूर्णपणे धार्मिकेतेला बंधन आहेत.

**श्री अशरफ मोतीवाला :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे काय तरतुद आहे यांची माहिति द्यावी.

**श्री अफसरखान :-** सभागृहात भगवे कपडे घालून येणे याशिवाय कपडयावरती पक्ष्याचे नांव लिहून सभागृहात प्रवेश करणे ते नियमाप्रमाणे योग्य नाही.

**श्री जयवंत ओक :-** कपडयाच्या रंगाबाबत काही सन्माननीय सदस्य विरोध करीत असतील ते योग्य नाही. जे सन्माननीय सदस्य मुस्लीम लिग पक्ष्याचे असतील आणि

त्यांना त्या पक्षाच्या रंगाचे पेहराव करुन घ्यावयाचा असेल तर ते सभागृहात येऊ शकतात, आमची सभागृहात येऊ शकतात आमची काहीही हरकत नाही.

**श्री अफसरखॉन:-** सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केले ते चुक असून यामध्ये काहीही तथ्य नाही. (जोरजोरात बोलतात) आजची सभा दहा मिनिटासाठी तहकुब करण्यात येत असल्याची घोषणा मा. पिठासन अधिकारी यांनी केली (वेळ अंदाजे ११.४० दहा मिनिटासाठी तहकुब करण्यात आलेली सभा दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरु झाली यावेळी मा. पिठासन अधिकारी यांनी नगरसचिव यांना विषय क्र. १ वाचून दाखविण्याची सूचना केली.

**विषय क्र. १ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) व महानगरपालिका महापौर आरक्षण नियम १९९४ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ५/८/१९९९ ची अधिसुचना क्रमांक जोईएन १०९९/१२४०/प्र. क्र. ६६/९९/नवि-२४ प्रमाणे महापौर हे पद नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आलेले आहे. त्यानुसार महापौर पदावर निवड करणे.

**संवाद** :-

**पिठासन अधिकारी** :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वये महापौर पदासाठी आजच्या सभेत निवड करण्याकरिता दिनांक १३/४/२००० रोजी सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आला. दिनांक १७ एप्रिल २००० ते २५ एप्रिल २००० पर्यंत नामनिर्देशित पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असून, दिनांक २५ एप्रिल २००० रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत महापौर पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशिन पत्र प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | श्री तनवाणी किसनचंद लेखराज | गायकवाड राधाकृष्ण राजाराम | श्री फुलारी नंदकुमार माधवराव |
| २. | श्री जैन विकास रतनलाल | श्री शिरसाठ संजय पांडूरंग | श्री जगदिश कन्हैयलाल सिध्द |
| ३. | श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | सौ कांबळे निर्मला विठ्ठल |
| ४. | श्री डॉ कराड किसनराव भागवत | १) सौ साधना गणेश सुरडकर | १) श्री ताठे भाऊसाहेब पुंडलिक |
| | | २) श्री शिंदे राजु रामराव | २) मानकापे पार्वती लहानु |
| | | ३) श्री सांवत मधुकर दामोधर | ३) सौ. डॉ आशा उत्तम बिनवडे |
| ५. | श्री नासेरखान अ. रहेमान खान कुरेशी | १) श्री अशरफ मोतीवाला | १) तुळशी बागवाले किशोर बाबुलाल |
| | | २) श्री कोकाटे | २) श्री मिर हिदायत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | काशिनाथ हरिभाऊ | उर्फ मिर बसालत अली |
| | | ३) श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | ३) श्री शेख शकेल शे. बुठण पटेल |
| | | ४) श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | ४) मो. अब्दुल कादीर मौलाना सय्यद |
| | | ५) श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | ५) श्री. अब्दुल रशीद अब्दुल सत्तार |
| ६. | सौ तफिसुन्नीस बेगम हबीब खान | श्री शेख इसाक जैनोदिन | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखा |
| ७. | श्री अयुबखॉ सरदार खॉ | श्री मिर हिदायत अली मिर बसालत अली | श्री ठकूजी रामसिंग वाणी |

वरील प्रमाणे महापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नानिर्देशन पत्रांची छाननीचे काम, सभाकामकाज नियमावलीच्या नियम क्रमांक. ४४ व ४७ अन्वये आता करण्यात येते आहे.

१) सन्माननीय सदस्य श्री किशनचंद तनवाणी यांनी त्यांचे मुळ जातीचे प्रमाणपत्र १५ मिनिटांच्या अवधीत दाखवावे.
२) सन्माननीय सदस्य श्री विकास जैन यांचा अर्थ ग्राहय धरुन मंजुर करण्यात येवो.
३) सन्माननीय सदस्य श्री अविनाश कुमावत यांनी त्यांचे मुळ जातीचे प्रमाणपत्र १० मिनिटापर्यंत दाखवून करावे.
४) सन्माननीय सदस्य श्री डॉ भागवत कराड यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

**श्री तकीहसन खान :-** सन्माननीय सदस्य श्री डॉ भागवत कराड हे एन. टी जाती संवर्गातील असून त्यांनी आबीसी मधून महापौर निवडणूकीसाठी फॉर्म भरलेला आहे. त्याबाबत आम्ही आक्षेप घेत आहेत.

**श्री काशिनाथ कोकाटे, श्री आफसखॉन:-** सन्माननीय सदस्य श्री डॉ. भागवत कराड यांनी नामनिर्देशन फॉर्म भरला. त्यावेळी एन. टी. म्हणून जीतीचे प्रमाणपत्र दाखल केले की, ओबीसीचे दाखल केले. याची माहिती द्यावी.

**पिठासन अधिकारी:-** सन्माननीय सदस्य श्री डॉ भागवत कराड यांनी दाखल केलेल्या प्रमाणपत्राची छाननी होत आहे. त्यांनतर आपल्याला माहिती देण्यात येईल. त्यापुर्वी सन्माननीय सदस्य यांना बोलण्याची संधी द्यावी.

**श्री काशिनाथ कोकाटे:-** मतदान प्रक्रिया पूर्ण होण्याआधी सन्माननीय सदस्य डॉ. भागवत कराड यांचे जातीचे प्रमाणपत्र कोणते आहे. याची सभागृहाला माहिती द्यावी.

**श्री अंबादास दानवे, श्री काशिनाथ कोकाटे:-** महानगरपालिकेच्या नियमावलीत जसे स्पष्ट नमुद केलेले आहे. आम्ही मागणी केलेली आहे की, सन्माननीय सदस्य श्री डॉ. भागवत कराड यांनी दाखल केलेले जातीचे प्रमाणपत्र कोणते आहे याबाबतची माहिती द्यावी.

**पिठासन अधिकारी:-** सन्माननीय सदस्य डॉ. भागवत कराड यांनी त्यांचे कडील मुळ जातीचे प्रमाणपत्र दहा मिनिटात या ठिकाणी दाखल करावे.

(मुळ जातीचे प्रमाणपत्रे दाखल सन्माननीय सदस्य करतात. याचवेळी सभागृहात काही काळ इतर सन्माननीय सदस्य महापौर यांच्या आयसकडे येऊन बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

**पिठासन अधिकारी:-** १) स. स. डॉ भागवत कराड यांचे मुळ जातीचे प्रमाणपत्र पाहता त्यांना अर्ज मंजुर करण्यात येते.

२) स. स. श्री नासिरखॉन सरदारखान यांच्या जातीचे प्रमाणपत्राची छाननी केली असता तो मंजुर करण्यात येतो.

३) स.स. तफिस उन्नीसा बेगम यांनी आपले जातीचे प्रमाणपत्राची मुळ प्रत १५ मिनिटात दाखल करावे.

४) अयुब खॉ सरदार खॉ यांनी दाखल केलेले जातीचे प्रमाणपत्र छाननी अंती मंजुर करण्यात येते. स. स. श्री किशनचंद तनवाणी, श्री अविनाश कुमावत न नफिसन्नीसा बेगम यांचे जातीचे मुळ प्रमाणपत्र पाहण्यात आले.

**पिठासन अधिकारी:-** ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाच्या असेल त्यांना आपली स्वाक्षरी केलेला अर्ज आपले सूचक व अनुमोदक यांच्य संमतीने सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४७ अन्वये परत घेता येईल. सभेत सूचक किंवा अनुमोदक यापैकी एकाधा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच दुपारी १.२० वाजेपर्यंत आपले नांव परत घता येईल. तरी कृपया ज्यांना महापौर पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना दुपारी १.२० वाजेपर्यंत आताच सांगितल्याप्रमाणे ज्यांना आपले नांव परत घेता येईल. मात्र या वेळेनंतर महापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दुपारी १.२० वाजले असून तिस (३०) मिनिटाचा वेळ संपलेला आहे. महापौर पदासाठी एकूण ७ उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले होते पैकी ५ उमेदवारांनी आपली उमेदवारी परत घेतलेली आहे.

१) श्री तनवाणी किशनचंद लेखराज
२) श्री जैन विकास रतनलाल
३) श्री कुमावत अविनाश लक्ष्मण
४) सौ तफीसुन्नीसा बेगम हबीबखॉ
५) श्री अयुबखॉ सरदारखॉ

आता महापौर पदाच्या निवडणुकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवारांची नावे** |
|---|---|
| १. | श्री डॉ कराड भागवत किसनराव |
| २. | श्री नासिरखान अ. रहेमानखान कुरैशी |

या २ उमेदवारांमध्ये महापौर पदाची निवडणूक होईल. ही निवडणूक सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ अन्वये गुप्त पध्दतीने घेण्यात येईल. सदर निवडणूक शांततेने व योग्य प्रकारे पार पाडता यावी. म्हणून खालील अधिकारी व कर्मचा-यांची निवडणूक कामासाठी आदेश क्रमांक मनपा/२०००/१६१ दिनांक २५/४/२००० व क्रमांक १७९ दिनांक

२७/४/२०००अन्वये केलेली नियुक्ती आणि या व्यतिरिक्त केलेल्या इतर नियुक्त्या कायम करण्यात येत असून, त्यांनी आजच्या सभेत होणा-या सर्व निवडणूकांसाठी त्यांना नेमून दिलेली कामे पार पाडवित.

**श्री तकीहसन खान:-** मतपत्रिका तयार करावयाची असून मी यापूर्वी सूचना केल्याप्रमाणे उर्दूतून मतपत्रिका तयार करावी. ठाणे, मुंबई येथे उर्दू भाषेतून मतपत्रिका तयार करुन दिल्या जातात व लोकसभेच्या निवडणूकीवेळी सुध्दा मतपत्रिका उर्दुतून नांवे लिहून येतात. त्यानुसार कार्यवाही करावी.

**पिठासन अधिकारी:**- सध्या वेळ पुरेसा नसल्याने उर्दुतून मतपत्रिका छापता येणार नाही. पुढील वेळी यावर विचार करण्यात येईल.

**पिठासन अधिकारी:**- आता महापौर पदांची गुप्त मतदान पध्दतीने निवडणूक घेण्यासाठी मतपत्रिका तयार करण्याकरिता एक तासाचा वेळ देण्यात येतो. मी एच. आर, बाहेती व श्री एच.एस.सपाटे यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी.

गोपनियता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर गोपनियतेच्या दृष्टीकोनातून अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळ प्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका एका तासात होतील व मतदानाला ठिक २.०० वाजता सुरुवात होईल.

**पिठासन अधिकारी:-** मतपत्रिका तयार झालेली आहे. आता मतदान प्रक्रियेस सुरुवात होईल. तत्पुर्वी मतपेटी रिकामी असल्याची सभागृहात दाखवावे. रिकामी असल्याचे मतपेटी दाखविल्यानंतर त्यास लॉक लावून व सिल करावे.

**श्री प्रकाश निकाळजे:**- मतदान पध्दतीची माहिती सभागृहाला द्यावी.

**पिठासन अधिकारी:**- मतपेटी जवळ नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहात दाखवून द्यावे व मतपेटीत कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून द्यावी व ती मोहोर बंद क रुन घ्यावी. (पिठासन अधिकारी स्वत:च्या सहिने मोहोरबंद करुन घेतील)

सभाकामकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरीता एखादया सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेय मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये. नगर सचिव यांनी कृपया मतदाना संबंधित सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावे.

**नगरसचिव:-** १. मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करातांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४. नियम क्रमांक ४५ (जे) नुसार जर मतपत्रिकेवर सभासदांने आपले नांव किंवा शब्द लिहला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रीतीने तिच्यावर काही खूण केली असेल, जी छिद्रांकित (परफोरेटरे) नसेल जिच्यावर मत नोंदले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरापयोगी होईल अशी मतपत्रिका अवैध समजली जाईल.

५. नियम क्रमांक ५० प्रमाणे प्रत्येक सदस्यांना एक मत देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्याच्या नावासमोर गुणाकाराची (x) फुली करावी.

**पिठासन अधिकारी:-** मतपत्रिका तयार करण्यात आली आहे. नमुना मतपत्रिका फलकावर चिटकवण्यात आली आहे. मतपत्रिकेवर अनुक्रमांक १ वर कराड डॉ. भागवत किशनराव यांचे नांव आहे व अ. क्र. २ वर नासिरखॉ अ. रहेमानखान कुरेशी यांचे नाव आहे.

आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभाग निहाय नांवे पुकारण्यात येतील सभा कामकाज नियमावलीचे नियम ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी १ तासाचा कालावधी देण्यात येते असून सभागृहातील घडयाळप्रमाणे आता दुपारचे २.४० वाजले असून मतदान ३.४० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर महापौर पदासाठी मतदान करता येणार नाही कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेने व सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे.

**जनसंपर्क अधिकारी:-** स. सदस्यांची नांवे पुकारतात वार्ड क्रमांक १०२ यांनी मतदानात भाग घेतल्यानंतर वार्ड क्रमांक १५ चे स. सदस्य श्रीमती किवळेकर जयश्री यांचे पतीची प्रकृती बरी नसल्याने दवाखान्यात दाखल असल्याने त्यांना अगोदर मतदानात भाग घेण्यासाठी नांव पुकारण्याचे मा, पिठासन अधिकारी यांनी सांगितले त्यांनुसार वार्ड क्र. १५ चे सदस्यांना मतदानात भाग घेतला त्यानंतर ४,५,६,७,८,९,१०,११,१२ व १३ चे वार्डातील सन्माननीय सदस्यांनी मतदानात भाग घेतला. परंतु वार्ड क्रमांक १४ चे सन्माननीय सदस्य यांना लिहिता व वाचता येत नसल्याचे अर्ज पिठासन अधिकारी यांचेकडे दिल्यावरुन पिठासीत अधिकारी यांनी खात्री करुन अर्ज मंजुर केला व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सन्माननीय सदस्य यांना मदत करण्यासाठी पिठासन अधिकारी यांनी सांगितले त्याप्रमाणे मतदानात भाग घेतला तर वार्ड क्रमांक १६ चे सन्माननीय सदस्य यांना लिहिता वाचता येत नसल्याने त्यांनी अर्ज पिठासन अधिकारी यांना दिल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन अति. शहर अभियंता यांनी सन्माननीय सदस्य यांना मदत करण्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी सांगतिले त्यानुसार मतदानात भाग घेतला. वार्ड क्र.१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२, व वार्ड क्र. ३३,३४,३५,३६,३७३८,३९,४०,४१,४२ पर्यंत मतदान झाल्यांनतर वार्ड क्रमांक ४३ चे मा. महापौर हे पिठासन अधिकारी असल्याने त्यांचे नांव पुकारल्यानंतर ते जागेवरुन उठतांना मा. उपमहापौर यांना महापौरांचा गाऊन घालुन दिला व पिठासन अधिकारी स्थानपन्न झाले. नंतर त्यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र ४४,४५,४६,४७,४८ पर्यंतचे मतदान होत

असतांना वार्ड क्रमांक ४५ चे सन्माननीय सदस्य यांनी मतदान करतेवेळी मतपत्रिका खराब झाली असल्याची तक्रार पिठासन अधिकारी यांचेकडे केली असता पिठासन अधिकारी यांनी सन्माननीय सदस्य यांना सदरची मतपत्रिका सरावा झालेली सिल करुन ठेवून दुसरी मतपत्रिका मतदानासाठी देण्यास सूचना केली.

याचवेळी पिठासन अधिकारी यांचे डायराजवळ लोकशाही आघाडीचे बरेचसे सन्माननीय सदस्य आले व जोरजोराने बोलत आक्षेप नोंदविला याचवेळी पुन्हा सेना भाजप युतीकडून त्याच प्रमाणात विरोध होऊन दोन्हीही बाजूने जोरजोरात बोलणे सुरु होते काहीही ऐकू येत नाही.

**श्री काशिनाथ कोकाटे:-** वार्ड क्रमांक ४५ चे सन्माननीय सदस्यांचे मतपत्रिका मतदान करतेवेळी खराब झाली असल्यास ती सभागृहात उघडून दाखववावी.

**पिठासन अधिकारी:**- मतदान करतेवेळी मतपत्रिका खराब झाली असल्याची तक्रार सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. त्यामुळे मतपत्रिका मतदान करण्यासाठी देण्यात यावी व १ ली खराब झालेली मतपत्रिका सिल करुन ठेवावी. जर खराब मतपत्रिका सभागृहात उघडून दाखविल्यास गुप्त मतदान पध्दतीचा भंग होईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे सूचनेनुसार तसे करता येणे शक्य नाही (व तसे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (आय) वाचून दाखविली)

यांनतर मतदान प्रक्रिया वार्ड क्र.४८ चे सन्माननीय सदस्यांनी मतदानात भाग घेतल्यानंतर पुन्हा वार्ड क्र. ४५ चे सन्माननीय सदस्यांना पिठासन अधिकारी यांचे सुचनेनुसार मतदानात भाग घेतला, (याच वेळी लोकशाही आघाडीचे सर्व सन्माननीय सदस्य जोरजोरात आरडून बोलत होते. त्यास सेना-भाजप युतीचे सन्माननीय सदस्यांनी त्याच प्रमाणत विरोध म्हणून तेही ओरडले. काहीही ऐकू येत नव्हते.)

**श्री रतनकुमार पंडागळे** वार्ड क्रमांक ४५ चे सन्माननीय सदस्य जी मतदान करीत असतांना खराब झाली असा संशय यावा म्हणून मतपत्रिका हाताने फाडली अशा प्रकारची पध्द्त चुकीची असून पुन्हा मतदानात भाग घेण्यास सन्माननीय सदस्यांना सहभागी होऊ देवू नये. याबाबतची आम्ही तक्रार नोंदवीत आहोत.

**श्री मिरा सलामी** वार्ड क्रमांक ४५ चे सन्माननीय सदस्य यांनी प्रथमत: मतदान केलेले असून, पुन्हा मतदान करण्यासाठी सूचना करणे योग्य नसून त्यांची मतपत्रिका बाद ठरवावी. अशी आमची मागणी असून पुन्हा मतदान प्रक्रियेत भाग घेण्यासाठी नांव पुकारणे योग्य नसून त्याबाबत आम्ही आक्षेप घेतो.

**श्री काशिनाथ कोकाटे** सन्माननीय सदस्य श्री ताठे यांनी पुन्हा मतदान प्रक्रियेत भाग घेतल्यास ते नियमाबाहय असून त्यांचे मत बाद ठरवावे. त्यांना मतदान करण्यास भाग देवू नये. त्याशिवाय सन्माननीय सदस्यांनी मतदान करते वेळी मतपत्रिका खराब झाली तेव्हा पिठासन अधिकारी यांचे मतपत्रिका खराब झाल्याचे लेखी तक्रार दिलेली आहे काय?

**श्री प्रकाश निकाळजे** वार्ड क्रमांक ४५ चे सन्माननीय सदस्यांनी मतदान करतेवेळी मतपत्रिका खराब झाल्याचे चुकीचा पायंडा पाडून पुन्हा मतदान करण्यास पिठासन अधिकारी यांनी सांगू नये.

**पिठासन अधिकारी** ठिक आहे. सन्माननीय सदस्य यांनी या संदर्भात लेखी तक्रार द्यावी. यांनतर वार्ड क्र. ४९ चे सन्माननीय सदस्य मतदानात भाग घेतात (तर वार्ड क्रमांक ५० चे सन्माननीय सदस्य मतदानात भाग घेण्यासाठी येतात तेव्हा दोन्हीही पक्षाकडील सन्माननीय सदस्य जोरजोरात आवाज करतात.)

वार्ड क्रमांक ५८ चे सन्माननीय सदस्यांनी मतदान प्रक्रियेत भाग घेतात त्यानंतर वार्ड क्रमांक ५१ व ५२ चे सन्माननीय सदस्यांनी मतदानात भाग घेतात तर वार्ड क्रमांक ५३ चे सन्माननीय सदस्य यांना अर्ज दिल्यावरुन त्यांना लिहीता वाचता येत नसल्याने त्यांनी लेखी अर्ज दिल्यावरुन व त्यांचा अर्ज मान्य झाल्यानतर मुख्य लेखाधिकारी यांना सहकार्य करावे असे मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना केली. वार्ड क्र. ५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७,६८,६९,७०,७१,७२, पर्यंतच्या सन्माननीय सदस्यांनी मतदानात भाग घेतला. तर वार्ड क्रमांक ७३ चे सन्माननीय सदस्य यांना मराठी येत नसल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना उपआयूक्त (प्र.) यांनी मतदानासाठी सहकार्य करावे.

पिठासन अधिकारी यांनी अशा सूचना केल्या. त्यानुसार त्यांनी मतदानात भाग घेतला तर, वार्ड क्रमांक ७४,७५,७६,७७,७८ व ७९ या सन्माननीय सदस्यांनी मतदानात भाग घेतला व वार्ड क्रमांक ८० च्या सन्माननीय सदस्य यांना मदतनीस साठी लेखी अर्ज केल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन पिठासीन अधिकारी यांनी विधी सल्लागार यांनी मतदानासाठी सहकार्य करावा. अशा सूचना दिल्या त्यानुसार त्यांनी मतदान केले. व वार्ड क्र. ८१,८२ यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र. ८३ चे सन्माननीय सदस्य यांना मराठी येत नसल्याने त्यांना लेखी अर्ज दिल्यावरुन त्यांचा अर्ज मान्य करुन आयुक्तांचे स्विय सहाय्यक यांनी सहकार्य करावे असे मा. पिठासन अधिकारी यांनी सुचना केली. त्यानुसार त्यांनी मतदानात भाग घेतला.

**पिठासन अधिकारी** आता दुपारी ३.४० वाजले असून मतदान संपले आहे, जसे मी घोषीत करातो, मतदान अधिकारी यांना आता मतपत्रिका देवू नयेत मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी लाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये ही आपणांस विनंती करण्यात येत आहे.

**पिठासन अधिकारी** मतमोजणीचे काम पूर्ण झाले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकूण मतदान | ८३ |
| अवैध मते | -- |
| वैध मते | ८३ |

श्री डॉ कराड भागवत किसनराव यांना पडलेली मते-४३ श्री नासेरखॉ अब्दुल रहेमानखॉ यांना पडलेली मते-४०.

मतमोजणीच्या निकालावरून मी असे घोषीत करतो की, महापौर पदासाठी श्री डॉ कराड भागवत किसनराव यांची निवड झाली असून ते ३

मतांनी विजयी झालेले आहे. मी प्रथम त्यांचे अभिनंदन करुन त्यांना विनंती करतो की, त्यांनी महापौर पदाची सुत्रे स्विकारुन आसन ग्रहण करावे ही विनंती.

डॉ कराड भागवत किसनराव हे पिठासन अधिकारी यांचेकडून गाऊन घेऊन महापौर यांच्या आसनावर विराजमान झाले व पिठासन अधिकारी म्हणून सुत्रे स्विकारली. यासाठी प्रशासनातर्फे महानरगपालिके अधिकारी संघटनतर्फे व स. सदस्यांनी पुष्पगुच्छ देवून नुतन महापौरांचे स्वागत केले.

**ठराव क्र. १ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) व महानगरपालिका महापौर आरक्षण नियम १९९४ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग मुंबई दिनांक ५/८/१९९९ ची अधिसुचनेनुसार नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी राखीव असलेल्या महापौर पदासाठी झालेल्या मतदानानुसार डॉ भागवत कराड यांना ४३ आणि श्री नासेरखॉन अ. रहेमानखॉन यांना ४० मते मिळाली असून डॉ भागवत कराड हे महापौर पदी ३ मतांनी विजयी झाल्याचे पिठासन अधिकारी यांनी घोषित केले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. २ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वये उपमहापौर पदावर निवड करणे.

**संवाद**

**पिठासन अधिकारी** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वये उपमहापौर पदासाठी आजच्या सभेत निवड करण्याकरिता दिनांक १३/४/२००० रोजी सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५, व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला. दिनांक १७ एप्रिल २००० ते २५ एप्रिल २००० पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २५ एप्रिल २००० रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत उपमहापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | श्री जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | श्री तकीहसन खान कासीम हसन खान | श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव |
| २. | श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | श्री अंबादास एकनाथराव दानवे | श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर |
| ३. | श्री शेख इलियास किरमानी शेख उमर | श्री शेख शकील शेख बुठण पटेल | श्री गाजी सोदाद्दीन गाजी जहीर अहमद |
| ४. | श्री अयुब खॉ सरदार खॉ | १) श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख | १) श्री सलीम पटेल शमशेर पटेल |
| | | २) श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख | २) सलीम पटेल शमशेर पटेल |
| | | ३) श्री मिर हिदायत अली मिर बसालत | ३) श्री ठकुजी रामसिंग वाणी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अली | |
| ५. | श्री आफसर खॉ यासीन खान | श्री स. मुमताज अली स. मोज्जम अली | श्री स. अब्दुल कादीर स. उमीर |
| ६. | श्री निकळजे प्रकाश भाऊराव | श्री सालवे माणिक लक्ष्मण | श्री शे. मुनाफ शे. यासीन |
| ७. | श्री रगडे भगवान दगडूजी | सौ इंगळे शंकुला सांडूजी | सौ खरात कुसून दौलत |
| ८. | सौ साधना गणेश सुरडकर | श्री ताठे भाऊसाहेब पुंडलीक | श्री देसरडा प्रशांत सुभाष |
| ९. | श्री शिदे राजु रामराव | सौ सुवर्णा उमेश चंदात्रे | सौ मानकापे पार्वती लहानू |
| १०. | श्री वसंत पांडूरंग नरवडे | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | श्री जगताप मोतीलाल सुभाष |

वरील प्रमाणे उपमहापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशिन पत्रांची छाननीचे काम, सभाकामकाज नियमावलीच्या नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता करण्यात येत आहे.

**पिठासन अधिकारी** उपमहापौर पदांसाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी पूर्ण झाली असून खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले आहेत.

वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांनी आपला स्वाक्षरी केलेला अर्ज आपले सूचक व अनुमोदक यांच्या संमतीने परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोपैकी जो काणी सभेला उपस्थित आहे, त्यांच्या संमतीने १५ मिनिटाच्या अवधित म्हणजेच दुपारी ५.१५ वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना उपमहापौर पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाचे असेल त्यांना दुपारी ५.१५ वाजेपर्यंत आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव परत घेता येईल. मात्र या वेळेनंतर उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पिठासन अधिकारी** उपमहापौर पदासाठी १० उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खालील प्रमाणे ८ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतली आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे** |
|---|---|
| १. | श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग |
| २. | श्री शेख इतिलयास किरमानी शे उमर |
| ३. | श्री अयुबखॉ सरदारखॉ |
| ४. | श्री निकाळजे प्रकाश भाऊराव |
| ५. | श्री अफसरखॉ यासिनखॉ |
| ६. | श्री रगडे भगवान दगडूजी |
| ७. | सौ साधना गणेश सुरडकर |
| ८. | श्री शिंदे राजू रामराव |

आता उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १. | श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| २. | श्री वसंत पांडूरंग नरवडे |

या २ उमेदवांरामध्ये उपमहापौर पदाची निवडणूक होईल. ही निवडणूक सभाकामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ अन्वये गुप्त पध्दतीने घेण्यात येईल. सदर निवडणूक शांततेने व योग्य प्रकारे पार पाडता यावी म्हणून अधिकारी व कर्मचा-यांची निवडणूक कामासाठी आदेश क्र. मनपा/२०००/१६१/दिनांक २५/०४/२००० व क्रमांक १७९ दिनांक २७/०४/२००० अन्वये केलेली नियुक्ती आणि या व्यतिरिक्त केलेल्या इतर नियुक्त्या कायम करण्यात येते असून त्यांनी आजच्या सभेत होणा-या सर्व निवडणुकांसाठी त्यांना नेमून दिलेली कामे पार पाडावित.

आत उपमहापौर पदांची गुप्त मतदान पध्दतीने निवडणूक घेण्यासाठी मतपत्रिका तयार करण्याकरिता एक तासाचा वेळ देण्यात येतो. श्री एच. आर. बाहेती व श्री एच. एस. सपाटे यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी.

गोपनियता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर गोपनियतेच्या दृष्टीकोनातून अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिलली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका एका तासात तयार होतील व मतदानाला सुमारे ६.३० वाजता सुरुवात होईल.

**पिठासन अधिकारी** मतपेटी जवळ नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे. व मतपेटीला कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून द्यावी व ती मोहोर बंद करुन घ्यावी. (पिठासन अधिकारी स्वतःच्या सहीने मोहेबंद करुन घेतील)

सभाकामकाज नियमावलीने नियम क्रमांक ५१ अन्वेय मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखादया सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांची कृपया गर्दी करु नये.

नगर सचिव यांनी कृपया मतदानासंबंधिच्या सुचना सभागृहाच्या निदर्शास आणून द्यावे

**नगर सचिव** १) मतदानात प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोदंवावे.

३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४) नियम क्रमांक ४५ (जे) नुसार जर मतपत्रिकेवर सभासदांचे आपले नांव किंवा शब्द लिहला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खूण केली असेल. जी छिद्रां किंवा (परफोरेटेड) नसेल जिच्यावर मत नोदंले नसेल अथवा जी संदिग्धते मुळे निरोपयागी होईल, अशी मतपत्रिका अवैध समजली जाईल.

५) नियम क्रमांक ५० प्रमाणे प्रत्येक सदस्यांना एक मत देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्याच्या नांवा समोर गुणाकाराची (x) फुली करावी.

**श्री प्रकाश निकाळजे** प्रत्येक उमेदवाराने एका नावापुढे किती फुल्या माराव्यात म्हणजे मत वैध ठरेल किंवा अवैध ठरेल याची माहिती द्यावी.

**श्री काशिनाथ कोकाटे** मा. महापौर पदाच्या निवडणूकीच्या वेळी मतदान प्रक्रिया चालू असतांना किती स. सदस्यांनी मतपत्रिकेसोबत काही लिहून पैसे टाकले याची माहिती द्यावी.

**पिठासन अधिकरी** मी स्वत: उमेदवार असल्याने याची मला कल्पना नाही.

**काशिनाथ कोकाटे** याबाबत माझे म्हणणे असे आहे की, अशा प्रकारे मतदान प्रक्रिया चालू असतांना एखादया स. सदस्यांनी मतपत्रिके सोबत पैसे टाकणे म्हणजे गुप्त मतदान पध्दतीचा भंग झालेला आहे. असे दिसून येते.

**पिठासन अधिकारी** या बाबत दुरुस्ती संदर्भात सभा कामकाज नियमावलीप्रमाणे जे काही नियम आहेत त्याची माहिती सचिवांनी द्यावी.

**सचिव** सभाकाज नियमावलीतील नियम ४७ (जे) नुसार जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहले असेल अथवा तो ओळख ाता येईल अशा रितीने तिच्यावर काही खुण केली असेल, जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल, जिच्यावर मत नोंदले नसेल अथवा जी संदीग्धतेमुळे निरोपयोगी होईल अशी मतपत्रिका अवैध समजली जाईल.

**श्री प्रकाश निकाळजे** मतदान प्रक्रियेच्या वेळी काही स. सदस्यांनी साहित्य टाकले तर काहींनी लिहून ठेवले तर काहींनी पैसे टाकले या सर्व बाबी गुप्त मतदान पध्दतीवर भंग करणारी आहे. ते बरोबर नाही. जर एखादया मतपत्रिकेवर एखादी खूण किंवा निशानी आढळल्यास त्यावर आक्षेप घेऊन ते मत बाद ठरवावे.

**पिठासन अधिकारी** महानगरपालिकेच्या सभा कामकाज नियमानुसार मतपत्रिकेवर एखादी खूण किंवा निशानी आढळून आल्याने ते मत अवैध ठरविले जाईल. परंतु त्या मतपत्रिकवर खूण किंवा निशाणी कोण करतात याची माहिती आपल्याला नसते त्यामुळे आक्षेप घेता येत नाही काणत्याही बाबी पेपरवरुन दिसुनही ते आपणास माहिती देता येत नाही.

**श्री प्रकाश निकाळजे** कोणत्याही मतपत्रिकेवर ओळख येणारी निशानी आढळल्यास किंवा खूण असल्याचे आक्षेप बाब आढळल्यास ते मत बाद ठरवावे.

**पिठासन अधिकारी** मतपत्रिकेवर मतदान प्रक्रियेवेळी कोण रु. ५८ किंवा १०८ टाकतात याची माहिती आपल्याला नसते त्यामुळे तसे मत बाद ठरविणे शक्य नाही प्रत्येक मतदान हे गुप्त पध्दतीने टाकल्या जाते. याशिवाय मतपत्रिका वर काही खुणा किंवा निशानी आढळल्यास किंवा वस्तू आढळल्यास तशी मतपत्रिका बाद ठरविता येणार नाही. कारण प्रत्येकाचे मत हे अमुल्य मत

असते. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही मतपत्रिका बाद ठरविता येत नाही. आता जास्त याबाबत चर्चा न करता मतदान प्रक्रियेला सुरुवात करावी. मी सर्व स. सदस्यांना विनंती करतो की, या सभागृहाचे काम सरळपणे व शातपणे चालविण्यासाठी गुप्त मतदान पध्दतीत कुणीही काही टाकू नये. पंरतु तशा प्रकारची वस्तु आढळल्यास कुणाचेही मत बाद करता येणार नाही.

**श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद** मा. महापौर साहेब हे पिठासन अधिकारी म्हणून काम पाहत असतांना त्यांनी न्याय देवतेचे काम करावे. कुणावरही अन्याय करु नये याची खबरदारी घ्यावी.

**पिठासन अधिकारी** स. सदस्य श्री नंदकुमार घोडेले व वसंत नरवडे पाटील हे दोन उमेदवार उपमहापौर पदासाठी निवडणूक लढवित आहेत.

**श्री स. अली मिरा सलामी** मतदान प्रक्रिया चालू असतांना काही वस्तू मतपत्रिकेत आढळल्यास त्याबाबत नियमाप्रमाणे योग्य की अयोग्य याची माहिती मा. आयुक्त यांनी द्यावी.

**पिठासन अधिकारी** मतदान प्रक्रियेच्या वेळी मतपत्रिकेत कुणीही स. सदस्यांनी काही टाकू नये अशा सूचना मी केलेल्या आहेत. परंतू मतपत्रिकेत काही सापडल्यास ती मतपत्रिका बाद करावी असे कुठेही नियमात नाही.

**श्री अफसरखान** पत्रकार गॅलरीत पत्रकारांशिवाय कुणही जावू नये यांची सूचना द्यावी त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी बसलेले दिसत आहेत.

**पिठासन अधिकारी** मतपत्रिका तयार करण्यात आली आहे नमूना मतपत्रिका फलकांवर चिटकवण्यात आली आहे. मतपत्रिकेवर अनुक्रमांक १ तर घोडके नंदकुमार राधाकिसन यांचे नांव आहे व अ.क्र. २ वर नरवडे वसंत पांडूरंग यांचे नांव आहे.

आता मतदानाला सरुवात होत आहे. प्रभागनिहाय नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाज नियमावलीने नियम ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी १ तासाचा कालावधी देण्यात येत असून, सभागृहातील घडयाळाप्रमाणे आता दुपारचे ६.३० वाजले असून मतदाने ७.३० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळी संपल्यानंतर उपमहापौर पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेने व सुरळीतपणे पार पाडण्यास सहाकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे.

**जनसंपर्क अधिकारी** वार्ड क्रमांक १,--३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ पर्यंतचे मतदान झाल्यानंतर वार्ड क्रमांक १४ चे स. सदस्य यांना लिहिता वाचता येत नाही असा अर्ज पिठासन अधिका-यांकडे दिलेला असल्याने त्यांना अर्ज मंजुर केल्यानतंर अति शहर अभियंता यांनी सहाकार्य करावे अशी सुचना मा. पिठासन अधिकारी यांनी केला. त्यानुसार त्यांनी मतदानात भाग घेतला वार्ड क्र. १५ चे स. सदस्य यांनी तर वार्ड क्र. १६ चे स. सदस्य यांना लिहता वाचता येत नाही. असा अर्ज दिला असल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य करावे अशी सूचना मा. पिठासन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदानात सहभाग घेतला, वार्ड क्र. १७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२ व ३३ च्या वार्ड स. सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र. ३४ मा. महापौर तथा पिठासन

अधिकारी यांचे नांव पुकारल्यानंतर त्यांचे जागेवरुन ऊठून मा. उपमहापौर यांना गाऊन घालून दिला व आसानावर बसविले व मतदान केले त्यांनंतर वार्ड क्रमाक ३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१ व ५२ चे स. सदस्यांनी भाग घेतला व मतदाने केले तर वार्ड क्रमांक ५३ चे स. सदस्य यांना लिहिता वाचता येत नसल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन आरोग्य वैद्यकीय आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मतदानासाठी सहकार्य करण्याचे मा. पिठासन अधिकारी यानी सूचना केली तर, वार्ड क्रमांक ५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७,६८,६९,७०,७१ व ७२ यांनी मतदान केले तर वार्ड क्रमांक ७३ चे स. सदस्यांना मराठी येत नसल्याने त्यांनी अर्ज दिल्यावरुन व त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना मा. आयुक्तांचे स्विय सहाय्यक यांनी सहकार्य करावे.

अशी सुचना मा. पिठासन अधिकारी यांनी केले. त्यांनुसार मतदान केले व वार्ड क्रमांक ७४,७५,७६,७७,७८,७९ यांनी मतदान केले तर वार्ड क्र. ८० चे स. सदस्य यांना लिहिता वाचता येत नसल्याने त्यांनी अर्ज दिल्यानुसार व त्यांचा अर्ज मंजुर केल्यानुतर त्यांना विधी सहाय्यक यांनी सहकार्य करावे. अशी सूचना मा. पिठासन अधिकारी यांनी केली. त्यांनुसार मतदान केले व वार्ड क्रमांक ८१ व ८२ यांनी मतदान केले तर वार्ड क्रमांक ८३ चे स. सदस्य यांना मराठी येत नसल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य करण्याचे मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना केली. त्यानुसार मतदान केले.

**पिठासन अधिकारी** आता ७.१५ वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करतो मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाचा फट बंद करावी. अशी सुचना मा पिठासन अधिकारी यांनी केले. त्यानुसार मतदान केले व वार्ड क्रमांक ७४,७५,७६,७७,७८,७९ यांनी मतदान केले तर वार्ड क्रमांक. ८० चे स. सदस्य यांना लिहिता वाचता येत नसल्याने त्यांनी अर्ज दिल्यानुसार व त्यांचा अर्ज मंजुर केल्यानंतर त्यांना विधी सहाय्यक यांनी सहकार्य करावे अशी सूचना मा. पिठासन अधिकारी यांनी केली. त्यानुसार मतदान केले व वार्ड क्रमांक ८१ व ८२ यांनी मतदान केले तर वार्ड क्रमांक ८३ चे स. सदस्य यांना मराठी येत नसल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य करण्याचे मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना केलली. त्यानुसार मतदान केले.

**पिठासन अधिकारी** आता ७.१५ वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करतो मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाचा फट बंद करावा व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या प्रतिनिधीतुन मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये ही आपणांस विनंती.

**पिठासन अधिकारी** मतमोजणीचे काम पूर्ण झाले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

एकूण मतदान ८३

अवैध मते ००
वैध मते ८३
मी नंदकुमार घोडेले यांना पडलेली मते - ४०
श्री वसंत नरवडे पाटील यांना पडलेली मते - ४३

मतमोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित केले की, उपमहापौर पदासाठी श्री वसंत नरवडे पाटील यांची निवड झाली असून ते ३ मतांनी विजयी झालेले आहेत मी प्रथम त्यांचे अभिनंदन करुन त्यांना विनंती करतो की, त्यांना उपमहापौर पदाची सुत्रे स्विकारुन आसन ग्रहन करावे.

**ठराव क्र. २ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (१) अन्वये उपमहापौर पदासाठी झालेल्या मतदानानुसार श्री नंदकुमार घोडेले यायंना ४० आणि श्री वसंत नरवडे यांना ४३ मते मिळाले असून श्री वसंत नरवडे पाटील हे उपमहापौर पदी तीन मतांनी विजयी झाल्याचे पिठासन अधिकारी यांनी घोषित केले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सर्व स. सभासदांच्या मागणीनुसार आजची सभा तहकुब करण्यात येऊन उर्वरित कामकाजासाठी दिनांक. २ मे २००० रोजी सभेचे आयोजन करण्यात यावे असे मा. महापौर यांनी घोषित केले व जनगनमन या राष्टगीताने आजच्या सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक ०२/०५/२००० रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**दिनांक ०२/०५/२००० रोजी तहकुब करण्यात आलेली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील " कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "मंगळवार दिनांक २ मे २००० रोजी मा. महपौर डॉ. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली" "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील नगरसेवक उपस्थीत होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | उपमहापौर |
| २) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | स. सभासद |
| ३) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ४) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ५) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ६) स. स. श्री औतडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ७) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ८) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ९) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १०) स. स. श्री कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ११) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) स. स. श्री पवार मंदाबाई प्रभाकर | -//- |
| १३) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १४) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १५) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १६) स. स. श्रीमती किवलेकर जयश्री सारंग | -//- |
| १७) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १८) स. स. श्री शे शकील पटेल शे. बुढन पटेल | -//- |
| १९) स.स. डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २०) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २१) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २२) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २३) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २४) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २५) स. स. सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २६) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २७) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २८) स. स. श्री नकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २९) स. स. श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३०) स. स. श्री अय्युब खॉ सरदार खॉ | -//- |
| ३१) स. स. श्री अब्दुल रशिद अब्दुल सत्तार | -//- |
| ३२) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |

३३) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल -//-
३४) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग -//-
३५) स. स. श्री आनंद विनायक तांदुळवाडीकर -//-
३६) स. स. सौ. रशिदा बेगम गफफार यार खॉन -//-
३७) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३८) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३९) स. स. श्री स. मुमताज अली मोज्जम अली -//-
४०) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
४१) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
४२) स. स. श्री थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव -//-
४३) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४४) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४५) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४६) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४७) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४८) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४९) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ -//-
५०) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
५१) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
५२) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
५३) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
५४) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
५५) स. स. श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद -//-
५६) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५७) स. स. श्री अशरफ मोतीवाला -//-
५८) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५९) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
६०) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे -//-
६१) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
६२) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
६३) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागिरथ -//-
६४) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
६५) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
६६) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
६७) स. स. श्री गाजी सादोउद्दीन गाजी जहीर अहमद -//-
६८) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
६९) स. स. सौ तफिसउन्नीसा बेगम हबीबखा -//-
७०) स. स. श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख -//-
७१) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
७२) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
७३) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
७४) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-

| | |
|---|---|
| ७५) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल | -//- |
| ७६) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान | -//- |
| ७७) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ७८) स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | -//- |
| ७९) स. स. सौ बबीता सुभाष कागडा | -//- |
| ८०) स. स. श्री सय्य्द अली सलामी सय्यद मिरा सलामी | -//- |
| ८१) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज | -//- |
| ८२) स. स. सौ निखत परवीन इजाज अली | -//- |

**विषय क्रमांक ३ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (२) अन्वये स्थायी समितीच्या १६ (सोळा) सभासदांची निवड करणे.

**संवाद**

**पिठासन अधिकारी** आजची सभा मंगळवार दिनांक २ मे २००० पर्यंत तहकुब करण्यात येते.

**पिठासन अधिकारी** दिनांक २९/४/२००० ची तहकुब करण्यात आलेली सभा आज दिनांक २ मे २००० रोजी सुरु होत आहे.

**अंबादास दानवे** मा. उप महापौर यांच्या निवडी बद्दल अभिनंदन त्याचप्रमाणे स.स. श्रीमती किवळेकर यांच्या पतीचे दुखःद निधन झाले त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी. तसेच श्रीमती कुसूमताई रंगणेकर यांच्या पतीने निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली वाहण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** श्रध्दाजंली वाहण्यात यावी.

**पिठासन अधिकारी** ठिक आहे सभागृहात ००.०२ मिनिट श्रध्दांजली वाहण्यात यावी. (त्याचप्रमाणे सभागृहात स. स. श्रीमती किवळेकर यांचे पती सारंग किवलेकर व श्रीमती कुसूमताई रंगणेकर यांचे पती नुकतेच दुखःद निधन झाल्याने त्यांना श्रध्दाजंली वाहण्यात यावी.)

**पिठासन अधिकारी** स. स. ना विनंती की, आपआपले मोबाईल फोन सभागृहात येतांना बंद करुन ठेवावेत.

**श्री अंबादास दानवे** मा. महापौर व मा उप महापौर यांचे निवडीबाबत अभिनंदन करावे.

**पिठासन अधिकारी** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (२) अन्वये स्थायी समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक १३/४/२००० रोजी औरंगाबाद महनगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला. त्यानुसार दिनांक १७ एप्रिल २००० ते २२ एप्रिल २००० पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्वीकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २२ एप्रिल २००० रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थायी संमिती सदस्य पदासाठी खालीलप्रमाणे ३७ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहेत तसेच सभाकामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| अ.क्र. | सुचकाचे नांव | उमेदवाराचे नावं | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम | श्री जगदिश कन्हैयलाल सिध्द | श्री तनवाणी किसनचंद लेखराज |
| २. | श्री आनंद विनायक तांदुळवाडीकर | श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | श्री फुलारी नंदकुमार माधवराव |
| ३. | सौ निर्मला विठ्ठल कांबळे | श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | सौ शिंदे रुक्मीणी राधाकिसन |
| ४. | श्री शिरसाठ संजय पांडूरंग | श्री लकडे भरत श्रीपती | श्री जैन विकास रतनलाल |
| ५. | श्री शे.शकील शे. बुढण | श्री पंडागळे रतनकुमार नारायण | श्री. अब्दुल रशीद अब्दुल सत्तार |
| ६. | सौ साजेदा बेगम विखार अहमद | श्री तकी हसनखान कासीम हसनखान | श्री अब्दुल रशीद अब्दुल सत्तार |
| ७. | श्री शे.शकील शे. बुढण | श्री अशरफ मोतीवाला | अब्दुल रशीद अब्दुल सत्तार |
| ८. | १) सौ सुलताना बेगम चाँद खान<br>२) श्री इलियास किरमाणी | कैसन खान बद्रोद्दीन खान | १) श्री तकीहसन खान कासीम हसन खान<br>२) सौ साजेदा बेगम विखार अहमद |
| ९. | श्री अब्दुल रशीद अब्दुल सत्तार | श्री जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | सौ घायतिलक लिलावती |
| १०. | श्री नासीरखान रहेमान अ. कुरैशी | सौ.सुरगोणिवार नारायण चंद्रय्या | सौ घायतिलक लिलावती |
| ११. | श्री शे.शकील शे. बुढण | सौ नुसरत बानो फिरोजखान | श्री मिर हिदायत अली मिर बसालत अली |
| १२. | श्री वाणी ठकुजी रामसिंग | तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | श्री शे.शकील शे. बुढण |
| १३. | श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | श्री तायडे पांडूरंग यशवंतराव |
| १४. | श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख | सौ तफिस उन्नीसा बेगम हबीब खान | सौ रशीद बेगम गफ्फार यारखान |
| १५. | श्री शिंदे किशोर रावसाहेब | श्री वसंत पांडूरंग नरवडे | श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख |
| १६. | श्री शिंदे किशोर रावसाहेब | श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख |
| १७. | श्री स. मुमताज अली मौज्जम अली | श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद | श्री नासेर खान सरदार खान |
| १८. | सौ साजेदा बेगम विखार अहमद | श्री शे. मुनाफ शे. यासीन | कैसन खान बद्रोद्दीन खान |
| १९. | श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख | श्री सलीम पटेल समशेर पटेल | श्री अय्युब खॉ सरदार खॉ |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | सौ साजेदा बेगम विखार अहमद | श्री स. अली स. मिरा सलामी | श्री मिर हिदायत अली मिर बसालत अली |
| २१. | १) सौ साजेदा बेगम विखार अहमद<br>२) श्री अयुब खान सरदार खान | श्री अफसर खान यासीन खान | १) श्री इलियास किरमाणी<br>२) श्री शेख इसाक जैनोद्यीन शेख |
| २२. | १) इंगळे शकुंतला सांडुजी<br>२) श्री शेख इसाक जैनोद्यीन शेख | सौ खरात कुसूमबाई दौलत | १) श्री रगडे भगवान दगडूजी<br>२) सौ साजेदा बेगम विखार अहमद |
| २३. | श्री शेख इसाक जैनोद्यीन शेख | श्री स. सलीम स. युसुफ | श्री अय्युब खॉ सरदार खॉ |
| २४. | श्री अय्युब खॉ सरदार खॉ | सौ शाहिन जफर व महेमुद जफर | सौ साजेदा बेगम विखार अहमद |
| २५. | १) सौ साजेदा बेगम विखार अहमद<br>२) श्री तकीहसन खान कासीम हसन खान | सौ निखत परविन ईजाज अली | १) श्री स. सलीम स. युसुफ<br>२) जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग |
| २६. | श्री इलियास किरमाणी | श्री गाजी सादोद्यीन गाजी जहीर | सौ साजेदा बेगम विखार अहमद |
| २७. | सौ कुलकर्णी जयश्री विजय | श्री गणेश रामचंद्र तांबे | श्री ताठे भाऊराव पुंडलीक |
| २८. | श्री देसरडा प्रशांत सुभाष | सौ मोरे जयश्री कुमारराव | सौ बबीता सुभाष कागडा |
| २९. | श्री शिंदे राजु रामराव | श्री कवडे साहेबराव राजुबा | सौ साधना गणेश सुरडकर |
| ३०. | सौ साधना गणेश सुरडकर | सौ विजया किशोर राहटकर | सौ कुलकर्णी जयश्री विजय |
| ३१. | सौ पवार मंदाबाई प्रभाकर | सौ किवळेकर जयश्री सारंग | सौ संगिता बाळू मैंद |
| ३२. | १) सौ सुवर्णा उमेश चंद्रात्रे<br>२) सौ आशा उत्तम बिनवडे | श्री सावंत मधुकर दामोधर | १) सौ आशा उत्तम बिनवड<br>२) सौ मानकापे पार्वती लहानु |
| ३३. | श्री देसरडा प्रशांत सुभाष | श्री डॉ. कराड भागवत किसनराव | श्री ताठे भाऊांसाहेब पुंडलीक |
| ३४. | श्री शिरसाठ संजय पांडूरंग | श्रीमती कांबळे निर्मला विठ्ठल | श्री जैन विकास रतनलाल |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | श्री साळवे माणिक लक्ष्मण | सौ साजेदा बेगम विखार अहमद |
| ३६. | श्री अंबादास एकनाथराव दानवे | श्री जैन विकास रतनलाल | सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर |
| ३७. | सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर | श्री थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव | श्री अंबादास एकनाथराव दानवे |

वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना आपला स्वाक्षरी केलेला अर्ज आपले सुचक व अनुमोदक यांच्या समंतीने परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादया उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच १२.०० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल.

**श्री प्रकाश निकाळजे, श्री काशीनाथ कोकाटे** जवळपास (१) एका तासाचा अवधी नामनिर्देशित फॉर्म परत घेण्यासाठी देण्यात यावा.

**मा. महापौर** ठिक आहे ४५ मिनिटाचा अवधी देण्यात येता.

**श्री. अफसरखान यासीनखान, श्री. काशीनाथ कोकाटे :** कमीत कमी (१) एका तासाचा अवधी देण्यात यावा.

**पिठासन अधिकारी** तरी कृपया ज्यांना स्थायी समिती सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे त्यांना आपली नांव १२.१५ वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र या वेळेनंतर स्थायी समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पिठासन अधिकारी** स्थायी समिती सदस्य पदासाठी ३७ उमेदवांरापैकी विहित मुदतीत खालीलप्रमाणे १८ उमेदवारांना आपले उमेदवारी अर्ज परत घेतली आहेत.

**अ.क्र. उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे**

१) अब्दुल कादीर मौलाना सय्यद
२) कराड डॉ भागवत किसनराव
३) कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) सौ कांबळे निर्मला विठ्ठल
५) तकीहसन खॉ कासिम हसन खॉ
६) थोरात दत्तात्रय ऊर्फ बाळासाहेब रामराव
७) नुसरत बानो फिरोजखॉन
८) वसंत पाडूरंग नरवडे
९) शाहिन जफर महमुद जफर
१०) शे. मुनाफ शे. यासीन
११) स. अली स. मिरा सलामी
१२) साळवे माणिक लक्ष्मण
१३) किवळेकर जयश्री सारंग

१४) निखत परविन इजाज अली
१५) अफसर खॉ यासीनखॉ
१६) पंडागळे रतनकुमार
१७) मोरे जयश्री कुमारराव
१८) तफिसुन्नीसा बेगम

आता स्थायी समिती सदस्य निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

**अ.क्र. उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे**

१) अशरफ मोतीवाला
२) कवडे साहेबराव राणुबा
३) कुमावत अविनाश लक्ष्मण
४) कैसरखान बद्रोद्यीन खान
५) खरात कुसुमबाई दौलत
६) गणेश रामचंद्र तांबे
७) गाजी सादोद्यीन गाजी जहीर
८) जगताप मोतीलाल रघुनाथ
९) जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
१०) जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
११) जैन विकास रतनलाल
१२) तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
१३) लकडे भरत श्रीपती
१४) वाघ भाऊसाहेब बाबुराव
१५) विजया किशोर राहटकर
१६) सलिम पटेल समशेर पटेल
१७) स. सलिम स. युसुफ
१८) सावंत मधुकर दामोधर
१९) सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

गोपनियता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर गोपनीयतेच्या दृष्टीकोनातून अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका एका तासात तयार होतील व मतदान सुमारे १.३५ वाजता सुरुवात होईल.

**पिठासन अधिकारी** (सभला सुरुवात ३.५० वाजता) मतपेटी जवळ नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे व मतपेटीला कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून द्यावी व ती मोहोर बंद करुन घ्यावी. (पिठासन अधिकारी स्वत:च्या सहीने मोहोरबंद करुन घेतील.

सभाकामकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांना मतमोजणी पाहण्याकरिता एखादया सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून

पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगरसचिव यांनी कृपया मतदाना संबंधिच्या सुचना सभागृहाच्या निर्दशनास आणून द्यावे.

**नगरसचिव** १) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोदंवावे.

३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासन अधिकारी यांच्या अनुतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४) नियम क्रमांक ४५ (जे) नुसार जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खूण केली असेल, जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल, जिच्यावर मत नोंदले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरोपयोगी होईल. अशी मतपत्रिका अवैध समजली जाईल.

५) नियम क्रमांक ६२ प्रमाणे प्रत्येक सदस्यांना १६ मते देण्याचा अधिकार आहे. मतदान करते वेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मते द्यावयाची असतील त्यांच्या नावांसमोर गुणाकारांची (x) फुली करावी. तसेच सदरची मते एकाच उमेदवारास किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारास आपल्या इच्छेनुसार देता येतील मात्र १६ पेक्षा जास्त मते देवू नयेत.

**पिठासन अधिकारी** नमुना मतपत्रिका फलकावर चिकटवण्यात आली आहे. आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी १ तासाचा कालावधी देण्यात येत असून सभागृहातील घडयाळा प्रमाणे आता दुपारचे ४.५५ वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सदस्य पदासाठी मतदान करता येणार नाही कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेने सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे. अशी सर्वांना विनंती आहे.

**जनसंपर्क अधिकारी** (मा. महापौर यांचे सुचनेवरुन प्रथमत:) वार्ड क्रमांक १५ चे स. स. यांनी मतदान केले तर वार्ड क्रमांक १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२ व १३ चे सदस्यांनी मतदाने केले तर वार्ड क्रमांक १४ चे सदस्यांनी लिहिता वाचता येत नसल्याने मतदानात सहकार्य करणेसाठी अर्ज दिल्यावरुन मा. पिठासन अधिकारी यांना अर्ज मंजुर करुन मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य करावे अशी सूचना केली. त्याचप्रमाणे वार्ड क्रमांक १६ चे सदस्यांना लिहिता वाचता येत नसल्याने अर्ज दिल्यावरुन व त्यांचा अर्ज मंजुर करुन उपआयुक्त (प्र.) यांनी सहकार्य करावे असे मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना केली व त्यानुसार मतदान कले त्यानंतर वार्ड क्र. १७ व १८ चे स.स. नी मतदान केले. तर वार्ड क्रमांक १९ चे सदस्यांनी लिहिता वाचता

येत नसल्याचे अर्ज दिल्यावरुन व त्यांचा अर्ज मंजुर करुन मा. पिठासन अधिकारी यांनी क. लि. शहापुरकर यांना मतदानास सहकार्य करणेची सुचना केली. तर वार्ड क्र. २०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१, ३२ व ३३ चे सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ३४ चे मा. पिठासिन अधिकारी यांचे नांव पुकारल्यानंतर त्यांनी मा. उपमहापौर यांना गाऊन घातला व त्यांच्या जागेवर बसविले व मतदानात भाग घेतला. तर वार्ड क्र. ३५ चे सदस्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ३६ चे सदस्य यांना मराठी येत नसल्याने त्यांनी मदतनीससाठी दिलेला अर्ज मंजुर करुन अति. शहर अभियंता यांनी मतदान करण्यास सहकार्य करावे. अशी सूचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ३७,३८,३९ व ४० चे सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्रमांक ४१ यांनी दिलेल्या अर्जानुसार त्यांना मराठी येत नसल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना विधी सहाय्यक यांनी सहाकार्य करावे अशी सूचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ४२,४३,४४,४५ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्रमांक ४६ चे सदस्यांनी मराठी येत नसल्याचे अर्ज दिल्यावरुन व त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना मा. आयुकतांचे स्विय सहाय्यक यांनी सहकार्य करावे अशी सूचना पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार मतदान केले तर वार्ड क्र. ४७ व ४८ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला.

**श्री सुदाम सोनवणे** ज्या स.स.चे नांवे पुकारल्या जाते. परंतु आतापर्यंत झालेल्या निवडणुकात कुणालाही मतदान करतेवेळी सहकार्य करण्याची वेळ पडली नाही. मात्र आजच व याच निवडणूकीसाठी का पडत आहे. याबाबत आमचा आक्षेप नोंदवावा.

**श्री अ. कादिर मौलाना** आमची मागणी आहे की, ज्या स.स. ना उर्दु येते मात्र मराठी येत नाही त्यामुळे त्या स.स.ना मतदान करतेवेळी सहकार्याची आवश्यकता आहे.

**श्री काशिनाथ कोकाटे** यापुर्वीपासून आम्ही मागणी करीत आलो की, मतपत्रिका हया मराठी सोबतच उर्दुतून तयार करावा, परंतु तसे करण्यात आलेले नाही. त्यामुळे उर्दु भाषीक असलेले स.स.ना मराठी येत नसल्याने त्यांना मतदान करतेवेळी सहकार्य करणे आवश्यक आहे. या शिवाय मतदानासाठी वेळेचे बंधन असल्याने सहकार्याशिवाय पर्याय नाही.

**श्री सुदाम सोनवणे** आमचे याबाबत आक्षेप आहे. तशी नोंद घ्यावी.

**मा. पिठासन अधिकारी** ठिक आहे, सभागृहात स.स.नी सुचना केल्याप्रमाणे तशी इतिवृत्तात नोंद घ्यावी.

**जनसंपर्क अधिकारी** वार्ड क्र. ४९,५०,५१,५२ चे सदस्यांचे नांवे पुकारले त्यानुसार त्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. ५३ चे सदस्यांना लिहिता व वाचता येत नसल्याने त्यांचा अर्ज मंजुर करुन त्यांना क.ति. जोशी दिनेश यांनी सहकार्य करावे. अशी सुचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली, त्यानुसार मतदान कले व वार्ड क्रमांक ५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१ चे सदस्यांना मतदानात भाग घेतला व वार्ड क्र. ६२ चे सदस्यांना मराठी येत नसल्याने त्यांच्या अर्ज मान्य करुन प्र. कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी सहकार्य करावे अशी सूचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदान केले. तर वार्ड क्र. ६३,६४,६५,६६,६७,६८ व ६९ चे सदस्यांनी मतदानात भाग

घतला व वार्ड क्र. ७० चे सदस्यांनी अर्ज दिल्यावरुन त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना मराठी येत नसल्याने त्यांना मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य करावा. अशी सुचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदानात भाग घेतला. (याच वेळी वार्ड क्र. ६८ चे स.स.नी मतदान करतेवळी त्यांचा मतपत्रिका फाटल्या गेली त्यांचे तक्रारीवरुन मा. पिठासिन अधिकारी यांनी आदेश दिला की, संबंधित स.स. ची मतपत्रीका सिल करुन घ्यावे व दुसरी मतपत्रीका द्यावी. त्यानुसार त्यांनी मतदान केले) यानंतर वार्ड क्र ७१ व ७२ चे सदस्यांनी मतदानात भाग घेतला. तर वार्ड क्र. ७३ चे सदस्य यांनी मराठी येत नसल्याचे अर्ज दिल्यावरुन व त्यांचा अर्ज मान्य करुन त्यांना डॉ. भोडंवे यांनी सहकार्य करण्याची सूचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदान केले. व वार्ड क्र. ७४,७५,७६,७७,७८ व ७९ चे सदस्यांना मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. ८० चे सदस्य यांनी त्यांना मराठी लिहिता वाचता येत नसल्याने त्यांचा अर्ज मान्य करुन लघुटंकलेखक श्री. मुळे यांनी सहकार्य करावे अशी सूचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केली. त्यानुसार त्यांनी मतदान केले व वार्ड क्र.८१ व ८२ चे सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र. ८३ चे सदस्यांनी त्यांना मराठी येत नसल्याने त्यांचा अर्ज मंजुर करुन त्यांना जकात अधिक्षक यांनी सहकार्य करावे अशी सूचना मा. पिठासिन अधिकारी यांनी केले त्यानुसार त्यांनी मतदान केले.

**मा. पिठासन अधिकारी** आता ४.५५ वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्य ठिकाणी कृपया गर्दी करु नये ही आपणास विनंती करण्यात येत आहे.

**मा. पिठासन अधिकारी** मतमोजणीचे काम पूर्ण झाले असून उमेदवारांना पडलेले मते खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकूण मतदान | १३२७ |
| अवैध मते | ----- |
| वैध मते | १३२७ |

| | **उमेदवारांची नांवे** | **पडलेली मते** |
|---|---|---|
| १) | अशरफ मोतीवाला | ७९ |
| २) | कवडे साहेबराव राणुबा | ७९ |
| ३) | कुमावत अविनाश लक्ष्मण | ६३ |
| ४) | कैसरखान बद्रोद्दीन खान | ७४ |
| ५) | खरात कुसुमबाई | ७९ |
| ६) | गणेश रामचंद्र तांबे | ७९ |
| ७) | जगताप मोतीलाल रघुनाथ | ६६ |

| | | |
|---|---|---|
| ८) | जगदिश कन्हैय्यालाल सिध्द | ७९ |
| ९) | जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | ८६ |
| १०) | तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | ७८ |
| ११) | लकडे भरत श्रीपती | ७८ |
| १२) | वाघ भाऊसाहेब बाबुराव | ७८ |
| १३) | सौ विजया किशोर राहटकर | ७९ |
| १४) | सलिम पटेल समशेर पटेल | ६९ |
| १५) | सावंत मधुकर दामोधर | ८८ |
| १६) | सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | ६४ |
| १७) | गाजी सादोद्यीन | ३२ पराभूत |
| १८) | जैन विकास | ३२ पराभूत |
| १९) | स. सलिम स. युसुफ | ४५ पराभूत |
| | | १३२७ |

मतमोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित करतो की, स्थायी सदस्य पदासाठी खालील सदस्यांनी निवड झाली असून, मी त्या सर्वांचे अभिनंदन करतो.

१) श्री अशरफ मोतीवाला
२) श्री कवडे साहेबराव रावुबा
३) श्री कुमावत अविनाश लक्ष्मण
४) श्री कैसरखान बद्रोद्यीन खान
५) श्री खरात कुसुमबाई दौलत
६) श्री गणेश रामचंद्र तांबे
७) श्री जगताप मोतीलाल रघुनाथ
८) श्री जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
९) श्री जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
१०) श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
११) श्री लकडे भरत श्रीपती
१२) श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) श्री विजया किशोर राहटकर
१४) श्री सलिम पटेल समशेर पटेल
१५) श्री सावंत मधुकर दामोधर
१६) श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**ठराव क्र. ३ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (२) अन्वये स्थायी समितीच्या सदस्यांसाठी झालेले मतदानानुसार सर्वात जास्त मते मिळालेले खालील प्रमाणे १६ (सोळा) सदस्य विजयी झाल्याचे पिठासिन अधिकारी यांनी घोषित केले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

१) श्री अशरफ मोतीवाला
२) श्री कवडे साहेबराव रावुबा

३) श्री कुमावत अविनाश लक्ष्मण
४) श्री कैसरखान बद्रोद्दीन खान
५) श्री खरात कुसुमबाई दौलत
६) श्री गणेश रामचंद्र तांबे
७) श्री जगताप मोतीलाल रघुनाथ
८) श्री जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
९) श्री जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
१०) श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
११) श्री लकडे भरत श्रीपती
१२) श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) श्री विजया किशोर राहटकर
१४) श्री सलिम पटेल समशेर पटेल
१५) श्री सावंत मधुकर दामोधर
१६) श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**विषय क्र. ४/४ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ चे पोटकलम (२) खंड (ब) आणि महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायती (नामर्दिशित सदस्यांची अर्हता, निवडणूका व नियुक्त्या) नियम १९९६ चे नियम क्रमांक ४ च्या तरतुदीनुसार नवनिर्वाचित महानगरपालिका सभासदाव्यतिरिक्त ५ (पाच) नामनिर्देशित सभासदांची निवड करणे.

**संवाद**

**मा पिठासन अधिकारी** महानगरपालिकेतर्फे पाच स्विकृत सदस्यांची निवड करणेची प्रक्रियेसाठी मतदान होणार आहे. आता सांय. ६.३० वाजले असून, सभा १/२ तासाठी तहकुब करण्यात येते (सभेला सुरुवात सायं ७.०० वाजता)

स्विकृत सदस्याची निवडणूक प्रक्रियेला आता सुरुवात होत असून, माजी उपजिल्ह अधिकारी श्री गवळी साहेब यांना या सभागृहात बोलविण्यात आलेले आहे. नामनिर्देशीत सदस्यांचे निवडीबाबत घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे दिनांक १७/४/२००० ते २५/४/२००० पर्यंत नामनिर्देशिन पत्र वाटप करणे व स्वीकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून, दिनांक २५/४/२००० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत एकूण ३९ नामर्दिशन पत्रसादर झाले. छाननी अंती २० उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे वैध ठरले. दिनांक २८/४/२००० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत ८ उमेदवारांनी नामर्दिशन पत्र परत घेतले असल्याने आता १२ उमेवारांमध्ये निवडणूक होईल त्यांची नांवे खालील प्रमाणे.

**अ. क्र. उमेदवारांची नांवे**

१) अब्दुल रऊफ अ माबुद
२) कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) कुलकर्णी विनायकराव सावलाराम
४) खंगुर सुरजितसिंग तिलकराज

५) घडामोडे भगवान देविदास
६) जहागिरदार मोहमंद अय्युब गुलाब जिलाना
७) जैस्वाल प्रदिप शिवनारायण
८) तुपे त्र्यंबक गणपतराव
९) घिल्लान तरवेंद्रसिंह महेंद्रसिंग
१०) पाटील नरेंद्र यादवराव
११) हाजी शेख हमीदोद्दीन फसियोद्दीन
१२) सलमा बानो मिर मोहमंद अली

गोपनियता पाळता यावी म्हणून मतपत्रिकाच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहील मात्र मतपत्रिकेवर गोपनियतेच्या दृष्टीकोनातून अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल. नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर चिटकविण्यात आली आहे.

**पिठासन अधिकारी** मतपेटी जवळ नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे व मतपेटीला कुलूप लावून तीची चावी माझ्याकडे आणून दयावी व ती मोहोरबंद करुन घ्यावी (पिठासन अधिकारी स्वतःच्या सहीने मोहोरबंद करुन घेतील.

मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखादया सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापूर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगर सचिव यांनी कृपया मतदानासंबंधिच्या सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून दयावे.

**नगरसचिव** १) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३) महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषद व नगर पंचायती (नामनिर्देशित सदस्यांची आर्हता, निवडणूका व नियुक्त्या) नियम १९९६ चे नियम ८ अन्वये मतदानाची पध्दत खालील प्रमाणे राहील.

१) प्रत्येक निर्वाचित पालिका सदस्यास निवडणूकीसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून दयावयाच्या व्यक्तीची संख्या लक्षात न घेता फक्त एकच मत आहे.

२) प्रत्येक पालिका सदस्य आपले मत देतांना त्याच्या मतपत्रिकेवर प्रथमतः त्याला ज्यास मत दयावयाचे असेल त्या उमेदवारांच्या नांव पुढील जागेत १ हा आकडा लिहील आणि त्यास त्यांच्या पसंती क्रमांकनुसार इतर उमेदवारांच्या नावापुढे ही २ आकडा किवां २ आणि ३ आकडे किवां २,३ किवां ४ हे आकडे याप्रमाणे पुढील आकडे लिहिता येतील.

३) सदर नियमांचे नियम १० नुसार खालीलप्रमाणे मतदान झालेले मतपत्रिका अवैध समजण्यात येतील.

अ) ज्यावर १ आकडा नाही अशी मतपत्रिका

ब) ज्यावर १ आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावापुढे लिहिला असेल किंवा असा आकडा कोणत्या उमेदवारांस लागू होतो, याबद्दल शंका निर्माण होईल अशा रीतीने तो लिहिलेले असेल.

क) १ हा आकडा अणि इतर कोणतेही आकडे एकाच उमेदवाराच्या नावापुढे लिहिलेले असतील.

ड) मतदान करणा-या सभासदांची ओळख ज्यामुळे पटेल अशी कोणतीही खूण किंवा लिखान केलेले असेल, अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

**मुख्य लेखाधिकारी** (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे निवडणूकी बाबतच्या कलमाची माहीती वाचून दाखविली)

१. स्विकृत सदस्य पदासाठी १२ उमेदवार रिंगणात असून, प्रत्येक स. सदस्यांना मतदान १ ते १२ च्या उमेदवारांना पसंतीनुसार देण्याचा अधिकार आहे. प्रत्येक स. सदस्यांना मत दयावयचे असेही आहे.

२. प्रत्येक स. सदस्यांना मतदान करतांना पसंतीक्रमांक मराठी/हिंदी/इंग्रजी या अक्षरात कोणत्याही भाषेत लिहीता येऊ शकते.

३. एका मतास १०० (शंभर) त्यानुसार ८३ मतदाराचे असे मताचे मुल्य निश्चित केलेले आहे.

४. प्रत्येक स. सदस्यांनी उमेदवारांचे १ ते १२ पर्यंतचे पंसतीक्रमांक दाखवावे जर १ ते ४ पर्यंतचे पसंती क्रमांकाने मतपत्रीकेवर लिहिले व ५ व्या क्रमांकावर लिहिले नाही व पुन्हा ६ ते १२ क्रमांकावर पसंतीक्रम लिहिलेले आढळल्यास तसे मत बाद ठरविले जाईल. ठरविलेल्या कोटा प्रमाणे फेरिनुसार मते ट्रन्सफर करण्यात येतील.

**श्री सय्यद अलिस मिरा सलामी :** मतदान प्रक्रियेची माहिती हिंदीतून सांगावे.

**मा. पिठासीन अधिकारी :** मतदान गुप्त मतदान प्रक्रियेची माहिती हिंदीतून सभागृहात दयावी.

**नगरसचिव** : ( मतमोजणी अधिकारी यांनी सागितलेली माहिती सर्व माहिती पुन्हा सभा कामकाज नियमावलीनुसार हिंदीतून सांगितले.)

**मा पिठासन अधिकारी :** आता मतदानास सुरुवात होत आहे. नियमानुसार मतदानासाठी एक तासाचा अवधी देण्यात येतो (वेळी अंदाजे सायं ७.४० वाजता) जनसंपर्क अधिकारी यांनी स. सदस्याचे वार्ड निहाय नांवे पुकारावे त्यानुसार गुप्त मतदान होईल. या विषयी मुख्य लेखाधिकारी तथा मोजणी अधिकारी यांनी नियमाप्रमाणे सर्व प्रक्रियेची माहिती दिलेली आहे. त्यानुसार कार्यवाही पूर्ण होईल. आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय नांवे पुकारण्यात येतील मतदानासाठी १ तासचा कालावधी देण्यात येत असून, सभागृहातील घडयाळ प्रमाणे आता सांयकाळचे ७.४० वाजले असून, मतदान ८.४० वाजता संपेल.

**जनसंपर्क अधिकारी** (वार्ड निहाय स. सदस्यांची नंवे पुकारातात) वार्ड क्र. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२ व १३ चे मतदान पूर्ण होते. तर वार्ड क्र.१४ चे स. सदस्यांना मा. पिठासन अधिकारी यांनी त्यांच्या अर्ज मान्य करुन सांस्कृतिक अधिका-यांनी सहकार्य करणेस सूचना देतात. त्यानुसार मतदान

होते. वार्ड क्र १५ चे मतदान पूर्ण होते. तर वार्ड क्र. १६ चे स. सदस्य यांनी मदतनीससाठी दिलेला अर्ज मान्य करुन डॉ. भोडवे यांनी सहकार्य करणेसाठी मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना दिल्या त्यानुसार मतदान पूर्ण झाले. वार्ड क्र . १७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३० व ३१ मतदान पूर्ण झाले तर वार्ड क्र ३२ चे स. सदस्या यांनी दिलेल्या अर्जानुसार त्यांचा अर्ज मान्य करुन विधी सहाय्यक यांनी सहकार्य करावे अशी सूचना मा. पिठासन अधिकारी यांनी केली त्यानुसार मतदान झाले व वार्ड क्र ३३ चे मतदान झाल्यानंतर वार्ड क्र. ३४ मा. महापौर यांचे नांव पुकारले ते पिठासन अधिकारी असल्याने त्यांनी पिठासन अधिकारी या जागेवर बसण्यासाठी मा. उपमहापौर यांना आसनग्रहण करण्यास सांगितले व आपले मतदान केले. त्याचप्रमाणे वार्ड क्र. ३५ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. ३६ चे स. सदस्यांचे अर्जा दिल्यावरुन व त्याचा अर्ज मंजुर करुन त्यांना उपआयुक्त (प्र.) यांना सहकार्य करणे मा. पीठासीन अधिकारी यांनी सूचना केल्यावरुन त्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ३७,३८,३९,४० चे स. सदस्यांनी मतदान पूर्ण केले तर वार्ड क्र. ४१ चे स. सदस्य यांनी दिलेल्या अर्जानुसार त्यांचा अर्ज मान्य करुन मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य करणेस मा. महापौर यांनी सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले. वार्ड क्र ४२,४३,४४,४५ चे मतदान पूर्ण झाल्यानंतर मा. पिठासन अधिकारी यांनी वार्ड क्र. ७२ चे स. सदस्या अगोदर मतदान करण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार त्यांनी मतदान केले व वार्ड क्र. ४६ चे स. सदस्य यांनी दिलेल्या अर्जानुसर त्यांचा अर्ज मंजुर करुन लघुटंकलेखक श्री मुळे यांनी सहकार्य करणेस मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले तर वार्ड क्र. ४७,४८,४९,५०,५१ व ५२ चे मतदान पूर्ण झाले. वार्ड क्र. ५३ चे स. सदस्य यांचा अर्ज मान्य करुन उपआयुक्त (प्र.) यांचे स्विय सहाय्यक यांनी सहाकार्य करणेस मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले वार्ड क्र. ५४ चे स. सदस्य यांनी मतदानात भाग घेतल्यानंतर वार्ड क्र. ६८ चे स. सदस्य यांना मा. पिठासन अधिकारी यांचे सूचनेनुसार अगोदर मतदान केले व वार्ड क्र ५५,५६,५७,५८,५९,६० व ६१ चे स. सदस्य यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र.६२ यांच्या अर्जानुसार मा. पिठासन अधिकारी यांनी अर्ज मान्य करुन मा. उपआयुक्तांचे स्विय सहाय्क्क यांनी सहकार्य करणेच्या सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले वार्ड क्र. ६३,६४,६५,६६,६७ व ६९ चे मतदान झाले वार्ड क्र. ७० चे स. सदस्य यांनी दिलेल्या अर्जामान्य करुन जकात अधिक्षक यांनी सहकार्य करणेच्या सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले तर वार्ड क्र ७१ चे मतदान झाल्यानंतर वार्ड क्र. ७३ चे स. सदस्यांचे विनंती अर्ज मान्य करुन सहा आयुक्त-१ यांनी सहाकार्य करणेस मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले वार्ड क्र. ७४,७५,७६,७७,७८ व ७९ चे मतदान झाले तर वार्ड क्र. ८० चे स. सदस्य यांना त्यांच्या अर्जानुसार केलेली विनंती मान्य करुन अति शहर अभियंता यांनी सहकार्य करणेस मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना दिल्या त्यानुसार मतदान झाले. वार्ड क्र. ८१ व ८२ चे स. सदस्य यांनी मतदानात भाग घेतला तर वार्ड क्र. ८३ चे स. सदस्य यांच्या लेखी विनंती अर्ज मान्य करुन

व लिपीक श्री दिनेश जोशी यांनी सहाकार्य करणेस मा. पिठासन अधिकारी यांनी सूचना दिल्यानुसार मतदान पूर्ण झाले.

**मा. पीठासन अधिकारी :** आता मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या प्रतिनिधलाच मतमोजणभ पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये ही आपणांस विनंती करण्यांस येत आहे.

**मतमोजणी अधिकारी (मुख्य लेखाधिकारी)** १ ल्या फेरीत उमेदवारांना पडलेल्या मतांची आकडेवारी पूढील प्रमाणे

१) <u>माताची किंमत शंभर असल्याने १ ल्या फेरीपर्यंत पडलेल्या उमेदवारांच्या माताची आकडेवारी पूढीलप्रमाणे आहे.</u>

| | |
|---|---|
| १. श्री अ रऊफ अ माबुद यांना | ७ मते म्हणजे ७०० |
| २. श्री सुभाष कच्छावाह यांना | १४ मते म्हणजे १४०० |
| ३. श्री विनायकराव कुलकर्णी यांना | निरंक ०० |
| ४. श्री सुरजितसिंग स्वुंगर यांना | १३ मते म्हणजे १३०० |
| ५. श्री भगवान घडामोडे यांना | १५ मते म्हणजे १५०० |
| ६. श्री जहागिरदार मो. अ. गुलाम जिलानी यांना | निरंक ०० |
| ७. श्री प्रदिप जैस्वाल यांना | निरंक ०० |
| ८. श्री त्र्यंबंक तुपे यांना | १२ मते म्हणजे १२०० |
| ९. श्री तरविंदरसिंग धिलन यांना | १२ मते म्हणजे १२०० |
| १०. श्री नरेंद्र पाटील यांना | निरंक ०० |
| ११. श्री हाजी शेख हमिदोद्दीन यांना | निरंक ०० |
| १२. श्रीमती सलमा बानो यांना | १० मते म्हणजे १००० |

एकूण ८३ पूर्णविहित मतदान झालेले आहे आणि पूर्ण मतदानाची किंमत ८३०० आहे. आताच निवडणूकीची प्रक्रीया सांगितल्याप्रमाणे निवडून येण्यासाठी आवश्यक मते १३८४ हवी आहे. यामध्ये प्राधान्यक्रमाने श्री भगवान घडामोडे व सुभाष कच्छवाह यांनी आवश्यक लागणारा कोटा पूर्ण केलेला आहे. सदरील माहिती मी या ठिकाणी सांगितले आहे. या ठिकाणी निर्णय हा पिठासन अधिकारी जाहिर करतील फक्त मी विवरण केलेले आहे की, फक्त आवश्यक मते किती आणि उमेदवारांनी मिळवलेली मते किती यानंतरची आता दुसऱ्या फेरीची गणणा होणार आहे. त्यापुर्वी गुणानुक्रम ज्यांना जास्तीची मत पडलेली आहेत. त्यांची अतिरिक्त मते ट्रान्सफर केली जातील. ही जी आता १ ली फेरी झालेली आहे. याबद्दल उमेदवार व उमेदवारांच्या प्रतिनिधींना काही आक्षेप असल्यास त्यांनी तात्काळ पिठासन अधिकारी यांचेकडे नांदवावी. त्यानंतरच आम्हाला २ ऱ्या फेरीची मोजणी सुरु करता येईल. यावेळी कोणीही मतमोजणीस आक्षेप घेतला नाही.

**पिठासन अधिकारी :** १ ल्या फेरीमध्ये जो आवश्यक लागणारा कोटा हा पूर्ण केलेला आहे ते श्री. भगवान घडामोडे यांना १५०० मते मिळालेली आहेत. त्यामुळे स्विकृत सदस्य म्हणून निवड झाल्याचे मी जाहीर करतो. तसेच सुभाष कच्छवाह यांना १४०० मते पडलेली आहेत. ते सुध्दा निवडून येण्यासाठी लागणारा कोटा १३८४ चा पार केलेला आहे. म्हणून स्कृित सदस्य म्हणून निवडून आल्याचे मी घोषित करतो. आता दुसऱ्या फेरीला सुरुवात करण्यात येते. (या फेरीच्या वेळी कुणीही स. स. नी. आक्षेप नोंदविलेले नाही.)

**मतमोजणी अधिकारी (मुख्यलेखाधिकारी ) :** यानंतर जी अतिरिक्त मते आहेत. स. श्री. भगवान घडामोडे यांना १५०० मते मिळालेली आहेत व कच्छवाह सुभाष यांना १४०० मते मिळालेली आहेत तर ती मते इतर उमेदवारांमध्ये डिस्ट्रीब्यूशन केले जाईल. म्हणजे .१५०० वजा १३८४ अशा प्रकारे श्री. भगवान घडामोडे यांना ११६ अतिरिक्त मते आहेत. या फेरीत पसंतीक्रमान्वये घडामोडे यांच्या फेरीत द्वितीय क्रमांकावर जो उमेदवार असेल त्यास घडामोडेंची अतिरिक्त ११६ मते सामावले जाईल. ज्या पात्र आहेत. त्यापैकी दोनच मतपत्रिका आहेत. यामध्ये १) तुपे त्र्यबंक व २) श्रीमती सलमा बानो यांना प्रत्येकी ५८ मते हयांच्या हक्कात हस्तांतर करण्यात येतात.

**२ ऱ्या फेरीच्या वेळी पडलेल्या मतांची आकडेवारी**

| | |
|---|---|
| १) श्री. अ. रऊफ अ. माबुद यांना | ७ मते म्हणजे ७०० |
| २) श्री. सुरजितसिंग खुंगर यांना | १३ मते म्हणजे १३०० |
| ३) श्री. त्र्यबंक तुपे यांना | १२मते+अतिरक्त ५८ मते=१२५८ |
| ४)श्री. तरविंदरसिंग धिल्लन यांना | १२ मते म्हणजे १२०० |
| ५) श्रीमती सलमा बानो यांना | १० मते+५८ अतिरिक्त ५८ मते= १०५८ |

आता ३ ऱ्या फेरीत मतांचे वाटप केले जाईन तत्पुर्वी या फेरीबाबत कुणाला काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी नोंदवावे अशा सूचना देण्यात आल्या. परंतु कोणीही आक्षेप नोंदविला नाही. श्री. सुभाष कच्छवाह यांना १४०० मते पडलेली आहेत व निवडून येण्यासाठी करण्याचा कोटा १३८४ चा त्यांनी पूर्ण केलेला आहे. म्हणून त्यांची अति १६ मते ज्या उमेदवारांनी मते पसंत क्रमाने द्वितीय स्थानावर असतील त्यांना वितरित करण्यात येतात. (यावेळी सुध्दा कुणीही स. सदस्यांनी मतमोजणी वेळी आक्षेप घेतले नाही.)

**आता ३ ऱ्या फेरीअखेर पडलेल्या मतांची आकडेवारी**

| | |
|---|---|
| १) श्री. अ. रऊफ अ. माबुद यांना | ७०० मते आहेत. |
| २) श्री सुरजितसिंग स्वुंगर यांना | १३०० मते आहेत. |
| ३) श्री त्र्यंबक तूपे यांना | १२७२ मते आहेत. |
| ४) श्री तरविरसिंग धिल्लन यांना | १२०० मते आहेत. |
| ५) श्रीमती सलमा बानो यांना | १०५८ मते आहेत. |

**मिर महंमद अली** निवडून येण्यासाठी आवश्यक असणारा १३८४ चा कोटा एकही उमेदवारांनी पूर्ण केलेला नसल्याने पुढील फेरीस सुरुवात करण्यात येते. आता पुढील प्रक्रिया कृपया आपण समजुन घ्या एकूण पांच (५) उमेदवार निवडूक रिंगणात आहेत. आता या सर्वामधुन ज्या उमेदवारास सर्वात कमी मते पडतील तो उमेदवार या फेरीतून बाद होईल. आणि हे जे उमेदवार

बाद ठरतील त्यांच्या मतपत्रिकेवर ज्या उमेदवारास द्वितीय पसंतीची मते असतील ती मते इतर उमेदवारांना वितरित करणेत येतील आणि त्यास द्वितीय क्रमांकाच्या मताशी जी मते वितरित होणार आहे. त्याची किंमत १०० ची सर्वांना सारखीच राहणार आहे. आता ही अतिरिक्त मते असल्यामुळे आपण ५८ व १४ अशा प्रकारे मते झालेली आहेत. आता श्री अ. रऊफ यांच्या मतपत्रिकेवर द्वितीय पसंतीक्रम राहील त्यांची द्वितीय पसंती क्रमाची किंमत १०० ने वाढणार आहे. आता आपण श्री अ. रऊफ अ. माबुद यांच्या मतपत्रिकेची छाणनी करुन एकूण सात (७) मतपत्रिकापैकी एक मतपत्रिका अपात्र आहे आणि सहा (६) मतपत्रिका पात्र आहेत. आता सहा (६) मतपत्रिकेचे डिस्ट्रब्यूशन ज्या ज्या उमेदवारांना द्वितीय पसंतीची मते मिळालेली आहेत त्या उमेदवारांच्या खाली ते डिस्ट्रब्युशन केले जाईल आणि या प्रत्येक मतांची किंमत ही १०० (शंभर) राहील, या फेरीबाबत कुणास काही आक्षेप नोंदवावयाचा असल्यास तो नोंदवावा. (या फेरीअखर सुध्दा कुणीही स. सदस्यांनी मतमोजणी प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदविलेले नाही.)

आता ४ ऱ्या फेरी अखेर पडलेल्या मतांची आकडेवारी

| | |
|---|---|
| १) श्री सुरजितसिंग खूंगर यांना | १५०० मते |
| २) श्री त्र्यबंक तुपे यांना | १२७२ मते |
| ३) श्री तरविदंरसिंग धिल्लन यांना | १२०० मते |
| ४) श्री हाजी शेख हमिनोद्यीन यांना | १०० मते |
| ५) श्रीमती सलमा बानो यांना | १२५८ मते |

आणि दोन मते बाद म्हणजे २०० अशी झालेली आहेत आणि चौथ्या फेरी समोर श्री सुरजितसिंग खूंगर यांनी आवश्यक असलेला १३८४ चा कोटा पूर्ण केलेला आहे. याबाबत पिठासन अधिकारी हे निर्णय देतील व कुण्या स. सदस्यांना मतमोजणी प्रक्रियेबाबत आक्षेप घ्यावयाचा असेल त्यांना घ्यावा.

**पिठासन अधिकारी** चौथी फरी अखेर श्री खूंगर सुरजितसिंग यांना १५०० मते पडलेली आहेत व यांना निवडून येण्यासाठी १३८४ मतांचा कोटा त्यांनी पूर्ण केलेला आहे. त्यामुळे श्री सुरजितसिंग खूंगर हे निवडणून आल्याचे मी घोषित करतो व त्यांचे हार्दीक अभिनंदन करतो व पूढील फेरीची सुरुवात करावी अशी सूचना करातो (या वेळेसही कोणत्याही स. सदस्यांनी मतमोजणी प्रक्रियेस आक्षेप नोंदविलेला नाही)

**मतमोजणी अधिकारी (मुख्यलेखाधिकारी)** ४ ऱ्या फेरीअखेर श्री खुंगर सुरजितसिंग यांना १५०० मते पडलेली आहेत आवश्यक मताचा कोटा १३८४ असल्याने त्यांना ११६ मते अतिरिक्त असल्याने ते ११६ मतांचे वाटप आता वितरित करण्यात येते.

<u>५ व्या फेरी अखेर पडलेल्या मतांची आकडेवारी</u>

| | |
|---|---|
| १. श्री त्र्यबंक तुपे यांना | १२७२ मते |
| २. श्री तरविदंरसिंग धिल्लन यांना | १२०० मते |
| ३. श्री हाजी शेख हमियोद्यीन यांना | १५८ मते |

४. श्रीमती सलमा बानो मिर मोहमंद
अली यांना १३१६ मते

अतिरिक्त मतांचे वाटप या ठिकाणी करण्यात आलेला आहे व ५ व्या फेरीअखेर आवश्यक मतांचा कोटा १३८४ कुणीही पूर्ण केलेला नसल्याने आता पूढील फेरी घेण्यात येईल. (पुढील फेरीची मतमोजणी चालू असतांना काही स. सदस्यांनी छानणी अधिकारी यांच्या समोर घोळक्याने उभे राहतात व सारखा आवाज करतात काहीही ऐकू येतनाही त्याच प्रमाणे या फेरीबाबत स. सदस्य सेना भाजप युतीतर्फे आक्षेप घेतात त्यामुळे बराच कालावधीपर्यंत मतमोजणी थांबलेली असते व आपसात सारखी चर्चा चालू असते.

**श्री काशीनाथ कोकाटे** मतमोजणी का थांबलेली आहे? याची माहिती दयावी.

**श्री अंबादास दानवे** आम्ही मतमोजणीच्या संदर्भात आक्षेप नोंदविला आहेत. त्यानुसार कार्यवाही व्हावी. (आक्षेपाचा अर्ज पिठासन अधिकारी यांचेकडे देतात.)

**श्री मिरा सलामी, श्री काशीनाथ कोकाटे** मा. महापौर साहेब आपण या सभेचे पिठासन अधिकारी आहेत. परंतु मतमोजणी का थांबविली याची माहिती दयावी.

**मा. पिठासीन अधिकारी** स. सदस्यांनी जे आक्षेप घेतलेले आहे व काही स. सदस्य छानणी तथा मतमोजणी अधिकारी यांचे समोर घोळक्याने उभे राहून सारखे आवाज करीत आहेत. त्यामुळे सभागृहात काहीही ऐकू येत नाही. या कारणास्तव आपसात बोलत असल्याने मतमोजणी थांबलेली आहे.

**अ. कादीर मौलाना** पिठासन अधिकारी म्हणून काम पाहत असलेले मा. महापौर यांनी न्यायाची भूमिका वठवावी. परंतु या ठिकाणी न्याय मिळत नसल्यास त्याचा आम्ही निषेध व्यक्त करु.

**श्री काशीनाथ कोकाटे** या ठिकाणी उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवडणूक प्रक्रियेच्या बाबतीत सविस्तर माहीती दयावी.

**पिठासन अधिकारी** छानणी तथा मतमोजणी अधिकारी यांच्या समोर स. सदस्यांनी घोळका करुन उभे राहू नये. या ठिकाणी उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी यांनी या संदर्भातील निवडणूकातील व मोजणी विषयी माहिती देतील.

**श्री नंदकुमारे घोडेले** या महानगरपालिकेत प्रथमच पाच स्विकृत सदस्यांची निवडणूक होत आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे ती सविस्तर स. सदस्यांना मिळालेली नाही. ज्यामुळे मतमोजणी प्रक्रिया चालू असतांना एखादया स. सदस्यांना निरंक मते मिळाली असल्यास पुढील फेरिमध्ये त्यांना बाद ठरविता येते काय?

**श्री स. अली मिरा सलामी** आतापर्यंत जी मतमोजणी केली ती नियमाप्रमाणे बरोबर आहे काय? याची माहिती दयावी.

**श्री काशिनाथ कोकाटे** मतमोजणी चालू असल्यानंतर पुन्हा १/२ तासापासून मतमोजणी प्रक्रिया थांबलेली आहे. सध्या तिन स्विकृत स. सदस्यांची निवड जाहीर केलेली आहे आणि आता सभागृहात निवडणूक विषयाची माहिती देण्याची का गरज भासते. प्रशासनाने याबाबत गंभीर दखल घ्यावी.

**श्री नंदकुमार घोडोले** सभागृहात पांच स्विकृत सदस्यांची निवडणूक होत आहे आणि पांच स्विकृत सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया व मतमोजणीची प्रक्रिया कशी असावी याबाबत सभागृहात योग्य ती माहिती नियमाप्रमाणे पुरविली नाही. अथवा दिलेली नाही त्यामुळे आम्ही आक्षेप नोंदविला असून त्यासाठी सभागृहात निवडणूकीची प्रक्रिया स्थगीत ठेवावी.

**मा पिठासीन अधिकारी** दहा मिनिटापासून मतमोजणी थांबलेली आहे त्या संदर्भात संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**निवासी उपजिल्हाधिकारी** पसंतीनुरुप मतमोजणीमध्ये प्रत्येक फेरीत प्रथम अतिरिक्त किंवा अधिकारी मते वाटप करण्यात येते आणि त्यानुसार त्या विशिष्ट फेरीमध्ये अथवा उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत त्यांच्या पैकी ज्या उमेदवाराची सर्वात कमी मते आहेत. त्यांना मतमोजणी प्रक्रियेतून वगळण्यात येते आणि त्यांना पडलेले मते ही राहीलेल्या उमेदवारांमध्ये त्यापुढील मत पसंतीनुसार वाटण्यात येतात. ५ व्या फेरीबाबत काही स. सदस्यांनी १ ल्या फेरीबाबतची निरंक मते मिळालेल्या उमेदवारांना पुढील फेरीत पुढील पसंतीची मते मिळाल्यास ते मोजणी करतील काय? अशी विचारणा काही स. सदस्यांनी केली. त्याबाबत जर अधिक उमेदवाराची १ ल्या पसंतीची मते निरंक असतील तर त्यांना जर पुढील फेरीमध्ये २ ऱ्या फेरीतील मते पुढील फेरीची मते मिळालेली तर वाटप करता येऊ शकतात. याचा पध्दतीने श्री हाजी शेख हमिदोद्दीन यांना १ ल्या पसंतीची मते निरंक असतील तर त्यांना पुढील पसंतीची मते मिळालेली असल्याने त्यांना देण्यात आलेले आहेत.

**श्री काशीनाथ कोकाटे** मतमोजणीच्या नियमान्वये बाद पध्द्तीने जी जास्तीची मते १५८ आहेत ती मते या फरीअखेर ज्या उमेदवारास पसंतीक्रमाने प्रथम आहे त्यास मिळवून मोजणी सुरु करावी.

**श्री अंबादास दानवे** स. स. रऊफ या उमेदवारास ७०० मते १ ल्या फेरीच्या वेळेस पडली असून तो १ ल्या फेरीतच बाद झाला परंतू प्रत्येक फेरीमध्ये अतिरिक्त मताचे १५८ हे मिळवून पुन्हा या फरीपर्यंत टिकून आहेत ते कसे याची विश्लेषण होणे आवश्यक आहे.

**श्री नंदकुमार घोडले** आम्ही दिलेले आक्षेप नोंदवून घ्यावे व मतमोजणी प्रक्रियेसांठीची माहिती सभागृहात दिलेली नाही त्यामुळे सदस्यांना काहीही समजत नाही.

**निवासी उपजिल्हाधिकारी** पुरेशी माहिती सभागृहात मतमोजणी अधिकारी यांनी दिली आहे. या प्रक्रियेसाठी पसंती क्रमानुसार जी अतिरिक्त मते होतात ती मते मिळवून दिलेला कोटा पूर्ण होतो काय ते पाहिले जाते.

**श्री अंबादास दानवे** वास्तविक पाहता सुरुवातीच्या काळात जे उमेदवार बाद ठरविल्या गेले तेही उमेदवार या फेरीमध्ये समाविष्ठ कोणत्या आधारे झाले याबाबतचा स्पष्ट खुलासा व्हावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** जी पध्द्त निवडणूक प्रक्रियेची आहे. त्याबाबतची माहिती संपूर्णपणे नसल्याने हा वाद तयार होत आहे. जर या निवडणूक प्रक्रियेची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये कार्यवाही चालू असेल तर त्यानुसार सभागृहात सर्वांना माहिती देवून कार्यवाही चालू ठेवावी.

**श्री थोरात बाळासाहेब** सदरची निवडणूक प्रक्रियेबाबत जो आक्षेप नोंदविलेला आहे त्या बाबतचा विचार करुन सभागृहाला माहिती अवगत करणे आवश्यक होते.

**निवासी उप जिल्हाधिकारी** वरीलप्रमाणे सभागृहात संपूर्णपणे माहिती मी अवलोकनास्तव दिलेला आहे.

**मा पिठासन अधिकारी** स. सदस्यांनी दिलेला आक्षेपाची नोंद या ठिकाणी घेण्यात आलेली आहे आणि त्यानूसार मतमोजणीत सुरुवात करावी आता या ठिकाणी मतमोजणी जवळ केवळ १२ उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील त्या व्यतिरिक्त कुणीही जवळ येऊ नये त्यामुळे मतमोजणी प्रक्रिया करतांना

कोणत्याही प्रकारची अडचणी येणार नाही व सर्वांना माहिती सांगतांना स्पष्टपणे दिसेल. तेव्हा सर्व स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर शांतपणे बसावे.

(याच वेळी पुन्हा मतमोजणी प्रक्रियेत सुरुवात होते.)

**मतमोजणी अधिकारी (मुख्य लेखाधिकारी)** ५ व्या फेरी अखेर उमेदवारांना पडलेली मते

| | |
|---|---|
| १) त्र्यंबक तुपे यांना | १२७२ मते |
| २) तरविंदरसिंग धिल्लन यांना | १२०० मते |
| ३) हाजी शेख हमिदोद्दीन यांना | १५८ मते |
| ४) सलमा बानो यांना | १३१६ मते |

५० व्या फेरी अखेर आवश्यक मताचा कोटा कोणीही पूर्ण केला नाही. निर्वाचित उमेदवारांची संख्या आवश्यक संख्येपेक्षा कमी असल्यामुळे मतनोदंणीत शेवटी असलेले उमेदवार श्री हाजी शेख हमीदोद्दीन यांना वगळण्यात येऊन त्यांच्य शोषित मत पत्रिकांची त्यावर नमुद केलेल्या नतंरच्या पसंती क्रमांकानुसार विद्यमान उमेदवारांमध्ये मतांची वाटणी करण्यात येईल. त्यानुसार ६ व्या फेरीत पडलेल्या मतांची आकडेवारी-----

| | |
|---|---|
| १) श्री. त्र्यंबक तुपे यांना | १२७२ |
| २) श्री. तरविंदरसिंग धिल्लन यांना | १२००+१०० = १३०० |
| ३) श्रीमती सलमा बानो यांना | १३१६+०५८ = १३७४ |

**श्री थोरात बाळासाहेब** आम्ही आक्षेप नोंदविला असून सध्या जी मतमोजणीची कार्यवाही चालू आहे ती थांबवून पुन्हा फेरमतदान घेण्याची कार्यवाही व्हावी अशी विनंती आहे.

**श्री नंदकुमार घोडोले** पाच स्विकृत सदस्यांची पहिल्यादांच निवडणूक होत आहे. याबाबत महानगरपालिकेला माहिती नाही. या निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी यांना बोलविण्यात आले. या स्विकृत सदस्यांचे बाबतीत स. सदस्यांना निवडणूक पुर्विची माहिती दिलेली नाही. झालेल्या निवडणूक प्रक्रियेची माहिती दिलेली नसल्याने सदरील प्रक्रिया पूर्णपणे संपलेली नाही कारण विजयी उमेदवार एक-एक करुन किती झाले या मोजणी प्रक्रियेमुळे काहीही सभागृहाला उकल होत नाही ज्यामुळे झालेलया निवडणूक प्रक्रियेसंबंधी व मतमोजणीही पुन्हा करावी असे माझे मत आहे. पूर्ण मोजणी पूर्ववत फेरमतदान घ्यावे. याबाबत आम्ही आक्षेप घेत आहेत. त्यानुसारच सभेने संमती द्यावी.

**मा पिठासीन अधिकारी** पाच स्विकृत सदस्यांची निवडणूक प्रक्रियेची माहिती दिलेली नाही हे स.स. चे म्हणने आहे. प्रथमत:च मनपातर्फे पांच स्विकृत सदस्यांची निवडणूक होत आहे. या प्रक्रियेची पसंती क्रमान्वये मोजणी होत असून पसंतीक्रमाने निकाल घोषित केले आहे आणि ५ व्य फेरीस जे निकाल घोषित केले आहेत. त्याबाबत काही स.स.नी आक्षेप नोंदविले ज्यामुळे मतमोजणी प्रक्रिया थांबलेली आहे. आता पुन्हा पूर्ण मोजणी करणे शक्य नाही.

**प्र. आयुक्त (उपआयुक्त (म.))** निवडणूक प्रक्रियेबाबतची माहिती मा. आयुक्त यांना नाही या आक्षेपास मी विरोध दर्शवितो जे निवडणूकीबाबतचे नियम आहेत ते या नियमास लागू असतात. फक्त काही बाबी संबंधी सल्ला घेण्यासाठी आपल्या

सर्वांच्या विचाराने जिल्हाधिकारी कार्यालयातील निवास उपजिल्हाधिकारी यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी सुध्दा या निवडणूक प्रक्रियेची माहिती संपूर्णपणे सर्व स. सभागृहाला दिलेली आहे व त्यानुसारच कार्यवाही चालू आहे.

**श्री अविनाश कुमावत** जे आक्षेप आम्ही घेतलेले आहेत त्यांची नोंद व्हावी.

**मा. पिठासन अधिकारी** स. सदस्यांनी दिलेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात आली असता आता शेवटच्या टप्याची मतमोजणी सुरु करावी. पुन्हा पुर्नमोजणी सध्या घेता येणे शक्य नाही.

<u>६व्या फेरी अखेर उमेदवारांना पडलेल्या मतांची आकडेवारी</u>

१) श्री. त्र्यंबक तुपे यांना १२७२
२) श्री. तरविंदरसिंग धिल्लन यांना १३००
३) श्रीमती सलमा बानो
मिर महमंद अली १३७४ अनुक्रमे

मते पडलेली असून यापूर्वी ३ (तीन) उमेदवारांचा विजय झालेला आहे व आता सध्या ६ वी व अखेरच्या फेरीत स. स. श्री तरविंदर सिंग धिल्लन यांना १३०० मते श्रीमती सलमा बानो मिरमहंमद अली बानो यांना १३७४ मते पडलेली आहे व या फेरीमध्ये दोन उमेदवारांचे निवड करावयाची असून, उमेदवारांचे नामनिर्देशन होईपर्यंत मतनोंदणीत सर्वात कमी मते असलेल्या उमेदवारांना एकानंतर एक या प्रमाणे क्रमाक्रमाने वगळण्यात येईल अशा तरतुद असल्याने ६ व्या फेरी अखेर सर्वात कमी मते असलेले अमेदवार श्री त्र्यबंक तुपे यांना वगळण्यात येऊन आता २ उमेदवारांची निवड करण्याची असल्याने व दोनच उमेदवार शिल्लक असल्याने श्री तरवेंद्रसिंग महेंद्रसिंह धिल्लन व श्रीमती सलमा बानो यांना या फेरीअखेर विजयी झाल्याचे मी घोषित करातो व नवनिर्वाचीत उमेदवारांचे अभिनंदन करतो.

**ठराव क्र. ४/४ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ चे पोटकलम (२) खंड (ब) आणि महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायती (नामर्दिशित सदस्यांची अर्हता, निवडणूका व नियुक्त्या) नियम १९९६ चे नियम क्रं. ४ अन्वये नामनिर्देशित सदस्यांसाठी झालेल्या मतदानानुसार, सर्वात जास्त मते मिळालेले खालील प्रमाणे ५ (पाच) नामनिर्देशित सदस्य म्हणून विजयी झाल्याचे पिठासन अधिकारी यांनी घोषित केले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) श्री घडोमोडे भगवान देविदास
२) श्री कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) श्री खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) श्रीमती सलमा बानो मिर महमंद अली

याच बरोबर जण गण मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २०/५/२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**शनिवार दिनांक २०/५/२००० रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात मा. श्री भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील सन्माननिय नगरसेवक उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | स. सभासद |
| ३) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ४) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ५) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ६) स. स. श्री शे. इलियास किरमानी शेख उमर | -//- |
| ७) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ८) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ९) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १०) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| ११) स. स. सौ मंदाबाई प्रभाकर पवार | -//- |
| १२) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १३) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १४) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १५) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १६) स. स. श्री शे.शकील पटेल शे. बुढन पटेल | -//- |
| १) स. स. श्रीमती डॉ आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १८) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| १९) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| २०) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २१) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २२) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २३) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २४) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २५) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २६) स. स. श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २७) स. स. श्री अय्युब खॉ सरदार खॉ | -//- |
| २८) स. स. श्री अब्दुल रशिद अब्दुल सत्तार | -//- |
| २९) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| ३०) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३१) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३२) स. स. सौ. रशिदा बेगम गफफार यार खॉन | -//- |

३३) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३४) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३५) स. स. श्री स. मुमताज अली मोज्जम अली -//-
३६) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
३७) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
३८) स. स. श्री थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव-//-
३९) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४०) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४१) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४२) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४३) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४४) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४५) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४६) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४७) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
४८) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
४९) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
५०) स. स. श्री अब्दुल कदीर मौलाना सय्यद -//-
५१) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५२) स. स. श्री अशरफ मोतीवाला -//-
५३) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५४) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५५) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५६) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
५७) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५८) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
५९) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
६०) स. स. श्री गाजी सादोउद्यीन गाजी जहीर अहमद -//-
६१) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसालत अली -//-
६२) स. स. श्री शेख इसाक जैनोदीन शेख -//-
६३) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
६४) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६५) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
६६) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
६७) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान -//-
६८) स. स. श्री तुळशीबागवाळे किशोर बाबुलाल -//-
६९) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
७०) स. स. सौ बबीता सुभाष कागडा -//-
७१) स. स. श्री सय्यद अली सलामी सय्यद मिरा सलामी-//-
७२) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज -//-
७३) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-

१) स. स. सौ कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण स्विकृत सदस्य
२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज स्विकृत सदस्य
३) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली स्विकृत सदस्य

**संवाद**

**अफसरखॉन यासीनखॉन** मी मांडलेला प्रस्ताव आजच्या सभेतील विषयपत्रिकेवर समाविष्ट झालेला नाही याची कारण काय?

**श्री प्रशांत देसरडा** माजी खा रामकृष्ण बाब पाटील यांचे चिरंजीव दादासाहेब रामकृष्ण पाटील व नामदेव मदगे, सुभाष कोठारी, यांचे नुकतेच अपघाती निधन झाले त्यांना सभागृहात श्रध्दाजंली वाहण्यात आली.

**श्री सुदाम सोनवणे** यास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर** ठिक आहे सभागृहात ०१.०० मिनिट श्रध्दांजली वाहण्यात यावी (सभागृहात वरीलप्रमाणे ०१.०० मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात यावी)

**श्री अफसरखॉन, यासीनखॉन** मी एक प्रस्ताव दिलेला होता मात्र तो आजच्या विषय पत्रिकेत समाविष्ट केलेला नाही याचे कारण काय? सभा कामकाज नियमावली प्रमाणे एखादया स. स. नी प्रस्ताव ठेवावयाचे झाल्यास कशा पध्द्तीने ठेवावे. या बाबतचे नियम काय आहेत याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** स. स. श्री अफसरखान यांनी दि. १६/५/२००० रोजी एक प्रस्ताव दिलेला होता तो जकाती बाबतच्या बी-बीयाने व इतर साहित्यासंबंधी जकात माफी झालेली आहे. ती रद्द करणे बाबतचा प्रस्ताव होता. परंतु अशा प्रकारचा प्रस्ताव सभागृहात गेल्या चार महिन्यापुर्वी आलेला होता व या सभागृहाने सदरील प्रस्तावास मंजुरी दिलेली होती. मंजुरी नंतर सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला होता व आता शासनाकडून मंजुरीचे पत्र प्राप्त झाले आहे व शासनाच्या मंजुरीच्या जी आर नुसार प्रशासनाने कार्यवाही सुरु केलेली आहे.

**श्री अफसरखॉन** मला एवढेच म्हणावयाचे आहे की, सभा कामकाज नियमावलीप्रमाणे नेमके कामकाज पध्द्त कशी असते. याची माहिती द्यावी आज बी-बीयाणे व इतर साहित्याबाबत सभागृहात अशासकीय प्रस्ताव ठेवून मंजुर केलेला आहे व सदरील प्रस्तावास प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे मत लक्षात न घेता शासनास तातडीने मंजुरीस्तव पाठविले. ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून शासनाने सुध्दा याबाबत कोणत्याही प्रकारचे प्रशासनाचे मत लक्षात घेता सदरील प्रस्तावास मंजुरी दिल्याने परिपत्रक काढले. त्यामुळे आज या महानगरपालिकेस जवळपास दरमहा रु. ३.०० कोटीचा आर्थिक तोटा सहन करावा लागणार आहे. यास जबाबदार कोण? याची माहिती द्यावी. या संदर्भाने मी आजच्या सभेसाठी जकात माफी शासनाने मंजुरी दिल्याचे रद्द करुन फेरविचार व प्रशासनाचे मत अजमावणेसाठी प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. परंतु या सभागृहात सदरील प्रस्ताव ठेवण्यात आलेला नाही. सदरील प्रस्ताव हा शेतकऱ्यांच्या फायदयासाठी नसून येथील व्यापारी लोकांचे हितासाठी होता.

**मा. महापौर** जकात माफीकाबाबत मला कल्पना मिळालेली होती. या बाबत मी नगरसचिव यांना संबंधित विभागाकडून माहिती घेण्याचे आदेश दिलेले होते. दरम्यानच्या काळात स.स.श्री अफसरखान यांनी याच संदर्भाने प्रस्ताव

ठेवणेसाठी ऐनवेळी सांगितले मात्र ऐनवेळचा प्रस्ताव ठेवत असल्याने या विषय पत्रिकेवर घेण्यात आलेला नाही.

**मा. महापौर** महानगरपालिकेची निवडणूक झाल्यानंतर ही पहलीच सभा आहे. यात मनापाचे ट्रस्टी म्हणून स. स. आहेत शहराच्या विकासात आणि वार्डाच्या विकास कामासाठी या ठिकाणी सर्व स. स. नी कार्यरत राहीले पाहिजे या ठिकाणी प्रत्येक स.स.ना आपआपल्या वार्डांची बाजु मांडण्यासाठी संधी दिली जाणार आहे. या महानगरपालिकेची कुणीही खाजगी व्यक्ती अथवा इतर लोकांनी एक इंचही जागा घेण्याचा प्रयत्न केल्यास ते आम्ही ट्रस्टी म्हणून आपण कदापीही सहन करणार नाही व जाऊ सुध्दा देणार नाही. याची मी ग्वाही देतो, स.स. यांना विनंती की, त्यांनी आपसात बोलू नये. त्यांचेकडील मोबाईल फोन खिशात असेल तर तो बंद करुन ठेवावा. शक्य तो सभागृहात येतांना मोबाईल चालू ठेवू नये. सध्या स.स.यांना जास्त चर्चा न करता मुळ विषयपत्रिकेवर चर्चा करावी. नंतर प्रश्नोत्तराचा वेळ देण्यात येईल.

**श्री स. अली मिरा सलामी** मुळ विषय पत्रिकेस सुरुवात करण्यापुर्वी अगोदर चर्चेला वेळ द्यावी.

**श्री अफसरखान यासीनखान** विषयपत्रिकेस सुरुवात करण्यापुर्वी चर्चेला एकतास वेळ देण्यात यावा.

**श्री सुरजितसिंग खुंगर** सर्वसाधारण सभेमध्ये काय बोलावे यासाठी सर्व स.स.ना माहिती देण्यात यावी जेणे करुन स.स.ना माहिती मिळाल्यानंतर बोलणे शक्य होईल. त्यामुळे सभागृहात अशा रितीने बोलावे याची कल्पना होईल.

**मा. महापौर** नविन स.स.साठी एक कार्यशाळा घ्यावयाची आहे. यासाठी मुंबई येथून स. व्यक्तींना अशा कार्यशाळेसाठी पाचारण करण्यात येईल.

**सय्यद अली मिरा सलामी** सभा कामकाज नियमावलीचे प्रति सर्व स.स. च्य माहितीसाठी द्यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** दर पाच वर्षांनी सभागृहात नविन स.स.निवडून येतात त्यामुळे सभाकामकाज नियमावली सर्वांना माहितीस्तव देण्यात यावे. त्याचप्रमाणे अगोदर चर्चा करुन मुळ अजंडयातील विषयपत्रिकेवर सुरुवात करावी.

**श्री सुदाम सोनवणे** गेल्या डिसेंबर ९९ पासून या महानगरपाहिलेकेमधील सर्वसाधारण सभेमध्ये मा. आयुक्त हे सतत गैरहजर असल्याने शहरातील पाणी पुरवठा व सिडको भागातील पाणी पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झालेला आहे. तेव्हा याबाबत अगोदर चर्चा व्हावी.

**मा. महापौर** मुळ विषयपत्रिकेवर प्रथमतः चर्चा करावी.

**विषय क्र. ५/१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबादच्या फारोळा येथील नविन व जुने असे दोन्ही जलशुध्दीकरण केंद्राकरिता वार्षिक ब्लिचिंग पावडर आय. एस. १०६५ ग्रेड-१ (१५०) मे टन सन २०००-२००१ करिता खरेदी करणे आहे. सदर ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता अंदाजपत्रक रु. २२,२३,०००/- चे तयार केले असून मा. आयुक्त यांनी दिनांक १५/२/२००० रोजी अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

तरी सदर ब्लिचींग पावडर खरेदीरित्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र ५/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचा फारोळा येथील नविन व जुने असे दोन्ही जलशुध्दीकरण केंद्राकरिता सन २०००-२००१ या आर्थीक वर्षाकरिता आय. एस. १०६५ ग्रेड-१ (१५०) मे टन ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या रु.२२,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स. अली मिरा सलामी** गेली १०-१२ वर्षापासून ड्रेनेज चोकअप बाबत शहरातील ड्रेनेज स्वच्छतेसाठी बांबुची आवश्यकता असते आणि गेल्या काही महिन्यापासून ड्रेनेजचे स्वच्छता काम करण्यासाठी बांबुचा तुटवडा असून या नविन वर्षासाठी बांबुचे टेंडर काढून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**श्री अफसरखान यासीनखान** सध्या पावसाळा सुरु होत असून शहरातील ड्रेनेज बाबत अनेक तक्रारी असून स्लम भागात तर अधिकच्या तक्रारी आहेत. यासाठी तातडीने बांबु खरेदीसाठी नविन टेंडर काढून कार्यवाही करावी.

**श्री जयवंत ओक** शहरातील जे नाले कचऱ्याने तुडूंब भरलेले असतील ते सर्व नाले साफसफाई करुन स्वच्छ करावे. यासाठी प्रशासनाने दरवर्षी प्रमाणे विशेष बाब नाला साफसफाई साठी लागणारे मजूर व खर्चास विशेष मान्यता द्यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** शहरातील बरेच नाले सफाई करण्यासाठी लागणाऱ्या खर्चास व मजुरांना तातडीने मंजुरी द्यावी. त्याचप्रमाणे झोनकडून आलेले मंजुरी प्रस्तावावर सुध्दा मा. आयुक्त यांनी तातडीने अमंलबजावणी करावी. त्यांना विशिष्ट मर्यादेपर्यंतच्या खर्चास मंजुरीची परवानगी द्यावी.

**सौ नफिस ऊन्नीसा बेगमा** माझ्या वार्डात बऱ्याच ठिकाणी पावसाळयात पाणी साचते त्याचप्रमाणे ड्रेनेजचे पाणी सारखे वाहत राहते. याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी.

**श्री विकास जैन** मागील दोन-तीन वर्षापुर्वी चर्चा झालेली होती की, हर्सुल तलाब येथील गाळ व माती काढून पुन्हा या तलावातील पिण्याचे पाणी लोकांना उपयुक्त होईल. त्यासाठी काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** १ स.स.यांनी सूचना केल्याप्रमाणे शहरातील ड्रेनेज साफसफाईसाठी आवश्यक लागणारे बाबु यासाठी तातडीने टेंडर काढून आवश्यक तो कार्यवाही प्रशासनाने करावी.

२. प्रत्येक झोनमध्ये बांबुची मागणीनुसार ड्रेनेज साफसफाईसाठी पुरवठा करावा. या कामी प्रत्येक झोनमध्ये एक क अभियंता व एक स्वच्छता निरिक्षक व साफसफाईसाठी लागणारे मजूर त्या कालावधीसाठी देण्यात यावे व शहरातील सर्व नाल्याची साफसफाई व्यवस्थित होईल याची काळजी घ्यावी.

**श्री जयवंत ओक** प्रत्येक झोनमध्ये नाले साफसफाईचे रु. १.००/- लाखाचे प्रस्ताव आलेले असून त्यासाठी शॉर्ट टेंडर काढून कार्यवाही करणे आवश्यक आहे. ७-८ लाखाच्या कामाला तात्काळ मंजुरी द्यावी. स्थायी समिती अस्तीत्वात नसून बऱ्याचशा खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी न मिळाल्याने प्रकरणे प्रलंबीत आहेत. तेव्हा अशा या प्रस्तावावर कोण विचार करणार? कोण मंजुरी देणार? या ठिकाणी माझी सूचना आहे की, सभागृह नेता व विरोधीपक्ष नेता यांनी

एकत्रीत विचार करुन या बाबत सभागृहात प्रस्ताव मांडावा. त्यांनतर सभागृहाने सर्वसमंतीने त्यास मंजुरी द्यावी.

**मा. महापौर** नाले साफसफाईचे प्रश्न असोत की कोणतेही असोत आर्थिक बाबतीत खर्चाच्या मंजुरीस स्थायी समिती ही सक्षम आहे. मात्र सध्या स्थायी समिती सभापतीची निवड न झाल्याने प्रकरणे प्रलंबीत आहेत. तरीही आर्थिक खर्चास टेंडर शिवाय डायरेक्ट कोणत्याही कामास मंजुरी देता येत नाही.

**श्री आफसरखान यासीनखान** शहरातील नाले साफसफाईसाठी अंदाजे १० ते १२ लाखाचा खर्च अपेक्षीत आहे. यासाठी काय कार्यवाही करणार याची माहिती मा. आयुक्त यांनी द्यावी.

**मा. महापौर** कार्यकारी अभियंता (पापु व ड्रेनेज) यांनी माहिती द्यावी.

**श्री अ. कादिर मौलाना** शहरातील अनेक प्रश्ना संदर्भात तातडीने निर्णय घेण्यासाठी या ठिकाणी मा. आयुक्त हे सभागृहात उपस्थित नाहीत याचे नेमके कारण काय?

**श्री सुदाम सोनवणे** गेल्या ५ महिन्यापासून नुतन आयुक्त या ठिकाणी नाहीत. वेगवेगळे कारणे दाखवून ते रजेवर जातात. त्यामुळे गेल्या ४-५ महिन्यापासून स.स.चे स्वेच्छा निधीचे प्रकरणे त्यांचे वार्डातील अनेक विकास कामे प्रलंबीत आहेत त्यामुळे अनेक स.स.ना नागरिकांच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. बरीचशी कामे मंजुरी होऊनही मा. आयुक्त हे रजेवर असल्याने त्या कामाच्या खर्चाने मंजुरी व मिळाल्याने प्रकरणे प्रलंबीत आहेत. त्यामुळे अनेक नगरसेवकांची ओरड सारखी होत असते. या कामी मा. आयुक्तांच्या निष्क्रियतेमुळे वार्डातील समस्यांचे निराकरणे व्यवस्थित होउु शकलेले नाही तेव्हा या संदर्भात सभागृहाने एकमताने मा. आयुक्त यांचे बाबतीत निर्णय घ्यावा.

**मा. महापौर** स. स. ना विनंती की, विषयांतर न करता फक्त ड्रेनेज बाबतीत जी चर्चा चालू आहे. त्यावरच चर्चा करावी.

**कार्य. अभियंता (पा.पु.)** शहरातील सहा नाले विविध भागातील वसाहतीतील दरवर्षी पावसाळयापूर्वी साफसफाई करण्यात येतात. या वर्षी जवळपास आठ नाल्यांचा साफसफाई करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली असून कमीत कमी या कामासाठी सात दिवसाचा अवधी द्यावा.

**मा. महापौर** नाले साफसफाई करण्यासाठी तीन दिवसाची शॉर्ट टेडंर नोटीस काढून कार्यवाही करावी यास मंजुरी देण्यात येते.

**श्री जयवंत ओक** शहरातील सहा नाले व्यतिरिक्त आणखी बरेच नाले आहे, त्या नाल्यांचे सुध्दा आपण साफ सफाई करुन घेणार का?

**श्री नासेरखान** शहरातील नाले साफसफाई तसेच लाईटचे प्रश्न सुध्दा आहेत त्या बाबतही विचार व्हावा.

**मा. महापौर** मी नुकतीच सुचना केल्यानुसार नालू साफसफाईसाठी शॉर्ट टेंडर काढून कार्यवाही व्हावी.

**श्री माणिक साळवे** नाले साफसफाईसाठी लागणारे मजूर त्याचप्रमाणे इतर नाल्याचाही या सोबतच विचार करुन निर्णय व्हावा.

**मा. महापौर** आता या बाबतीत जास्त चर्चा झालेली आहे. पुरवणी विषय पत्रिकेवर चर्चा व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र.६/१ :**

वार्ड क्रमांक ५० गणेशनगर, सिडको (एन-८) या प्रभागामध्ये १५ ते २० हजार लोकवस्ती असून सदरील वसाहत ही उंचावर असल्याकारणाने या ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. त्यामुळे तेथील नागरिकांना नेहमी पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. या भागातील म.न.पा च्या एन-८ येथील दवाखान्याच्या शेजारील जागेमध्ये जलकुंभ बांधण्याची येथील रहिवाश्यांची बऱ्याच दिवसांपासूनची मागणी असून त्याबाबतची निवेदने मनपा प्रशासनाकडे दिलेली आहेत. सदर भागामध्ये योग्य दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी या ठिकाणी जलकुंभ बांधणे अत्यंत गरजेचे असून त्या कामासाठी तातडीने अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. तसेच चालू आर्थिक व वर्षामध्ये सदरील काम पूर्ण होण्याकरिता अर्थसंकल्पात आवश्यक रक्कमेची तरतुद करण्यात यावी. करिता सवसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सुचक | श्री नंदकुमार फुलारी |
| अनुमोदक | श्री सुदाम पाटील सोनवणे |
| | श्री अंबादास दानवे |
| दिनांक | ११/५/२००० |

**संवाद :**

**श्री प्रकाश निकाळजे** या प्रस्तावावर चर्चा करता येणार नाही.

**श्री स. अ. मिरा सलामी** जोपर्यंत अंदजपत्रक मंजूर होत नाही तोपर्यंत या प्रस्तावावर चर्चा करता येणार नाही.

**श्री अफसरखान** स. सदस्यांना माहिती नाही की, कोणत्या हेड मध्ये कितीची तरतुद केलेली आहे व कोणत्या कामासाठी केलेली नाही. आता नव्याने निवडणुका झालेल्या आहेत व प्रशासनातर्फे अंदाजपत्रक नसून सदरील प्रस्तावावर चर्चा कोणत्या आधारावर करता येणार आहे. त्यापेक्षा अर्थ संकल्प जोपर्यंत तयार होत नाही तोपर्यंत आर्थिक बाबतीतले प्रस्ताव नामंजुर करावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** आज मनपा पहिली सभा आहे नागरिकांनी उत्साहाने ८३ निवडून दिलेली सदस्य व ८३ सदस्यांनी निवडून दिलेले स्विकृत सदस्यांना येथे जनतेचे काम करण्यास पाठवले आहे. सर्वांना विश्वासात घेवून काम कराव असे अपेक्षित आहे. काही बाबी मी निदर्शनास आणून देवू इच्छितो. गेल्या चार महिन्यापासून सिडको हडको भागातील पाणी पुरवठया बाबत सततचे प्रश्न मांडत आहे. सिडको एन-७ येथे जलकुंभ बांधलेले आहे. मात्र त्या ठिकाणावरुन पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. स. सदस्य श्री सुदाम सोनवणे हे महापौर असतांना त्यावेळेस सुध्दा एन-८ येथील नागरिकांना पाण्याची व्यवस्था सुरळीत होण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी जलकुंभ बांधावा यासाठी जागेसहित प्रस्ताव दिलेला आहे. परंतू तेव्हापासून काहीही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही किंवा आर्थिक तरतुद सुध्दा केलेली नाही. सध्या याच प्रस्तावावर प्रशासनातर्फे कोणत्याही प्रकारची तरतुद केलेली नसतांना या विषयावर चर्चा करता येणार नाही.

**श्री सुदाम सोनवणे** शासनाचे वित्तीय वर्ष ३१ मार्च अखेर नंतर चार महिन्याचा अर्थसंकल्प मा. राज्यपालाच्या आदेशानुसार मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. तेव्हा सिडको हडको भागातील गंभीरतेच्या पाण्याच्या प्रश्नावर कुणीही खेळ

न करता सदरील प्रस्तावास मंजुरी द्यावी. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर प्रशासन त्यास आर्थिक तरतुद करुन नंतरच कार्यवाही करेल.

**श्री काशीनाथ कोकाटे** नागरिकांच्या विविध समस्या मांडावे परंतू या प्रस्तावावर आमचा विरोध नसून अगोदर आर्थिक तरतुद न करता चर्चा करणे योग्य नाही.

**श्री प्रकाश निकाळजे** प्रशासनाने अंदाजपत्रक महानगरपालिकेचे मंजुर केल्यानंतर विचार केला जाईल असे सांगावे तोपर्यंत पुढील सभेत सदरील विषय ठेवावा.

**श्री जयवंत ओक** जनतेचे विविध प्रश्न आहेत. शहरातील पाणी पुरवठा, लाईट व रस्त्यांचे प्रश्न आहेत या मुलभूत सुविधा पुरविणे प्रशसनास भाग आहे त्यासाठी सदरील पाण्याचा बिकट प्रश्नावर जास्त चर्चा न करता मंजुरी द्यावी.

**श्री पांडुरंग तायडे** १५० ते २०० हातपंप बसविण्यास जलकुंभ बांधण्याची गरज भासणार नाही कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

**श्री आफसरखान** संबंधित प्रस्तावावर आमचा विरोध नसून महानगरपालिका २ कोटी रुपये कोठून आणणार

**श्री अंबादास दानवे** सिडको एन-८ या भागातील जवळपास ४०-५० वसाहत असून बांधकाम पूर्ण झाले. त्याठिकाणी पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. या भागासाठी जर जलकुंभ बांधले तर नागरिकांचा व आजुबाजुच्या परिसरातील लोकांचा प्रश्न सुटू शकेल यासाठी ज्या सिडकोतील खुल्या जागा आहेत त्या पाहणी करुन त्या ठिकाणी नवीन जलकुंभ बांधण्यास काहीच हरकत नाही. प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री मिरा सलामी** पाणीपुरवठा व ड्रेनेज बाबतीत सर्व स. सदस्यांची चर्चा होणे आवश्यक आहे. जेणे करुन जनतेच्या प्रश्नावर व त्या ठिकाणच्या विविध समस्यांवर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे. परंतु कोणत्याही कामासाठी संबंधित बाबतीत आर्थिक तरतुद नसल्यास त्यावर विचार कोणत्या आधारे करणार? विषय पत्रिकेवरील प्रस्ताव रद्द करावे.

**मा. महापौर** विषयांतर न करता फक्त पाणी पुरवठयावर चर्चा करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** माजी महापौर सुदाम सोनवणे असतांना त्यांच्याकडे मी अनेकदा सिडको एन-८ येथील परिसरासाठी एक जलकुंभ बांधणेच्यासाठी निवेदन दिले होते. परंतु त्याच वेळेस सुचना केल्यानुसार प्रशासना मार्फत कार्यवाही झालेली नाही. याचे कारण काय? महानगरपालिकेचे अंदाजपत्रक कशा पध्दतीने तयार केलेले आहे. याची माहिती द्यावी.

**श्री जयवंत ओक** अंदाजपत्रक तयार करावयाचे काम महानगरपालिका ठरवित असते. प्रशासनामार्फत मंजुरी नको तर, जनतेने पिण्याच्या गंभीरतेच्या प्रश्नावर व विकास कामावर चर्चा करावी.

**श्री तकीहसन** सिडको हडको भागासाठी जलकुंभ बांधावयाचा प्रस्ताव हा चूक नाही. पध्दत चूक आहे. शहरात किती जलकुंभाची आवश्यकता आहे. प्रशासनामार्फत जागेचा प्रस्ताव येणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी जलकुंभ बांधावयाचा आहे. त्याबाबत प्रशासनातर्फे विशेष करुन नगररचना विभागाकडून जागेची पाहणी व ती जागा सर्व दृष्टीने योग्य आहे काय? याची टिप्पणी व आरखडा संपूर्णपणे तयार होत नाही. तोपर्यंत जलकुंभ बांधणेबाबत विचार करणे योग्य नाही. कारण जलकुंभ बांधणेंचा प्रस्ताव एकच नसून शहरात अनेक ठिकाणासाठी आहे. परंतु प्रशासनाने सर्वे करुन या बाबतीत निर्णय होणे आवश्यक आहे. तोपर्यंत जागेची निश्चती व्हावी.

**श्री सुदाम सोनवणे** प्रशासनाचा खुलासा घ्या. आयुक्तांनी लेखा अनुदान मंजुर केला त्या काही शिल्लक आहे का?

**मा. महापौर** जलकुंभ बांधावयाचे प्रस्तावावर तरतुदी संदर्भात मुख्य लेखा अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** पाण्याची टाकी बांधण्याची आवश्यकता आहे की नाही, याबाबत माहिती मिळावी.

**श्री जयवंत ओक** शहराच्या विकास कामांसाठी जी तरतुद केलेली आहे. ज्यामध्ये रु २८.०० कोटीची लेखा अनुदान तरतुद केलेली होती. ही तरतुद कुठे आहे याची माहिती द्यावी.

**मुख्यलेखाधिकारी** चार महिन्याच्या लेखानुदान मंजुरीस मंत्रीमंडळाने निर्णय घेतलेला होता आणि महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार नावाने सदरील आदेश पारीत केलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलमान्वये (माहिती सभागृहात वाचून दाखविली) ४ महिन्यासाठी लेखानुदान मंजुर केलेली तरतुद रु. २९,१०७९,०००/- आहे. त्यात नियमित खर्च जसे पगार, स्पिलओव्हर देयक इ. साठी विविध लेखाशिर्ष खाली तरतुदी केल्या आहेत.

**श्री सुदाम सोनवणे** लेखानुदान मंजुर केल्यानंतर नियमाप्रमाणे स्थायी समितीस अंदाजपत्रक सादर केले आहे काय?

**मुख्यलेखाधिकारी** नियमाप्रमाणे स्थायी समितीला अंदाजपत्रकास मंजुरीचे अधिकार आहेत मात्र सदरील सभाच अस्तीत्वात नसल्याने प्रशासनाने याबाबतीत शासनाचे सल्लानुसार शासनाने मंत्रीमंडळात निर्णय घेतलेला आहे व राज्याचे मा. राज्यपालाचे अध्यादेशाद्वारे चार महिन्यासाठी लेखानुदान मंजूर केले व त्याआधारे मा. आयुक्त यांनी त्यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

**श्री अंबादास दानवे, श्री सुदाम सोनवणे** सदरील विषयावर जास्त चर्चा न करता विषय मंजूर करण्यात यावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी या बाबतीत माहिती द्यावी.

**मा महापौर** (याच वेळी स. सदस्य मध्ये आपसात चर्चा चालू होते) सभा १०.०० मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. वेळ अंदाजे १२.४० वाजता सभेला सुरुवात १.२० वाजता.

**श्री कैसरखान** गणेशनगर सिडको एन-८ या भागात जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. यास सिडकोची परवानगी आहे काय? त्यामुळे जलकुंभ बांधकाम करता येऊ शकते काय? माहिती द्यावी सर्व खर्च सिडकोने करावा. पाणी आपण देवू परंतु बांधकाम का म्हणून करायचे.

**मा. महापौर** महानगरपालिकेच्या हद्दीत सिडको भाग येते आणि सिडकोच्या वसाहतीत पाणी पुरवठा करणेचा करार महानगरपालिकेने केलेला असल्याने या बाबतीत सुध्दा कार्यवाही करु शकते.

**श्री अब्दुल कादीर मौलाना** सिडको भागास एन-५ येथे दोन जलकुंभ बांधले आहेत. त्याचप्रमाणे सिडको एन-७ येथे सुध्दा दोन जलकुंभ बांधलेले आहेत. आणखी याच भागात जलकुंभ बांधणेची आवश्यकता का आहे?

**श्री अफसरखान** माझ्या मते सिडको एन-८ या भागात जलकुंभ बांधणेची आवश्यकता नाही. तरीही या बाबतीत संबंधित अधिका-यांकडून माहिती घ्यावी.

**श्री अंबादास दानवे** सभागृहात सारखी चर्चा न करता जिव्हाळयाचा प्रश्नावर सर्वानुमते मंजुरी द्यावी.

**श्री मिरा सलामी** सदरील विषयावर चर्चा न करता पुढील बैठकीत तरतुदीनंतर ठेवावा.

**मा. महापौर** सदरील विषय मंजुर करण्यात येतो व यासाठी आवश्यक लागणारा खर्च हा शासकीय निधी उपलब्धते नुसार कार्यवाही करवी. शासकीय अनुदानातून करण्यात यावे.

**ठराव क्र.६/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५० गणेशनगर, सिडको एन-८ या प्रभागामध्ये वसाहत उंचावर असल्याने तेथील नागरिकांना व्यवस्थित व योग्य दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी एन-८ येथील महानगरपालिका दवाखाण्याच्या शेजारी जलकुंभ बांधण्याकरिता शासकीय अनुदानातुन आर्थिक तरतुद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/२ :**

भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र.२ मध्ये २०,००० लोकसंख्या असल्याकारणाने तसेच संबंधित ठिकाणी विद्यार्थ्याची संख्या जवळपास चार ते पाच हजार आहे. मध्यमवर्गीय कुटूंबे राहत असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम नाही. त्यामुळे त्यांच्या विद्यार्थी मुलांना अभ्यासाचा योग्य ती सुविधा उपलब्ध करु शकत नाही. तेव्हा संबंधित परिसरातील विद्यार्थ्यांची संख्या व गैरसोय लक्षात घेता सर्व सोयींनी उपलब्ध असे अभ्यासगृह निर्माण करण्यात यावे. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक श्री गणेश तांबे
अनुमोदक श्री मधुकर सावंत
दिनांक १५/५/२०००

**संवाद**

**श्री प्रकाश निकाळजे** या प्रस्तावातील अनुमोदक सभागृहात उपस्थित नाही.

**मा. महापौर** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र.७/२ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८/३:**

भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र.२ मध्ये एकूण लोकसंख्या जवळपास २०,००० आहे. तसेच सदरील वार्डमध्ये भिमनगर, भावसिंगपुरा, श्रावस्तीनगर, पेठेनगर, नवयुग कॉलनी, कानीफनाथ नगर, तेलगोटे कॉलनी, मोतीवालानगर इत्यादी वसाहीती असून भविष्यात येथील लोकसंख्या आणखी वाढण्याचा शक्यता आहे. कारण नियोजित बऱ्याचशा कॉलनीचे ले-आऊट मंजूर झालेले आहे. या पार्श्वभूमीवर विचार करता संबंधित वार्ड नं. २ हा फार मोठा वार्ड असून संबंधित ठिकाणी मध्यमवर्गीय कुटूंबे राहतात. त्यांच्या सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी सर्व सोयीनीं युक्त असे हॉस्पीटल (दवाखाना) असणे अत्यावश्यक आहे. करीता किमान २५ खाटांची हॉस्पीटल (दवाखाना) सुरु करण्यात यावे, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक श्री गणेश तांबे
अनुमोदक श्री मधुकर सावंत

दिनांक १५/५/२०००

**ठराव क्र.८/३ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९/४ :**

भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र.२ या परिसरात पेठेनगर, मोतीवालानगर, श्रास्तीनगर, तेलगोटे कॉलनी, कानिफनाथनगर, नवयुग कॉलनी, नंदनवन कॉलनी, आशानगर, अमित नगर, संगिता कॉलनी, आशा बराच मोठा भाग असल्यामुळे या भागातील नागरिकांना सर्व प्रकारच्या खरेदीसाठी शहराच्या मध्यभागी ५ ते ६ किलोमीटर प्रवास करावा लागतो तो टाळण्यासाठी व सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी वार्ड क्र.२ मध्ये व्यापारी संकुलनाची उभारणी करणे अत्यावश्यक आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक श्री गणेश तांबे
अनुमोदक सौ साधाना सुरडकर
दिनांक १५/५/२०००

**ठराव क्र.९/४ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र१०/५ :**

भिमनगर भावसिंगपुरा या वार्डाचा लोकसंख्या जवळपास २०,०००/- असल्याकारणाने आणि संबंधित वार्डामध्ये अनेक वसाहीती असल्यामुळे या ठिकाणी सतत रहदारीचा प्रश्न बिकट झालेला आहे. भिमनगरच्या १ल्या पुलावरुन सर्व लोकांना ये जा करावी लागते. सर्व वसाहतीमध्ये येण्याजाण्यासाठी एकाच पुलावरुन प्रवेश करावा लागतो. संबंधित पुल अरुंद रहदारीच्या दृष्टीने अरुंद असून तिथे नेहमी अपघात होतात. त्यामुळे त्याच पुला शेजारी दुसरा पुल उभा करुन रस्त्याचे रुंदीकरण त्वरीत करण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक श्री गणेश तांबे
अनुमोदक सौ साधाना सुरडकर
दिनांक १५/५/२०००

**ठराव क्र.१०/५ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.११/६ :**

सौ दिप्ती शेवतेकर रा. औरंगाबाद यांची एन. आय. एस पतीयाळा येथे ज्यूडोच्या १ वर्षाच्या पदविका अभ्यास क्रमासाठी निवड झालेली आहे. तरी तयांना सन्माननिय नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधुन प्रत्येकी १,०००/- रु. प्रमाणे रक्कम २५,०००/- विशेष बाब म्हणून मंजुर करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक श्री गणेश तांबे
अनुमोदक श्री वसंत नरवडे पाटील

**ठराव क्र. ११/६ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १२/७ :**

सिडको विभागातील लोकसंख्या लक्षात घेता त्या ठिकाणी सिडको विभागाने एकही नाटयगृह बांधून दिलेले नाही. परंतू सिडको विभागाकडून नाटयगृहासाठी जागा आरक्षित केलेला आहे व ती जागा मनपाच्या ताब्यात देण्याची कार्यवाही चालू आहे. सदर जागेवर मनपाच्या वतीने लवकरात लवकर अदयावत नाटयगृह ज्याची आसन क्षमता १८०० ते २००० असावी असे बांधून जनतेची गैरसोय दूर करावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक श्री गणेश तांब, सौ जयश्री कुलकर्णी
अनुमोदक श्री प्रशांत देसरडा
दिनांक १६/५/२०००

**ठराव क्र १२/७ :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो. असे सर्वानुमते ठरले.

## *"ऐनवेळचे प्रस्ताव"*

**श्री प्रकाश निकाळजे** स. सदस्य श्री अफसरखान यांनी लेखी प्रस्ताव दिलेला आहे. त्या ऐनवेळच्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** जकात बाबत एन वेळच्या विषयावर चर्चा करावी.

**मा. महापौर** ऐन वेळचा प्रस्ताव असल्याने चर्चा करण्यास संमती देण्यात येते.

**विषय क्र १३/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १६ मे २००० पासून बी-बीयाणे व जंतुनाशके या वस्तुवर शासनाचे आदेशासनुसार जकात माफ करण्यात आली आहे. वास्तविक मागील वर्षी शासनाने वरील वस्तुवंर जकात सुरु करावी म्हणून मनपास मंजुरी दिली होती. त्यामुळे मनपाचे ३ कोटीचे उत्पन्न वाढले. तथापी शासनाने मनपाचे कोणतेही म्हणने ऐकून न घेता एकतर्फी निर्णय देवून जकात माफी दिली. त्यामुळे मनपाचे सुमारे ३ कोटीचे उत्पन्न बुडणार आहे.

वास्तविक जकात माफीचा फायदा शेतकऱ्यांना न होता सरळ व्यापाऱ्यांना होत आहे. त्यामुळे केवळ व्यापाऱ्यांचे हित लक्षात घेवून हा निर्णय झालेला आहे. प्रशासनातर्फे शासनास या बाबतीस कळविण्यात आले होते की, जकात माफ केल्यास मनपाचे ३ कोटीचे नुकसान होईल. शासनाने ही बाब विचारात न घेता निर्णय घेतलेला असल्याने मनपाच्या विकासावर याचा परिणाम होणार असल्याने शासनाकडे पुनःश्च फेरविचारार्थ प्रस्ताव पाठविण्यात यावा व तो पर्यंत बी-बीयाणे व जंतु नाशके या वस्तुवंर जकात वसुली चालू ठेवण्यात यावी.

सुचक श्री अफसरखान यासिनखान
अनुमोदक श्री स. सलीम स. युसूफ

**संवाद**

**श्री अफसरखान** जकात मधील बी-बीयाणेचा माफी बाबतचा प्रस्ताव असून सदरील प्रस्तावावर मागील सर्वसाधारण सभेने प्रस्ताव पारित करुन शासनाकडे

पाठविला व शासनाने त्यावर प्रशासनाचे कोणत्याही प्रकारचे मत न मागविता मंजुरी दिलेली आहे. या प्रस्तावावर शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा लाभ नसून केवळ व्यापारी लोकांना या प्रस्तावामध्ये नफा आहे. त्यांना शासनाची फसवणूक व दिशाभूल करुन शासनाकडून मंजुरी मिळविली आहेत त्यामुळे महानगरपालिकेची जवळपास ३.०० कोटींची वर्षाला आर्थिक तोटा सहन करावा लागणार आहे. यासाठी सदरील प्रस्तावाचा फेरविचार करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव मंजुर करुन पाठविणे आवश्यक आहे. या प्रस्तावामुळे शेतक-यांचा कोणत्याही प्रकारचे नुकसान नसून यामध्ये व्यापाऱ्यांचाच फायदा जास्तीचा आहे.

**श्री जयवंत ओक** शेतकऱ्यांचे या प्रस्तावानुसार नुकसान होईल अशी भूमिका घेऊ नये.

**श्री रावसाहेब औताडे** या प्रस्तावानुसार शेतक-यांचा कोणत्याही प्रकारे तोटा नाही परंतू बी-बीयाणे व प्रस्ताव शेतकऱ्यांशी निगडीत असल्याने त्यावर विचार व्हावा.

**श्री अब्दुल कादीर मौलाना** १-२ किलोच्या पिशवीसाठी शेतकऱ्यांचा फायदा नसून यामध्ये व्यापारी लोकांचाच फायदा होणार आहे बरेचसे व्यापारी मोठया प्रमाणात आयात करतात त्यामुळे त्यांना याचा फायदा आहे. त्यासाठी त्यांचा व्यापारही मोठया प्रमाणात असल्याने करोडो रुपयाचे ते करदाते आहेत. तेव्हा अशा व्यापाऱ्यांना बी-बीयाणेच्या संदर्भात जकात माफी देणे योग्य नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** महानगरपालिकेच्या उत्पन्नाशी निगडीत बाब असल्याने सदरील प्रस्ताव हा बी-बीयाणे जकात माफीचा व्यापारी लोकासाठी असल्याने रद्द करुन फेर विचारार्थ शासनाकडे मंजुरीस्तव पाठवावा. या प्रस्तावानुसार शेतकऱ्यांचा कोणत्याही प्रकारचा फायदा नसून तोटाच आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव मंजूर झाल्यास ज्यांनी अनेक प्रकारचे व्यावसायी दृष्टीने कर माफी करतात त्यांना आणखी चालना मिळेल व महानगरपालिकेची आर्थिक बाजू लंगडी होईल व उत्पन्न कमी प्रमाणत होईल. पिशवीवर सर्व करासहित किंवा कराराहित किंमत छापलेली असते त्याच किमंतीवर विकण्यात येते शेतकऱ्यांना तोटा नाही.

**श्री मिरा सलामी** शासनाकडून या संदर्भात प्रस्ताव मंजुर होऊन कसा आला त्यांनी प्रशासनाचे मत घेतले काय? याची माहिती द्यावी, त्याशिवाय शेतकऱ्यांचे हीत लक्षात घेता व्यापारी लोकांचा फायदा कसा होता याचीही माहिती द्यावी.

**श्री जयवंत ओक** स. सदस्य श्री मिरा सलामी व रावसाहेब औताडे यांनी केलेल्या सूचनांचा विचार व्हावा व निर्णय घ्यावा.

**श्री अफसरखान** सदरील प्रस्ताव हा दिशाभूल करण्यासाठी असल्याने या प्रस्तावास विरोध करुन मनपाचे आर्थिक नुकसान टाळावे यासाठीच सदरील बाबतीत दुरुस्ती प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविणे योग्य.

**श्री जयवंत ओक** शेतकऱ्यांच्या भावनेची कदर करुन कार्यवाही व्हावी.

**श्री अफसरखान** शेतकऱ्यांचे नांव घेऊन करोडो रुपयाचे नुकसान महानगरपालिकेचे व्यापारी मंडळी करीत आहेत ते चुकीचे आहे.

**मा. उपमहापौर** सदरील प्रस्ताव फेरविचारर्थ मंजुर करुन शासनाकडे पाठवावा.

**श्री माणिक साळवे** शासनाकडून या प्रस्तावा संदर्भात काही मदत मिळणार आहे काय? याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** या प्रस्तावावर बरीच चर्चा झालेली आहे. बी-बीयाणे किटक नाशके इत्यादीवर जकात माफी रद्द करण्यात येते. जकात माफी रद्द बाबतचा प्रस्ताव फेरविचारार्थ शासनाकडे पाठवून मंजुरी घेवून कार्यवाही करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** बी-बीयाणे जकात माफीचा प्रस्ताव रद्द केल्याने आता आपण काय कार्यवाही करणार याची माहिती द्यावी.

**श्री जयवंत ओक** शासनाकडून जकात माफी बाबतचे पत्र आलेले असून आपण या बाबतीत आता जकात माफीच्य फेरविचारार्थ कार्यवाही अशी करणार याची माहिती द्यावी.

**श्री तकीहसन खान** मा. महापौर यांनी फेरविचारार्थ प्रस्ताव मंजुर केलेला आहे, आता जास्त चर्चा करणे बरोबर नाही.

**ठराव क्र. १३/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या बी-बीयाणे व जंतुनाशके या मालावर जकात माफी देण्याबाबत दि. १३/१२/१९९९ रोजी ठराव क्रमांक १३६/८ अन्वये सर्वसाधारण सभेत ठराव पारित केलेला होता. त्यानुसार शासनाने दिनांक १६ मे २००० पासून उपरोक्त मालावर जकात माफी करण्यास मंजूरी दिलेली आहे. या जकात माफीमूळे महानगरपालिकेचे वार्षीक तीन कोटी रुपयांचे उत्पन्न बुडत असल्यामुळे सदरील ठराव क्रमांक १३६/८ दि.१३/१२/१९९९ याद्वारे रद्द करण्यात येऊन मनपा हद्दीत आयात होणाऱ्या बी-बीयाणे व जंतुनाशके या मालावर पुर्वी प्रमाणेच जकात कर आकारण्यास तसेच शासनाने जकात माफी संबंधी काढलेले आदेश रद्द करण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे आशीया खंडात झपाटयाने विकसित होत असलेले शहर म्हणून प्रसिध्द आहे, परंतू या शहराच्या सौदंर्यीकरणाच्या व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून शहराची साफसफाई योग्यरित्या होत नसल्याचे दिसून येते. गल्लीतील/रोड वरील कचरा वेळच्या वेळी उचलला जात नसल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

नागरिकांच्या आरोग्याच्या व शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून शहरातील कचरा कर्मचाऱ्यामार्फत रात्रीच्या वेळी पूर्णपणे उचलला जावा यासाठी झोन मार्फत कर्मचाऱ्यांना दोन शिफ्ट मध्ये अथवा रात्रीची शिफ्ट

सुरु करण्यात यावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक श्री सुरजितसिंग खुंगर
अनुमोदक श्री शे. इसाफ शे. जैनोद्दीन

**संवाद**

**श्री प्रकाश निकाळजे** शहरातील साफसफाई बाबतच्या प्रश्नावर प्रशासनाने गंभीरतेने दखल घेऊन कार्यवाही करावी.

**श्री सुरजितसिंग खुंगर** शहरातील बऱ्याच भागात केरकचऱ्यांने कुंडया भरलेल्या आहेत त्यामुळे डांसाचा सुळसुळाट अनेक भागात पसरल्याने नागरिकांना रोगराईने

ग्रस्त केलेले आहे. याबाबत महानगरपालिकेचे आरोग्य विभागाने योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे यासाठी शहरात दैनंदिन साफसफाई झोन निहाय होणे आवश्यक आहे यासाठी शहरात साफसफाई योग्य रितीने होणे आवश्यक आहे या करिता दिवसभरात दोन पाळयांमध्ये साफसफाई व्हावी अशी योजना आखावी अशा प्रकारचा प्रस्ताव मी मांडत आहे त्यावर विचार व्हावी.

**श्री अंबादास दानवे** स. सदस्या श्री खुंगर यांनी सुचविलेल्या प्रस्तावानुसार महानगरपालिकेशी निगडीत आहे काय?

**श्री अफसरखान** शहरात वाढती दुर्गंधी लक्षात घेता साफसफाई निटनेटीकी व्हावी यासाठी आवश्यक लागणारे कर्मचारी वर्ग रोंजदारी वरील जरी असेल तरी त्यांना कमावर घेऊन साफसफाईची व्यवस्था झोननिहाय ठेवावी. यासाठी जादा कामगार लागले तरी त्याप्रमाणे प्रशासनाने स्वच्छतेची मोहिम राबवावी.

**श्री तकी हसन खान** पावसाळा सुरु होत आहे आणि शहरातील साफसफाई सुरळीत होणेसाठी कर्मचारी वर्ग नियमित असणे आवश्यक आहे सुट्टीची दिवशी काम बंद असते २-३ दिवसात कचरा साचतो झोन ऑफीसर यांनी सकाळी ७.०० वाजता झोन मध्ये यावे झोन न. १ मध्ये ११ वाजेपर्यंत येत नाही. प्रत्येक महिन्यातील २ रा व चौथा शनिवार त्याचप्रमाणे शासकिय सुट्ट्या येतात त्या दिवशीच्या काळात कायम स्वरुपी कर्मचारी व दैनिक वेतनावरील कर्मचारी हे काम करीत नाही. यासाठी की, त्यांना त्या दिवशीची सुट्टी शासकीय नियमाप्रमाणे गृहीत धरुन रोजंदारी वरील कर्मचा-यांना पगार त्यादिवशी दिल्या जात नाही, त्यामुळे शहरातील बऱ्याच भागात साफसफाई व्यवस्थित होत नाही. याबाबतची खबरदारी म्हणून संबंधित मजुरांना त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला देणे आवश्यक आहे व सोमवार ते शनिवार दिवशी दररोज साफसाफाई निटनेटीकी होईल याची खबरदारी घेण्याची कार्यवाही संबंधित झोन अधिकारी यांनी घ्यावी असा आदेश काढावा व तसे पाबंद कराव स्वच्छता निरिक्षक, रिक्शा, लोखंडी गाडया इत्यादीची व्यवस्था करावी.

**अब्दुल कादीर मौलाना** मला अशी माहिती मिळाली की, दैनिक वेतना वरील कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी २००० पासून रु ९०/- हा दर लागू करण्याचा प्रस्ताव पारित झालेला आहे परंतु आद्यापही संबंधित दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना वाढीव दराने वेतन दिल्या जात नाही याचे कारण स्पष्ट व्हावे जेणे करुन काम करणा-या कर्मचाऱ्यांना माहे एप्रिल पासून दरवाढ झाल्यास त्यांचेवर अन्याय होणार नाही.

**श्री प्रशांत देसरडा** शहरातील साफसफाई नंतर केरकचरा उचलून कुंडया मध्ये भरल्या जाते व कुंडयातील केरकचरा हा गाडयावर उचलून ट्रेचिंग ग्राऊंडाला नेला जातो, परंतु माझ्या असे लक्षात आले की, काही भागात कचरा उचलण्याच्या गाडयांची कमतरता दिसते. ज्यामुळे कचरा दैनंदिन उचलल्या जात नाही. जर कचरा दररोजचा उचलला गेला नाही तर दुर्गंधी पसरते. बरेचसे हॉटेलवाले हे त्यांचे कडील केरकचरा जालना रस्त्यावरही टाकतात त्यामुळे सडलेल्या वस्तुंची दुर्गंधी पसरते पर्यायाने लोकांना त्याचा त्रास होतो. याबाबतची खबरदारी प्रशासनाने घ्यावी.

**श्री जयवंत ओक** झोननिहाय ठरवून दिल्याप्रमाणे नियमित साफसफाई होणेसाठी कर्मचाऱ्यांची कमतरता भासल्यास प्रशासनामार्फत तातडीने कार्यवाही करावी.

कायम स्वरुपी कर्मचा-यांनी दुसरा व चौथा शनिवाराला सुट्टी असली तरीही काम केले तर त्यांना त्याचा मोबदला दिल्या जात नसल्याने ते कामावर येत नाहीत आणि मंजुर कर्मचारी हे कामावर येत नसल्याने साफसफाई व ड्रेनेजचे कामे होत नसल्यास दुर्गंधी पसरते यासाठी झोन मधील साफसफाई सुरळीत राहील अशी व्यवस्था व्हावी एम.आय.डी.सी भागात साफसफाई व्यवस्थित होत नाही.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे** नाले साफसफाई करीत असतांना शहरातील सर्वच नाल्यांची साफसफाई सुरळीत होईल याची प्रशासनाने दखल घ्यावी त्याच प्रमाणे रोड प्रमाणे रोड वरील साफसफाई सुध्दा निटनेटकी राहील याची दक्षता घ्यावी.

**श्री अंबादास दानवे** समर्थनगर भागात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा आहे या चौका मधुन सिल्लेखाना रोड वरुन लाल रंगाचे दुर्गंधीयुक्त पाणी सतत वाहत असते. या सिल्लेखाना भागात अद्यापही जनावरांची कत्तल होत आहे त्यामुळे लाल रंगाचे दुर्गंधीयुक्त पाणी वाहते याबाबतचा प्रशासनामार्फत बंदोबस्त होणे आवश्यक आहे. पशुधन विकास अधिकारी यांना पत्र देऊन कळविण्यात आले परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही. याबाबत जर योग्यरित्या बंदोबस्त झाला नाही तर उपोषणाचा मार्ग तेथील कार्यकर्ते करणार आहेत याची नोंद घ्यावी.

**श्री सुरगोणिवार नारायण** आवष्किार कॉलनी एन-६ या भागात म्हाडाची वसाहत आहे ही वसाहत महापालिकेकडे हस्तांतरित गेली १०-१२ वर्षा पासून असून त्या ठिकाणी साफसफाई नियमित होत नाही. शिवाय बऱ्याचशा घरांमध्ये पावसाळयात पावसाचे पाणी शिरते याची प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. बऱ्याच भागात लाईट चालू नाहीत.

**श्री नासेरखान** स. सदस्य श्री अंबादास दानवे यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे ते योग्य नसून केलेला आरोप खोटा आहे. सिल्लेखाना भागात जनावरांची कत्तल होत नाहीत मागील कित्येक दिवसा पासूनचे हे आरोप खोडसळपणाचे दिसून येतात.

**श्री राजू शिंदे** शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थित होईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**श्री रतनकुमार पंडागळे** स्वच्छतेची मोहीम यशस्वी होण्यासाठी कर्मचाऱ्यांना त्यांच्य कामाचा मोबदला त्यांना मिळणे आवश्यक आहे २ ऱ्या व ४ थ्या शनिवाराला काम केलेल्या कर्मचा-यांना गेल्या ६ महिन्यापासून त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला मिळालेला नाही. बऱ्याच भागात साफसफाई मजूरांची संख्या अल्पशी आहे ती वाढविणे आवश्यक आहे. याबाबत प्रशासनाने गंभीरतेने दखल घ्यावी.

**श्री सुदाम सोनवणे** शिवशाहीच्या काळात २०० साफसफाई मजूरांना मंजूरी मिळाली होती परंतू सदरील पदे अद्यापही कायम स्वरुपी भरण्यात आलेले नाही याचे कारण काय? सभागृहाला याची माहिती द्यावी.

**श्री अफसरखान** ज्या २०० मजुरांची कायम स्वरुपी नेमणूकीसाठी कार्यवाही होईल तेव्हा कुणावरही अन्याय होणार नाही. याची प्रशासनाने काळजी घ्यावी व २०० मजूरांची पदे न भरण्याचे कारण काय?

**श्री प्रकाश निकाळजे** दिवसेंदिवस कामाचा व्याप लक्षात घेता मजूर व कर्मचारी वाढविणे आवश्यक झालेले आहे मात्र मागील ५ वर्षाच्या काळात माजी आयुक्त भोगे साहेब असतांना त्यांनी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांतूनच सर्व झोन मधील

साफसफाईचे काम करवून घेतले तेही कोणत्याही प्रकारच्या तक्रारी न येता आताच्या काळात रोजंदारीचे मजूर दोन पटीने वाढवूनही कामे झोन मधील पाहिजे त्या प्रमाणात होत नाही व उलट तक्रारी वाढत आहेत याचे कारण समजायला मार्ग नाही. यासाठी जे कर्मचारी काम करतात त्यांचे कडून कामे करवून घ्यावे व ज्या झोनमध्ये कर्मचारी कमी पडतात त्या ठिकाणी वाढ करुन दैनंदिन सफाई करावी झोन ४ मध्ये ट्रक व रिक्षा केरकचरा वाहून नेण्यासाठी वाढविणे आवश्यक आहे तसेच कर्मचाऱ्यांची वाढही होणे आवश्यक आहे व दोन पाळीत केरकचरा उचलता झोन क्र. ४ स्लम भाग ाहे दर आठवडयाला बाजार भरतो दररोज भाजी मंडई भरले कचरा जास्त होता एक जादा ट्रक देण्यात यावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** साफसफाईबाबत प्रत्येक झोन मध्ये किती कर्मचारी असावेत एकंदरी झोनची लांबी रुंदी क्षेत्रफळा नुसार लागणारे मापदंडा नुसार कायमस्वरुपी कर्मचारी किती असावे याचे प्रमाणिक ठरवूनच प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री किशोर शिंदे** माझ्या वार्डातील बराचसा भाग हा अनाधिकृत वसाहतीत मोडतो तर काही भागामध्ये नागरी सुविधा अभावी नागरिकांना वंचित रहावे लागते यासाठी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री सुनिल वडागळे** लक्ष्मी कॉलनी, शांतीपुरा व भावसिंगपुरा वार्डातील समस्यापैकी माझ्या वार्डात पाणी पुरवठयाच्या काही प्रमाणात तक्रारी आहेत तर काही ठिकाणी साफसफाई चांगली होत असून सफाई कर्मचारी यांची वाढ करणे आवश्यक आहे. माझ्या काही भागात पाणी पुरवठा सुरु होत नाही.

**श्री अफसरखान** साफसफाईसाठी कर्मचा-यांची मागणी लक्षात झोन मध्ये वाढीव मजुर मंजुर करावे व संबंधित अधिका-यांना सूचना द्याव्यात की, आपल्याकडे साफसफाईसाठी किती मजूरांची आवश्यकता आहे.

**लिलावती घायतिलक** बरेच साफसफाई मजुर एका झोन मधुन दुसऱ्या झोन मध्ये कामाला येतात यासाठी जाणेयेणेसाठी चर्तुर्थ श्रेणी कर्मचा-यांना लांबवरून यावे लागते त्यामुळे वेळ वाया जातो. दिलेले काम पूर्णपणे व्यवस्थित होत नाही त्यामुळे कर्मचा-यांचे बाबतीतही विचार होणे आवश्यक आहे.

**श्री भगवान रगडे** डुकरे जनावरे शहरात फार मोठया प्रमाणात झाले आहे याचा बंदोबस्त होणे आवश्यक आहे, पाण्याच्या टाकी बाबतीत कार्यवाही व्हावी व साफसफाईसाठी मजूर वाढवून द्यावे.

**श्री मोतीवाल जगताप** झोन मधील माझ्या वार्डातील साफसफाईसाठी लागणारे किती मजुर लागतील याचा आरखडानुसार कार्यवाही व्हावी व याबाबतची सर्व माहिती मी सोबत आणलेली आहे लहान व मोठे रस्त्यावर गाडया पाठविण्याची व्यवस्था करावी.

**श्री शे इसाक जैनोद्यीन शे.** अलताफ कॉलनी या ठिकाणी असलेला नाला या गाडयामध्ये अनेक मृत जनावरे पडलेले आहेत. या संदर्भात संबंधित विभागीय अधिका-यांना पत्राद्वारे कळविले परंतु अद्यापही कार्यवही केलेली नाही व सांगतात की, ते काम मलेरिया विभागाचे आहे. याबाबत नागरिकांच्या जिविताला धोका झाल्यास त्यास कोण जबाबदार राहील याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** या शहराची स्वच्छता कशी असावी व शहर कसे चांगले राहील याबाबत सर्व स. सदस्य व पदाधिकारी यांचे विचार ऐकवले व चर्चा सभागृहात झाली औरंगाबाद शहर हे पर्यटन स्थळ म्हणून जसे गणले गेले तसे ते एक

स्वच्छते बाबतही आंतरराष्ट्रीय स्तरावर राहावे यासाठी संबंधित अधिकारी वर्गांनी सुध्दा सतर्क राहावे अशी आमची इच्छा आहे हे काम करीत असतांना अधिका-यांच्या अडचणी काय आहेत, स्वच्छता निरिक्षक, गाडी चालविणारे वाहन चालकांच्या अडचणी काम आहेत याबाबतचे मते जाणून घेणेसाठी अधिकारी व पदाधिकारी यांची बैठक मी सात आठ दिवसापुर्वी घेतलेली होती आपण केलेल्या सूचना आहेत त्या अतिशय चांगल्या असून स. सदस्यांनी केलेल्या सूचना आहेत त्या अतिशय चांगल्या असून स. सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी पालन करावे जर त्यांनी याची अंमलबजावणी केली नाही तर त्यांचेवर कार्यवाही होईल याची नोंद घ्यावी.

१) स. सदस्य श्री तकीहसन यांनी केलेल्या सुचनेनुसार बऱ्याचशा झोन कार्यालयात मजूरांची कमतरता आहे याबाबत झोन अधिका-याकडून माहिती मागविली त्यानुसार ज्या झोनमध्ये काम करणारे मजुरांची आवश्यकता आहे त्यांना त्वरेने मजूर देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

२) सुट्टीच्या दिवशी म्हणजे दुसरा व चौथा शनिवार व रविवार या दिवशी काम केल्यास त्याचा मोबदला देण्याबाबत सुचना आलेल्या आहेत त्याबाबत खरोखरच जे मजूर सुट्टीच्या कालावधीत कामे करतात त्यांना त्या दिवशीचा मोबदला प्रशासनाने द्यावा असे मी आदेशीत करतो. याशिवाय १ एप्रिल २००० पासून दैनिक वेताना वरील कर्मचाऱ्याना रु ६५/- वरुन ९०/- रुपये दैनिक रोज देण्याचा सर्वसाधारण सभेचा ठराव स. सदस्य श्री कादीर मौलाना यांनी वाचून दाखविला याबाबत प्रशासनाने अंमलबजावणी का केली नाही याची माहिती ३ दिवसात सादर करावी व दैनिक वेतना वरील दर वाढवून मिळणेची अंमलबजावणी प्रशासनाने तातडीने करुन फरकाची रक्कम अदा करावी असे आदेशित करतो.

३) स. सदस्य श्री प्रशांत देसरडा यांनी केलेली सूचना हॉटेलवाले हे रस्त्यावर सडके अन्न व भाजीपाला अंडयांचे टरफले टाकतात त्यांना महापालिकेतर्फे २-३ वेळेस नोटीसा बजावावी व त्याप्रमाणे ते ऐकत नसल्यास त्यांचे हॉटेल परवाना रद्द करावा असे मी निर्देश देतो.

४) सदस्य श्री अंबादास दानवे यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे समर्थनगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळया समोरुन ड्रेनेज मधुन घाण पाणी वाहते. या संदर्भात कार्यकारी अभियंता पा.पु. व ड्रेनेज तसेच पशुधन विकास अधिकारी यांना त्या ठिकाणी पाठविले व मी स्वतःही त्याची पाहणी केली. ड्रेनेजद्वारे लाल रंगाचे पाणी वाहते ते योग्य नाही याचा अहवाल देण्यास सांगितले जे लाल रंगाचे पाणी वाहते ते कोठून वाहते, खरोखरच सिल्लेखाना येथे जनावरांची कत्तल होतात काय याचा अहवाल दोनच दिवसात देण्याची मी सूचना केलेली आहे.

**श्री नासिरखान अ. रहेमान खान** स. सदस्य श्री अंबादास दानवे यांनी केलेल्या आरोप चूकीचा असून त्या ठिकाणी जनावरांची कत्तले होत असून त्या ठिकाणी जनावरांची कत्तले होत नसून पडेगांवला चामडयासाठी गोदामाची समस्या प्रशासनाने पूर्ण करुन द्यावी. सिल्लेखान भागात कोणत्याही प्रकारची दुर्गंधी पसरणार नाही. याची हमी आम्ही देतो पडेगाव येथे सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** ५) स. सदस्य श्री नासेरखान व अंबादास दानवे यांना सांगू इच्छितो की मी सदरील स्थळी जाऊन पाहणी केली त्याचप्रमाणे दोन्हीही अधिका-यांकडून अहवाल मागविला असता लाल रंगाचे पाणी ड्रेनेजद्वारे वाहत हे लक्षात येते व तसा अहवालही प्राप्त झालेला आहे परत पुन्हा एकदा मी पत्राद्वारे कळविले की, लाल रंगाचे पाणी ड्रेनेजद्वारे न येणेसाठी पशुधन विकास अधिकारी व कार्यकारी अभियंता पा. पु. व ड्रेनेज यांनी कार्यवाही करावी असे सूचित केले आहे.

६) यानंतर आविष्कार कॉलनी, सिडको, एन-६ येथे साफसफाई व्हावी अशी सूचना स. सदस्य श्री सुरगोणीवार नारायण यांनी केली त्याप्रमाणे संबंधित झोन अधिकारी यांनी साफसफाईची व्यवस्था नियमितपणे करावी.

७) स. सदस्य श्री सुदाम सोनवणे यांनी विचारलेला प्रश्न २०० साफसफाई मजुरांचा याबाबत उप आयुक्त (प्र) हे माहिती देतील.

८) यानंतर स. सदस्य श्री प्रकाश निकाळजे यांनी सूचना केली की, माजी आयुक्त भोगे साहेब असतांना आहे त्याच कर्मचा-यातून कामे व्यवस्थीतरित्या करुन घेत असत. यासाठी सुक्ष्म नियोजन याची गरज आहे. त्याप्रमाणे मी आठ (झोन मधून पाहणी केली असता फक्त झोन १ मध्ये मायक्रो प्लॅनिंग प्रमाणे मजुरांची कामे चालू आहेत असे दिसले. मायक्रोप्लॅनिंग मध्ये कोणत्या कामासाठी किती मजुरांची आवश्यकता आहे व कोणता मजूर कुठे कामाला आहे याची तातडीने माहिती मिळते. अशा प्रकारची योजना सर्व झोनमध्ये राबविण्यचा विचार असून त्याप्रमाणे माहिती मागविण्यात येत आहे. याबाबत थोडाफार विलंब लागेल.

९) स. सदस्य श्री काशीनाथ कोकाटे यांनी सूचना केलेली होती की, मायक्रो प्लॅनिंग प्रमाणे झोन अधिका-यांनी कोणते मजुर कोणत्या ठिकाणी कामाला आहेत याची माहिती मिळते तशा प्रकारची माहिती झोन मधून प्राप्त झाली नाही, सर्व माहिती प्राप्त झाल्या नंतर पदाधिकारी यांना ते देण्यात येईल.

नारेगांव येथील कचरा रस्त्यावर येते त्यानुसार संबंधित वाहन चालक व झोन अधिकारी यांना तशा सूचना देण्यात येते की, केरकचरा रस्त्यावर पडणार नाही. याची दखल घ्यावी व रस्त्यावर केरकचरा पडलेला असल्यास तो तातडीने उचलून घ्यावा, ज्यामुळे शेतकरी व इतर कुणीही व्यक्तीस त्रास होऊ नये याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना मी तशा सूचना देतो.

१०) स. सदस्य श्री किशोर शिंदे यांनी केलेली सूचना त्या भागात महापालिकेतर्फे बोर्ड लावावा ती सूचना अंमलात आणावी.

११) शहरातील प्रत्येक झोन मधून केरकचरा वाहून नेत असतांना तो ट्रकद्वारे ट्रक पूर्णपणे न भरता अर्धाच भरलेला ट्रक वाहून नेला जातो याबाबत मी झोन मधील सर्व स्वच्छता निरिक्षक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत व नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंउ येथेही एका कर्मचा-यांची नेमणूक केलेली आहे. एकूण ३१ गाडया पैकी प्रत्येक गाडीने ३ ते ५ फेऱ्या मारल्या पाहिजेत. याशिवाय शहरातून केरकचरा वाहून नेत असतांना ट्रक चालकाने गाडीवर ताडपत्री झाकून चालवावे नसता संबंधितांवर दंडांत्मक कार्यवाही करण्यात येईल. दुपारच्या पाळीत केरकचरा वाहून नेण्यासाठी रोजंदारी

वरील कर्मचा-यांना पाबंद करण्यात येईल व दुपारच्या सत्रात १५ ते २० वाहने लागतील व या वाहनावर वाहन चालकही लागतील.

१२) स. सदस्या श्रीमती घायतिलक यांनी केलेलीसूचना स्लम भागातील लहान लहान गल्यामध्ये रिक्शाची व्यवस्था करावी ती व्यवस्था करण्यात येईल.

१३) स. सदस्य श्री भगवान रगडे यांनी केलेल्या सूचनाप्रमाणे शहरात डुकरांचा सुळसुळाट आहे, त्यांना पकडण्यासाठी पशुधन विकास अधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करुन पकडण्याची मोहिम राबवावी व बंद करुन कोंडवाडयात ठेवावे व दंड आकारावे स. सदस्य यांनी सुध्दा प्रशासनास या कामी दंडात्मक रक्कम वसूल करणेसाठी सहकार्य करावे.

१४) स. सदस्य श्री मोतीलाल जगताप यांनी जो चार्ट आहे तो तपासणी करुनच सर्वांना देण्यात येईल व रस्त्यावर कोणता ट्रक व कोणत्या कुडंयाद्वारे केरकचरा उचलण्यात येतो याचा नंबरसहीत माहिती विचारणा करण्यात आलेली होती त्याप्रमाणे मी याबाबत एक बैठक बोलविली आहे त्यात माहिती मिळेल व माहिती न मिळाल्यास तशा सूचना मा. आयुक्त यांना देण्यात येईल.

१५) स. सदस्य श्री नंदु फुलारे यांनी केलेली सूचना अशी की, रस्त्यावर जे नागरिक कचरा टाकतात त्यांचेवर दंड आकारावा ती सूचना अमोल अशी आहे त्याची अंमलबजावणी व्हावी, परंतु शहर सुंदर स्वच्छता ठेवणे अगोदर करावे नंतरच शहरातील नागरिकांना दंड आकारणेचे आवाहन करता येईल. या बरोबर शहर सुदंर व स्वच्छ कसे होईल याकडे सर्वांनी लक्ष द्यावे असे मी सर्वांना कळकळीची विनंती करतो.

**मा. महापौर** पाणी प्रश्नाबाबत स. सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांनी (एकत्रित प्रस्ताव दिलेला आहे व शहर व सिडको भागात महापालिका निवडणूकी नंतरही पाणी प्रश्न सारखे गाजत आहेत याबाबत स्वातंत्ररित्या बैठक बोलविण्यासाठी ७ दिवसाची नोटीस देवून बैठक बोलविता येते. तेव्हा स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता पाणी प्रश्नावर स्वतंत्रपणे बैठक बोलविल्या नंतर सविस्तर चर्चा करावी.

**श्री सुरजितसिंग खुंगर** केलेली सूचना व ठराव मंजुर करुन अमंलबजावणी व्हावी.

**मा. महापौर** स. सदस्य श्री सुरजितसिंग खुंगर यांनी केलेली सूचना आहे तो प्रस्ताव नाही व याबाबत स. सदस्यांनी अनेक सुचना साफसफाई बाबत केलेल्या आहेत त्याबाबत सर्वांनी नोंद घेतलेली आहे व त्या सूचना प्रमाणे मी प्रशासनास आदेशित केलेले आहे.

**ठराव क्र. १४/२ :**

सदरील प्रस्ताव हा प्रस्ताव नसून सूचना आहे असे सर्वानुमते ठरले.

**श्री नंदकुमार धोडले** जवळपास २ १/२ महिन्यापासून महापालिकेतील १८५ गुत्तेदार यांना त्यांची देयके लवकर अदा केली जात नाहीत. गुत्तेदारांचे एक शिष्टमंडळ तत्कालीन आयुक्त यांना भेटलेले होते व सात दिवसात गुत्तेदारांना देयके अदा केले जातील असे सांगितले होते. आचार संहितेमुळे २ १/२ ते ३ महिन्यापासून देयके प्रलंबित आहेत ते जवळपास अडीच ते तीन कोटीचे

आहेत ते त्यांना तातडीने अदा करावा, अन्यथा त्या शिष्टमंडाळाची विविध महानगरपालिकेतील विकास कामे बंद करण्याचा इशारा दिलेला आहे व तो दिनांक २२/५/२००० पासून कामे बंद करण्याचा इशारा दिलेला असल्याने महापालिकेतील स. सदस्य व प्रशासन यांच्यामध्ये वाद होतील, नागरिकांची कामे बंद पडल्यास त्यांनाही चिड निर्माण होईल यासाठी आवश्यक ती कार्यवाही व्हावी अशी माझी विनंती आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** गेल्या २-३ महिन्यापासून गुत्तेदारांचे बिले प्रलंबित आहेत तर कोणत्या कारणास्तव बिले प्रलंबित आहेत याची माहिती द्यावी. बिले थांबविण्याचे कारण काय आहेत त्या-त्या कामामध्ये खराबी आहे काय? काही तांत्रिक अडचणी आलेल्या आहेत काय? प्रशासनाकडे पैसा नाही काय? याची सविस्तर माहिती द्यावी.

**श्री अंबादास दानवे** स. सदस्य श्री नंदकुमार घोडेले यांनी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय गंभीर आहे गुत्तेदार संघटनेने उपोषणाचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे स. सदस्य व प्रशासन यांच्यामध्ये चर्चा घडवून आणणे पेक्षा गुत्तेदारांशी चर्चा करुन आता पर्यंत गुत्तेदारांचे देयके प्रलंबित का आहेत शहरातील विकास कोमे ठप्प होणार नाहीत याची दखल घेणे आवश्यक आहे. यासाठी गुत्तेदारांशी चर्चा करुन तातडीने निर्णय घ्यावा व उपोषणाचा मार्ग अवलंबून देता निर्णय व्हावा अशी अपेक्षा आहे.

**श्री विकास जैन** माझ्या वार्डात प्रत्येक ठिकाणी रस्त्याचे कामे चालू आहेत व स्ट्रिट लाईटचेही कामे चालू आहेत तेव्हा गुत्तेदारांची देयक अदा न केल्याने कामे थांबलेली आहेत. नागरिकांना त्रास होईल यासाठी कामामध्ये व्यत्यय नको गुत्तेदारांचे देयके देणे आवश्यक आहे बिले का देता येत नाही याचा खुलासा व्हावा.

**श्री प्रकाश निकाळजे** गुत्तेदारांचे प्रलंबित देयके बाबत चर्चा करीत असतांना गुत्तेदार व प्रशासन यांच्यामध्ये ही बाब विभागली आहे जर सर्वसाधारण सभेने प्रशासनास दबाव आणल्यास कामाच्या क्वॉलिटी मध्ये फरक पडण्याची शक्यता आहे, तेव्हा माझी विनंती आहे की, ही बाब प्रशासनाची असून प्रशासनावर सोडून द्यावे.

**श्री मिरा सलामी** या ठिकाणी गुत्तेदारांचे प्रलंबित देयके बाबत प्रश्न उपस्थित होण्याचे कारण काय?

**मा. महापौर** याबाबत मी उत्तर देणार आहे.

**श्री अंबादास दानवे** स. सदस्य श्री विकास जैन यांनी सुचित केल्याप्रमाणे त्यांच्या वार्डात अनेक विकासाचे कामे चालू आहेत व कामे करीत असतांना देयके प्रलंबित राहील्यास गूत्तेदार काम थांबवले पर्यायाने वार्डातील नागरीक लोकप्रतिनिधींना विचारणा करतील यासाठी लोकप्रतिनिधींना विचारणा करणे भाग पडते व प्रशासनावर दबाव टाकणे आवश्यक आहे. अन्यथा नागरिकांच्या समस्या सुटण्यास विलंब लागेल, व नागरिक रस्त्यावर येण्याची भिती आहे.

**श्री सलिम पटेल** : गुत्तेदारांचे देयके प्रत्येक महिन्यात अदा करावे. परंतु काम संपवूनही देयके दिली जात नाही याचा खुलासा दयावा.

**सुदाम सोनवणे** : गुत्तेदारांची कामे केले त्यांची देयके प्रलंबित असल्याची चर्चा सभागृहात चालू आहे. मी महापौर असतांना गेल्या डिसेंबर ९९ पासून आता पर्यंत मा.

आयुक्त हे कार्यालयात किती दिवस बसून कामकाज केले व विकास कामांचे किंती संचिका काढल्यात याची माहिती द्यावी याची उदा. दयावयाचे झाल्यास सिडकोतील पाणी पुरवठयाच्या कामास मंजूरी दिली असतांना मा. आयुक्तांनी लक्ष दिले नाही त्यामुळे आजही नागरिकांना पिण्याचे पाण्याचा प्रश्न घेऊन सारखी लोक प्रतिनिधीकडे येतात दिनांक ३/४/२००० पासून १५/४/२००० पर्यंत सिडको नागरिकांना पाणी पुरवठा पुरेसा मिळत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींची कुचंबना होत असून गेल्या ४-५ महिन्या पासून मा. आयुक्त हे कार्यालयात येऊन कामे करीत नाही याची विचारणा होणे आवश्यक आहे त्यामुळे शहराची विकास कामे ठप्प झाली आहे.

मा. आयुक्त हे रजेवर गेल्या नंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे कार्यभार दिला त्यांनीही प्रकरणे निकाली काढलेली नाहीत व अधिका-यांवर भ्रष्टाचाराचे आरोप लावलेले आहेत हे त्याचेच कारणे आहेत याचाही खुलासा व्हावा.

**मा. महापौर** या बाबत मुख्य लेखाधिकारी यांनी माहिती द्यावी ( या वेळी बरेच स. सदस्य मा आयुक्त यांनी माहिती द्यावी मुख्य लेखाधिकारी यांनी नाही असा आवाज करतात.)

**श्री काशीनाथ कोकाटे** सर्वसाधाराण सभेला आज जी चर्चा होत आहे गेल्या काही दिवसापासून मा. आयुक्त हे बैठकीला उपस्थित नाहीत. जर मा. आयुक्त यांनी पदाभार घेतलेला असल्यास त्यांची नैतिक जबाबदारी आहे की, त्यांनी या सभेला उपस्थित राहण्याची त्या सभमध्ये मा. आयुक्त ही जाणीव पूर्वक उपस्थित नाहीत असे दिसते, गेल्या ४-५ महिन्यापासून आचार संहितेच्या नावाखाली अनेक कामे व विकासाच्या कामांची संचिका प्रलंबित आहेत, त्यामुळे लोकप्रतिनिधी व जनतेच्या कामाविषयी जे झटतात, त्यांना साहजिकच चिड निर्माण होते पर्यायाने सारखे विचारणा करावे लागते. जनतेच्या प्रश्नासंबंधी प्रशासनाने प्रमुख म्हणून मा. आयुक्त यांचे खुर्चीवर उप आयुक्त बसलेले आहेत त्यांची याबाबतची माहिती द्यावी मुख्यलेखाधिकारी यांनी फक्त खर्चाची माहिती द्यावयाची असते हे लक्षात घ्यावे.

**मा. महापौर** स. सदस्यांना विनंती करतो की, मी कोणत्याही बाबतीत प्रशासनाचा बाजून नसून शहराच्या विकास कामांसाठी झटावे एवढाच उद्देश माझ्या समोर आहे.

**सौ विजया राहटकर** विकास कामे ठेकेदारामार्फत चालतात त्या त्या वार्डाचे स. सदस्यांना कोणकोणती कामे त्यांचा वार्डात चालू आहे हे कळावयास पाहिजे, दशमेश नगर येथी काम चालू आहे, २-२ १/२ महिने झाले किती दिवस काम चालणार विचारावे असता मला अद्याव उत्त मिळाले नाही.

**श्रीमती पार्वती मानकापे** माझ्या वार्डातील बरीचशी विकासाची कामे करीत असतांना अडचणी येतात या भागात रस्त्याची कामे करीत असतांना बरेच रोड खोदले जाण्या येण्याचा रस्ता बंद केला पावसात कसे वापरणार याची प्रशासनाने दखल घ्यावी व प्रश्न निकाली काढावा.

**श्री अंबादास दानवे** याबाबत मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** स. सदस्यांच्या चर्चे वरुन असे लक्षात येते की, मा. आयुक्त यांनी गेल्या काही दिवसामध्ये कार्यालयात बसून काम कलेले नाही. याशिवाय दिर्घकालीन रजेवर गेले त्यामुळे विकास कामे प्रलंबित होत आता पुन्हा मा.

आयुक्त या ठिकाणी रुजू झालेले असून त्यांनी कामास सुरुवात केली आहे. जर त्यांना या ठिकाणी कामेच करावयाची नसल्यास तसे सांगावे दुसरे आयुक्त आणणेसाठी शासनाला कळविता येईल. कारण मागील वर्षाचे स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीच्या अनेक संचिका प्रलंबित असून काही निधी परत गेले आहेत तेव्हा या आयुक्तांनी काम करणेसाठी निर्णायक भूमिका घेणे आवश्यक व स. सदस्यांच्या भावना मा. आयुक्त यांना कळवावे व पुढील सभेमध्ये ते सभागृहात आले पाहिजे त्यांनी सभागृहाचा अपमान केलेला आहे हे लक्षात घेतले पाहिजे, अन्यथा विभागीय आयुक्त यांना काळवावे.

**श्री अंबादास दानवे** मी सभागृहात नेता या नात्याने या ठिकाणी असा प्रस्ताव मांडतो की, या ठिकाणी मा. आयुक्त यांच्या जागी उप आयुक्त बसलेले आहेत. त्यांना "संपूर्ण अधिकारी बहाल करावे" अशा प्रकारचा प्रस्ताव मी मांडीत आहे त्यास विरोधी पक्ष नेता यांनी अनुमोदन द्यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** स. सभागृह नेता यांनी केलेली सूचना प्रमाणे आज पर्यंत गेली ४-५ महिन्या पासून प्रशासनामध्ये आचार संहितेच्या नावाखाली प्रकरणे प्रलंबित ठेवलेली आहेत. कोणतेही ठोस निर्णय घेता येत नाही, यासाठी विभागीय आयुक्त यांना असे कळविण्यात यावे की, महानगरपालिकेमध्ये मा. आयुक्त नसतांनाही पूर्ण वेळ देणारा आयुक्त असणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** गुत्तेदारांचे देयके प्रलंबित असल्याबाबतची चर्चा चालू आहे. याबाबत बऱ्याचशा स. सदस्यांनी विविध सूचना केल्या त्या ऐकल्या, गुत्तेदार संघटनेने माझी भेट घेऊन निवेदन दिले, आम्ही २२ तारखेला उपोषणाला बसणार आहोत. त्याबाबत आम्ही सर्व ५ पदाधिकारी यांनी असे ठरविले की, नुकतेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री औरंगाबाद शहरात येत आहेत त्यांना भेटून औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त हे सारखे रजेवर जातात त्यामुळे विकास कामे ठप्प आहेत तेव्हा त्यांचे जागी आयुक्त यांची नियुक्ती करावी असे निवेदन सर्व पदाधिकारी यांनी मिळून द्यावयाचे ठरले, परंतु सध्याचे जे प्रभारी आयुक्त म्हणून काम पाहतात ते जिल्हाधिकारी यांनी आम्हाला सांगितले की, श्री बलदेवसिंह हे त्यांच्या मातोश्री आजारी असून फारच गंभिरपणे आजारपण असल्याने ते रजेवर आहेत आता ते २६ तारखेला रुजू होणार आहेत, जर २६ तारखेला ते रुजू झाले नाही तर तुम्ही तुमचचा निर्णय घ्यावयाचा असेल तर घ्यावा परंतु माणुसकीच्या दृष्टीकोनातून यावर गंभीरतेने विचार होणे आवश्यक असल्याचे सांगितले त्यावरुन आम्ही सर्व पदाधिका-यांनी विचार विमर्श करुन मा. मुख्यमंत्री यंना भेटावयाचे नाही असे ठरले, व तशी सुचना आम्ही गुत्तेदार संघटनांचे पदाधिकारी यांनाी दिली व दिनांक २२ तारखेपासून उपोषणाचा मार्ग पत्करु नये तो आपण स्थगित करुन १ तारखे पर्यंत वाट पहावे अशी विनंती केल्याने ती संघटनेने मान्य केली कुठल्याही परिस्थितीमध्ये महापालिकेची कामे झाली पाहिजे व केलेल्या कामांचे देयके संबंधितांना मिळाली पाहिजेत या मताचा मी आहे काही स. सदस्यांनी असे आरोप केलेत की, अधिका-यांना पाठीशी घालण्यात येते. तेव्हा पाठीशी घालण्याचा प्रश्नच येत नसून विविध लोकोपयोगी कामे करणे आवश्यक आहे यासाठी आयुक्त हे रजेवरुन परत येईपर्यंत वाट पाहणे आवश्यक राहील १ तारखे पर्यंत मा. आयुक्तांची वाट पाहावी त्यानंतर पुढील कामे सुरळीत होतील.

**श्री स. अली मिरा सलामी** सध्या प्रभारी आयुक्त म्हणून जिल्हाधिकारी हे काम पाहत आहेत व त्यांनी सांगितले की, श्री बलदेवसिंग यांच्या मातोश्रीची प्रकृती ठिक नसल्या कारणाने त्यांनी रजा वाढविली. व आता ते २६ तारखेला येतील, परंतु आईच्या पकृतीमुळे ते २६ तारखेला येऊ शकतील किंवा येऊ शकणार नाही शाश्वती दिसत नाही, परंतु मा. आयुक्त हे राजेवर जाणेपूर्वी येथील उप आयुक्त यांना अधिकार प्रदान करुन जर गेले तर बऱ्याचशा स. सदस्यांच्या स्वेच्छा निधी व विविध विकासाच्या कामांच्या संचिका निकाली काढल्या असल्या व गुत्तेदारांचे देयके वेळेवर मिळाली असती त्यामुळे गंभीर प्रश्न उपस्थित झालेले आहे. ब-याचशा वार्डातील स. सदस्यांची कामे थांबलेली आहेत. त्यामुळे अडथळे निर्माण झाली आहेत तेव्हा माझी विनंती आहे की, मा. आयुक्त यांना फोनद्वारे बोलणी करुन त्यांच्या कडील अधिकारी हे उप आयुक्त यांना प्रदान करणे विषयी चर्चा करावी जेणे करावी जेणे करुन स. सदस्यांनी व विविध वार्डातील नागरिकांची कामे प्रलंबित राहणार नाहीत याची दखल घ्यावी.

**श्री सुदाम सोनवणे** महानगरपालिकेचा प्रशासन व लोकप्रतिनिधी या दोघांच्या कारभार सूरळीत चालतो, परंतु त्यातले एखादे चाक जरा निकार्य झाले तर गाडा सुरळीत चालण्यास प्रतिबंध बसतो, तेव्हा मा. आयुक्त नसल्याने ४-५ महिन्या पासून विकास कामे ठप्प झालेली आहेत, मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यापेक्षा मा. आयुक्त यांच्या बदलीसाठी शिफारस करावयास पाहिजे. आयुक्तांच्या अनुपस्थितीमुळे बरेचसे कामे ठप्प झालेली आहेत त्यासाठी ठराव घेऊन तातडीने पाठवावा.

**मा. उप महापौर** प्रभारी आयुक्त श्री चहल साहेबांशी मी चर्चा केली. सभागृहात ज्या प्रकरणावर चर्चा चालू आहे त्या विषयी मी सांगू इच्छितो की, जर आयुक्त श्री बलदेवसिंग साहेब यांची या महापालिकेत काम करण्याची तयारी नसेल तर तसे सांगावे त्यानुसार आम्हाला शासनाकडे सोयी प्रमाणो व या ठिकाणी काम करणारे अधिका-यांची नियुक्ती करण्याची मागणी करता येऊ शकते. तेव्हा चहल साहेबांनी सांगितले की, श्री बलदेवसिंग साहेबांची आईची प्रकृती ठिक नाही, त्यामुळे त्यांची सध्या मानसिक स्थिती नाही. ते दिनांक २६ तारखेला रुजू होणार आहेत व त्यांना याच महानगरपालिकेत काम करण्याची इच्छा आहे. असे सांगितले त्यानुसार कोणताही निर्णय न घेता थांबणे योग्य

**श्री अफसरखान** गेल्या १ महिन्यापासून मा. आयुक्त नाहीत तरीही बैठका होत आहेत. यामधुन निष्पन्न काहीही दिसून येत नाही काही अधिकारी यांच्या बेजबाबदार व दिशाभूल केल्या प्रकरणी महापालिकेची रुपये ३.०० कोटीची जागा नागपाल बिल्डर या व्यक्तीला हस्तांतर केलेली आहे अशा प्रकारची महापालिकेची जागा इतर व्यक्तीला देणेबाबत ज्या नागपाल बिल्डरला देऊ केली त्या संबंधित अधिकारी वर्गांची चौकशी व्हावी व दोषी व्यक्ती तथा पि. आर कार्ड नकली तयार करुन खाडाखोड केल्या प्रकरणी संबंधित विरुध्द पोलीसात फिर्याद नोंदवून ४२० ची केस दाखल करावी. याबाबतच्या बातम्या अनेक दैनिक वृत्तपत्रात सतत येत आहेत, याचा खुलासा मा. आयुक्त यांनी करावा.

**मा. महापौर** आजच्या दैनिक सामना मध्ये जी बातमी प्रसिध्द झाली त्याची माहिती नगररचनाकार यांनी द्यावी.

**नगररचनाकार** मोजणी करण्याची कार्यवाही चालू आहे.

**श्री प्रकाश निकाळजे** दैनिक वृत्तपत्रात नगररचना विभागाच्या बातम्या सतत येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये महापालिके विषयी चिड निर्माण होते असंतोष पसरतो, त्यासाठी या संदर्भात व्यवस्थीतपणे खुलासा प्रशासनाने द्यावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबतची माहिती नगररचना विभागाकडून घेऊन सभागृहात द्यावी.

**श्री अफसरखान** काही बिल्डर्सने आयेजित कार्यक्रमामध्ये स्वत: मा. महापौर उपस्थित झाले होते याचा अर्थ काय?

**मा. महापौर** स. सदस्यांनी विचारपूर्वक बोलावे मी बिल्डर्सच्या प्रदर्शनाच्या कार्यक्रमासाठी आयसीसीआय फायनान्स कंपनीने घेतलेल्या कार्यक्रमास उपस्थित होतो. एखादया बिल्डर्सच्या कार्यक्रमात नाही हे लक्षात घ्यावे.

**मा. उप आयुक्त** (स. सदस्य श्री घोडेले यांनी प्रश्न उपस्थित केला. मा. आयुक्तांनी स्वत:च्या हस्ताक्षरात उत्तर दिले ते मी वाचून दाखवितो पत्र वाचून दाखविले)

**श्री सुदम सोनवणे** जागे संदर्भात महापालिकेने अपील केलेले होते किंवा नाही.

**मा. महापौर** ९० दिवासाची मुदतीत अपील करावयाचे पाहिजे होते.

**श्री तकी हसन खान** संबंधित बिल्डर्स धारकाने जागेबाबत स्वत:च्या नावावर पी.आर.कार्ड तयार करुन घेतले, ज्यावेळेस संचिका सुरु झाली त्यावेळी नगर रचना विभागाने तत्परता लक्षात घ्यावयास पाहिजे होती त्या संचीकेमध्ये विनाकारण विलंब लावून नगररचनाकार श्री खन्ना यांनी जाणिवपूर्वक या जागे बाबतचा आक्षेप घेतला नाही व तसे महापालिकेचे काहीही आक्षेप नसल्याचे का लिहिले याची माहिती स्पष्ट करावी हा सर्व महापालिकेतील नगररचना विभागाने खेळलेला डाव आहे.

**मा. महापौर** स. सदस्यांनी सूचना मांडल्यानुसार नगररचना अधिकारी श्री खन्ना यांनी त्या जागेबाबतच्या संचीकेत कोणते वाक्य लिहिले याची माहिती द्यावी.

**नगररचनाकार** अपील स्विकारण्या बद्दलची कार्यवाही होती, त्याचा खुलासा आताच झालेला आहे.

**श्री अफसरखान** महापालिकेची जागा होती. त्या जागेवर महापालिकेने बांधकाम परवानगी दिली व पुन्हा नाकारली व नंतर सदरील जागा महापालिकेची असे लिहून नगररचना अधिकारी देतात याबाबतची माहिती द्यावी.

**श्री तकी हसन खान** जागा महानगरपालिकेची व दुसऱ्या बिर्ल्डसला देवून त्यांनी स्वत:च्या नावावर पी. आर कार्ड तयार करणे व महापालिकेच्या जागेचा दुरुपयोग करणे योग्य नाही, त्यामुळे तेथील अधिकारी व कर्मचारी यांच्या डोक्यावर एक प्रकारे फार मोठे ओझे दिसते व कुणाच्या तरी दबावाखाली काही कर्मचारी काम करतात का? असे दिसून येते यापेक्षा या जागेच्या वादा संदर्भात कुणीही वादावादी किंवा फेराफार न करण्यासाठी असलेले सर्व कागदपत्रे व संचीका मा. आयुक्त महोद्य जो पर्यंत येत नाही तो पर्यंत सर्वा समक्ष सिल करुन आपल्याकडे ठेवावे. नसता त्या कागदपत्रांची विल्हेवाट लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मा. महापौर** नगररचना विभागाने या बाबतंची सविस्तर माहिती पुढील सर्वसाधारण सभेमध्ये द्यावी.

**श्री अफसरखान** मी विचारलेल्या सूचनांची माहिती द्यावी मी वारंवार सूचना करीत आहे की, जे इतिवृत्तात नोंद होत आहे त्यानुसार माहिती द्यावी. महापालिकेच्या जागे बाबत कोणत्याही प्रकारे आर्थिक व्यवहार होणार नाही याची दखल घ्यावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** आम्हाला एवढीच माहिती द्यावी की, महापालिकेतील नगररचना विभागातील अधिका-यांना सर्व बाबतीत माहिती असतांना ते या ठिकाणी देत नाही ते माहिती न देण्याचे कारण काय? आम्हांला सभागृहात स. सदस्यांनी विचारलेले प्रश्नांची माहिती द्यावी. सर्व्हे नं. ८ व १५ च्या जागेचा नकाशा नमुद केलेला आहे त्या ठिकाणावरून ड्रेनेज लाईन गेलेली आहे या माहिती बाबत सिटी सर्व्हे मध्ये संपूर्णपणे खाडोखोड करुन बदल केल्याचे दिसते. सिटी सर्व्हे कडून आलेल्या आदेशाची त्याच दिवशी सर्व माहिती गोळा करुन नोंद घेतल्या जाते म्हणजे अशा प्रकारे माहिती न देण्याचे कारण काय? संबंधित अधिकारी हे अशा प्रकारे प्रशासनाला अंधारात ठेवून काम करीत असतील तर जनतेला व जनतेच्या पैशाच्या अपव्यय करणे होय शहरातील किती मोकळया जागा व किती खुल्या जमिनी आपण कोणाकुणाला दिलेल्या आहेत ज्यामुळे महापालिकेतील नगररचना विभागाला याची सर्व माहिती आहे. तेव्हा ही सर्व माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. अधिकारी वर्ग जर शिस्तीला धरुन चालत नसतील व महापालिकेच्या जागा विक्रली काढीत असतील अशा अधिकाऱ्यांचा पंचनामा करावा व चौकशी करावी कोणत्याही प्रकारे दबावाला बळी पडता कामा नये आपण जनतेचे प्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत, तेव्हा सभागृहात विचारलेली माहिती मिळणे आवश्यक आहे व अधिका-यांना भ्रष्टचारापासून पाबंद घालण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

**श्री दलबिरसिंग जबिंदा** नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगीसाठी गरीब लोकांकडून मालमत्ता कर भरुन घेतात, परंतू या प्रकरणात मालमत्ता कर न भरताच परवानगी दिली.

**मा. महापौर** या प्रकरणामध्ये संबंधित बिल्डर्सला प्रशासनातील कुणी अधिकारी मदत करीत असतील तर त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल व महानगरपालिकेचे जवळपास २ ते ३ एक्कर जमिनीचे कुणालाही लापरवाही व लादण्यचे प्रयत्न करीत असल्यास त्यांचाही दयामाया केली जाणार नाही सभागृहामध्ये या प्रश्नावर अत्यंत गांभिर्याने चर्चा होत आहे. मात्र सर्वच प्रश्नाला उत्तर तातडीने देणे शक्य नाही. यासाठी प्रशासनाला २-३ दिवसाचा अवधी देण्यात यावा आणि थोडयाच दिवसात मा. आयुक्त रजेवरुन येणार आहेत त्यानुसार सविस्तर माहिती मिळेल व पुढील सर्वसाधारण सभेमध्ये प्रथमत: याच प्रश्नावर चर्चा करणेत येईल.

**श्री अंबादास दानवे** "दैनिक सामना" या वृत्तपत्रात आलेल्या बातमी बाबत आपण सभागृहात चर्चा करीत आहोत विरोधी पक्ष नेता यांनी सूचना केल्याप्रमाणे मी अशी विनंती करतो की, लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेले काही स. सदस्य व प्रशासनातील अधिकारी यांची एक समिती तयार करावी व समितीने सर्वकष अभ्यास करुन अहवाल सभागृहाला द्यावा.

**श्री तकीहसनखान, श्री अफसरखान, श्री काशीनाथ कोकाटे** सर्वे नं. ८ व १५ मो शहानुरवाडी येथील जागेबाबतचे कागदपत्रे व संचिका या तातडीने सिलबंद करुन ठेवावे व माहिती द्यावी.

**श्री अफसरखान** अगोदर संबंधित जागे बाबत परवानगीसाठी कागदपत्रे महापालिकेत दाखल झालेली होती त्यावेळी या नगररचना विभागास माहिती होती की, सदरची जागा ही महानगरपालिकेची आहे नंतर पुन्हा संचीका दखल झाली त्यावेळी संबंधित नगररचना विभागाने काय लिहिले याची माहिती द्यावी व दुसरे म्हणजे या जागे संदर्भात संबंधित विभागास माहिती आहे किंवा नाही याचा खुलासा व्हावा व नव्वद दिवसा नंतर अपील कसे घेतले.

**मा. महापौर** संबंधित विभागाने स्पष्ट करावे की, त्या संचीकेत नो ऑब्जेक्शन लिहिले आहे किंवा नाही.

**नगररचनाकार** या अटी व शर्ती स्विकारण्याबद्दल महानगरपालिकेकडून प्रशासकीय मान्यता झालेली आहे आणि त्याबद्दल मा. आयुक्त यांनी जो खुलासा केलेला आहे त्या खुलासा बद्दल अपीलाची वस्तुस्थिती दिलेली आहे. अपील स्विकारणे बद्दल ना हरकत दिले जागे बाबत नाही.

**श्री तकी हसन खान** जास्त चर्चा न करता संबंधित कागदपत्रे सिल करुन पुढील बैठकीत चर्चा करावी. ब-याचशा स. सदस्यांना या विषयाची काहीही माहिती नाही.

**श्री सुदाम सोनवणे** स. सदस्य श्री तकी हसन खान बोलले ते चुकीचे असून या संदर्भात सर्व स. सदस्यांना माहिती आहे. मुळ संचीका यांच्याकडे आहे काय? व वर्तमानपत्रात आलेली बातमी खरी किंवा खोटी.

**मा. महापौर** ज्या विषयाची सभागृहात चर्चा चालू आहे ती संचीका सध्या कुठे व कुणाकडे आहे या बाबतची माहिती श्री खन्ना नगररचनाकार यांनी द्यावी.

**नगररचनाकार** सदरची संचिका मा. आयुक्त यांच्याकडे आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** ही पध्द्त बरोबर नाही. सदरची संचीका मा. आयुक्त यांचेकडे नसून प्रशासन दिशाभूल करीत आहे. (याच वेळी काही स. सदस्यांचा आवाज येतो दिशाभूल करावयाची नाही भ्रष्टाचारास वाव देवू नका) सदरची संचीका ही सिटी सर्व्हेच्या कार्यालयात आहे (या वेळी काही स. सदस्यांचा आपसात बोलत असल्याचा आवाज जोरात असतो त्यामुळे काहीही ऐकू येत नाही.

**मा. महापौर** दहा मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते. (वेळ ४.१० अंदाजे सायंकाळी सभेला सुरुवात सायंकाळी ५.१० वाजता)

**मा. महापौर** ज्या विषयाच्या संचीकेसाठी सभा तहकुब करण्यात आली होती त्या संचिका एकंदर (७) सात आहेत व त्या मा. आयुक्त यांच्याकडे होत्या त्या सर्व संचिका माझ्याकडे आलेलया आहेत. त्या सर्व संचिका सर्वा समक्ष सिलबाद करुन मा. आयुक्तांचे स्विय सहाय्यक यांचेकडे ठेवण्यात येते.

**श्री प्रकाश निकाळजे** या सर्व संचिका मा. महापौर यांच्या कस्टडीत ठेवावयास पाहिजे व मा. आयुक्त आल्या नंतर त्या पुढील सर्वसाधारण सभेमध्ये उघडण्यात याव्यात.

**श्री अफसरखान** या संदर्भात एखादी कमिटी नेमावी व कमिटीने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावी.

**मा. महापौर** पुढील सर्वसाधारण सभेच्या वेळी पांचही पदाधिकारी यांचे समवेत संचिकांचे सिल उघडण्यात येतील. तत्पुर्वी सर्वसाधारण सभापुर्वी संबंधित विभागाने माहिती द्यावी. त्यानंतरच कमिटीचा विचार करण्यात येईल.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २०/६/२००० रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**मंगळवार दिनांक २०/६/२००० रोजी औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" यांचे सकाळी ११.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | स. सदस्य |
| ३) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ५) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| १०) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ११) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १३) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १४) स. स. सौ मंदाबाई प्रभाकर पवार | -//- |
| १५) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १६) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १७) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १८) स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १९) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| २०) स. स. श्री शकील पटेल शे. बुढन पटेल | -//- |
| २१) स. स. श्रीमती डॉ आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २२) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २३) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २४) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २५) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २६) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २७) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २८) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २९) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| ३०) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३१) स. स. श्री अय्युब खॉ सरदार खॉ | -//- |
| ३२) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |

३३) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल -//-
३४) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग -//-
३५) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३६) स. स. सौ. रशिदा बेगम गफफार यार खॉन -//-
३७) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३८) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३९) स. स. श्री स. मुमताज अली मोज्जम अली -//-
४०) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
४१) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
४२) स. स. श्री थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव-//-
४३) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४४) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४५) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४६) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४७) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४८) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४९) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
५०) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
५१) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
५२) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
५३) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
५४) स. स. श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद -//-
५५) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५६) स. स. श्री अशरफ मोतीवाला -//-
५७) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५८) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५९) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
६०) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
६१) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भागिरथ -//-
६२) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
६३) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
६४) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
६५) स. स. श्री गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहमद -//-
६६) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसालत अली -//-
६७) स. स. सौ नफिसुन्निसा बेगम हबीब खॉ -//-
६८) स. स. श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख -//-
६९) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
७०) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
७१) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
७२) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
७३) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्दीन खान -//-
७४) स. स. श्री तुळशीबागवाळे किशोर बाबुलाल -//-

७५) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
७६) स. स. सौ बबीता सुभाष कागडा -//-
७७) स. स. श्री सय्यद अली सलामी सय्यद मिरा स. -//-
७८) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज -//-
७९) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री घडामोडे भगवान देविदास
२) स. स. सौ कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
४) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**संवाद**

**सुदाम सोनवणे** स. स. श्री भरत लकडे यांच्या मुलीच्या निधनाबद्दल सभेत १.०० मिनिट श्रध्दाजंली अर्पण करावी.

**भगवान घडामोडे** यास माझे अनुमोदन आहे.

**जयवंत ओक** स. स. श्रीमती चंद्रभागाबाई दाणे यांचे बंधुचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. महापौर** ठिक आहे. सभाहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.
सभागृहात ०१.०० मिनिट स्तब्ध उभे राहून सर्वांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

**अविनाश कुमावत** श्री भरत लकडे यांची कन्या वारली ती गॅस्ट्रोने वारली किंवा कसे गॅस्ट्रोच्या ४८ केसेसची नोंदणी झाली.

**श्री. अंबादास दानवे :** स.स.श्री. भरत लाकडे यांच्या मुलीचे निधन झाले ते देदैवी होय तसेच प्रकरणांच्या गॅस्ट्रोच्या साथीमुळे जवळपास ४० च्या वर रुग्णांची संख्या असू शकते. आपल्या शहरातील अस्वच्छता व दुर्गंधी यामुळे गॅस्ट्रोची साथ पसरलेली आहे. गॅस्ट्रोच्या साथीचा कोणत्याही प्रकारचा फैलाव शहरात होऊ नये याची प्रशासनातर्फे खबरदारी घेऊन सर्वत्र स्वच्छता, फवारणी व औषधांचा वापर करुन नागरीकांच्या आरोग्याबाबत उपाययोजना करावी.

**सुदाम सोनवणे** शहरात आतापर्यंत एकूण ४० रुग्ण गॅस्ट्रोचे असल्याची माहिती मिळाली आहे. तेव्हा शहरात खरोखरच गॅस्ट्रोची लागण झालेली आहे का? याची माहिती द्यावी.

**अफसरखान यासिनखान** गॅस्ट्रोचे शहरात ६ ते ७ रुग्ण असल्याचे दवाखान्याच्या आधारे दिसून येते. तेव्हा शहरात गॅस्ट्रोची लागण होत आहे. यावरुन स्पष्ट होते. शहरातील दुर्गंधी व अस्वच्छतेचा अभाव तसेच दुषीत पाणी यामुळे गॅस्ट्रोची लागण पसरण्याची शक्यता आहे. पावसामुळे दुर्गंधी वाढते. कचरा गटार १५-१५ दिवस साफ होत नाही यावर कडक कार्यवाही करावे. ४ दिवसात साफसफाई करावी. अधिका-यांकडून खुलासा घ्यावा.

**गणेश तांबे** माझ्या वार्डात गेली ४ १/२ (साडे चार) वर्षापासून स्वच्छता निरीक्षक नसल्याने स्वच्छता पुरेशा प्रमाणांत होत नाही. तेव्हा स्वच्छता दैनंदिन होणेच्या दृष्टीने स्वच्छता निरिक्षकाची आवश्यकता आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** झोन - ३ मध्ये मागे आपण बैठक घेतलेली होती की, या प्रभागातील साफसफाई व्यवस्था निटनेटकी व्हावी. परंतु अद्यापही याबाबत कार्यवाही केलेली नाही. याची सभागृहात माहिती द्यावी.

**जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग** झोन-४ येथील गॅस्ट्रोच्या नोंदी आपल्याकडे आल्या आहेत एका भागात चामडयाचे गोदाम आहे त्यामुळे तेथील नागरिकांना अत्यंत त्रास होत असून पशुधन विभागाने तातडीने कार्यवाही करावी. याच प्रमाणात उस्मानपुरा भागात भंगाराचे गोदाम आहे. ज्यामुळे त्या ठिकाणी कचरा साचून दुर्गंधी पसरते त्याबाबतही कार्यवाही व्हावी.

**सय्यद अली सलामी सय्यद मिरा सलामी** शहरातील पाणी पुरवठा विषयी बैठक बोलविण्याचे घोषित केलेले होते. परंतु अद्यापही बैठक न घेण्याचे कारण स्पष्ट करावे. शहरातील जो पाणी पुरवठा होतो त्यामुळे काही जुन्या भागातील जुने नळ कनेक्शन व पाईपलाईन मुळे निकृष्ट दर्जाचे असल्याने ते फुटतात व त्यालाच लागून ड्रेनेजचा पाईपलाईन असल्याने दोहोमध्ये मिसळून पाणी दुषित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे नागरिकांना दुषित पाणी प्यावयास मिळाल्याने गॅस्ट्रो सारखी साथ होण्याचा संशय होतो कारण शहरातील स्वच्छता दैनंदिन सुरळीत होणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे ड्रेनेजच्या पाईप लाईन कुठेही फुटून पिण्याचे पाण्याचे लाईनमध्ये कुठे मिसळते काय? याची पाहणी करुन कार्यवाही तातडीने झोन निहाय करणे आवश्यक असते व याची दखल प्रशासनाने घ्यावी. मा. महापौर यांनी दर रोज पत्रकार परिषद घेऊन वर्तमानपत्रात कुठल्यातरी बातम्या प्रसिध्द करुन प्रकाश झोतात येणे ते बरोबर नाही. शहरातील झालेल्या कामांचा निर्णय व अमंलबजावणी झाल्यानंतर पत्रकारांना निर्णय कळवावा.

**श्री सुदाम सोनवणे** शहरात गॅस्ट्रोची लागण झाली आहे काय? संबंधित अधिका-यांनी माहिती द्यावी.

**श्री जयवंत ओक** स. स. श्री स. अली मिरा सलामी यांनी सांगितल्या प्रमाणे शहरातील ड्रेनेज लाईनची व्यवस्था सुरक्षीत नाही व ड्रेनेजचे पाणी रस्त्यावरुन बऱ्याच भागात वाहत जातांना दिसते व तेच दुषित पाणी पिण्याचे पाण्यामध्ये मिळाल्यास पाणी दुर्गंधीयुक्त व दुषित होऊन नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने त्रासाच होतो व रोगराई होऊ शकते शहरातील लहान सहान बाबीकडे प्रशासन दुर्लक्ष करते. त्यामुळे नागरीकांना त्रास होतो. यासाठी तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे नसता प्रशासन व प्रशासनातील अधिका-यांचे अशा प्रकरणी बदनामी होते. ड्रेनेज लाईन व पाणी पुरवठा लाईन वेळोवेळी का फुटते याची कार्यवाही होणे अत्यंत आवश्यकता आहे आणि झोननिहाय आलेल्या तक्रारीचे निवारण तातडीने होणे आवश्यक आहे यासाठी नागरिकांच्या तक्रारी तातडीने दूर करणेसाठी ड्रेनेज व पाणी पुरवठा पाईप लाईन दुरुस्ती व देखभाल या शिर्षाखाली रेटलिस्ट तयार करण्याचे अधिकार झोनलाच द्यावयास पाहिजे. मुख्य कार्यालयात याचा संपर्क नको. जेणे करुन नागरिकांना वेळोवेळी मुख्य कार्यालयाशी संपर्क न साधता झोन लाच संपर्क करुन निवारण करणेची कार्यवाही करता येऊ शकते.

**श्री प्रशांत देसरडा** साफसफाई ही दैनंदिन व चांगलया प्रकारे कशी होत राहील, तशी मोहीम राबवावी. संबंधित झोन अधिकारी सकाळच्या सत्रात नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी झोनमध्ये उपस्थित राहिल्यास व वेळ

ठरविल्यास त्यानुसार नागरिक त्या वेळेत तक्रारी घेवून येतील. परंतु बऱ्याच वेळेस संबंधित झोनमध्येच झोन अधिकारी उपस्थित नसल्याने तक्रार घेऊन आल्यानंतर ताटकळत बसावे लागते.

**श्री नंदकुमार फुलारी** पाण्याची टाकी साफ नाही. साफ करुन घ्यावी.

**श्री राजु शिंदे** माझ्या वार्डातील साफसफाई बाबत मी झोनमध्ये पत्र दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी. त्याचप्रमाणे मुख्य कार्यालयात पत्र देऊन सूचना केली की, माझ्या वार्डात साफसफाई मजूर अत्यंत कमी असून दैनंदिन साफसफाई निटनेटकी होत नाही. तेव्हा याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**श्री तकीहसन खान** शहरातील ज्या जुन्या पाणी पुरवठाचे पाईप लाईन आहेत त्या फार जुन्या असून त्या बदलणे आवश्यक आहे. ज्यामुळे कोणत्याही वेळेस त्या पाईप लाईन फुटतात व ड्रेनेजचे लाईन आहेत. त्यामध्ये मिसळल्यास पाणी दुषित होते. पर्यायाने नागरिकांना पाणी दुषित प्यावयास मिळते. त्यामुळेच गॅस्ट्रोची लागण होण्याची शक्यता असते. सरकारी घाटी दवाखानान्यात आतापर्यंत १७ रुग्ण गॅस्ट्रोचे दाखल झालेले आहेत. एका वर्तमानपत्रात बुढीलेन भागातील साफसफाई व कचराकुंडी अस्वच्दतेबाबत दि. ३१/५/२००० च्या वर्तमानपत्रात फोटोसह बातमी प्रसिध्द केली तर दि. १९/६/२००० रोजीच्या वर्तमानपत्रात तीच बातमी फोटोसहित प्रसिध्द केली. त्याच प्रकरणात (वर्तमानपत्रातील फोटोसहीत बातमी सभागृहात दाखवितात) ज्यामुळे शहरातील साफसफाई करण्यापेक्षा दुसरे कारण काय? वर्तमानपत्रावाले एकच बातमी दुस-यांदा छापून आणतात. त्यामुळे विश्वास ठेवावे का? साफसफाई संदर्भात प्रशासनाने दखल घेतली आहे कचरा उचलल्या जातो, कचरा पहिल्यापेक्षा जास्त उचलण्यात येतो व पहिल्यापेक्षा जास्त सफाई होते व शहरातील जेवढया काही जुन्या वसाहती आहेत त्या भागात पाणी पुरवठा व ड्रेनेजच्या पाईप लाईन या जुन्या स्वरुपातील असल्याने व वारंवार फुटत असल्याने दोन्ही पाईपचे सरळ मिसळ होऊन पाणी दुषित होत असल्याने नागरिकांना रोगराई सारख्या संकटाला तोंड द्यावे लागते. यासाठी जुन्या पाईप लाईन या बदलून पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईन या वेगवेगळया कराव्यास यासाठी की, गॅस्ट्रो सारख्या रोगांवर दुषित पाण्यामुळे मात करता येईल माझ्या वार्डात २,३ दवाखाने आहेत मात्र एकही गॅस्ट्रोचे लागण झालेले रुग्ण आढळून आले नाही. मागच्या महिन्यात ३४ व आता १७ पेशंट आहेत तेव्हा पाईप लाईन वेगवेगळया कशा होतील याचा निर्णय होणे आवश्यक आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** गॅस्ट्रोची लागण ही सर्व शहरात पसरलेली आहे सिडको येथील महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल व शासकीय व अशासकीय दवाखान्यात या गॅस्ट्रोचे रुग्ण असल्याची माहिती मिळालेली आहे. स.स.श्री लकडे यांच्या मुलीचा मृत्यू गॅस्ट्रोने झालेला नाही अशी माहिती देण्यात आली सध्या पावसाळा सुरु झालेला असून पावसाळयात घाणीने व साफसफाई निटनेटकी न झाल्यास दुर्गंधी होऊन रोगराई पसरते हे सभागृहाचे मत झालेले आहे. मा. महापौर यांनी पत्रकारांना माहिती दिली की, स. स. च्या मुलीचे निधन गॅस्ट्रोने झालेले नाही हे कुठल्या अधारे केले. त्या ठिकाणी दुर्गंधीयुक्त पाणी गेले कित्येक दिवसापासून येथील नागरिकांना प्यावयास मिळते ज्यामुळे गॅस्ट्रोसारखा प्रकाराने लोक मृत्यूमुखी पडतात. याची खबरदारी घेणेसाठी

प्रशासनातील अधिकारी यांनी झोननिहाय स्वच्छता व नागरिकांच्या आलेल्या तक्रारीचे तातडीने निवारण करणे आवश्यक ठरते आणि प्रशासनाच्या गलथाणपणामुळे स. स. च्या मुलीचे निधन झाले व मा. महापौर हे चुकीची माहिती पत्रकारांना देऊन प्रशासनाला पाठीशी घालत आहेत हे या ठिकाणी लक्षात घ्यावे. तेव्हा शहरातील गॅस्ट्रोची लागण लागलेली पूर्णपणे व्यवस्थित करणेसाठी झोननिहाय स्वच्छता, दुर्गंधीयुक्त पाणी, याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी व गॅस्ट्रोसारख्या रोगाबाबत प्रशासन काय उपाययोजना करणार याची माहिती द्यावी.

**श्री भगवान घडामोडे** स. स. श्री भरत लकडे यांच्या मुलीचे निधन गॅस्ट्रोने झाले हे विरोधीपक्ष नेता यांचे म्हणने योग्य नसून त्यामुळे मा. महापौर यांनी अधिकाऱ्यांना पाठिशी घालण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ज्या तक्रारी प्रशासनाकडे दाखल होतात त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखाकडे असते. जर वेळोवेळी तक्रार दाखल करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नसल्यास योग्य ती माहिती घेऊन निर्णय व्हावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** मी माझे वैयक्तीक मत मांडलेले आहे व प्रशासनास या संदर्भात ४ वेळेस मा. महापौरांनी स्वच्छतेवर बैठकी बोलावल्या आहेत व अधिका-यांची बैठकही घेतलेली आहे परंतु त्यामधुन काही निष्पन्न होत नसल्यास त्यांचेवर काय कार्यवाही करणार मागील वेळेस मा. महापौरांनी पाणी पुरवठा यावर बैठक घ्यावयाचे ठरले होते, परंतु अद्यापही या संदर्भात कार्यवाही झालेली नाही.

**श्री संजय शिरसाठ** स. स. श्री तकी हसन खान यांनी मा. महापौरांनी चांगले काम केल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तेव्हा या सभागृहात गॅस्ट्रोबाबत निर्णय व्हावा. स. सदस्यांच्या सूचनेकडे लक्ष द्यावे गॅस्ट्रोबाबत पेपर कंटींग फोटो दखवण्यात आलेले आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** शहरातील ड्रेनेज व पाणी पुरवठा पाईप लाईन वेगवेगळी होणे आवश्यक आहे. दुषित पाणी येते. या बाबतची माहिती द्यावी.

**श्री सुदाम सोनवणे** गॅस्ट्रोची लागण शहरात आहे किंवा नाही याची माहिती द्यावी.

**श्री अंबादास दानवे** स. स. चे मुलीचा मृत्यू गॅस्ट्रोने झाल्याचे अद्याप घोषित केलेले नाही. परंतु यापूर्वीपासून त्या भागात पाणी गढूळ येत असल्याच्या तक्रारी होत्या त्यावर कार्यवाही करणे आवश्यक होते. प्रशासन याबाबत निष्काळजीपणाने वागते असे यावरुन दिसते, शहरातील नागरिकांच्या आरोग्यास अपायकारक कोणत्याही घटना घडू नयेत यासाठी प्रशासनाने आपले कार्य पार पाडावे नागरिकांनी दिलेल्या तक्रारीची दखल वेळीच घ्यावी.

**मा. महापौर** स. स. श्री लकडे यांची मुलगी मृत झाल्याचे मला समजले त्या वेळेस मी स्वतः आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेसह मी स. स. श्री लकडे यांच्या कडे जाऊन भेट घेतली. मृत मुलीला ढवळे या हॉस्पीटलमध्ये उपचारांसाठी दखल केलेले होते मी स्वतः त्या मुलीचे केस पेपरची पाहणी केली आणि संबंधित डॉक्टारांशी चर्चा केली परंतु केस पेपर वरुन असे लक्षात आले की, सर्व औषधोपचार व तांत्रीक पाहणी केली असता मुलीचा मृत्यू मेंदू ज्वराने झाला असल्याचे स्पष्ट झालेले आहे मागील महिन्यात शहरात गॅस्ट्रोची लागण आहे. त्याबाबतची माहिती घेतली असता मागील महिन्यात ४६ रुग्ण

आढळले. असा अहवाल आहे आणि या महिन्यात १७ गॅस्ट्रोची लागण लागल्याची रुग्ण असल्याचे दिसुन आले या गॅस्ट्रोच्या संदर्भात माहिती मिळताच मी तातडीने माझ्याकडे बैठक बोलविण्यात आली होती. व सदरील बैठकीत आरोग्य वैद्यकीय अधिकारी व संबंधित झोन अधिकारी यांना नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शहरातील साफसफाई बाबत योग्य त्या सूचना मी दिलेल्या होत्या याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावयाचे सुध्दा सांगण्यात आले वेळोवेळी गॅस्ट्रोची लागण झाल्याचे ठिकाणी रुग्णांचे अहवालाचे नोंद घेण्याचे सांगून विविध मनपा दवाखान्यात योग्य ते निर्देश देण्याची सूचना दिलेल्या आहेत व त्यानंतरच पत्रकारांना माहिती दिलेली आहे. जेणे करुन विविध झोन मधुन सुक्ष्म नियोजन यंत्रणा साफसफाई साठी वापरुन शहरातील नागरिकांना रोगापासून मुक्त होणे व साफसफाई मजूर व्यवस्थित काम करुन शहरात स्वच्छता राहील अशी काळजी घेतील म्हणून हीयोजना अमलात आणण्याची गरज वाटली त्याबाबतचा सुद्धा अहवाल विविध झोनमधुन मागविण्यात आला. तरीही गॅस्ट्रोने संदर्भात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** शहरात गॅस्ट्रोची लागण आहे यामध्ये दुमत नाही. गॅस्ट्रो काय आहे. एकाच वेळी संडास, उलटी झाली तर गॅस्ट्रोची लागण होते. शरीरातील पाणी कमी होते रुग्ण दगावण्याची शक्यता असते व परिसर स्वच्छता, दुषित पाणी, शिळे अन्न, आंबे यांचा वापर इ. मुळे मे च्या शेवटच्या आठवडयात व जून, जुलै मध्ये गॅस्ट्रोचे प्रकार होतात वैद्यकीय महाविद्यालयात निदान होते. तेथे संपूर्ण जिल्हा व आजुबाजुचे लोक येतात. शहरातील व ग्रामीण भागात रुग्ण येतात ज्या भागातील रुग्ण आहे तेथे पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासने परिसर स्वच्छ ठेवणे इ उपाय योजना करतो व एम.पी. डब्ल्यू द्वारे ही उपाय योजना केली जाते. सर्व शहरातील रुग्ण सापडले. तर उपचार करण्यात येते. गेल्यावर्षी एप्रिलमध्ये ४६ व आता ५१ मे मध्ये ५२ जून मध्ये ४६ व आता १८ रुग्ण आहेत. तातडीने उपय योजना केली. पिण्याच्या पाण्याचे नमून पाठवतो. झोन वाईज स्वच्छता, फवारणी करणे हॅलोजनच्या गोळया झोन मधुन देवून, आम्ही पूर्वी घरोघरी वाटत होतो. सर्वच वार्डातून फवारणी सुरु केली आहे.

**जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग** खुल्या पदार्थावर माशा बसतात त्यामुळे रोगराई पसरते.

**मा. महापौर** जेथे स्लम आहे. तेथे माशा जास्त आहे. फवारणी करायच्या सूचना देण्यात आल्या.

**श्री जयवंत ओक** वर्तमान पत्रात जाहिरात देतात झोपडपट्टीमध्ये लोक वर्तमानपत्र वाचत नाही. महानगरपालिकेने उपाययोजना काय केली. जाहिरात देतात त्याबद्दल धन्यवाद.

**मा. उपमहापौर** झोपडपट्टी भागात माईकद्वारे लोकांना सकाळ-संध्याकाळ सूचना द्यावी. नागरिकांनी जागरुक राहावे. रिक्शामध्ये कॅसेटद्वारे प्रसिध्दी द्यावी.

**श्री स. अली मीरा सलामी** गॅस्ट्रो बाबत चर्चा चालू आहे उपमहापौर यांचे घरासमोर दुषित पाणी होते ते ड्रेनेज युक्त पाणी होते अशा पाण्यामुळे कोणते आजार होते याची माहिती द्यावी व ही माहिती पोस्टर लावून व अनाऊन्स करुन द्यावी.

**श्री जयंवत ओक** रिक्शा भाडयाने न घेता विकत घ्यावी उपमहापौरांची सूचना अत्यंत चांगली आहे. अमंलबजावणी करावी.

**श्री कशीनाथ कोकाटे** महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत औषध फवारणी होते की नाही त्यांचे कर्मचारी काय करतात.

**मा. महापौर** आरोग्य वैद्यकीय अधिकरी यांनी सविस्तर माहिती द्यावी दुषित पाण्यामुळे कोणते संसर्गजन्य रोग होतात. पाऊस पडला की गॅस्ट्रो होतो.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** फक्त गॅस्ट्रोच होतो असे नाही, कविळ, कॉलरा, असे संसर्गजन्य रोग पाण्यामुळे होतात, काविळाचे रुग्ण मार्चमध्ये ५ एप्रिलमध्ये ८ मे मध्ये १० जून मध्ये २ रुग्ण निर्दशनास आले आहे.

**मा. महापौर** कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व ड्रेनेज) यांनी अस्वच्छेतेबाबत माहिती द्यावी.

**श्री जयवंत ओक** (यावेळेस सभागृहात जोरजोरात स.स.मध्ये आवाज होतो काहीही ऐकू येते नाही.)

**श्री भगवान रगडे** मिसारवाडी भागात आजूबाजूच्या परिसरात औद्योगिक कारखाने आहेत व कारखान्याचे दुषित पाणी बाहेर सोडलेले असल्याने नळाद्वारे पिण्याचे पाण्यामध्ये पाणी मिळते. याचा दुष्परीणाम म्हणजे गॅस्ट्रोची लागण काही ठिकाणी झालेली आहे. उपआयुक्त (म.) यांनी भेट देऊन पाहणी केली परंतु अद्यापही कार्यवाही झालेली नाही. कारखान्यातील दुषित पाणी बंद होणेसाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे. नारेगांव येथे शहरातील विविध झोन कचरा वाहून आणून या ठिकाणी रस्त्यावर टाकला जातो. त्यामुळे या भागात पावसाने कुजल्याचा दुर्गंधी वास येतो. येथील ड्रेनेज चेंबर फुटलेले आहेत. ज्यामुळे सांडपाणी वाहून जात नाही व रस्त्यावर घाण पाण्याची वाट चालू असते. साफसफाई व ड्रेनेजचे चेंबर व्यवस्थित रित्या करणेसाठी संबंधित अधिका-यांनी कार्यवाही करावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** सर्व शहरात दुषित पाणी पुरवठा होतो असे नाही जुने शहर असल्याने काही भागात रस्ते अरुंद आहेत व जुन्या पाईपलाईन असल्याने एखादे वेळेस पाईपलाईन खोदण्याचे काम केले असल्यास त्या फुटल्याने इतर ठिकाणी वाहणारे पाणी मिळते व त्यामुळे दुर्गंधी येते शहरातील बऱ्याच भागात नविन पाईप लाईन टाकण्यात आलेल्या आहेत. परंतु जुन्या शहरातील व गजबजलेल्या भागात एखादी पाईप लाईन काढून दुसरी पाईपलाईन टाकावयाची झाल्यास ड्रेनेज व पाणी पुरवठयाच्या लाईन एकत्रीत जवळपास असल्यास खोदकामाने एकमेकात पाणी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही पाईप लाईन टाकीत असतांना, याबाबत खबरदारी घेण्यात येते. ज्या भागातील माझेकडे तक्रारी येतात त्या तक्रारीचे निवारण आम्ही केलेले आहेत. २ महिन्यापुर्वी जवळपास विविध भागातील तक्रारी प्राप्त झाल्यापैकी १२ तक्रारीपैकी ३ तक्रारीचा पाहणी करुन आजच कार्यवाही करण्यात येणार आहे. काही पाणी पुरवठयाच्या २०-२५ तक्रारी आलेल्या आहेत त्याचे सॅम्पल (नमूने) घेवून शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी नमुने पाठविण्यात आले आहेत. ९९% पाणी पुरवठा व्यवस्थितरित्या होतो. परंतु ज्या ठिकाणी जुने पाईपलाईन आहेत स्लम भाग आहे त्या ठिकाणी छिद्र पाडून काही नागरिक तोडफोड करतात. त्यामुळे घाण पाणी दुस-या पाईपमध्ये मिळून दुषित पाणी होते. तरीही या विभागामार्फत तातडीने कार्यवाही करण्यात येते.

**श्री स. अली मिरा सलामी** दलालवाडी येथील काही भागातील ड्रेनेज चेंबर मध्ये पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन जाते त्यामुळे दुषित पाणी होऊन नागरीकांचे आरोग्य बिघडण्यास किंवा रोगाची लागण होण्याची शक्यता आहे.

**मा. महापौर** ड्रेनेज चेंबरला लागुनच पिण्याच्या पाण्याची लाईन असल्यास व कालांतराने फुटल्यास दुषित पाणी होण्याचा संभव असतो. त्यापेक्षा तेथील पाण्याची लाईन त्या ठिकाणीवरुन काढून टाकावी कार्यकारी अभियंता यांनी असे कनेक्शन बाजुला करावे.

**श्री जयवंत ओक** पाण्याची पाईप लाईन ड्रेनेज लाईन एकत्रीत न ठेवता वेगवेगळी ठेवावी व जुन्या ज्या भागामध्ये पाईपलाईन आहेत त्या काढून टाकाव्यात.

**मा. महापौर** याबाबत मा. आयुक्त सभागृहात माहिती देतील.

**मा. आयुक्त** पाण्याची पाईप लाईन व ड्रेनेज लाईन या ज्या भागात एकत्रीत आहेत त्यांचे सर्वेक्षण करण्यात माझी अडचण नाही पाईपलाईन बाबत नंतरच विचार करण्यात येईल. या नविन पाईप लाईनच्या संदर्भाने अर्थसंकल्पात याबाबत तरतुद करता येईल.

**श्री जयवंत ओक** शहरातील नागरीकांच्या मुलभूत सुविधा पाणीपुरवठा/ड्रेनेज/रस्ते व लाईट या पुरविण्यासाठी प्रशासनाने अंदाजपत्रका तशा प्रकारची जास्तीची तरतुद ठेवावी.

**श्री तकी हसन खान** जुन्या शहरातील ड्रेनेजचे पाईपलाईन काढून टाकण्याचे काम सध्या सोपे नाही. परंतु या जुन्या पाईप लाईनची व्यवस्था पूर्ण करणे योग्य होईल. त्यास काही वेळ लागेल जुने शहर दगडाचे आहे. हा भाग ब्रेकरने फोडवा लागेल दगड फोडणे अवघड होते म्हणून जलवाहिनीला लागून ड्रेनेज लाईन टाकण्यात आले आहे. त्यावेळचे परिणाम आता भोगावे लागत आहे.

**श्री प्रशांत देसरडा** माझ्या वार्डात गेल्या ६-७ वर्षापासून बाहेरुन आणलेली ड्रेनेज लाईन आणून सोडून देण्यात आलेली आहे त्यामुळे बऱ्याचशा भागात ड्रेनेज लाईन नाही. तेव्हा काही नागरीकांना ड्रेनेज लाईन सक्तीचे करुन टाकून देण्यात यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** ड्रेनेज लाईन काही भागात सोडून देण्यात आलेली आहे. ज्यास बांधकाम परवानगी किंवा ले-आऊट मंजूर करतांना याबाबतचा निर्देश होत नाही काय?

**श्री. प्रकाश निकाळजे** शहरातील मध्यवर्ती भागापासून २-३ नाले वाहतात. त्या ठिकाणी नाल्यावरून ड्रेनेज लाईन बांधलेल्या आहेत त्यामुळे ड्रेनेज लाईन लेव्हलमध्ये नसल्याने व त्या लाईन सरळ मार्गाने न टाकलेले असल्याने इतर ठिकाणच्या लाईनमध्ये मिळण्याची शक्यता असते व त्यामुळे ड्रेनेजमध्ये दुर्गंधीयुक्त पाणी वाहत व ते रस्त्यावरुन वाहतात अशावेळी कार्यालयातील जेसीबी मशीनची मागणी केली असता ती तातडीने मिळत नाही त्यांचे वार ठरलेले आहेत. परंतु त्या दिवशीसुध्दा उपलब्ध होत नाही. फक्त पदाधिकारी मा. महापौर, उपमहापौर, सभापती, व सभागृहनेता आणि विरोधीपक्षनेता यांनी मागणी केली तर तात्काळ पाठविल्या जाते. परंतु आमच्या सारख्यांनी मागणी केली तर मिळत नाही. याची दखल प्रशासनाने घ्यावी.

**श्री जयवंत ओक** कोणत्याही पदाधिकाऱ्यांचा अवमान होऊ नये त्यानुसार बोललेलो आहे. कारण शहरातील ड्रेनेज बाबत काही प्रमाणात तातडीची गरज भासल्यास ज्या प्रमाणात झोन निहाय जेसीबी मशीन द्वारे काम करण्यासाठी ठरविण्यात

आलेले आहेत त्या वेळी अनके वेळा असे आढळून आले आहे की, जेसीबी मशीन मागणी प्रमाणे उपलब्ध झालेले नाहीत त्यामुळे अनेक वार्डातील ड्रेनेज समस्या या वाढत जात आहेत. तक्रारी करुनही काहीही उपयोग नाही. बऱ्याच वेळी सार्वजनिक सुटया व महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार या दिवशी सुध्दा ड्रेनेजचे काम करणारे कर्मचारी काम करीत असतात. परंतु अलीकडे प्रशासनाने दुसरा व चौथा शनिवारला काम केल्याचा मोबदला कर्मचाऱ्यांना दिला जात नाही. त्यामुळेही नागरीकांच्या ड्रेनेज समस्या वाढत जातात. पर्यायाने दुर्गंधी वाढते.

**श्री. प्रकाश निकाळजे** माझ्या वार्डामध्ये जवळपास रु २-३ कोटी रुपयाचे एक नाल्यावरुन ड्रेनेज लाईन टाकण्याची कार्यवाही केली. परंतु प्रशासनाने ती लाईन योग्य रित्या न टाकल्याने त्या ठिकाणी टाकण्यात आलेली ड्रेनेज लाईनच वाहून गेली आहे. तेव्हा अतिशय निकृष्ठ दर्जाचे ड्रेनेजचे काम असल्याने संबंधित गुत्तेदारचे बिले अदा करु नयेत व याची प्रत्यक्षात पाहणी करावी व शहानिशा करुनच चौकशी अंती निर्णय घ्यावा.

**मा. महापौर** १. स. स. श्री प्रकाश निकाळजे यांनी त्यांच्या वार्डासंबंधी ज्या सूचना मांडल्या त्यानुसार त्यांच्या वार्डातील ड्रेनेज लाईनचे निकृष्ठ दर्जाचे कामाचे संपूर्णरित्या चौकशी करावी व पुढील सभेत तसा अहवाल द्यावा.

२. स. स. श्री प्रकाश निकाळजे यांनी पदाधिका-यांच्या वार्डातील जेसीबी मशीनचा वापराबाबत जे वक्तव्य केले. त्यानुसार माझ्या वार्डात मी या महिन्यात एकदाही जेसीबी मशीनची मागणी केलेली नाही व माझ्या वार्डात जेसीबी मशीन आलेली नाही आणि जर असे काही घडलेले असल्यास व संबंधित अधिका-यांनी सांगितले असल्यास त्या अधिका-यावर कार्यवाही करावी. कारण माझ्या वार्डात मी एकदाही मागणी केलेली नाही.

३. जेसीबी मशीनच्या संदर्भात व विविध वार्डातील नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता, स. पदाधिकारी यांच्या सुचनेवरुन मनपाने आणखी एक जेसीबी मशीन खरेदी करण्याची कार्यवाही करावी.

**श्री तकी हसन खान** ड्रेनेज किंवा पाणी पुरवठयाच्या लाईनसाठी जे अे सी पाईपलाईन टाकण्यात येतात त्यावरुन ट्रक गेल्यावर ते फुटतात माझ्या वार्डात २ वेळा झाले. ४ सी आय पाईप नाही. ए सी पाईप लाईन ऐवजी सी. आय पाईप टाकण्याची कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** स. स. च्या सूचनेवरुन ड्रेनेज पाईप लाईन विविध वार्डातील कामासंदर्भात टाकली जात असतांना ए सी पाईप लाईन न टाकता सी. आय पाईप लाईनचे टाकणे आवश्यक असल्यास स. सदस्यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** स. स. श्री प्रकाश निकाळजे यांनी स. पदाधिकारी यांच्या वार्डात जेसीबी मशिनची मागणी केल्याबरोबर अगोदरच पाठविल्या जाते हे म्हणजे अतिशय चूक असून या बाबत संपूर्ण चौकशी करण्यात यावी. कारण माझा वार्ड व झोन हे सिडको भागात येत असल्याने या ठिकाणी जेसीबी मशीनची मागणी करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. बऱ्याच भागामध्ये नागरिकांच्या तक्रारी आहेत व नागरीक हे संबंधित लोकप्रतिनिधी यांचेकडे तक्रारी घेऊन जातात. तेव्हा लोकप्रतिनिधी म्हणून संबंधित झोनशी संपर्क साधून जेसीबी मशीनची तातडीची मागणी करतात आणि अशावेळी संबंधित अधिका-यांनी

त्या झोनसाठी ठरविल्यानुसार पाठवावे किंवा दुस-या दिवशी पाठवावी अन्यथा कोणत्याही प्रकारचे आश्वासन न देता ठरलेली वेळ व तारीख निहाय जेसीबी मशीन पाठविण्याची व्यवस्था करावी.

**मा. महापौर** नागरिकांच्या तक्रारी झोन कार्यालयात गेल्यास संबंधित अधिका-यांनी दिलेल्या तक्रारीची दखल घेऊन निवारण करावे. अन्यथा कार्यवाही करण्यात येईल.

**श्री बाळासाहेब थोरात** माझ्या वार्डामध्ये ड्रेनेज नाला साफसफाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नाले साफसफाईमध्ये या नाल्याचा समावेश आहे किंवा नाही. कारण सदरील नाला हा फार लांब अंतरावरुन वाहत येतो व घाण पाण्याने दुर्गंधी सर्वत्र पसरते यासाठी नियमितपणे ड्रेनेज साफ होणे आवश्यक आहे.

**श्री शे शकील पटेल** माझ्या वार्ड हा एक तर खडकावर असल्यासारखा आहे या भागात एक नाला आहे. त्या ठिकाणावर ब-याच भागातून दुर्गंधीयुक्त पाणी वाहत येते. त्यामुळे नाला साफसफाई तातडीने होणे आवश्यक आहे. एक महिना झाला काम नाही. ड्रेनेज चेंबर तुटून पडले गॅस्ट्रो होण्याची शक्यता आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** माझ्या माहितीप्रमाणे स. स. श्री शकील पटेल यांच्या वार्डातील संबंधित नाल्याचा प्रश्न अतिशय ज्वलंत असून त्यावेळी मनपाचे अधिकारी व मी स्वत: पाहणी केलेली आहे. तेव्हा या बाबत तातडीने कार्यवाही करावी.

**श्री सुनिल वडागळे** माझ्या वार्डातील नाल्यामध्ये इतर ठिकाणावरुन ड्रेनेजचे पाणी सोडलेले आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरते. यासाठी सदरील वाहत जाणाऱ्या नाल्याची साफसफाई तातडीने करुन घेण्याची कार्यवाही व्हावी.

**सौ साधना सुरडकर** शहरातील ज्या भागामध्ये नविन भाग सध्या विकसित होत आहे. त्या भागात ड्रेनेज पाईप लाईन अद्यापही टाकण्यात आलेली नाही. ज्यामुळे नाल्याच्या ठिकाणी काठावर किंवा नाल्यालगत जी घरे वसलेली आहेत. त्या ठिकाणी हापसे आहेत, नाल्याचे पाणी येते. परंतु नाल्या काठचा भाग असल्याने त्या ठिकाणी साफसफाई व्यवस्थित होत नाही. नविन वसाहत आहे. पाण्याचे नियोजन केले नाही. त्यांना जलवाहिनी दिलेली नाही. श्रीकृष्णनगर, मधुबन, मयुरबन इ. ठिकाणी जलवाहीनी नाही.

**नारायण अन्ना सुरगोणीवार** सिडकोतील एन-६ हा भाग म्हडाचा असून तो मनपाकडे हस्तांतरीत झालेला आहे. परंतु काही भागात या ठिकाणी पाणी साचते. त्याच प्रमाणे येथील भाग हा चढउतार असल्याने ड्रेनेज लाईन व्यवस्थीत रित्या टाकण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे त्या उघडी पडण्याची चिन्हे आहेत. यासाठी येथील छोटे छोटे नाले आहेत ते तातडीने साफ होणे आवश्यक आहे.

**श्री भगवान रगडे** माझा वार्ड हा झोन-५ च्या कार्यक्षेत्रात येत असून या भागात डुकराचा सुळसुळाट आहे. त्यामुळे येथील डुकरांचा बंदोबस्त करणेसाठी संबंधित पशुधन विकास अधिकारी यांना योग्य त्या सूचना द्याव्यात.

**मा. महापौर** बऱ्याच स. सदस्यांनी ड्रेनेज व नाला सफाई संदर्भात सूचना मांडलेल्या आहेत. त्याबाबत कार्यकारी अभियंता पा. पु. व ड्रेनेज यांनी माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** शहराती एकूण नऊ नाले प्रामुख्याने वेगवेगळया प्रवाहाने वाहतात. या नाल्यातील गाळ व आजुबाजूचे वाढलेले गवत वनस्पती यांची साफसफाई केली जाते त्यामुळे पाण्याचा वाहण्याचा प्रवाह कमी होतो. या वर्षीसुध्दा दरवर्षीप्रमाणे शहरातील नाले सफाईचे काम हाती घेण्यात येत

आहेत. ४ दिवसापूर्वीच निविदा अंतिम करण्यात आले. १२ ते १३ ठेकेदाराकडून नाल्याचे काम तातडीने हाती घेतलेले आहे व संपुर्णरित्या साफसफाई करण्याची कार्यवाही सुरु आहे, एकूण नाल्याचे साफसफाईचे काम १५ दिवसात पूर्ण करावयाचे आहे.

**मा. महापौर** शहरातील एकूण ९ नाल्यांची साफसफाई सुरु झालेली आहे. याबाबत कुण्या एखादया स.स.ना शंका असेल तर त्यांनी प्रत्यक्षात आपआपले प्रभागातील नाले सफाई व्यवस्थित होते किंवा नाही याची पाहणी करुन काही अडथळे आल्यास तशा सूचना प्रशासनाकडे कराव्यात.

**श्री आनंद तांदुळवाडीकर** सिल्लेखान येथील नाल्याची साफसफाई करण्यात येणार आहे किंवा नाही.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** होय.

**श्रीमती लिलावती घायतिलक** माझा वार्ड हा स्लम भाग असल्याने या भागालगत सिडकोचा काही भागाचा समावेश होतो. उदा. संघर्षनगर, संतोषी मातानगर व अंबीकानगर या भगातील साफसफाई व्यवस्थित होत नाही. या भागात ड्रेनेज लाईन अद्यापही टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे स्लम भाग असल्या कारणाने रस्त्यावरुन घाण पाणी वाहत राहते व नागरिकांना दुर्गंधी सहन करावा लागतो या भागात पिण्याचे पाण्याची व्यवस्था पुरेशी नाही. पाणी उशीरा येते व कमी दाबाने येते काही भागात विजेचे खांब रोवलेले आहेत. परंतु त्या ठिकाणी वायर ओढलेले नाहीत.

**श्री सुरजितसिंग खुंगर** मागील सर्वसाधारण सभेमध्ये मी काही सूचना केलेल्या होत्या की, दिवस व रात्री अशा दोन पाळयांमध्ये शहरातील स्वच्छता राहण्यासाठी सफाई करावी. त्यानुसार कार्यवाही सुरु करावी. रात्री गाडया चालवल्यावर जास्त ट्रिप होईल. त्याबद्दल काहीही कार्यवाही केलेली नाही.

**मा. महापौर** स. स. ची सूचना योग्य आहे. परंतु रात्रीच्या वेळेस कामगारांना काम करता येईल काय? याबाबत विचार करावा लागेल. त्याचप्रमाणे शहरातील जे ९ नाल्यांची साफसफाई होत आहे ते कोणकोणते नाले आहेत याची माहिती द्यावी.

**श्रीमती पार्वती मानकापे** विष्णूनगर या भागातील नाल्याची साफसफाई व्हावी.

**मा. महापौर** होय सदरील नाल्याची साफसफाई करण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.)** शहरातील ज्या ८-९ नाले सफाईचे कामे हाती घेण्यात येत आहेत ते विष्णुनगर ते प्रतापनगर, प्रतापनगर ते पुढे आनंद नगर, टाऊनहॉल, नूर कॉलनी, श्रीमान श्रीमती जवळील पैठणगेट भागातील सुपर मार्केट, औरंगपुरा औषधी भवन जवळील फजलपुरा, किराडपुरा, क्रांतीनगर, कोकणवाडी इ. चा समावेश आहे.

**मा. महापौर** स. स. श्री शकील पटेल यांच्या वार्डातील गारखेडा येथील नाला सफाईचे काम अर्धवट का सोडण्यात आलेले आहे.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.)** या भागातील नाल्याबाबत न्यायालयीन मनाई हुकुम नाही सहा महिन्यापुर्वी काम सुरु विद्युत २ खांबाच्या बाजुने ड्रेनेज लाईन स्थालांतर करावयाचे एकस्ट्रा आयटमलाही मंजूरी झाली. माहे फेब्रुवारी महिन्यात तशी सूचना दंडात्मक कार्यवाही करणेबाबत प्रस्तावित करण्यात आली आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** गारखेडा शंभूनगर भागात नाला पाहणीसाठी सर्व जबाबदार अधिकारी हजर होते. या ठिकाणी मनाई हुकूम आहे असे कार्यकारी

अभियंता यांनी सांगितले विद्युत खांबा जवळून ड्रेनेज लाईन टाकण्याचे सर्वेक्षण करण्यात येणार होते किती दिवसात पुर्ण होईल. आपण संबंधित स्थळाची पाहणी करावी व नंतरच सविस्तर माहिती सांगावी.

**मा. महापौर** स. स. ची शकील पटेल यांच्या वार्डात संबंधित नाल्याच्या ठिकाणी पाहणी केली असता, तेथील नाल्याचे काम अर्धवट झालेले होते. अशी माहिती मिळाली आणि पुढील कामाच्या बाबतीत कोर्टातील वाद आहे असे सांगण्यात येते वस्तुस्थिती काय आहे. काम का थांबलेले आहे. याबाबतीतही माहिती द्यावी.

**मा. उपायुक्त** अंदाजपत्रक केले जाते त्यावेळी ब-याच गोष्टी पाहिल्या पाहिजे ते पाहीले जात नाही रस्त्यातील अडथळे महानगरपालिकेची मालकी इ. बाबत सर्वांना लेखी सूचना दिल्या पुढे निविदेत अडचण होणार नाही. मालकी हक्का बाबत वाद नसावा तांत्रिक व प्रत्यक्षात जागेवर कामे कसे होतील याची दक्षता घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. अन्यथा संबंधितांवर कार्यवाही करणेत येईल. सदरचे काम कसे पूर्ण होईल ते पाहतो. संचिका मागवून घेतो.

**श्री शे. शकील पटेल** गादिया विहार येथे ४ थ्या मजल्याचे काम अनाधिकृतरित्या झाले आहे. ४० फुट रुंद रस्ता गेला त्यावर स्थगिती दाखवितात. स. न. १६-१७ मध्ये परवानगी व काम मात्र स. न. ५४ मध्ये होत आहे.

**श्री रतकुमार पंडागळे** स. स. श्री जयवंत ओक यांनी कामगारांच्या दुस-या व चौथ्या शनिवाराला काम केल्याचा मोबदला देण्याच्या बाबतीत जो उल्लेख केला त्या अनुसरुन प्रशासनाने कामगारांच्या दृष्टीने योग्य असून कामाचा मोबदला देणे बाबत आदेश काढावे.

**मा. आयुक्त** कामाची निकड लक्षात घेता ज्या विभागाची अतिशय आवश्यकता आहे. त्यांचे बाबतीत संबंधित झोन कडून माहिती मागविण्यात येत असून त्यानुसार कामाच्या गरजेनुसार कायटेरिया निहाय कामाचा मोबदला देणे बाबत विचार करता येईल.

**मा. महापौर** आता याबाबत चर्चा भरपूर झालेली असून, स. स. श्री दलबिरसिंग जाबिंदा यांनी केलेली सूचना म्हणजे त्यांचा भागात भंगाराचे गोदाम आहे. ज्यामुळे दुर्गंधी सुटत व नागरिकांना त्रास होतो ते हटविण्यात यावे.

स. स. श्री गणेश तांबे यांच्या वार्डामध्ये स्वच्छता निरिक्षक नाही त्यामुळे झोन-१ साठी स्वच्छता निरिक्षक देण्यात यावा.

स. स. श्री स. अली मिरा सलामी यांच्या सूचनेनुसार विविध विकासाचे कामे चालू करावी व लहान मोठे कामे करवून घेणेसाठी झोनमध्ये रेटलिस्टचे कामे चालू करावे व मा. आयुक्त यांचेकडे मंजुरीस्तव पाठवावे.

स. स. श्री प्रशांत देसरडा यांच्या वार्डात ड्रेनेज ओपन असल्याने संबंधित अधिकारी यांनी प्रत्यक्षात जाऊन पाहणी करावी. ब-याच प्रमाणात तक्रारी येतात की, झोनमधील अधिकारी जागेवर बसत नाही तेव्हा झोन अधिकारी यांनी सकाळी ६.०० वाजता आल्यानंतर त्यांनी त्यांच्या भागातील स्वच्छतेची पाहणी स. ९.३० वाजेपर्यंत करावी व १२.०० वाजेपासून कार्यालयात बसावे व दुपारच्या नंतर ५.०० वाजेपर्यंत कार्यालयात थांबावे.

स. स. श्री तकीहसनखान यांनी शहरातील स्वच्छता व्यवस्थित होते असे सांगितले कचरा १० ते १५% पडलेला असेल, याबाबतही दक्षता घेण्याबाबत

संबंधित अधिकारी यांनी लक्ष द्यावे. कोणत्याही अधिका-यांना पाठीशी घालणार नाही.

स. स. श्री काशीनाथ कोकाटे यांनी केलेल्या सूचनेनुसार त्यांच्या भागामधील कामाचे जेसीबी मशीनच्या संर्दभात कोणाही अधिका-याकडे शिफारस पत्र दिलेले नाही. शहरातील स्वच्छता राखणेसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी काळजी घ्यावी. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता पा. पु यांनी पिण्याचे पाणी स्वच्छ व चांगले कसे मिळेल याची काळजी घ्यावी.

मिसारवाडी/नारेगांव येथील स. स. नी मांडलेला प्रश्न हा त्या भागातील विभाग आयुक्त व कार्यकारी अभियंता पा. पु/ ड्रेनेज यांनी प्रत्यक्षात जाऊन पाहणी करावी व ज्वलंत प्रश्नाबाबत तातडीने कार्यवाही करावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शहरातील स्वच्छेतेबाबत व पावसाळयामध्ये घाणीने माशांचा प्रादुर्भाव ज्या ज्या भागात जास्त असतो. त्या त्या ठिकाणी औषधी फवारणी करण्याची कार्यवाही करावी. यासाठी आरोग्य वैद्यकीय उपधिकारी यांनी झोन अधिकारी व संबंधित स्वच्छता निरिक्षक यांचेकडे जबाबदारीने कामे करवून घ्यावयाची काळजी घ्यावी.

शहरातील ज्या नागरिकांना गॅस्ट्रो, कॉलरा व हिवताप सारखे आजार असल्यास त्यांनी तातडीने जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात इलाज करावा असे आव्हान करणेसाठी मुंबई प्रा. मनपा अधिनियमामध्ये तशा प्रकारचे सूचना द्याव्यात.

शहरातील ड्रेनेज व पाणी पुरवठा लाईन बाबतच्या ज्या तक्रारी येतात त्याबाबत तातडीने अमंल करणेसाठी अंदाजपत्रकात तशी तरतुद करण्यात यावी.

विविध भागात ऑटो रिक्शाची कचरा उचलने संदर्भात आवश्यक त्याबाबत माहिती द्यावी व आरोग्याच्या दृष्टीने कसे हितकरक राहील. पाणी कसे गाळून घ्यावे. स्वच्छता राखावी याबाबतीत नागरिकांना आव्हान करणेसाठी जाहिरातीद्वारे व पोस्टर काढून माहिती देण्यात यावी.

जेटिंग मशीन दोन शिप्ट मध्ये चालू करता येईल काय ते पहावे कारण माहे एप्रिलमध्ये २०० टन, मे महिन्यात ३०० टन, जून महिन्यात ४०० टन उचलण्यात आले ही मशीन एकाच वेळेस ८० ते ९० टन कचरा उचलते.

**श्री सुनिल वडागळे** माझ्या वार्डामध्ये पाणी पुरवठा सुरळीत नाही. याबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** : नारेगांव येथील खत प्रकल्पाबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिलेले आहे.

**मा. आयुक्त** याबाबत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रत्यक्षात पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** नारेगांव येथील खत प्रकल्पाबाबत माहिती द्यावी.

**मा. महापौर** नारेगांव येथील खत प्रकल्पाबाबत दैनंदिन जवळपास ३०० मे ट्रीक टन कचऱ्यावर पक्रिया झाली पाहिजे तेवढे होत नाही. रोडची अवस्था बरी नाही. खड्डे पडलेले आहे. दोन्ही बाजूला कचरा आहे कचरा सैगरी गेट करावयाचे व त्यानंतर बाकीचा कचरा वेगळा करावा लागेल ६ महिन्यात ही कार्यवाही करावी लागेल.

**श्री भागवन रगडे** नारेगांव येथे खत टाकण्यात येते. २५-३० किलो मिटर दूर अंतरावर टाकावे. या ठिकाणी कचरा टाकल्याने आजूबाजूच्या लोकांना व खेडयापाडयातील लोकांना जळत राहिलेल्या धुरांचचा त्रास होतो.

**मा. महापौर** नारेगांव येथील काही भागात स्वच्छतेचा अभाव व जनावरांचे उघडयावर हाडे व कातडे टाकीत असल्यास तेथील संबंधित स्वच्छता निरक्षका करावी कार्यवाही करण्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी तातडीने काळजी घ्यावी.

**मा. उप महापौर** शहरात काही ठिकाणी मटनाचे दुकाने उघडयावरील व चामडयांचे गोदामाचे साठे उपलब्ध असल्याचे समजते. तेव्हा याबाबत वाहन चालकांनी मेलेल्या जनावरांचे तुकडे गाडीवर आणून या ठिकाणी टाकू नये याची खबरदारी घ्यावी. याची वेगळया ठिकाणी व्यवस्था करावी.

**श्री स. अली मिरा सलामी** सुशिक्षित बेरोजगारांची संख्या सध्या खूपच आहेत. काल टपऱ्या उचललया नविन नविन टपऱ्या दररोज बसतात. धंदा सुरु करतात मनपाकडे परवानगीसाठी चकरा मारतात गेल्या ५ वर्षात कोणीच लक्ष दिले नाही. अतिक्रमण वाढत जात आहे. सन १९९५ मध्ये टपरी संदर्भात एक समिती तयार करण्यात आली होती. या समितीने शहरातील किती अधिकृत/अनाधिकृत मटन व बिफ दुकाने आहेत. त्याची पाहणी करुन ज्या ज्या भागात आवश्यक आहे. त्या त्या भागात द्यावे व ज्या भागात आवश्यक नाही. त्यांना इतरत्र ठिकाणी देण्याचे बाबतीत कार्यवाही व्हावी. परंतु ६ जुन १९९५ पासून जे अधिकृत आहेत व त्यांचा व्यवसाय सुरळीत चालू आहे. त्यांचे बाबतीत कोणाच्याही तक्रारी नाहीत. त्यांना रितसर परवानगी द्यावी आणि ज्या दुकानदारांनी अनाधिकृत व्यवसाय सुरु केलेले आहे व ज्यांचे बाबतीत तक्रारी असतील त्यांचे बाबतीत प्रकरणे तपासून घ्यावीत. परंतु याबाबत नियमाप्रमाणे कायवाही करणे आवश्यक राहील. जे दुकाने अतिक्रमाणात येतात व ज्यांचेवर अद्याप काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यांना तातडीने हटविण्यात यावे मनपाचे नविन आयुक्त जे येतात त्यांना काहीतरी सांगून त्यांची दिशाभूल करण्यात येते. जेव्हां १९९६ जी कमीटी तयार केली होती. त्यानुसार सर्व्हे करुन कार्यवाही करावी व रितसर टपऱ्यांना परवानगी द्यावी त्यांचे कडून फिस नियमाप्रमाणे वसून करावे ज्यामुळे प्रत्येक महिन्याची आजपर्यंतची फिस जवळपास ७.५० लाखाची वसुलीचे नुकसान मनपास होत आहे. याची दक्षता घ्यावी.

**श्री नंदकुमार घोडले** १९९६ मध्ये जी टपरी कमिटी तयार करण्यात आलेली होती. त्यानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तेव्हा पुन्हा नविन कमिटी तयार करावी.

**श्री. अफसरखान यासनिखान** काल घाटी दवाखाना येथील टपऱ्या हटविण्यात आल्या आहेत. येथील एका अपंगाची टपरी हटविण्यात आली त्याची परिस्थिती अत्यंत नाजुक असून त्याच्या रोजीरोटीचा प्रश्न आहे. टपऱ्या हटविण्यापुर्वी ३ दिवसाची नोटीसा बजावण्याची कार्यवाही करावयास पाहिजे होते. ते महानगरपालिकेने केलेली नाही. ज्या टपऱ्या सन १९९५ च्या पुर्वीच्या आहेत व ज्यांचा मनपातर्फे सर्वे करण्यात आलेला होता. त्यांना परवानगी देण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. शहरातील औरंगपुरा, कुंभारवाडा येथील

अनाधिकृत टपऱ्या का हटविण्यात येत नाहीत, गरीब व होतकरु सुशिक्षीत बेरोजगार व्यवसाय करतात. त्यांचे टपऱ्या मनपा हटविते ते बरोबर नाही.

**मा. आयुक्त** अनेक जागावर अतिक्रमणे झालेली आहेत. ती आज झाली की पुर्वी झालेली आहेत ते पाहावे लागेल माणुसकीच्या दृष्टीकोनातून काम द्यायचे याचा विचार करावा लागेल तथापि अनाधिकृत आहे त्यांना अधिकृत करता येणार नाही. १९९६ चा अहवाल वाचलेला नाही. त्यानंतर बरेच अतिक्रमण झालेले आहेत. या संदर्भात शासनाचे काय उपाय योजना केली त्यांचे मार्गदर्शक तत्वे कोणते, मा. उच्च न्यायालयाचे झालेले निर्णय हे पाहावे लागेल. शासनने विकास योजना मंजुर केलेली आहे. या विकास योजनेचे उल्लघंन होत असेल तर त्याचेवर कार्यवाही करावी लागेल. त्यांना एक संधी देण्यात येईल त्यांनी याबद्दल हमी द्यावी. जे स्वेच्छेने पुढाकार घेतील त्यांचा विचार करु विकास योजनेशी विसंगती येत नसेल ज्यांना नियमित करण्याबाबत विचार करुन कायदयाचे पालन करतांना त्रास होतो.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा** जालना रोडवरील बांधकामे ही अतिक्रमणात येतात काय? त्या ठिकाणी एका टपरीची मोडतोड करुन उचलण्यात आली. त्यांना परवानगी असतांनाही कोणत्याही प्रकारचे कागदपत्रांची पाहणी सुध्दा केली नाही ते प्रशासनाचे धोरण योग्य नाही.

**श्री. अफसरखान यासिनखान** शहरामध्ये अनेक ठिकाणी वाहतुकीला अडथळा होत आहे व बिल्डर्सची अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत. काहींनी एस.एफ. आय. सुध्दा सोडलेला नाही. याबाबत सर्वे करुन सभागृहात अहवाल सादर करावा. पार्किंगच्या जागेत दुकाने काढले फ्लॅट सिस्टीममध्ये पार्किंगचे वापर बदलला गॅलरी व इतर बांधकामे केलेली आहेत.

**श्री. प्रकाश निकाळजे** मानवी दृष्टीकोन समोर ठेवून जे सुशिक्षित बेरोजगार आहेत ते कसेतरी पोट भरतात त्यांच्या रोजी रोटीचा ज्वलंत प्रश्न असतो त्यांना हटविणेपुर्वी पर्याय सूचवावा. नंतरच हटवावे किंवा आहे त्याच स्थितीत गेल्या दहा वर्षापासून काम करुन व्यवसाय करीत असलेल्या टपरी धारकांना परवानगी द्यावी. औरंगाबाद शहराचे सौदंर्य वाढावे यात काहीच दुमत नाही. परंतु टपऱ्या अनाधिकृत बसण्यापुर्वीच मनपाने त्या बसून देण्याची खबरदारी घ्यावयास पाहिजे १०० फुट ८० फुट रुंद रस्त्यावर टपऱ्या देवू नये असा ठराव घेतलेला आहे. शहराच्या मध्यवर्ती भाग समजला जाणारा गुलमंडी औरंगपुरा या भागात दुकाने थाटून अनाधिकृत रित्या उभ्या आहेत. त्यांच्याकडे कुणाचेही लक्ष नाही. त्यांना रितसर परवानगी द्यावयाची झाल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्नात भर पडेल. यासाठी शहरातील इतर भागासाठी सुध्दा मनपाने परवानगी देऊन मनपाच्या उत्पन्नात भर पडेल असे धोरण अवलंबवावे.

**श्री रतनकुमार पंडागळे** ज्यांना टपरी परवानगी दिलेली असेल व कोणत्याही प्रकारची पुर्व सूचना न देता त्या टपऱ्या अनाधिकृत समजुन काढल्या असतील तर त्यांनी नुकसान भरपाई देण्याचा विचार व्हावा. अन्यथा ते टपरी धारक व्यक्ती न्यायालयात जाऊन नुकसान भरपाईची मागणी करतील.

**श्री जयवंत ओक** मागील काळात टपरी समिती तयार करण्यात आली होती, परंतु या समितीच्या कार्यकाळात केलेल्या अहवालाची अमंलबजावणी व निर्णय होऊ शकला नाही. परंतु सध्या याबाबत प्रशासनाची काम भूमीका राहील याची

माहिती द्यावी. या शहरात एकंदर ५३ घोषित झोपडपट्या आहेत व या शहरात बऱ्याचशा भागात आरक्षण जागेवर अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत. वास्तविक पाहता या जागेमुळे मनपाने काही योजना राबविल्यास चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळू शकले असते. परंतु अशा प्रकारे त्या आरक्षीत जागेवरील अतिक्रमणास महानगरपालिका प्रशासन बुलडोझर फिरविणार काय? अगोदर येथील अतिक्रमण हटवावे व नंतरच टप-यांचे अतिक्रमण काढावे.

**मा. महापौर** या शहराचा वाढता व्याप लक्षात घेता शहराचा बराचसा भाग हा विकसीत होत आहे. त्यानुसार शहरातील बेरोजगारी वाढल्याने सुध्दा सुशिक्षित बेकार तरुण वेगवेगळया उद्योजक काढून आपला व्यवसाय जमविण्याचा प्रयत्न करीत आहे. तरीही शहराच्य सौदंर्यात भर पडणेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी कुठेही टपऱ्या बसविणे योग्य नाही व अतिक्रमणे होऊ नये या मताचा आहे. याबाबत सर्व पदाधिकारी यांनी मिळून मा. आयुक्त यांना कल्पना दिलेली होती व सर्व पदाधिका-यांनी सहकार्य सांगितलेले आहे.

**श्री अंबादास दानवे** कालची मोहिम हाती घेतल्या बद्दल प्रशासनाचे अभिनंदन अनाधिकृत टपऱ्या जर असतील तर त्या हटविण्यात यावा. मात्र गत १५ वर्षापुर्वीच्या असतील तर नियमामध्ये बसत असल्यास पाहावे अन्यथा काढावे त्यास आमचे सहकार्य आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** रस्ता रुंदीकरण पैठणगेट ते क्रांतीचौक पर्यंत पूर्ण झालेले असतांनही नुतन कॉलनी भागात कालच दोन टपऱ्या बसलेल्या आहेत त्या तातडीने हटवाव्यात.

**मा. महापौर** कालच रस्ता रुंदीकरण झाले. टपऱ्या बसल्या जमिन मालकांची ६X४ ची जागा शिल्लक राहते. तेथे ठेवणार, टपरी बसू देणार नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** चर्चा झालेली आहे. टपरी समितीची अहवाल प्राप्त झालेला होता. डी.पी. रोडला बाधा येते त्याची पर्यायी व्यवस्था करावी. टपऱ्या हटविण्याच्या मोहिमेमध्ये ज्या टपरी धारकांना परवानगी दिलेली आहे. त्यांचाच टपऱ्या काढण्यात आल्या व ज्यांनी कोर्टाद्वारे स्टे आणलेला आहे, त्यांच्या टपऱ्या काढण्यात आल्या ते करु नये २०X३० ची प्लॉट विक्री थांबविण्यात येत नाही.

**श्री भगवान घडोमोडे** शहरातील ब-याचशा टप-या या अधिकृत रित्या बसलेल्या आहेत. ज्या टप-यांना परवानगी आहे त्या टप-यांना पोट भाडेकरु ठेवलेले आहेत आणि जे वेगळया मार्गाने पैसे उकळून पोट भरतात मात्र मनपाची भाडे बरोबर भरणा करीत नाही या बाबतची सविस्तर पाहणी करुन कोणत्या भागात किती टपऱ्यांना परवानगी दिलेली आहे व त्यांचा मुळ मालक कोण आहे यांची चौकशी करुन पोटभाडे करुन वर व मुळ मालकावर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी आणि काही भागामध्ये १९९५ नंतर प्रशासनाने परवानगी दिलेली आहे ते रद्द करण्यात यावे.

**श्री. सुनिल वडागळे** माझ्या वार्डात अनेक ठिकाणी अनाधिकृत बांधकामे चालू आहेत याबाबत मी मा. आयुक्त यांना पत्र देवून विचारणा केली. परंतु अद्यापही प्रशासकीय विभागाने कार्यवाही केली नाही.

**श्री. स. अली मिरा सलामी** युती शासनाने झुणका भाकर केंद्रे दिले जमिनही दिली आता शासनाने यावर बंद करण्याचा निर्णय घेतलेला असून केंद्रासाठी दिलेल्या जमिनी परत घेतलेल्या नाही.

**मा. आयुक्त** शासनाने घेतलेले निर्णय माझेकडे आहे. १/१/९५ नंतर त्यांना पाणीपुरवठा इ. सवलती दिल्या आहे बरेच अनाधिकृत बांधकामे आहेत. बरेच परवानगीपेक्षा वेगळी बांधकाम वेगळी बांधकाम केले आहे. मागच्या रविवारी बैठक घेतली व यासंबंधी योग्य ते आदेश देण्यात आले आहे खुल्या जागा आरक्षणाखालील जागा हया महानगरपालिकेने जपायचे असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याचा प्रश्न आहे. काही आरक्षणे विकास योजना रस्त्यांचे भूसंपादन चालू आहे विकास योजनेतील आरक्षित जागावर बांधकामे होऊ नयेत महानगरपालिकेच्या खुल्या जागा संरक्षित करण्यात येते आहेत शहरी विभागात सरकारी जमिनी/महसुली जमिनी हस्तांतर होतात. अशा ठिकाणी अनाधिकृत बांधकामे होतात. खरेदी विक्री होते. कालबध्द कार्यक्रम आखुन सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहे. सर्वेक्षण झाल्यावर माहिती मिळेल काल टप-या काढल्या बाबत केलेली कार्यवाही तेवढयापुरतीच मर्यादीत राहू नये. सभागृहाच्या सहकार्याने काढल्यावर कार्यवाही लवकर होईल. ज्यांना ५-१० वर्षापुर्वी टपरी दिली. तीच व्यक्ती आहे किंवा नाही. सबलीज करण्यात आले आहे का, ते पाहण्यात येईल. व असे असेल तर परवानगी रद्द करावी लागेल हॉटेल बंजाराच्या संदर्भात जागा पाहणी करण्याबाबत सूचना दिली आहे. झुणका भाकर केंद्रासंबंधित शासनाचे काय निर्णय झालेला आहे, ते पाहवे लागेल सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचे रस्ते पाहायला पाहिजे. शासन निर्णयाची प्रत आपणांकडे नाही त्यामुळे त्याबद्दल बोलणे योग्य वाटत नाही.

**श्री सुनिल वडागळे** माझ्या वार्डात अनेक अनाधिकृत वसाहती व अनाधिकृत बांधकामे होत असून प्रशासनाला पत्र देऊन अदयापही काहीच कार्यवाही केलेली दिसत नाही. संबंधित इमारत निरिक्षक हे पाहून न पाहिल्या सारखे करतात. याबाबत कुठे तरी प्रशासनाने दखल घेणे आवश्यक आहे.

**श्री जयवंत ओक** माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंत या महानगरपालिकेत एकंदर १४ आयुक्त येऊन गेलेले आहेत. त्यांनी आरक्षीत जागेवर शहरातील जे अनाधिकृत बांधकामे झाली त्यांच्या बाबतीत त्यांचे धोरण स्पष्ट झालेले नाही. ज्यामुळे वसाहती वाढत गेल्या अनाधिकृत बसल्या यावर प्रशासनाने आळा का बसविला नाही.

**श्री तकी हसन खान** यापुर्वी औरंगाबाद शहराचा व्याप कमी होता. मात्रे शहर महानगरपालिका झाल्याने झपाटयाने वाढत चालते दैनंदिन गरजा वाढल्याने वर्दळही वाढली. अशा रितीने ओद्योगिकरण व मराठवाडयाचा केंद्र बिंदू म्हणून शहराकडे सर्वांच्या नजरा आहेत. त्यानुसार लोकसंख्या व रस्त्यावरील गर्दी वाढल्याने विकास कामे करीत असतांना अनाधिकृत बांधकामे व स्लम (झोपडपट्टया) अस्तित्वात येण्यापूर्वी प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक होते आज मात्र प्रशासनाला जड जात आहे.

रस्ता रुंदीकरण करत नाही. चौक ते चेलीपुरा हा भाग अत्यंत कन्गेस्टेड (congested) आहे. रस्ता रुंदीकरणासाठी लोक तयार आहे

महानगरपालिका पाहत नाहीत. विकास योजने प्रमाणे ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** विकास योजना मध्ये आरक्षित जमिनी व आरक्षित नसलेल्या जमिनीवरील अनाधिकृत विकास झाल्यास कायद्यात तरतुद आहे. एक तर भूसंपादन कादयाखाली संपादन करावी किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार खरेदी सूचना देण्याची तरतुद आहे. संपादन न केल्यास ६ महिन्यांनतर आरक्षण रद्द होण्याची तरतुद आहे.

**श्री अफसरखान यासीनखॉन** शहरातील काही बिल्डर्सनी आरक्षीत जागेवर अतिक्रमण करुन मोठमोठे प्लॅटस, अर्पाटमेंटचे बांधकामे केलेली आहेत. त्रास सर्वस्वी जबाबदार नगररचना विभाग असून या विभागातील काही शाखा अभियंता व कनिष्ट अभियंतासह नगररचनाकारही जबाबदर आहेत. शहानुरवाडी येथील भूखंडावर अतिक्रमण करुन बांधकाम केले हा प्रकार त्यातलाच असून यामध्ये आपले काही नगररचना विभागातील कर्मचारी/अधिकारी यांचे लागेबांधे असल्याने असे प्रकार घडत आहेत. यावर प्रशासनाने आळा घालावा.

**मा. आयुक्त** सर्वसाधारण सभेला अधिकार आहेत. सभागृहाला असे वाटत असेल की, जेथे वसाहत आहे. तेथे आरक्षण ठेवले तर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबद्दल करण्याची कार्यवाही करता येईल शहरातील डीपी प्लॅन बाबतीत रस्त्यावर अतिक्रमण करुन टपऱ्या स्थायी झाल्या असल्यास त्याबाबतची पाहणी करुन कार्यवाही करणेत येईल.

रोड वाईडिंग बाबत जे प्रकरणे प्रलंबीत आहेत व बाधीत होणा-या प्रकरणाबाबत पाहणी करुन योग्य तो निर्णय घेणे आवश्यक राहील कारण दिवसेदविस लोकसंख्या वाढत असल्याने नागरिकांना रस्त्यांच्या बाबतीत त्रास सहन करावा लागतो. याचीही काळजी घेण्यात येईल. एकाच वेळी सर्व रस्ते करता येणार नाही. अर्थसंकल्पात भूसंपादनासाठी जास्तीत जास्त तरतुद ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**श्री जगदीश सिध्द** माझ्या वार्डातील रोडच्या लगत अतिक्रमणाच्या समस्या आहेत. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**मा. महापौर** १५ मिनीटासाठी सभा तहकुब करण्यात येते. वेळ दुपारी ३.०० वाजता (सभेला सुरुवात अंदाजे वेळ ३.४० वाजता)

**श्री जयवंत ओक** गत काळापासून शहरातील अनाधिकृत बांधकामाचा प्रश्न प्रलंबीत आहे. या शहराचा एकंदर ५३ स्लम आहे. या सर्व भागात अनाधिकृत बांधकामे करुन नागरिक राहतात. त्यांना मनपातर्फे सर्व नागरी सुविधा मिळणे आवश्यक आहे स. विपक्ष नेता यांनी विनाकारण काहीही बोलू नये. शासनाकडून विकास कामाबाबत प्रकरणे काढून आणावीत.

**श्री प्रकाश निकाळजे** स. विपक्ष नेता यांचे बाबतीत काहीही बोलू नये. याबाबत मा. महापौर साहेबांनी स. स. यांना समज द्यावी. अन्यथा आम्ही निषेध व्यक्त करतो. (यावेळी सभागृहात काही वेळ स.स. मध्ये सारखा आवाज होतो काहीही ऐकू येत नाही)

**मा. महापौर** सभा ५.०० मिनिटासाठी तहकुब करण्यास येते. वेळ ३.५० वाजता. (सभेला सुरुवात ४.१० वाजता)

**श्री अंबादास दानवे** मी प्रश्न विचारला होता उत्तर मिळाले समाधान झाले नाही. विविध प्रश्न विचारले होते. चुकीचे उत्तर दिले. "छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय" बाबतचा प्रश्न दि. ८/६/२००० रोजीच्या एका दै लोकमत व सांजवार्ता या वृत्तपत्रात अशी बातमी छापून आलेली आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयातील जे काही भागाचे बांधकाम. झालेले आहे त्यातुन पाणी गळते त्याचप्रमाणे काही लाकडांचे दरवाजे खिडक्या व इतर वस्तु तयार करण्यात आलेल्या आहेत त्यांचा भूसा तयार झाला अशी बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. ते खरे आहे काय? जर खरे असेल तर एवढया मोठया नावाजलेल्या वस्तु संग्रहालयात एवढया मोठया प्रचंड प्रमाणात खर्च होऊनही कोणत्या क्वॅालीटीचा वापर करण्यात आला हे समजत नाही. लाकाडाचा वापर करण्यात आला तर सागावान लाकुड म्हणून कोणत्या लाकडाचा वापर करुन बिले दिले याची माहिति द्यावी. त्याचप्रमाणे या संग्रहालयात दैनिक वेतनावर एक कर्मचारी कार्यरत असतांना त्यांची मुदत संपलेली होती. व त्याला कमी करण्यात आले परंतु त्याचे कडून काम करुन घेण्यात येऊनही त्याचा आदेश अद्यापपर्यंत निघाला नाही त्यामुळे त्याचा आदेश प्रशासनाने काढावा.

**श्री स. अली मिरा सलामी** गेली दोन तासापासून सभागृहात सारखी चर्चा चालू आहे, परंतु काय निर्णय झाला याची माहिति द्यावी. टपरी कमिटीच्या संदर्भात आपले निवेदन आले नाही.

**मा. महापौर** आपल्या शहरात अतिक्रमणे अनाधिकृत बांधकामे व टप-या बाबत सभागृहात चर्चा चालू आहे. १९९६ ला टपरील कमिटीने त्यावेळी शहरातील अस्तित्वात असलेल्या टपऱ्यांची नोंद घेतलेली आहे सन १९९५ च्या पुर्वी ज्या टप-या परवानगीने बसल्या त्यांचे बाबतीत निर्णय व ज्या टप-या अनाधिकृतरित्या बसल्या परंतु त्यांना परवानगी दिलेली नाही मात्र त्या १९९५ च्या पुर्वीच्या आहेत त्यांच्या बाबतीत नियमाप्रमाणे परवानगी देणे आवश्यक होते आणि १९९५ च्या नंतरच्या ज्या अनाधिकृत टप-या बसलेल्या असतील त्यांचे बाबतीत नियमाप्रमाणे परवानगी दिलेली आहे. त्यांचे कडून नियमाप्रमाणे भाडे वसुल करुन कार्यवाही व्हावी. टपरी कमिटीने अहवाल दिला निर्णय झाला नाही. वाहतुक व अन्य कारणासाठी जागा रिकामी करणे आवश्यक असेल त्यांना पर्यायी जागा द्यावी.

**श्री अफसरखान यासीनखान** टपरी कमिटीच्या अहवालावरुन अद्यापही कार्यवाही झालेली नाही. १९९५ च्या पुर्वीच्या ज्या टपऱ्या आहेत. त्यांचे कमिटीने सर्व्हे करुन अहवाल दाखल केलेला आहे. मात्र अदयापही कार्यवाही झालेली नाही. ९८% अनाधिकृत टप-या आहेत २ टपऱ्यांना महानगरपालिकेने परवानगी दिली ती कोणत्या आधारे देण्यात आली.

**श्री किशनचंद तनवाणी** सभागृहामध्ये आम्ही सर्व स. स. नवीन आहोत. तेव्हा १९९६ च्या वेळेस टपरी कमिटी स्थापना झालेली होती. त्याचा काय अहवाल आहे याची माहिती नविन सदस्यांना अवगत करावे.

**श्री सुदाम सोनवणे** टपरी कमिटीचा मी एक सदस्य आहे आणि अध्यक्षही होतो. परंतु मला एवढेच सांगावयाचे आहे की, प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे आम्हाला योग्य तो निर्णय घेता आला नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** सन १९९८ ला काही टपऱ्यांना परवानगी दिली होती काय याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** सन १९९५ टपरी कमिटीला परवानगी दिलेली आहे काय याची माहिती द्यावी.

**श्री जयवंत ओक** काही भागातील टपरी धारकांनी कोर्टातून स्टे आणलेले आहे काय याचीही माहिती द्यावी व तसे प्रकरण काढावे.

**मालमत्ता अधिकारी** या संबंधी पुढील बैठकीत संचिंका तपासून माहिती देण्यात येईल.

**श्री अफसरखान यासिनखान** सन १९९८ नंतर चे टप-यांना परवानगीचे पत्र मालमत्ता अधिकारी यांचे संचिकेतील यादी आहे ते त्यांनी दाखवावे.

**श्री जयवंत ओक** शहागंज चमन मधील टप-याना १९९८ ला परवानगी दिली.

**श्री अफसरखान यासिनखान** टपरी कमिटीच्या अहवालावरुन कमीटीची शिफारस आधारे काही टप-यांना परवानगी दिली तेव्हा अशा किती टप-यांना परवानगी मिळाली याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** मालमत्ता अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी** त्यावेळेस मालमत्ता अधिकारी म्हणून माजी मालमत्ता अधिकारी श्री एन.ए. वाहुळ हे होते.

**मा. महापौर** टपरी कमिटीची १९९६ च्या नंतर एकही परवानगी दिली नाही. ज्यांना परवानगी दिलेली आहे. त्यांना आता रद्द करण्यात यावे. ज्यांनी परवानगी दिली असेल त्यांची चौकशी करावी. १९९५ च्या नंतर टपरी कमिटीची बैठक न घेता देण्यात आले असेल तर ते रद्द करण्यात येतात. १९९५ अगोदरच्या कायम राहतील ज्यांचेकडे परवानगी आहे ते अधिकृत समजण्यात येतील.

**श्री. प्रकाश निकाळजे :** सन १९९८ ला स. पदाधिकारी यांनी एकत्रीत मिळून संपूर्ण शहराचा सर्वेक्षण केला परंतू तरीही टपरी कमीटीचा अहवाला वरुन परवानगी दिलेले नाही. ते रद्द करण्यात यावे.

**श्री अंबादास दानवे** छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय गळती बाबत खुलासा करावा.

**मा. महापौर** छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथील भिंत गळणेची माहिती द्यावी.

**अति शहर अभियंता** स. स. श्री अंबादास दानवे यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मी खालीलप्रमाणे सादर करीत आहे या इमारतीवर आतापर्यंत ९८.४५ लाख खर्च झालेला आहे.

याच ठिकाणी विविध वस्तुवर मनपाने आतापर्यंत काहीही खर्च कलेले नाही यासाठी श्री पुरवार श्री लामतुरे व रुणवाल यांनी काही नाणी व वस्तु पुराण वस्तु संग्रहालयासाठी दिलेल्या आहेत. आपण श्री पुरवार यांना मानधन देतो.

इमारत दुरुस्तीसाठीचा आतापर्यंत काहीही खर्च अद्यापही झालेला नाही.

इमारतीतील सर्व दालने गळतात हे खरे नाहीत. दालन क्र. ३ हे गळत होते. त्यांच्या बाबतीत संबंधित गुत्तेदार यांचेकडून आहे त्या पैशातून, काम करवून घेण्यात येत आहे. त्या ठिकाणी पाणी गळून ओलावा आलेला आहे. या बाबतीत संबंधित गुत्तेदारास समज दिली असून त्यांनी कार्यवाही केलेली आहे.

इमारतीतील दालन क्र.५ मध्ये ज्या वस्तु ठेवलेल्या आहेत त्यामध्ये किटकनाशके औषधी टाकून ठेवलेले आहेत.

**श्री आशफाक सलामी** स. सदस्यांनी प्रश्न विचारणा केली. त्याचे उत्तर संबंधित अधिका-यांनी दिली.

**श्री तकीहसन खान** या ठिकाणी जी चर्चा चालू आहे ते या सभेतील अजंडया व्यतिरिक्त चर्चा चालू आहे. ते योग्य नाही.

**श्री प्रकाश निकाळजे** रु. १६.०० लाखाचे फर्निचरसाठीचा झालेला खर्च आहे. मात्र वापरलेले लाकुड सागवान होते की कोणते होते. ज्यामुळे लाकडाला किड लागली. याची माहिती द्यावी.

**श्री अंबादास दानवे** या ठिकाणचा सिहांबद्दल काय कार्यवाही केली.

**अति. शहर अभियंता** या संदर्भात पत्रव्यवहार चालू आहे.

**मा. महापौर** ठिक आहे जे काम छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयातील राहिलेले असेल ते सर्व कामे संबंधित गुत्तेदाराकडून तातडीने करवून घ्यावे.

**सौ साधना सुरडकर** सर्व्हे नं. ८/१५ बाबत माहिती द्यावी संचिका सिल केल्या होत्या पुढे काय झाले कळाले नाही. पत्र देवूनही माहिती मिळत नाही.

**श्री सुदाम सोनवणे** शहरानुरवाडी सर्व्हे नं. ८ व १५ बाबत विचारणा केलेल्या प्रश्नाचे उत्तर मला चारच ओळीत प्राप्त झाले त्यामुळे माझे समाधान झालेले नाही. याबाबत मला दि. २०/५/२००० च्या सर्वसाधारण सभेमध्ये माहिती देण्यात येईल असे सांगितले होते. मात्र अद्यापही मला योग्य ती माहिती दिलेली नाही. मला गोलमोल उत्तर देवून टाळाटाळ केलेली आहे आणि सदरील उत्तर रात्री १०.०० वाजता मला प्राप्त झाले.

**मा. महापौर** ज्या फाईली संदर्भात सभागृहात सर्व प्रकरणे सिलबंद करण्यात आलेले आहे. त्या सर्व फाईली स. सर्व पदाधिकारी व स. नगरसेवक तसेच मा. आयुक्त यांचेसमोर उघडण्यात येतील.

**श्री रतनकुमार पंडागळे** छत्रपती शिवाजी महाराज संग्राहालय व मौलाना आझाद संशोधन केंद्र तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र महानरगपालिकेने वास्तु विकसीत केल्या परंतु छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्राहालयात ज्याप्रमाणे कर्मचारी व मानधनावर सल्लगार तज्ञ व्यक्तींची निवड केली. तशी इतर दोन्हीही केंद्रमध्ये अदयापही का केली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात फक्त ४ शिपाई आहेत त्या व्यतिरिक्त कुणीही नाही. तेव्हा ती वास्तु बांधली कशासाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध का करुन देत नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** सर्व्हे न. ८ व १५ बाबत वाद चालू आहे. तेव्हा एकास परवानगी आणि परवानगी नाही असे नगररचना विभागाने करण्याचे कारण काय? त्या ठिकाणचा संपूर्ण नाला हा महानगरपालिकेचा असून तो नाला आपण बांधणार आहात काय? पुढील दोन्हीही सर्व्हेमधील बांधकामे ही अनाधिकृत असून त्यांचे बाबतीत प्रशासनाने कार्यवाही का केली नाही.

**श्री अफसरखान** सर्व्हे न. ८ चे परवानगी दिली नाही. परंतु सर्व्हे नं. १५ ही जागा नाल्यावर असून सदरील जागा जवळपास २७,००० स्कवे. फुट आहे. परंतु प्रत्यक्षात ती जागा ४०,००० स्कवे. फुटाची असल्याचे दाखविले. तेव्हा सदरील जागेवर भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचा-यास हाताशी धरुन संगंनमत करण्यात आले. यासाठी प्रशासनातील नगररचना विभागाने सर्व

कागदपत्राची शहानिशा केलेली नाही. मार्क आऊट जागेच्या नकाशाप्रमाणे केलेले दिसत नाही व दिलेले बांधकाम हे अनाधिकृत व प्रशासनाची दिशाभूल ठरणारी आहे. संबंधित बिल्डर्स कडून नगररचना विभागातील काही कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता व नगररचनाकार यांना फार मोठा पैशाचा सौदा करुन परवानगी दिलेली आहे. सदरील परवानगी ताबडतोब रद्द करुन सदरील बांधकाम तातडीने पाडण्यात यावे.

**श्री अंबादास दानवे** सर्व्हे नं. ८ व १५ च्या जागेबाबत जो वाद चालू आहे. तत्पूर्वी सदरील जागा ही महानगरपालिकाची असल्याने त्या जागेवर बांधकाम परवानगी देण्यापूर्वी प्रशासनातील नगररचना विभागाने तपासणी करणे आवश्यक होते ते त्यांनी केले नाही. ही जबाबदारी प्रशासनाची होती यास जबाबदार कर्मचा-यांस योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**मा आयुक्त** ★ सदरील बांधकाम चालू आहे त्या ठिकाणी कोर्टाने स्टे दिलेला आहे.

★ ज्यांनी संबंधित नाल्यावर अतिक्रमण करुन अनाधिकृत बांधकाम कलेले असेल त्यांना परवानगी दिलेली असेल त्या कर्मचाऱ्यावर व संबंधित बिल्डर्स विरुध्द कार्यवाही करणेत येईल.

★ शहरातील यापुढे कोणत्याही नाल्यावर बांधकाम व जागा लिजवर न देणे बाबत सभागृहाने निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

**मा. उपमहापौर** शहरातील जेवढे नाले आहेत त्यांची सर्व लांबी रुंदीचे नकाशे आहेत त्यांची नोंद ठेवावी व पुढील परवानग्या देवू नये.

**श्री जयवंत ओक** या सात-आठ दिवसात नगररचना विभागाकडून नाल्यावरील बांधकाम बाबत संचिका मागवावी व नंतरच निर्णय घ्यावा.

**श्री भगवान घडामोडे** या विषयास अनुसरुन १ प्रकरण आले अनेक बोगस पी. आर. कार्ड तयार केले स. न. १५ बांधकाम थांबवा. जागा ही नाल्यावरील असून त्याबाबतची संपूर्णपणे चौकशी व्हावी. सर्व्हे नं. ८ व १५ या जागेवर ज्या बिल्डर्सनी अनाधिकृतरित्या बांधकाम परवानगी मागितली व मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे प्रशासनातील नगररचना विभागाने कोणत्याही प्रकारची कागदपत्रांची शहानिशा न करता मंजुरी दिली त्या शाखा अभियंता कनिष्ठ अभियंता तथा नगररचनाकार सोबतच संबंधित बिल्डर्सवर योग्य ती कार्यवाही व्हावी.

**श्री जयवंत ओक** पत्रकार भवनासाठी सिध्दार्थ उद्यानच्या समोरील नालावर बांधकामासाठी जागा दिलेली आहे. त्यामुळे मा. महापौरांनी अशा कोणत्याही प्रकारचा निर्णय घेऊ नये.

**मा. महापौर** सर्व्हे नं. ८ व १५ शहानुरवाडी येथील महानगरपालिकाच्या जागेवर संबंधित बिल्डर्सने केलेले अतिक्रमण संबंधिची सर्व संचीका सभागृहात सिल बंद करण्यात आलेली आहे. स. पदाधिकारी व स. नगरसेवक यांचे समक्ष त्याच प्रमाणे मा. आयुक्त समोर सदरील संचिका उघडण्यात येतील व त्या संचिकेची सविस्तर पाहणी करुन घेण्यासाठी जवळपास ३-४ दिवसाचा अवधी लागणार आहे. त्या संचिकेची सविस्तर चौकशी केल्या नंतर सर्व्हे नं. ८ व १५ या महानगरपालिकेच्या जागेवर संबंधित बिल्डर्सने अनाधिकृत बांधकम केले व परवानगी घेतली ती परवानगी स्थगित करण्यात येते.

★ शहरातील कोणत्याही आरक्षित खुल्या जागा, नाल्यावरील जागा लिजवरील, या महानगरपालिकेने कुणासही एक इंचही जागा देवू नये व तशा प्रकारचा प्रस्तावाही प्रशासनाने ठेवू नये. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**श्री रुक्मणी शिंदे** माझा वार्ड अनाधिकृत असून या भागातील लोकांना पी. आर. कार्ड अद्यापही नाहीत.

**मा. महापौर** डॉ. बाबासाहेब संशोधन केंद्र येथे आवश्यक लागणारे कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देणेबाबत काय कार्यवाही केली.

**प्रकल्प संचालक** या संशोधन केंद्रामध्ये विविध पदानिर्मितीची प्रस्ताव मंजूर करुन शासनाकडे पाठविला आहे. त्यामध्ये सहा ग्रंथपाल, लिपिक व सहा. समन्वयक तसेच माळी, वॉचमन व शिपाई पदे भरणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रासाठी आवश्यक लागणारे साहित्य व कर्मचारी देणे संदर्भात नुकतीच मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली बैठकीत मुख्य समन्वयकांवर चर्चा झाली त्यामध्ये ५ तज्ञ व्यक्तीचे नांवे सुचविण्यात आले त्यामध्ये प्रामुख्याने १) प्रा. राममाने, २) डॉ. पानतावणे, ३) डॉ सुभाष गडद ४) प्राचार्य मोहोगांवकर व ५) प्रा. प्र. ई सोन कांबळे इ. आहेत पेकी एकाची निवड मानधनावर करावयाची आहे.

**मा. महापौर** सदरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रावर पदे निर्मीतीचा प्रस्ताव मंजूर झालेला असून सदरील बाबतीत शासनाकडून प्रस्ताव मंजुर होऊन आलेले नाहीत.

**श्री प्रकाश निकाळजे** या संदर्भात विरोधाभास निर्माण होतो आहे. उद्‌घाटन होऊन या संशोधन केंद्राला जवळपास ६ महिन्याचा कालावधी लोटलेला आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची पदे भरलेली नाहीत. सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रास कुलूपे लावून बंद आहे. आता स. सदस्यांनी पत्र देवून विचारणा केल्यामुळे प्रशासनाचे डोळे उघडले आहेत. सर्वसाधारण सभेने पदनिर्मीतीचा प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविला असून त्यास शासनाची मंजुरी अद्यापही मिळाली नाही. परंतु शासनाकडे पाठपुरावा आतापर्यंत किती वेळेस केला. पदास मंजूरी मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदे भरण्यास कार्यवाही करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** डॉ. बाबासाहेब संशोधन केंद्र तातडीने सुरु करणेसाठी आवश्यक लागणारे साहित्ये व कर्मचा-यांचे पदे भरणा तातडीने करुन केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करावी.

**श्री रतनकुमार पंडागळे** आतापर्यंत पदे का भरण्यात आली नाही आंतरराष्ट्रीय पातळीने संशोधन केंद्र व्हावे.

**मा. महापौर** डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या ठिकाणी आवश्यक लागणारे कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात इतर विभागातून घेऊन कार्यवाही करावी.

**विषय क्र. १६/१ :**

सर्वसाधाण सभा ठराव क्र. १३/१ दिनांक २०/५/२००० अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या बी-बीयाणे व जंतुनाशके या मालावर पूर्वीप्रमाणेच जकात कर वसुलीस मंजुरी देण्यात आली आहे. तथापि प्रत्यक्षात शहरात आयात होणाऱ्या

बी-बीयाणे व जंतुनाशके यांच्यावर जकात वसुली केली जात नाही. त्यामुळे महानरगपालिकेचे वार्षिक तीन कोटी रुपयांचे उत्पन्न बुडत आहे. याबाबत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री अंबादास दानवे
श्री काशीनाथ कोकाटे
अनुमोदक श्री अफसरखॉ यासिनखॉ

**संवाद :**

**श्री अफसरखॉंन** जकात बाबतच्या प्रश्नावर चर्चा व्हावी. ज्यामध्ये मागील बैठकित बी-बीयाणे या विषयावर चर्चा होऊन शासनाने सदरील प्रस्तावावर जकात माफीचे निर्णय दिलेला होता. तथापी बी-बीयाणे वर जकात माफ केल्यास जवळपास ३-४ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान महानगरपालिकेचे होणार आहे. म्हणून मागील दि. २०/५/२००० रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत प्रस्ताव जकात माफीचा रद्द करुन बी-बीयाणे वर जकात आकरणी करणसाठी प्रस्ताव मंजूर करुन शासनास पाठविणे बाबत सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. त्याबाबत आजपर्यंत कोणती कार्यवाही केली. अमंलबजावणी का केली नाही.

**मा. महापौर** जकातीच्या बी-बीयाणे, वतन टेकस्टाईल व जपानी गादयांच्या बाबत पत्र देवून विचारणा केली आहे. प्रशासनाने त्यानुसार माहिति द्यावी.

**मा. उपआयुक्त (प्र.)** बी-बीयाणे यांच्या बाबतीत महानगरपालिकेने ठराव पारित करुन शासनाकडे पाठविला होता या बाबतची माहिती वाचून दाखवितो.

१. औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ०७ दिनांक १९-७-१९८९ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयातीत व्यापारी बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर जकात करातून सुट देणेबाबतचा ठराव पारित करण्यात आला.

२. सदर ठराव शासनास महानगरपालिकेमार्फत मान्यता प्रदान करण्याकरिता सादर करण्यात आला. सदर ठरावास महाराष्ट्र शासन निर्णय क्र. १६८९/११३०/प्र.क्र.१०४/८९/नवि-२४ दिनांक १४ मार्च १९९१ मान्यता प्रदान केली व त्याची अंमलबजावणी शासनाने निर्देशित केल्याच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १६ एप्रिल १९९१ पासून करण्यात आली.

३. तद्नंतर औरंगाबाद महानरगपालिका मार्फत प्रशासकीय ठराव क्रमांक ६८ दिनांक १७/२/९५ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयतीत बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर जकात कर माफी पासून शेतकऱ्यांना काहीच फायदा होत नसल्यामुळे उक्त मालावर जकात कर पुनःश्च लागू करणे बाबतचा प्रशासकीय प्रस्ताव पारीत केला व सदरचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक ७-७-९५ रोजी मंजूरीस्तव सादर केला.

४. महाराष्ट्र शासनाने सदर प्रस्तावास शासन निर्णय क्रमांक ए. एएसी/१०९७/१२४/प्र. क्र. १८/९७ नवि-२४ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ चे पोट कलम (१) अनुसार मान्यता प्रदान केली व सदर मान्यता महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दीस देवून दिनांक ३०/६/९९ च्या मध्यरात्रीपासून त्यांची अंमलबजावणी करण्यात येऊन दिनांक १-७-९९ पासून औरंगाबाद

महानगरपालिका हद्दीत आयातीत बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर जकात दर अनुसूची "ओ" नुसार २ टक्के दराने जकात कर वसुली करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले.

५. महाराष्ट्र शासनाचे उप सचिव यांनी दिनांक ९ जुलै ९९ अन्वये शासन निर्णय क्र. ए.एम.सी/१०९७/१५४/१८/९७ दिनांक २५/५/९९ ला पुढील आदेशापर्यन्त स्थगिती दिली. तद्अनुषंगाने शासनाच्या उक्त पत्रानुसार दिनांक १७/७/९९ पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयातीत बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर जकात कर वसुलीस तुर्त स्थगिती देण्यात आली.

६. दिनांक २४ नोव्हेंबर १९९९ च्या पत्रानुसार उक्त शासन निर्णयास देण्यात आलेले स्थगिती आदेश उठविण्यात आला. तद्अनुसार औरंगाबाद महानगरपालिके मार्फत दिनांक १/१२/९९ पासून पुनःश्च बी-बीयाणे किटकनाशके या मालावर जकात कर लागू करण्यात आला.

७. दिनांक १३/१२/९९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. १३६/८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयातीत बी-बीयाणे किटकनाशे व रासायनिक खते व कृषी उपयोगी औषधे या मालावर जकात करातून माफी देणे बाबतचा अशासकीय प्रस्ताव पारीत केला.

८. सर्वसाधारण सभेत पारित केलेला प्रस्ताव तत्कालीन महापौर यांनी शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आला. शासनाने सदर प्रस्तावा संदर्भात क्र. ए.एम.सी/१०९७/१५४/प्र.क्र.१८/९७ दिनांक २१/३/२००० च्या पत्रानुसार सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या प्रस्तावाची प्रमाणित प्रत तसेच महानगरपालिकेचा अभिप्राय याबाबतची माहिती मागविली असता महानगरपालिकेमार्फत कार्यालयीन पत्र क्रमांक मनपा/उ आ प्र/स्विस/२०००/५५५ दिनांक १/४/२००० अन्वये सर्वसाधारण सभेने पारित केलेला प्रस्ताव हा संपूर्ण अशासकीय असून याबाबत प्रशासनाचे मत न घेता पारित केलेला आहे व ज्यामुळे महानगरपालिकेचे जकात कर उत्पन्नात र. रु. २.०० ते २.५० कोटीचे नुकसान होऊ शकते व सदरचे नुकसान भरपाई करणे बाबत महानगरपालिकेकडे कोणतीही तरतुद नसल्यामुळे सदरच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करु नये अशी शिफारस केलेली होती.

९. दिनांक ११/५/२००० नुसार शासनाचे कक्ष अधिकारी यांनी पत्र देवून जानेवारी, फेब्रुवारी व मार्च महिन्यात उक्त मालापासून औरंगाबाद महानगरपालिकेस किती जकात कर उत्पन्न प्राप्त झाले या संदर्भात माहिती मागविली असता प्रशासनामार्फत पत्र क्र मनपा जकात/किरकोळ/३९६/२००० दि. १७/४/२००० अन्वये बी-बीयाणे व किटकनाशके व कृषी उपयोगी औषधे या मालावर जानेवारी २००० ते मार्च २००० या महिन्याच्या कालावधीत रु. १३,९५,५५३/- इतकी व रासायनिक खते या मालावर रु. ५५,८२,२०५/- इतकी जकात कर वसुली प्राप्त झालेली असून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत उक्त मालावर जकात कर लागू केल्यामुळे महानगरपालिका हद्दीतील व्यापारी यांनी बहुतांश माल हा औरंगाबाद महानगरपालिका हद्दी बाहेरील उदा. वाळुज, पंढरपुर, दौलताबाद येथे उतरविला. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत एकूण उत्पन्नाच्या २०% उत्पन्न प्राप्त झाले असे कळविण्यात आले.

१०. महाराष्ट्र शासन क्र. ए.एम.सी/१०९७/१५४/प्र.क्र. १८/९७ निवी-२४ दिनांक ५ मे २००० अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयातीत बी-बीयाणे व किटकेनाशके या मालावर जकात करातुन माफी देण्याच्या प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियक १९४९ चे उप कलम ४५५ (१) अन्वये मान्यता प्रदान केली. शासन मान्यतेनुसार उक्त शासन निर्णय मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे उप कलम ४६२ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दीस देवून दिनांक १६/५/२००० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयातील बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर जकात कर माफ करण्यात आली.

११. दिनांक २०/५/२००० रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर देण्यात आलेली जकात कर माफी रद्द करण्यात येवून पुर्वीप्रमाणेच जकात कर लागू करणे बाबत ठराव क्र. १३/१ नुसार सर्वानुमते मान्यता प्रदान केली. तद्अनुसार प्रशासनाने शासनाकडे बी-बीयाणे व किटकनाशके या मालावर दि. ५ मे २००० च्या शासन निर्णयानुसार दिलेली जकात कर माफी रद्द करण्यात येवून पूर्वीप्रमाणेच जकात कर आकारणी करण्यास मान्यता द्यावी अशी शासनास विनंती केलेली आहे. सदर आयातीत मालावर शासनाची मान्यता प्राप्त होताच जकात कर पुर्वीप्रमाणे जकात कर वसुल केली जाईल.

**श्री अफसरखान** शासनाकडील प्रस्तावावर जकात कर माफी नंतर सर्वसाधारण सभेने दिनांक २०/५/२००० रोजी शासनाच्या निर्णयानंतर मनपास आर्थिक बोजा पडत असल्याने प्रस्ताव रद्द करुन बी-बीयाणावर जकात आकारणी करणेचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला असतांना ही अद्याप पर्यंत प्रशासनाने बी-बीयाणे यावर जकात कर आकारणी केलेली नाही त्यामुळे काही व्यापारी तसेच कर्मचारी अधिकारी यांचे संगनमत यावरुन स्पष्ट होते आणि त्यामुळे महानगरपालिकेचे बऱ्याच मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. याची प्रशासनाने दखल घ्यावी. शासनाकडून जकात माफीचे पत्र आल्याबरोबर प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याचे कारण काय? तेव्हा अशा अधिकाऱ्यांची आपण गांभीर्याने दखल घेतलेली नाही. कारण यामध्ये व्यापारी व अधिकारी यांचे बरेच काही दडलेले आहे. ज्यामुळे मनपाचे जवळपास रु. ४.०० कोटीचे नुकसान झालेले आहे. शासनाकडून आलेल्या पत्रानुसार त्यांचे विरुध्दात अपील का केलेली नाही. मनपा ही स्वयात्त संस्था असून मनपाचे आर्थिक भार यावरच अवलंबून आहे. त्यामुळे अपील करणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त** सुरुवातीला सर्वसाधारण सभेने याबाबतचा ठराव मंजुर करुन पाठविलेला होता त्यानुसार प्रशासनाचे मत आम्ही नोंदविलेले आहे, कि सदरील प्रस्ताव हा अशासकीय असून मनपाच्या आर्थिक बाबींचा प्रश्न उपस्थित होत असल्याने या प्रस्तावावर पुनविचार व्हावा व प्रस्ताव शासनाने रद्द करावा. परंतु त्यानंतरही शासनाने सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार प्रस्ताव मंजुर करुन फॅक्स पाठविलेला आहे. पुन्हा आता त्याच अनुषंगाने प्रस्ताव रद्द करुन जकात आकारणी करणेचा मंजुर झालेला ठराव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. शासन निर्णयानंतर कार्यवाही होईल. शासनाने जकात माफीचा प्रस्ताव रद्द केले पाहिजे.

**श्री अफसरखान** मागील सर्वसाधारण सभेचा प्रस्ताव कधी मंजुर करण्यात आला याची आम्हाला काहीही माहिती नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची दिशाभूल करण्यात आली आहे.

**श्री अंबादास दानवे** सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव मंजूर केल्यानंतर शासनाने त्याबाबतच्या निर्णय आपल्याकडे पाठविला. परंतु महानगरपालिकेच्या आर्थिक बाबीचा विचार करता नफा व तोटा याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याने मनपावर कोणत्याही प्रकारे आर्थिक बोजा होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यानुसार शासनास तसे कळविणे योग्य.

**मा. आयुक्त** शासनाकडून सर्वसाधारण सभेच्या प्रस्तावानुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे. मात्र त्याबाबत प्रशासनाचे मत नोंदविण्यात आलेले असतांनाही शासनाने प्रस्ताव मंजुर केलेला आहे. आता पुन्हा सर्वसाधारण सभेने बी-बीयाणे तर जकात माफीचा निर्णय रद्द करुन आकारणी करणेचा दुरुस्त प्रस्ताव पाठविलेला असल्याने त्यानुसार शासन मंजुरीनुसार कार्यवाही करता येईल. परंतु कोर्टामध्ये अपील करणेबाबत काही प्रकरण गुतांगुतीचे होऊ नये याची खबरदारी घेणेसाठी कायदेशीर सल्ला घेणे योग्य.

**श्री काशीनाथ कोकाटे, श्री अफसरखान** सर्वसाधारण सभेने दिनांक २०/५/२००० रोजीच्या चर्चेद्वारे शासनाकडील आलेल्या जी. आर. नुसार पुर्नविचारार्थ व महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून त्यांची आर्थिक बाजुची निकड लक्षात घेता बी-बीयाणे यावर जकात कर आकारणी करणेची कार्यवाही शासनाकडून कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन न मागविता कार्यवाही चालू ठेवावी व सभेने पारित केलेल्या प्रस्तावानुसार अमंलबजावणी करावी.

**मा. महापौर** मागील सर्वसाधारण सभा दिनांक २०/५/२००० रोजी प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर मी स्वत: प्रशासनास पत्र देवून प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी पत्र दिलेले आहे.

**मा उप आयुक्त (प्र.)** दिनांक २०/५/२००० रोजीच्या सर्वसाधारण सभेचा पारित झालेला प्रस्ताव मी वाचून दाखवितो. "प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या बी-बीयाणे व जंतुनाशके या मालावर जकात माफी देण्याबाबत दिनांक १३/१२/९९ रोजी ठराव क्रमांक १३६/८ अन्वये सर्वसाधारण सभेने ठराव पारित केलेला होता. त्यानुसार शासनाने दिनांक १६ मे २००० पासून उपरोक्त मालावर जकात माफ करण्यास मंजूरी दिलेली आहे. या जकात माफीमुळे महानगरपालिकेचे वार्षिक तीन कोटी रुपयांचे उत्पन्न बुडत असल्यामुळे सदरील ठराव क्र. १३६/८/दिनांक १३/१२/१९९९ याद्वारे रद्द करण्यात येऊन मनपा हद्दीत आयात होणाऱ्या बी-बीयाणे व जंतुनाशके या मालावर पुर्वीप्रमाणेच जकात कर आकारण्यास तसेच शासनाने जकात माफी संबंधी काढलेले आदेश रद्द करण्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**श्री अफसरखान** एकदा सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर पुन्हा त्याचा अंमलबजावणी सुरु करण्यास विलंब करण्याचे कारण काय? याबाबत तातडीने निर्णय व्हावयास पाहिजे. आणखी किती दिवस थांबणार आहात. आतापर्यंत जवळपास रु. ३.०० कोटीचे आर्थिक नुकसान मनपाचे होत आहे. आणखी महानगरपालिकाची बाजू कमकुवत करावयाचे आहे काय?

शेतकऱ्यांचे या प्रस्तावाबाबत काहीही फायदा नसून सर्व काही व्यापारी लोकांसाठी हे सर्व चाललेले आहे. त्यापेक्षा शासनाने मंजुरीचा जी. आर. पाठविलेला आहे. त्यास अनुसरुन महानगरपालिकाने कोर्टामध्ये अपील करावे ते केलेले आहे काय? शासनाकडे महानगरपालिकाची बिकट परिस्थितीची माहिती दिली आहे काय? एकदा नफा किती व तोटा किती याची कल्पना शासनास कळविलेली आहे काय? या सर्व महानगरपालिकाच्या आर्थिक नुकसानीस कोण जबाबदार याची माहिती दयावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** पाहिल्यापासून शेवटपर्यंत या प्रस्तावासंदर्भात संशस्यास्पद निर्णय असून यामध्ये काही व्यापारी व कर्मचारी/अधिकारी यांचे संगनमत आधारे ही कार्यवाही केलेली असणार आणि त्यामुळेच मनपाच्या आर्थिक बाबींचा याकडे कुणीही लक्ष दिलेले दिसत नाही. सभागृहाचे निर्णयानंतर त्यांची अंमलबजावणी का होत नाही. उदयापासून बी-बीयाणे जकात लागू केली पाहिजे.

**मा. उपआयुक्त (प्र)** शासनाकडे सदरील प्रस्ताव पाठविलेला आहे. सभागृहाचे म्हणणे आहे की, सर्वसाधारण सभेने दिनांक २०/५/२००० च्या निर्णयानुसार तातडीने जकातीच्या प्रस्तावावर अंमलबजावणी करवी, मा. उच्च न्यायालयाचे विधीज्ञ अभिप्राय घेवून निर्णय घेता येईल.

**श्री जयवंत ओक** सर्वसाधारण सभेमध्ये कोणताही प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठवून त्यानुसार कार्यवाही करावी लागेल. प्रशासनाकडून एकदा पारित झालेला प्रस्ताव हा मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला जातो आणि शासनाने मंजुरी दिल्यानंतरच कार्यवाही करावी असा नियम आहे कारणे शेतकऱ्यांच्या हिताची बाब आहे. त्यांचेवर कुठल्याही प्रकारचे अन्याय होणार नाही याची दखल घ्यावी. शासनाने मंजुर केलेला ठरावावर पुन्हा रद्द करुन निर्णय घेणे सभागृहाला उचित नाही. याचाच अर्थ शासनाचा निर्णय तुम्हाला बंधनकारक नसल्यास आपण काहीही निर्णय घेऊन मोकळे होणार का? त्यावर कुणाचेही नियंत्रण नाही असे होता कामा नये. तेव्हा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये महानगरपालिकाचा कार्यभार चालविण्यासाठी शासनाकडून प्रत्येक बाबतीत मंजुरी घेण्यात आवश्यक आहे. व चर्चेतून हा निर्णय व्हावी.

**मा. महापौर** शेतक-यांचे बी-बीयाणे यावर जकात कर लावण्याच्या प्रस्तावावर व्यापारी लोकांना पाठीशी घालत आहात ते योग्य नाही. शासनाने दरवर्षी महानगरपालिकेला रु. १०.०० कोटीचा निधी दिलेला आहे. त्यांचे महानगरपालिका आभार मानते.

**श्री काशीनाथ कोकाटे** एकदा सभागृहाने मंजूर केलेल्या प्रस्तावावर प्रशासनाने अमंलबजावणी का केलेली नाही याची माहिती द्यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** भावनेच्या भरात जाऊ नये. जो निर्णय असेल तो कायदयाच्या चौकटीत बसवून काम करावयास पाहिजे. उदा. प्रकरण न्यायप्रविष्ट झाले तर अडचण निर्माण होईल याचाही विचार व्हावा.

**मा. महापौर** बी-बीयाणे बाबत असा निर्णय घेण्यात येतो की, मा. हायकोर्टाने विधिज्ञ यांचे अभिप्राय हे उप आयुक्त (प्र) हे घेतील व उदयापासून दिनांक २१/६/२००० पासून बी-बीयाणे यावर जकात आकारणी करण्यास या ठरावा स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १६/९ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरात आयात होणाऱ्या बी-बीयाणे, जंतुनाशके यावर जकात माफी देणेबाबत सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या ठराव क्र. १३६/८ दिनांक १३/१२/१९९९ रद्द करण्यात येतो आणि सर्वसाधारण सभा ठाराव क्र. १३/१ दि. २०/५/२००० च्या निर्णयानुसार शहरात आयात होणाऱ्या बी-बीयाणे व जंतुनाशके या मालावर दिनांक २१ जून २००० पासून नियमाप्रमाणे जकात कर वसुल करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/२ :**

सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२८/५ दिनांक २०/४/२००० अन्वये पैठण रोड औरंगाबाद येथील वतन टेक्सटाईल लि. या मोमीन जमातीतील युनिटला शहरात आयात होणा-या मालावर व मशिनीरीवर जकात माफ करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यावर फेर विचार होणे बाबत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सूचक | श्री अंबादास दानवे |
| | श्री काशीनाथ कोकाटे |
| अनुमोदक | श्री अफसरखॉ यासिनखॉ |

**संवाद :**

**मा. महापौर** यानंतर "वतन टेक्स्टाईल" व जपानी गादयांबाबत वर्तमानपत्रात ज्या बातम्या प्रसिध्दीस झाल्या त्याबाबत तसेच शासनाकडून आलेल्या पत्रावरील माहिती सभागृहाला द्यावी. वतन टेक्स्टाईल कडून बॉंड घेऊन जकात आकारणी न करता गाडया सोडण्यात आलेल्या आहेत. त्याबाबतची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे सदरील प्रस्ताव कधी मंजुर झाला याचीही माहिती द्यावी.

**श्री गणेश तांबे** मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही कामगारांच्या प्रश्नासंदर्भात उपोषणास बसलेले गौतम खरात यांचा प्रश्न सोडवावा. जर लवकर सुटणार नसेल तर आणखी किती दिवस खोळंबून ठेवणार याची माहिती द्यावी. कामगारांच्या प्रश्नावर प्रशासनाची काय भूमिका आहे ते सांगावे.

**मा. महापौर** कामगारांच्या प्रश्नावर नंतर चर्चा करणेत येणार आहे. सध्या जकातीच्य बाबत वतन टेक्सटाईल व जपानी गादयाबाबत चर्चा होईल. या गादयावरती किती टक्के वसुली होती त्याची माहिती द्यावी.

**श्री तकी हसन खान** वतन टेक्सटाईल व जपानी गादयांच्या जकातीच्या प्रश्नासंदर्भात सभागृहाला काहीही माहिती नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य सभागृहाला काय भूमिका बजावणार?

**श्री अंबादास दानवे** जपानी गादयांच्या संदर्भात अशी माहिती आहे की, जपानी गादया हया प्रत्येकी ८० हजार ते १.५० लाखापर्यंतची किमंतीच्या असून जवळपास १०० गादया हया विक्रीसाठी शहरात आल्या. त्यावर किती टक्क प्रमाणात जकात आकारणी करण्यात आली यांची माहिती द्यावी. आणखी जवळपास ५०० गादया हया शहराबाहेरील गोडावूनमध्ये पडलेल्या आहेत. ज्यामुळे महानगरपालिकेतील जकात आयातीच जपानी गादयांवर किती टक्के

प्रमाणात वसुल झालेली आहे याची माहिती द्यावी. अशीही माहिती आहे की, या गादयांवर फारच कमी टक्के दराने जकात आकारणी करण्यात आलेली आहे.

**मा. उपआयुक्त (प्र.)** १ दिनांक १३/१२/१९९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक १०९/७ अन्वये मे. वतन टेक्स्टाईल लिमिटेड पैठण रोड, औरंगाबाद यांच्या आयातीत मला संदर्भातील जकात कर माफीच्या प्रस्तावास सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर प्रस्ताव सर्वानुमते नामंजुर करण्यात आलेला होता.

२. शासनाने दिनांक ३ एप्रिल २००० रोजीच्या पत्रानुसार सदर प्रस्तावावर अहवाल मागविला होता. महानगरपालिका प्रशासनामार्फत सदर प्रस्ताव दि. १३/१२/१९९९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते नामंजुर झाल्याबाबत दिनांक १२/५/२००० रोजीच्या पत्रकान्वये कळविण्यात आले होते.

३. दिनांक २०/४/२००० रोजी संपन्न झालेल्या सभेतील ऐनवेळेचे विषय क्रमांक ५ अंतर्गत मे. वतन टेक्सटाईल लिमिटेड यांना त्यांच्या आयात मालावर व मशिनरीवर जकात कर माफ करण्याच्या प्रस्तावास स्विकृतीसह सर्वानुमते ठरावे क्रमांक २२८/५ नुसार मंजुर केला.

४. दिनांक २९ मे २००० रोजी शासनाकडून सदर ठरावा संदर्भात महानगरपालिका प्रशासनाचा अभिप्राय/अहवाल शासनास सादर करणे बाबत कळविलो त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका मार्फत दिनांक ७ जून २००० रोजीच्या पत्रानुसार सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव हा संपूर्ण अशासकीय असून संबंधित कंपनीच्या आयातीत कच्च्या मालावर अंदाजे सरासरी ०५ ते ०७ लाख रुपये प्रति वार्षिक आर्थिक नुकसान होणार असून होणारे नुकसान भरपाईचे महानगरपालिकेकडे कोणतेही प्रयोजन नाही याबाबतचा सविस्तर अहवाल व अभिप्राय पाठविलेला आहे.

५. दिनांक ५ जून २००० रोजीच्या महाराष्ट्र शासनाने उप सचिव यांनी पत्राद्वारे महानगरपालिकेस कळविले की, सदर ठरावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. करिता प्रस्तुत प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत मे. वतन टेक्सटाईल्स लिमिटेड यांनी आयात केलेली यंत्रे व कच्चा माल यासाठी देय होणा-या जकात कराच्या रक्कमेचे हमीपत्र घेवून कंपनीचा माल मुक्त करण्यात यावा. त्यानुसार दि. ०७-०६-२००० मे. वतन टेक्सटाईल लिमिटेड यांचा आयात
झालेला माल हमीपत्र घेवून सोडण्यात आला.

## आयात मालाचे विवरण खालीलप्रमाणे

| **दिनांक** | **मालाचे वर्णन** | **मालाची किंमत** | **जकात कर** |
|---|---|---|---|
| ७/६/२००० | यंत्र सामुग्री | ३,०४,७६,४८९/- | ७,६१,९१२/- |
| ९/६/२००० | यंत्र सामुग्री | १,८३,२४,४६९/- | ४,५८,११२/- |
| ९/६/२००० | कच्चा माल | १,३४,७०६/- | २,०२१/- |
| १५/६/२००० | कच्चा माल | १,२८,६४५/- | २,५७३/- |
| १७/६/२००० | यंत्र सामुग्री | १,०२,४४,८७४/- | २,५६,१२२/- |
| | **एकूण** | **५,९३,०९,१८३/-** | **१४,८०,७४०/-** |

**मा. आयुक्त** सुरुवातीस प्रस्ताव नामंजुर करण्यात आला. त्यानंतर ऐनवेळचा विषया अन्वये दि. २०/४/२००० अन्वये प्रस्ताव मंजुर करण्यात आला. त्यांनतर शासनाने याबाबत अहवाल मागविला असता प्रशासनाने अहवाल सादर केलेला आहे. तथापि याबाबत निर्णय घ्यावयाचा झाल्यास अगोदर पूर्वीचा प्रस्ताव रद्द करावा लागेल किंवा बदल केल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागेल व तसे शासनास पाठविण्यात येईल.

**श्री तकीहसन खान** अगोदर वतन टेक्सस्टाईल लि. चा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. नंतर प्रशासनावर अभिप्राय शासनास सादर करण्यात आला. त्यानंतर शासनाने सदरील प्रस्तावास मान्यता देण्याची बाब विचाराधिन असल्याचे कळवून जकात कराच्या रक्कमेचे हमीपत्र घेवून कंपनीचा माल मुक्त करणेत आला आणि आता पुन्हा सदरील प्रस्ताव रद्द करावा असा प्रस्ताव चर्चेला आहे. म्हणजे सर्वसाधारण सभा ही कशासाठी आहे हेच कळत नाही. एकदा म्हणता प्रस्ताव मंजूर करावा व दुस-या वेळेस प्रस्ताव नामंजूर करावा हे सर्व सभागृहात चर्चा करण्याचे प्रयोजन काय? सभागृहात शिस्तीला धरुन नाही. अशा प्रकारची थट्टा कोणत्याही प्रस्तावाबाबत करणे योग्य नाही.

**श्री सुदाम सोनवणे** ज्या प्रकारे बी-बीयाणेचा ठराव रद्द केला तसाच वतन टेक्सस्टाईलचा रद्द करावा.

**श्री भगवान घडामोडे** वतन टेक्सस्टाईल्स लि. नांवाने व काही मटेरीयल शहरात आले. कोणता व किती माल शहरात आला याची शहानिशा करावी. उदया वतन टेक्सस्टाईल दुसऱ्याचा माल आणेल. आपण सोडणार का? वतन टेक्सस्टाईल संबंधी ठराव घेवून त्यावर जकात आकारणी करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** आमचे एवढेच म्हणणे आहे की, वतन टेक्सस्टाईल्स लि. यांच्या मालावर जकात आकारणी करण्यात यावी. आम्ही शासनाचा निर्णय धुडकावत नाही.

**श्री तकी हसन खान, श्री स. अली मिरा सलामी** शासनाचा अपमान आहे. पुन्हा शासनास ठराव पाठवू नये. शासनाची चेष्टा केल्यासारखे होईल. टेक्स्टाईल्स व लिज्जत पापडवर जकात आकारणी करण्यात यावी.

**मा. महापौर** सर्व सन्माननीय सदस्यांच्या सभागृहातील चर्चेनुसार त्यांच्या भावना लक्षात घेता उदया दिनांक २१/६/२००० पासून वतन टेक्स्टाईल्स लि. यांनी आयातीत केलेल्या मालावर जकात आकारणी करण्यात मंजूरी देण्यात येते व सदरील प्रस्ताव दिनांक २०/४/२००० ला मंजुर करण्यात आला तो रद्द करण्यात येतो (यावेळी सभागृहात बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांमध्ये सदरील प्रस्ताव रद्द करुन मंजूर करावी की नामंजूर करावे किंवा दुरुस्ती करावा. याबाबत आपसात चर्चा चालू असते. काहीही ऐकू येत नाही.

**मा. महापौर** वतन टेक्सस्टाईल्स लि. व लिज्जत पापड यांच्या आयातावरील मालास जकात माफीचा प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला होता तो दुरुस्ती करुन सदरील दोन्ही प्रस्तावास जकात आकारणी करण्यास हे सभागृह सर्वानुमते मंजुरी देते. याच सभेत स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १७/२ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पैठण रोड वरील मे वतन टेक्सटाईल प्रा. लि. संस्थेच्या शहरात आयात होणा-या मालावर व मशिनरीवर जकात कर माफी बाबत ठराव क्र. २२८/५ दिनांक २०/४/२००० च्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेल्या निर्णयात दुरुस्ती करण्यात येत असून मे वतन टेक्सटाईल प्रा. लि.या संस्थेच्या शहरात आयात होणा-या माल आणि मशिनरी यावर दि २१ जून २००० पासून नियमाप्रमाणे जकात वसुली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. याच सभेत स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** आता जपानी चुबंकीय गादया बाबत सभागृहात माहिती देण्यात येईल.

**स. अली मिरा सलामी** जपानी चुंबकीय गादया या शहरात आलेल्या मालावर किती टक्के प्रमाणात आकारणी जकातीची करण्यात आली याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** चुंबकीय गादयांच्या संदर्भात शहरात किती गादया आल्या व जकात हमी प्रमाणात फाडण्यात आले. तर काहींना जकात न लावता तसेच सोडण्यात आले. अशा प्रकारच्या बातम्या काही वृत्तपत्रातून प्रस्तावीत झाल्या तर काही सन्माननीय सदस्यांनी सुध्दा तक्रारी केल्या. तेव्हा याबाबतची सविसतर माहिती द्यावी.

**श्री तकीहसन खान** काही वर्तमानपत्रातील बातम्या हया ख-या असतात कशावरून आपण वर्तमानपत्रातील बातम्यावरुन प्रशासनास माहिती मागविता ते कितपत शक्य आहे. कोणत्याही वर्तमानपत्रावर हवाला आपण देऊ नये.

**मा. महापौर** सदरील प्रश्न सन्माननीय सदस्यांनी पत्र देवून विचारणा केलेली आहे. श्री प्रशांत देसरडा यांच्या वार्डात या चुंबकीय गादया विक्रीसाठी आणल्या जातात. त्यामुळे प्रश्न उपस्थित झालेला आहे आणि त्यामुळे सभागृहासमोर विचाराधिन प्रश्न ठेवलेला आहे. या संदर्भात उप आयुक्त (प्र.) यांनी सविस्तर माहिती द्यावी.

**मा आयुक्त (प्र.)** १. मे फंटीइअर ट्रेडींग कंपनीने औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत प्रथम दिनांक ३/१२/१९९९ रोजी ब्लयू ड्रॉट कुरिअर मार्फत मालाची आयात करुन मला समवेत असलेला साठा स्थलांतर (स्टॉल ट्रान्सफर) देयक ज्याची किंमत रु. २१,००,०००/- वर ४% दराने रु. ८४,०००/- भरणा केला. त्यावेळेस जकात अधिक्षक या पदावर श्री डी. ए. गिरी कार्यरत होते. त्यावेळेस श्री निकम, जकात अधिक्षक यांचा काहीही संबंध नाही.

२. जपानी चुंबकीय गादया बाबत तत्कालीन आयुक्त यांचेकडे तक्रार प्राप्त झाली. मा आयुक्त यांच्या आदेशानुसार मालमत्ता अधिकारी श्री. जरारे यांना उक्त प्रकरणात चौकशी करणेबाबत आदेशित केले. मालमत्ता अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत मालाची जकात भरणा करणे करिता दर्शविण्यात आलेली किंमत व मालाची विक्री किंमत यामध्ये बरीच तफावत निर्दशनास आली. तद्अनुषंगाने कार्यालयाने मे. फ्रंटीइअर ट्रेंडींग कंपनीचे व्यवस्थापक व औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील व्यक्तीगत ग्राहकांना यांना जकात कर व जकात पत्रकाची रक्कम भरणा करणे बाबत पत्र देवून कळविले होते. त्यानुसार एकूण २० ग्राहकांनी चुंबकीय गादया सिंग सेट व डबल सेटवर अनुक्रमे रु. ७६,२७५/- व ९६,०२५/- यावर अथवा त्यांच्या जवळ असलेल्या देयकानुसार ४% दराने जकात कर भरणा केलेला आहे.

३. मे. फ्रंटीइअर ट्रेंडिंग कंपनीने औरंगाबाद यांनी उक्त निर्गमित करण्यात आलेल्या नोटीस संदर्भात दिनांक ३/५/२००० रोजी जकात अधिक्षक यांच्यासह कंपनीच्या प्रतिनिधीशी उप आयुक्त यांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार दिनांक ३/१२/९९ रोजी आयात करण्यात आलेल्या व कमी जकात भरणा करण्यात आलेल्या मालावर फरकाची जकात रक्कम भरणे बाबत सुचित केले व त्यांनी संमती सुध्दा दर्शविली व जकात फरकाची रक्कम अदा केल्यानंतरच पुढील मालाची आवक करण्यात यावी. असे सूचित केले. परंतु त्यांनी जकातीची फरकाची रक्कम भरलेली नाही.

४. मे. फंटीइअर ट्रेडींग कंपनी औरंगाबाद यांनी जकात कर फरकाची रक्कम अदा न केल्यामुळे दिनांक ७/६/२००० रोजी चोवीस तासांची अंतिम नोटीस देण्यात आली. परंतु संबंधित कंपनीने पर्यंत त्यांची दखल ने घेतल्यामुळे मे. फ्रंटीइअर ट्रेडींग कंपनी औरंगाबाद या कंपनी विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे जकात अधिक्षक यांना सुचित केले.

५. दिनांक १६/६/२००० रोजी ॲड श्री सतीष बोरकर यांनी दिलेल्या मसुद्यानुसार दिनांक १७/६/२००० रोजी छावणी पोलीस स्टेशन येथे मे. फ्रंटीइअर ट्रेडींग कंपनी विरुध्द तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. करिता टिप्पणी माहितीस्तव सादर.

**श्री प्रशांत देसरडा** एक चुंबकीय गादीचा दर जवळपास रु. १.२५ ते १.५० लाख किंमतीचा असल्याने ज्यांनी ती गादी खरेदी केली त्यास नाक्यावर पाठविले असता तेथील जकात कर्मचाऱ्यांनी चुकीची वसुली केली त्यामुळे आर्थिक नुकसान मनपाचे झाले आहे जर जकात कर्मचारी नविन असतील व चुळीने वसुली करीत असतील तर त्यांचे बाबतीत काय कार्यवाही करणार?

**मा. आयुक्त** जपानी चुंबकीय गादया सुरुवातीच्या वेळेतील किती आल्या व जकात किती फाडले याची मला कल्पना नव्हती. परंतु मी जेव्हा बारकाईने चौकशी केली व चर्चेसाठी बोलविण्यात आले त्यावेळी त्याचे कागदपत्रावरुन असे दिसले की, जपानी चुंबकीय गादयांची मूळ किंमत रु. २२ हजारापर्यन्त आहे. मात्र तर ठिकाणी आपण कोणत्या किमंतीत विकता अशी विचारणा केली असता अशी माहिती मिळाली की, जवळपास ८० ते १.२५ लाखापर्यंत किमंतीने त्या गादयांची विक्री केली जाते. म्हणजे त्यांचे सिंगल व डबल साईज अशा प्रकाराने त्याची किंमत ठरविल्या जाते असो परंतु त्या कंपनीच्या लोकांशी चर्चा करतांना त्यांनी सांगितले की, मालाच्या मुळ किंमती प्रमाणे जकात लावावी आणि त्याप्रमाणेच सुरुवातीला जकात आकारणी केलेली दिसते. तेव्हा ज्या किंमतीमध्ये ते गादया विकतात त्या किंमतीच्या अधीन राहून ४% दराने वसुल करावे व जी काही तफावत आहे. ती भरणा करावी असे सांगितले तथापि संबंधित कंपनीने राहिलेली जकातीची तफावत दिलेल्या कालावधीत भरणा केलेली नसल्याने त्यांचे विरुध्द तक्रार दाखल केलेली आहे. कोणत्याही प्रकारे जकात आकारणी कमी केली किंवा रद्द केलेली नाही. या संदर्भात इतर महानगरपालिकेमध्ये काय कार्यवाही केली जाते याबाबत उप आयुक्त, जकात अधिक्षक व दोन सन्माननीय नगरसेवक यांची एक समिती नेमून त्यांना स्वतंत्रपणे अहवाल सादर करणेस सूचना देणे योग्य.

**श्री अंबादास दानवे** चुंबकीय गादया प्रकरणी कमी जास्त दर लावतांना हे सुरुवातीस कळले काही नाही काय? आज समिती तयार करुन पूणे व कोल्हापूर महानगरपालिकेत जाऊन माहिती घ्यावी.

**मा. आयुक्त** चुंबकीय गादयांच्या संदर्भात इतर महानगरपालिकेमध्ये काय स्थिती आहे त्याची प्रत्यक्षात माहिती घेणेसाठी एक समिती नेमून कार्यवाही करणे योग्य कारण प्रत्येक जपानी चुंबकीय गादीचे जकात भरणा संबंधित मालाकांनी पूर्णपणे केलेल्या नसल्याने त्यांच्या नावनिशी नोटीसा बजावून वसुली करण्यात येत आहे.

**मा. महापौर** जपानी चुंबंकीय गादया या ठिकाणी येत आहेत. ते जकात पूर्णपणे भरत नाही. या व इतर बाबतीत कोल्हापूर व पूणे महानगरपालिकेमध्ये काय परिस्थिती आहे याची माहिती घेण्यासाठी एका समितीचे गठण करण्यात येते. त्या सदस्यांनी पाहणी दौरा करुन अहवाल सादर करावा. अशी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

समिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १) श्री एस. वाय. कांबळे | उप आयुक्त (प्र.) |
| २) श्री महेंद्र खैरनार | मुख्य लेखाधिकारी |
| ३) श्री रविंद्र निकम | जकात अधिक्षक |
| ४) श्री प्रकाश निकाळजे | सन्माननीय सदस्य |
| ५) श्री प्रशांत देसरडा | सन्माननीय सदस्य |

याबरोबरच "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २६/६/२००० रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**सोमवार दिनांक २६/६/२००० रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" सभागृहात मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली विशेष सर्वसासधारण सभेची "वंदे मात्‌रम" या गिताने सुरुवात झाली. या सभेत महानगरपालिकातील अधिकाऱ्यासह खालील सन्माननीय स. नगरसेवक उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | स. सदस्य |
| ३) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ५) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| १०) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १२) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| १३) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १४) स. स. सौ मंदाबाई प्रभाकर पवार | -//- |
| १५) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १६) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १७) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १८) स. स. श्रीमती किवलेकर जयश्री सारंग | -//- |
| १९) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| २०) स. स. श्री शकील पटेल शे. बुढन पटेल | -//- |
| २१) स. स. श्रीमती डॉ आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २२) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २३) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २४) स. स. सौ विजया किशोर रहाटकर | -//- |
| २५) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २६) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २७) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २८) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २९) स. स. श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३०) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३१) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३२) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब | -//- |

३३) स. स. श्री मुमताज अली मोज्जम अली -//-
३४) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
३५) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
३६) स. स. श्री थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव-//-
३७) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
३८) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
३९) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४०) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४१) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४२) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४३) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४४) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४५) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
४६) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
४७) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
४८) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
४९) स. स. श्री अशरम मोतीवाला -//-
५०) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५१) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५२) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
५३) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
५४) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५५) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
५६) स. स. श्री गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहमद -//-
५७) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
५८) स. स. सौ नफिसुन्निसा बेगम हबीब खॉ -//-
५९) स. स. श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख -//-
६०) स. स. श्री अफसरखॉं यासिनखॉ -//-
६१) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६२) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
६३) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
६४) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्दीन खान -//-
६५) स. स. श्री तुळशीबागवाळे किशोर बाबुलाल -//-
६६) स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द -//-
६७) स. स. सौ बबीता सुभाष कागडा -//-
६८) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज -//-
६९) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
२) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**विषय क्र. १८/१ :**

१. उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद नगरपरिषदेचे ८/१२/१९८२ रोजी महानगरपालिकेत रुपांतर झाले महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर औरंगाबाद शहराच्या आजुबाजुची एकूण १८ खेडी महानगरपालिकेत समाविष्ट झालेली आहे. शहराची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेप्रमाणे ३,२०,१५६ एवढी होती. ती १९९१ च्या जनगणनेप्रमाणे ५,७३,२७२ एवढी झालेली आहे. महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वी एकूण ७२२ पदे सफाई मजूराची मंजूर होती. त्यानंतर १११ पदे निर्माण झाली असे एकूण ८३३ पदे सफाई कामगारांची पदे मंजुर होती. औरंगाबाद शहराची लोकसंख्या १९८१ च्या तुलनेत १९९१ च्या जनगणनेत मोठी वाढ झालेली आहे. लोकसंख्या वाढीसोबत शहरातील नागरी वस्त्यांची वाढ झ ाली. नागरी वस्त्या वाढल्यामुळे महानगरपालिकेतर्फे प्राथमिक सुविधा देणे आवश्यक झाले. औरंगाबाद शहराचे चटाई क्षेत्र १९९२ मध्ये ४०,००,००० चौ मिटर होते व गटारीची लांबी २,१९,५६४ रनिंग मिटर एवढी होती. सदरील चटाई क्षेत्रांचे व गटारीची साफसफाई कायम स्वरुपी कर्मचा-यांकडून करुन घेणे शक्य नव्हते. त्यामुळे दैनिक वेतानावर कामगार नियुक्त करुन साफ सफाईचे काम करुन घेण्यात येऊ लागली. कायमस्वरुपी कामगांराची पदे कमी असल्यामुळे १९८२ पासून दैनिक वेतनावर काम करणारे मंजुराकडून कामे करुन घेण्यात येत आहे व दैनिक वेतनावर कामगार नियुक्त केलेले असल्यामुळे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ८८/२५ दि. ३०/१/९२ अन्वये १०० पुरुष व १०० स्त्री अशी एकूण २०० सफाई कामगारांची पदे निर्माण करुन शासनाच्या मंजूरीसाठी दि. २१/११/१९९२ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला. सदरील पद निर्मिती प्रस्तावात शासनाने वेळोवेळी माहिती मागितली होती. त्यानुसार शासनास वेळोवेळी अनुषंगित माहिती पाठविण्यात आली. त्यानंतर शासनाने सदरील २०० पदास शासन निर्णय क्र. ए. एम. सी. ११९२/१५२०-प्र.क्र. १३३/९२/नवि-२४ दि. १६/६/९९ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली व शासनाने सदरील आदेशात निर्देश दिले की, औरंगाबाद महानगरपालिकेने सदरहू पदे भरतांना मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिका क्र. ३३८९/९४ व याच आशयाच्या अन्य रिट याचिकावर दि. २०/७/९५ रोजी दिलेल्या आदेशाचे कटाक्षाने पालन करण्यात यावे. तसेच सफाई कामगारांची पदे भरतेवेळी मेहतर समाजाच्या उमेदवारांना प्राधान्य द्यावे म्हणून शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना लक्षात घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे आदेशात निर्देश दिले.

२. दैनिक वेतनावरील कामगारांनी त्यांना सेवेत कायम करण्यासाठी १९९४ मध्ये मा. उच्च न्यायालयात वेगवेगळया १४ याचिका दाखल केल्या होत्या सदरील याचिकाची एकत्रीत सुनावणी होऊन याचिका क्र. ३३८९/९४ व याच आशयाच्या इतर याचिकात दि. २१/१०/९४ रोजी निर्णय दिली की, महानगरपालिकेतील विविध विभागातील दैनिक वेतनावरील कामगारांची एकत्रीत जेष्ठता यादी तयार करण्यात यावी, त्याची ज्येष्ठता दैनिक वेतनावर प्रथम नियुक्तीच्या तारखेपासून धरण्यात यावी व त्यांनी एकूण किती दिवस दैनिक वेतनावर काम केले आहे त्यांच्या नावासमोर नोंदवावे, या प्रमाणे तयार करण्यात आलेली ज्येष्ठता यादी सर्व विभागात दि. २१/११/९४ रोजी प्रकाशित करावी. दि. २१/११/९४ पासून एक आठवडयाच्या आत सर्व संबंधिताकडून ज्येष्ठता यादीवर आक्षेप मागवावे व सदरील आक्षेप कर्त्याची वैयक्तीक मुलाखती घेवून ज्येष्ठता यादी अंतिम करावी व दि. १२/१२/९४ रोजी न्यायालयात सादर करावी असा आदेश दिला.

३. वरील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने दैनिक वेतनावरील कामगारांची ज्येष्ठता यादी तयार करण्यास आली होती व उक्त निर्णयाच्या अनुषंगाने विविध विभागात आवश्यकतेनुसार सदरील यादीमधुन ज्येष्ठतेनुसार कामगारांना कामे देण्यात येत होती. परंतु एकत्रीत ज्येष्ठता यादीमधुन विविध विभागात त्या विभागाचा अनुभवी कामगार उपलब्ध करुन देतांना अडचणी निर्माण होऊ लागल्या असे प्रशासनाच्या लक्षात आले. त्यावेळेस प्रशासनामार्फत याचिका क्र. ३३८९/९४ व यांच्या आशयाच्या इतर याचिकेच्या संदर्भाने मा. उच्च न्यायालयात लेखी स्पष्टीकरणे देवून महानगरपालिकेत दैनिक वेतनावरील कामगारांची विभाग निहाय ज्येष्ठता यादी करण्यास परवानगी द्यावी. अशी विनंती केली. उक्त विनंतीवर विचार करुन मा. उच्च न्यायालयाने दिनांक २०/७/१९९५ रोजी निर्णय दिला की, महानगरपालिकेने दैनिक वेतनावरील कामगारांची विभाग निहाय प्राथमिक ज्येष्ठता यादी तयार करुन दि. २०/९/९५ रोजी प्रकाशीत करावी. सदरील यादीवर ५/१०/९५ पर्यंत आक्षेप सादर करण्यास मुदत द्यावी व सदरील आक्षेपावर निर्णय घेऊन दि. ३१/१०/९५ रोजी विभाग निहाय ज्येष्ठता यादी अंतिमरित्या प्रकाशित करावी. उक्त आदेशान्वये दैनिक वेतनावरील कामगारांची विभाग निहाय ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली. सदरील ज्येष्ठता यादी मधुन ज्येष्ठतेनुसार विविध विभागांना आवश्यकतेनुसार दैनिक वेतनावर कामगार नियुक्त करण्यात आलेले आहे व ते सध्या कार्यरत आहेत.

४. तसेच १९९७ ते १९९९ या कालावधीत काही दैनिक वेतनावर काम केलेल्या व ज्येष्ठता यादीत नांव नसलेल्या कामगारांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. सदरील १२७ याचिकात मा. उच्च न्यायालयाने दि. १३/८/९९ रोजी एकत्रीत सुनावणी होऊन निर्णय दिला की, सप्टेंबर ९९ पर्यंत याचिका कर्त्यांनी त्यांनी महानगरपालिकेत काम केल्याचा पुरावा सादर करावा. सदरील याचिका कर्त्यांनी सादर केलेल्या पुराव्यानुसार व महानगरपालिकेतील अभिलेखानुसार पडताळणी करुन सर्व संबंधिताचे नांवे विभागनिहाय तयार करण्यात आलेल्या ज्येष्ठता यादीत ४ महिन्यात समाविष्ट करावे. त्यानुसार सदरील याचिका कर्त्यांचे पुरवे व अभिलेखाचे पडताळणी करुन नांवे समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

५. उक्त मा. उच्च न्यायालयाच्या दि. २१/११/९४, २०/७/९५ व १३/८/९९ च्या निर्णयाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या कामगारांच्या ज्येष्ठता यादीतील कामगारांची दैनिक वेतनावरील सेवा व न्यायालयाचे निर्देश यानुसार (स्त्री १०० व पुरुष १००) अशी एकूण २०० सफाई मजूराची पदे सफाई विभागातील दैनिक वेतनावरील कामगारांच्या ज्येष्ठता यादीमधुन ज्येष्ठतेनुसार सेवा भरती नियमाच्या तरतुदीनुसार पात्र मजूराची निवड करण्याचे प्रशासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये निवड समितीचे गठण करुन दि. २५ व २६ मार्च २००० रोजी मजूराच्या रिक्त पदावर पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

६. सफाई मजूरासाठी सेवा भरती नियमात खालील प्रमाणे तरतुद आहे.

१) ४ थी परीक्षा उत्तीर्ण,

२) ३० वर्षाहून अधिक वय नसावे.

तसेच मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल म्हणजे ३५ वर्षाहून अधिक वय नसावे. अशी तरतुद आहे.

७. उक्त तरतुदीच्या अनुषंगाने निवड समितीने मुलखती घेऊन निवड समितीने प्रशासनास स्वतंत्र अहवाल सादर केला. निवड समितीने सादर केलेल्या अहवालात खालील प्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

१) प्रशासनाने सादर केलेल्या रेकॉर्डनुसार व प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी पडताळणी केल्यानुसार जे उमेदवार सेवा भरती नियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्हता धारण करीत आहे. त्यांना महानगरपालिका सेवेत सफाई मजूर पदावर कायमस्वरुपी नेमणूक देण्यासाठी विचार करण्यास हरकत नसावी. तथापि, या कर्मचा-यांना नियुक्ती देण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करुन घेण्यात यावी.

२) मा. उच्च न्यायालयाने ही मात्र उमेदवार घेण्याचे निर्देश दिलेले असल्याने व सेवा भरती नियमानुसार मुद्दा क्र. १ अनुसार उपरोक्त कर्मचारीच पात्र ठरत असल्याने उर्वरीत कर्मचा-यांबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा. यामध्ये व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवावयाचा झाल्यास वयाची व शैक्षणिक अर्हतेची अट शिथिल करण्यास्तव प्रशासनातर्फे सर्व साधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यात येऊन त्यास राज्य शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील. राज्य शासनाने सदर प्रस्तावास मान्यता दिली तर त्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करता येईल.

निवड समितीचा अहवाल, महानगरपालिका सेवा भरती नियम, मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश व शासनाने दिलेल्या आदेशाचा सर्वांगीन विचार करुन प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

८. (अ) जे उमेदवार सफाई कामगारांच्या पदासाठी सेवा भरती नियमानुसार व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये तयार करण्यात आलेल्या ज्येष्ठता यावी. एकंदर ५७ उमेदवार ज्येष्ठतेनुसार निवडीस पात्र ठरल्याने त्यांना नेमणूक देण्यापूर्वी त्यांच्या वयाचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचा दाखला निर्गमीत झालेल्या कार्यालयामार्फत पडताळणी करुन नंतरच नेमणूकीचे आदेश देणे योग्य.

(ब) निवड समितीचा अहवालातील शिफारस क्र. ३ चा विचार करता शासन निर्णय क्र. ए. एम. सी-१४९४/६६५-सीआर-१४५-३४-युडी-२० नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई दि. १७/९/१९८४ अन्वये महानगरपालिकेतील सेवेतील पदावर नियुक्तीच्या पध्दतीमधील नियम क्र. ७ मध्ये नमुद केलेले आहे की, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेता विशेष प्रकरणात वयाच्या ४५ वर्षापर्यंत वय शिथिल करण्याची तरतुद आहे.

तसेच दैनिक वेतनावर काम करणारे कामगार प्रथम दैनिक वेतनावर नियुक्त झाले त्यावेळेस त्यांनी उच्चतम वयोमान पार केलेले नव्हते, त्यामुळे दैनिक वेतनावरील कामगारांची सफाई विभागातील दैनिक वेतनावरील मागील १२ ते १५ वर्षाची सेवा व अनुभव विचारात घेता, संदर्भिय नियमातील क्र. ७ च्या अधिन राहून उच्चतम वयोमानाची मर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यास हरकत नाही.

तसेच जे उमेदवार आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करत नसल्यामुळे त्यांना दोन वर्षात प्राथमिक शिक्षणाचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आदेशित बंधन घालणे योग्य.

९. शासनाने २०० पदांना मान्यता देतांना महेतर समाजाच्या उमेदवारांना प्राधान्य द्यावे म्हणून निर्देश दिलेले आहे. त्यानुसार महेतर समाजाच्या उमेदवारांना योग्य प्रमाणात संधी देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते. उच्च न्यायालयाने निर्देशीत केल्यानुसार सेवा भरती नियमातील अटीची पुर्तता करणा-या उमेदवाराच्यां ज्येष्ठेतेनुसार विचार करण्यांत येईल.

करिता "अ" मधील निवड समितीच्या शिफारशीनुसार पात्र असलेल्या ५७ उमेदवारांची सफाई मजूर या पदावर वेतन श्रेणी रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० मध्ये निवड करुन नियुक्ती देण्यापुर्वी त्यांच्या वयाचे व शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र निर्गमीत विभागाकडून फेर पडताळणी करुन नियुक्ती आदेश निर्गमीत करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

तसेच "ब" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार सफाई विभागातील १३२ दैनिक वेतनावरील कामगारांची मागील १२ ते १५ वर्षाची सेवा विचारात घेता संदर्भीय नियमाच्या अधिन राहून उच्चतम वयोमान वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिल करुन, तसे सफाई मजूर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र दोन वर्षात सादर करण्यासाठी आदेशात बंधन घालून, सफाई मजूराच्या पदावर वेतनश्रेणी रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० मध्ये नियुक्ती देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

सबब "अ" व "ब" मधील प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**संवाद**

**श्री अविनाश कुमावत** २०० साफसफाई मजूराच्या प्रस्तावाबाबत काय करता येईल याची व प्रशासनाची भूमिका नेमकी काय आहे याबाबतची माहिती सांगावी पृष्ठ क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महेतर समाजातील लोकांना कोर्टाच्या आदेशानुसार आपण किती मजुरांना समावून घेणार आहोत स्पष्ट माहिती सभागृहाला द्यावी.

**श्री जयवंत ओक** सफाई मजूरांची भरती करीत असतांना प्रशासनाची नेमकी भूमिका काय आहे. याची माहिती द्यावी. ज्या २०० सफाई मजूरांची निवड करीत असतांना जे मजूर गेल्या १०-१५ वर्षापासून दै. वेतनावर वर काम करीत आहे व त्यांची नावे कोर्टाने दिलेल्या ओदशाच्या ज्येष्ठता यादीत आहे. परंतु काहीची ज्येष्ठेता यादीतील नांवामध्ये बदल झालेला आहेत कोण कुणाचा नावावर काम करतो. ज्येष्ठता डावलली जाता कामा नये, म्हणून मजूरांना कायम करीत असतांना याची खबरदारी घ्यावी. अशी माहिती आहे की, काही मजूरांकडून पैसे/वसुल करण्यात आली. जर असे असेल तर याबाबतचे प्रशासनाने संपूर्ण चौकशी करुन कार्यवाही करावी व महेतर समाजातील मजूरांना कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे किती लोकांना सामावून घेणार याची माहिती द्यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** सफाई कर्मचा-यांना कायम करणे बाबत ही विषेश बैठक बोलविण्यात आली त्याबाबत धन्यवाद सफाई कर्मचारी/मजूर म्हणजे नेमके कोण? याची माहिती द्यावी की, माझी व्याख्या जे सतत घाणित काम करतात हातात फावडं, झाडू, बकेट घेवून काम करतात व जे पांढरे शुभ्र कपडे घालून अधिका-यांकडे असतात यातुन नेमके कोणते चतुर्थ श्रेणी कर्मचा-यामध्ये नेमके कोणकोण येतात याची माहिती द्यावी. कारण प्रशासनातील ब-याचशा विभागामध्ये वर्ग-४ चे दैनिक वेतन वरील व्यक्ती कामे करतात. काही कर्मचारी नगर परिषद काळात कामावर आहेत ते आजपर्यंत कार्यरत आहे ते अद्यापही कायम झालेले नाहीत. तेव्हा चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणजे नेमके कोण याची माहिती व व्याख्या सांगावी. जे मजूर गेल्या २०-२५ वर्षापासून कामावर आहेत व ते काम करुन त्यांनी वयोमर्यादा पार केलेली आहे. त्यांना

कायम करतांना त्यांना सेवानिवृत्ती नंतर शासनाने सर्व फायदे मिळणार काय? त्यांची सेवा ज्येष्ठेता तीच कायम राहील काय? यांची माहिती द्यावी.

**मा. महापौर** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**श्री रतनकुमार पंडागळे** शासनाकडून प्राप्त झालेले जी.आर. चे आदेश काय आलेले आहेत स्पष्ट करावे व कोर्टाचे निर्देश काय होते ते स्पष्ट करावेत.

**मा. आयुक्त** सन १९९४ पासून जी यादी ज्येष्ठेते निहाय कोर्टात दाखल केली होती त्यामध्ये १९९३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले की, रुजू होणा-या तारखेपासूनची एक ज्येष्ठता यादी करावी पुढील कार्यवाही करावी. यादी तयार केली व अंमलबजावणी सुरु केली या ज्येष्ठेता यादीमध्ये साफसफाई कर्मचारी म्हणजे सर्व झोनमधील सफाई कर्मचारी ज्यामध्ये सफाई कर्मचारी प्राणी संग्राहालयात काम करणारे कर्मचारी इ. चा समावेश होतो. यामध्ये शासनाने विचारणा केली असता प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट केली की, वेगवेगळया विभागात वर्ग-४ चे कर्मचारी काम करीत आहेत. त्यांचे कामाची सेवा ज्येष्ठताही वेगवेगळया यादया तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे साफसफाई कामावर काम करणारे दैनिक वेतन मजूरांची यादया वेगळया करण्यात आल्या आहेत व प्रस्तावही सफाई कर्मचारी म्हणून मंजूरी मिळाली आहे. त्यामुळे इतर विभागात काम करणारे दैनिक वेतन वरील कर्मचा-यांनी काही प्रमाणात आक्षेप घेतला. त्या आक्षेपावर जाहीररित्या आक्षेप मागवून यादया तयार करण्यात यावे व ते जाहीर करण्यात आले. असे हायकोर्टाने निर्देश दिलेले होते.

दि. २०/५/९५ ला मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयात महानगरपालिका प्रशासनाची भूमिका मा. उच्च न्यायालयाने मान्य केली. विभाग निहाय आक्षेप मागवून सुनावणी केली. विभाग निहाय आक्षेप मागवून सुनावणी केली असत सन. १९९५ मध्ये ज्येष्ठता यादया तयार करुन कोर्टात सादर केले. यामध्ये सन १९९२ ला सर्वसाधारण सभेत साफसफाई मजूरांचा २०० लोकांचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला १०० पुरुष १०० स्त्री सदरील प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर शासनाकडे पाठविण्यात आला यामध्ये काही दै. वे वरील मजूर सुटलेले होते. त्यांचेवर अन्याय झाला असे त्यांचे म्हणने असल्याने ते न्यायालयात गेले. तेव्हा कोर्टानी निर्णय दिला की, ज्यांनी नांवे सुटलेली असतील त्यांची पुरवणी यादया तयार कराव्यात त्यानंतरच पूरवणी यादया तयार करण्यात आल्या आणि साफसफाई कर्मचा-यांची ज्येष्ठता यादया तयार करुन कोर्टाच्या निर्देशानुसार करण्यात आल्या. शासनाने २०० सफाई कर्मचा-यांची मंजूरी दिली. त्यामध्ये असे निर्देश दिले की, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णय पालन करावे. शासनाचे निर्णय आल्यानंतर समितीचे गठण केले व समितीने पत्र लोकांची यादी केली जे २०० साफसफाई कर्मचारी भरणार आहात त्यांचे बाबत प्रशासन कायम करीत असतांना इयत्ता ४ थी पास असणे आवश्यक सर्वसाधारण गटासाठी ३० वर्षे व आरक्षण बाबत वयाचे ३५ वर्षे वय मर्यादा असल्याने तपासणी करुन सिव्हील सर्जन कडून प्रमाणपत्र घेतले पाहिजे. काही कर्मचारी ४ थी पास नाहीत त्यांची शैक्षणिक पात्रता नाही. परंतु जे गेली १०-१५ वर्षापासून सतत काम करतात. त्यांचे बाबतीत विचार करावा लागेल वरील वयोगटात बसत नाही. त्यामुळे सवलत देता येते जे पात्र आहे त्यांना ज्येष्ठता प्रमाणे घ्यावे.

वयाची सवलत ४५ वर्षे पर्यंत दिली तर बरेच अपात्र पात्र ठरतील त्या कर्मचा-याबाबत प्रशासन काही अटी लावते की, दोन वर्षापर्यंत त्यांनी शैक्षणिक पात्रता पूर्ण झाल्याचे दाखल करावेच. त्याच प्रमाणे यांच्याबरोबर कायम स्वरुपात महेतर समजाला सुध्दा नियमाप्रमाणे सामावून घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

**मा. महापौर** महेतर समाजाला कायम स्वरुपी प्रतिनिधीत्व देतांना कसे प्राधान्य देणार याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त** नियमाप्रमाणे प्राधान्य देता येईल. ज्येष्ठता यादी तपासून जे बसत असतील त्यांना देण्यात येईल.

**श्री नंदकुमार घोडले** कायम स्वरुपी करीत असतांना मेहतर समाजाला किती टक्के जागा मिळणार आहेत व शैक्षणिक पात्रता अट पूर्ण नाही केली तर

**मा. आयुक्त** समजा दोन वर्षापर्यंत शैक्षणिक पात्रता पूर्ण केली नाही तर तशा कर्मचा-यांना मुदतवाढ मागता येईल.

**श्री अविनाश कुमावत** ज्या दैनिक वेतन कर्मचा-यांचे वयात काही तफावत असल्यास आपण काय करणार?

**मा. आयुक्त** तसे कर्मचारी जास्तीचे नाहीत फारच थोडे आहेत.

**श्री जयवंत ओक** साफसफाई कर्मचा-यांचा प्रस्ताव १९९२ ला मंजूर करण्यात आला व ९४ ला शासनाकडे पाठविण्यात आला व १९९९ ला शासनाकडून मंजुरी प्राप्त होऊन आज त्याला अंतिम स्वरुप प्राप्त होत आहे. या प्रस्तावासंबंधी कर्मचा-यांना कायम करीत असतांना शैक्षणिक अटी बाबत इयत्ता ४ थी पासची पात्रता धारण न केल्यास काय भूमिका प्रशासनाची राहील याची माहिती द्यावी. या व्यतिरिक्त इतर कामगारांवर अन्याय होऊ नये. याचीही खबरदारी घ्यावी. सभागृहाने या संदर्भात एकत्रीत निर्णय घ्यावा व कर्मचा-यांवर अन्याय होऊन नये त्या प्रमाणात कार्यवाही व्हावी.

**श्री पांडुरंग तायडे** ज्येष्ठता यादयानुसार साफसफाई कर्मचारी भरती करणार आहात त्यांनी निवड झाल्यानंतर आदेशाच्या प्रती स. सदस्यांना देण्यात यावी.

**श्री सुदाम सोनवणे** २०० सफाई कामगारांचा प्रस्ताव शिपशाही शासनाने मजूर केला असून त्यांचे अभिनंदन करतो. परंतु गेल्या ८ महिन्यापासून प्रशासनाने या प्रस्तावा संदर्भात काही कार्यवाही केलेली दिसत नाही. सन १९९२ ला सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मंजुर केला व ९४ ला शासनाकडे मंजुरीस्तव पाठविला आणि शिवशाहीच्या राजवटीत या प्रस्तावास मंजुरी मिळाली. परंतु त्याची अंमलबजावणी अद्यापही केलेली नाही. या प्रस्तावातील मजूरांना मेहतर समाजाला किती टक्के मजूरांना सामावून घेणार आहात याची प्रशासनाने माहिती द्यावी. त्याचप्रमाणे शासनाने काही अटी व शर्ती शैक्षणिक पात्रतेबाबत लावलेले आहेत. त्यास शिथिल देणार आहे काय याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** महेत्तर समाजविषयी प्रशासनाची काय भूमिका आहे याची माहिती द्यावी किती टक्के या समाजासाठी ठेवणार आहे ते सांगावे.

**श्री प्रकाश निकाळजे** शासन नियमाप्रमाणे व कायदयाला अधिन राहून कार्यवाही व्हावी.

**श्री अंबादास दानवे** सन १९९२ ला प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठविला आणि तत्कालीन पालकमंत्री श्री चंद्रकांतजी खैरे यांनी सदरील प्रस्ताव मंजुर

करुन घेणेसाठी शासनास प्रवृत्त केले. परंतु या प्रस्तावासाठी महेत्तर समाजाला किती टक्के प्राधान्य देणार याची प्रशासनाने माहिती द्यावी.

**उप. आयुक्त** १९९२ ला सर्वसाधारण सभेने मंजूरी दिल्यानंतर शासनाकडे पाठविण्यात आला याबाबत शासनाकडे सतत पाठपुरावा प्रशासनाकडून करुन १९९९ ला या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली याची प्रक्रिया चालू असतांना मनपाचे निवडणूक आली आदर्श आचारसंहिता लावण्यात आली. परंतु त्यांनतर सदरील सफाई कर्मचा-यांच्या कायम करणेच्या प्रक्रियेला गती आली. या प्रस्तावात मेहतर समाजाला किती प्रमाणात प्राधान्य द्यावे. याबाबत समाज कल्याण विभागाचे मार्गदर्शन घेतले असता. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार सदरील २०० पदे भरीत असतांना एकूण २३ पदे महेतर समाजाला मिळणार आहेत व त्यासाठी वय ४५ वर्षापर्यंत मर्यादा असल्याचा फायदा या मजूरांना मिळणार आहे. (यामध्ये स्त्री १३ व पुरुष १०)

**श्री अंबादास दानवे** आम्हाला पदे भरण्याची आकडेवारी नको, एकूण टक्केवारी किती व ते ठरविले असल्यास किती टक्के मिळणार.

**श्री अविनाश कुमावत** महेतर समाजाचे किती कर्मचारी/मजूर काम करीत आहेत व त्यापैकी किती भरणार आहात.

**श्री भगवान घडामोडे** महेतर समजाला २०० सफाई मजूरापैकी किती टक्के मजूरांना कायम नौकरीत सामावून घेणार आहात याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** उपआयुक्त (प्र.) यांनी माहिती द्यावी.

**उप आयुक्त (प्र.)** एकंदर यादीनुसार ४१ महेतर समाजातील पुरुष कर्मचारी/मजूर दै. वे. वर काम करणारे आहेत. तर महिला २२० आहेत. त्यापैकी फक्त १३ स्त्री व १० पुरुष एकूण २३ महेत्तर मजुरांना २०० सफाई कर्मचा-यांच्या प्रस्तावानुसार सेवेत सामावून घेण्यात येणार आहे. म्हणजे ११% महेतर समाजाला प्रतिनिधीत्व मिळत आहे.

**श्री तकी हसन खान** महेतर समाज म्हणजे काय? याची माहिती द्यावी.

**श्री अफसरखान** महेतर समाजाबाबत सभागृहात शब्दप्रयोग करणे योग्य नाही. स्वीपर बोलावे तशी इतिवृत्तात दुरुस्ती करावी.

**श्री भगवान घडामोडे** या सभागृहात विषयांतर करु नये.

**श्री प्रकाश निकाळजे** ज्येष्ठता यादीमध्ये किती कर्मचारी आहेत त्यांना प्राधान्य घावयास पाहिजे म्हणजे जे कर्मचारी घाणीचे काम करतात. त्यांना प्राधान्य द्यावे. साफसफाई मजूर काम करीत असतांना महेतर समाजाचे मुद्दा नसतो साफसफाई कर्मचारी यांचे २०० पदे भरण्यासाठी कार्यवाही करीत असतांना त्यांना कायम करणे ज्येष्ठतेप्रमाणे आवश्यक असते.

**श्री अंबादास दानवे** कायम सेवेत समाविष्ठ करातांना महेतर समाजाला प्रतिनिधीत्व किती टक्के मिळते ही सभागृहात माहिती मिळणे आवश्यक असल्याने चर्चा करण्यात येते आहे.

**मा. आयुक्त** मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून ज्येष्ठता यादी केली. शासनाच्या निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल.

**श्री जयवंत ओक** या शहरात ४८ महेतर समाजाचे पुरुष मजूर काम करतात काय? जे मजूर काम करीत आहेत. त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्तीचे आहेत टक्केवारी दाखवा. प्रत्येक समाजात न्याय मिळाला पाहिजे.

**श्री अफसरखान, श्री प्रकाश निकाळजे** या प्रस्तावात दिलेले आहे की, ज्येष्ठेता यादी प्रमाणे कोर्टाच्या आदेशाचे अधिन राहून शासन निर्णयाप्रमाणे पदे भरावयाचे आहेत. त्यामुळे महेतर समाजाला प्राधान्य द्यावे परंतु किती टक्के द्यावे असे कुठेच नमुद नाही. म्हणजे २०० सफाई मजूर भरीत असतांना त्यातील अटी व शर्ती व शिथिलते बाबतचा प्रस्ताव आलेला आहे.

**श्री रतनकुमार पंडागळे** कामगारांच्या प्रश्नावर या सभागृहात चर्चा होत आहे. त्यावर निर्णय होणे आवश्यक आहे दुसरे असे की, जे कर्मचारी उपोषणास बसलेले आहेत त्यांची प्रशासनाने दखल घेतलेली नाही. सन १९९२ ला २०० सफाई कामगारांचा प्रस्ताव मंजूर करीत असतांना या शहराचा वाढता व्याप व १८ खेडयांचा समावेश या दृष्टीने शहराची वाढती व्याप्ती लक्षात घेता त्यावेळी मंजुर करण्यात आला होता व शासनाकडे मंजुरीस्तव पाठवून मंजुरी मिळाल्यानंतर आता अंमलबजावणी होत आहे. या २०० सफाई मजुरांच्या प्रस्तावामध्ये ५७ मजूर प्रशासनाने घातलेल्या अटीमध्ये बसत असून उर्वरित १४३ मजूर त्यांच्या शैक्षणिक पात्रता शिथिलता देण्याचा प्रस्ताव असून त्यास मंजुरी मिळणे आवश्यक आहे. तसेच मनपा सेवाभरती नियमात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यामध्ये गेली ५ वर्षात नियमात दुरुस्ती कधीच झाली नाही. याबाबतची माहिती द्यावी. गेल्या १०-१५ वर्षापासून बरेचसे मजूर साफसफाईचे कामे दैनिक वेतनवर करीत असून त्यांना त्यांच्या सेवेत कायम करणे आवश्यक आहे. या सभागृहात जातीयतेचा कोणत्याही प्रकारे रंग आणण्याचा प्रयत्न करु नये या ठिकाणी कोर्टाचे आदेशान्वये कार्यवाही व्हावी. कायम करीत असतांना ज्येष्ठेतेनुसार व कोर्टाच्या यादीतीलच मजूरांना कायमस्वरुपी आदेश त्यांच्या कागदपत्रांची छाननी करुन करावी.

**मा. आयुक्त** मा. उच्च न्यायालयाचे निर्णय बघुनच हा प्रस्ताव ठेवलेला आहे. नियमाप्रमाणे बरेच अपात्र ठरत होते. ज्येष्ठेता यादी मा. उच्च न्यायालयात दखल केली आहे. विषयपत्रिके वरील या विषयावर एकमताने निर्णय व्हावा.

**श्री भगवान घडामोडे** मजुरांचे जे हक्क आहे ते त्यांना मिळावे गेली १०-१५ वर्षापासून दै.वे. सतत संबंधित मजूर वेगवेगळया झोनमध्ये काम करीत आहेत. त्यांचे वयोमान वाढले आहे. प्रशासनाने टाकलेली शैक्षणिक पात्रतेची अट शिथिलता करुन ती रद्दच करावी व वयाची अट सुध्दा रद्द करावी. या मजूरांची मानसिकता पाहता त्यांना कायम करणे गरजेचे आहे. वय ४५ पेक्षा जास्त असल्यास त्यांची काम करण्याची मानसिकता असेल तर, त्यांना काम करु द्यावे. अन्यथा त्यांच्या मर्जीनुसार स्वेच्छा निवृत्ती देवून त्यांना अनुकंपा धर्तीवर त्यांचे नातेवाईकांना नौकरीत लावावे व सदरील प्रस्ताव लादलेल्या शिथिलतेसह मंजुर करावे याचे वैयक्तिक भांडवल होऊ नये. याचे श्रेय सभागृहाला मिळावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** सदरील प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आला असता इयत्ता ४ थी पास शैक्षणिक पात्रतेची अट व वयाची अट हया सर्व प्रशासनाने स्पष्टपणे विचार करुनच पाठवावयाचे असते. म्हणजे आज हा प्रश्न उद्‌भवला नसता. आता या बाबीवर जास्त व प्रमाणात चर्चा न करता दिलेल्या अटी व शर्ती रद्द कराव्यात व कोर्ट व शासनाचे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. आरक्षित बाबतीत जे मुद्दे उपस्थित

झाले त्याबाबत प्रशासनाने सखोल अशी माहिती द्यावयास पाहिजे. साफसफाई कर्मचारी हे गेली १५-२० वर्षापासून दै. वे. वर काम करीत असून त्यांचे वयोमानही वाढलेले आहे. त्यांना ज्येष्ठेतेनिहाय कायम करावे. त्यांची शैक्षणिक पात्रतेची टाकलेली अट यास शिथिलता देवून त्यांना मुदतवाढ करण्याची कार्यवाही व्हावी. क्रमाक्रमांने सफाई मजूर शैक्षणिक पात्रतेत बसण्यासाठी प्रयत्न करतील तरी ही यावर प्रशासनाने त्यांचेवर कोणत्याही अटी लावू नये अथवा दंडात्मक कार्यवाही करु नये. प्रस्ताव शासनाकडे मंजूर करुन पाठवित असतांना शिथिलतेबाबत प्रश्न प्रलंबित न ठेवता व शासनाची वाट न पाहता मजूरांना कायम करण्याची प्रक्रिया चालू ठेवावी. तसेच सेवा ज्येष्ठता दै. वे. च्या यादी फलकावर लावण्यात यावी. सर्वांना दाखवावे आरक्षणासंबंधी माहिती द्यावी.

**मा. महापौर** २०० साफसफाई मजूरांना कायम करीत असतांना त्यांचेवर टाकण्यात आलेली शैक्षणिक पात्रतेची ४ थी पासची अट यामध्ये शिथिलता करुन यात त्यांना आणखी २-३ वर्षाचा कालावधी वाढवून द्यावा. वयाची अट ४५ वर्षापेक्षा जास्त किती आहेत याचा खुलासा करावा व याबाबत प्रशासनाची काय भूमिका आहे याची माहिती द्यावी.

**मा. आयुक्त** असा नियम आहे की, शासन निर्णयाप्रमाणे वयाची ४५ वर्षाची शिथिलता देता येते. त्या व्यतिरिक्त नाही.

**मा. महापौर** ४५ वर्षापेक्षा जास्त आहे. त्यांच्यासाठी शिथिलता द्यावी. विशेष बाब म्हणून त्यांचा विचार व्हावा. असे किती मजूर वयोमान जास्तीचे वाटतात.

**उप आयुक्त (प्र.)** २०० मजूरांची पदे भरीत असतांना ज्येष्ठता यादीनुसार जे पात्र ठरतात त्यापैकी २ स्त्री व १ पुरुष मजूर असे एकूण ३ मजूर आहेत. ते वयाचे ४५ वर्षापेक्षा जास्त आहेत.

**श्री प्रकाश निकाळजे** ज्यांचे जेष्ठता यादीत वयोमान जास्त वाटते. त्यांचे बाबतीत मानवतेच्या दृष्टीने शिथिलता देण्याचा विचार व्हावा.

**श्री नंदकुमार घोडले** विशेष बाब जे ३ मजूर वयाची मर्यादा जास्तीचे ओलांडचे आहेत. परंतु त्यांनी आतापर्यंत आशेवरच रोजंदारीवर मनपात काम केले त्यांना सामावून घेण्याची कार्यवाही करावी. त्यांना कामावर घ्यावे व प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

**मा. आयुक्त** सदर प्रकरणी विशेष बाब म्हणून शासनाने मंजुरी द्यावी असा ठराव पारित करावा लागेल.

**श्री प्रकाश निकाळजे** एकदा कायम झाल्यानंतर त्यांना सेवानिवृत्तीनंतर पेन्शनचे फायदे मिळणार किंवा नाही.

**मा. आयुक्त** शासन नियमाप्रमाणे सर्वांना त्याबाबतीचे फायदे मिळतील.

**श्री अविनाश कुमावत** महेतर समाजातील रोजंदारीवरील कर्मचा-यांच्या निवडीबाबत काय झाले.

**मा. आयुक्त** दिनांक १६ जून १९९९ चे शासन परिपत्रक आहे. त्यात काही कामगार महेतर समाजाचे भरण्यात यावे असा उल्लेख आहे. या उच्चन्यायालयाचे निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल.

**श्री रतनकुमार पंडागळे** सदरील प्रस्ताव ९२ सालापासून मंजूर झालेला आहे. हा प्रस्ताव ज्या तारखेपासून मंजुर झाला त्या तारखेपासून त्यांना नियमित करावे.

**श्री अंबादास दानवे** दि. १६/६/१९९९ च्या आदेशात शासनाने महेतर समाजाच्या बाबतीत प्राधान्य द्यावे असा उल्लेख असतांना त्यांचे वेळेस कार्यवाही का केली नाही. हा ठराव २०० हंगामी कर्मचा-याबात आहे. माझे पूर्ण अनुमोदन आहे.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा** सन १९९२ साली ज्यांनी प्रस्ताव ठेवला व मंजुरी करुन घेतली त्यांचे अभिनंदन करावे. अशी मी सूचना मांडतो.

**श्री प्रकाश निकाळजे** मजूरांना कायम करणे बाबतचा प्रस्ताव ठेवलेला आहे व सूचविले त्याचे मी समर्थन करतो. विरोधी पक्ष नेता यांनी देखील समर्थन द्यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** या प्रस्तावात मी अनुमोदन देतो. वयाची अट शिथिल करण्याबाबत एकमताने निर्णय घेण्यात यावा.

**मा. महापौर** आता चर्चा फार झाली असून, चर्चे अंती मी या निर्णयावर आलो आहे. जे कामगार/मजूर इयत्ता ४ थी पास/उत्तीर्ण नसतील त्यांना कायम करावे व त्यांना पुढील २ वर्षाची संधी देऊन इयत्ता ४ थी उत्तीर्णची अर्हता धारण करावी. जर दोन वर्षात शैक्षणिक अर्हता धारण केली नाही तर पुढील २ वर्षापर्यंत मुदत वाढवून देण्यात येईल. त्याचप्रमाणे मजूरांच्या वयाची अटीबाबत ४५ वर्ष करण्यात आलेले आहेत. त्यांना प्रशासनाने नौकरीत कायम करावे व त्यापेक्षाही वय जास्त असल्यास त्या ाबत "विशेब बाब" म्हणून शासनाकडे तशी मंजूरीसाठी शिफारस करावी. सदरील प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १८/१** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार २०० सफाई कामगारांची भरती करणेबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सेवा भरती नियमातील तरतुदीच्या अनुषंगाने प्रस्तावातील परिच्छेद "अ" मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे अर्हता धारण करणा-या साफसफाई विभागातील दैनिक वेतनावरील कर्मचा-यांना ज्येष्ठतेनुसार "सफाई मजूर" या पदावर वेतन श्रेणी रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० मध्ये वयाचे व शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र निर्गमित विभाकडून फेर पडताळणाचे अधिन राहून नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

तसेच प्रस्तावातील परिच्छेद "ब" मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे साफसफाई विभागातील दैनिक वेतनावरील कामगाराचा मागील १२ ते १५ वर्षाची सेवा विचारात घेता शासन निर्णय क्रमांक-एएमसी/१४९४/६६५-सीआर-१४५-३४-युडी-२० नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई दि. १७/९/१९८४ अन्वये महानगरपालिकेतील सेवेतील पदावर नियुक्तीच्या पध्द्तीमधील नियम क्रमांक ७ च्या अधिन राहून दैनिक वेतनावरील कामाचा अनुभव लक्षात घेता उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात मान्यता देण्यात येते. तसेच सेवा भरती नियमात असलेली ४ पर्यंतची शैक्षणिक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षात धारण करुन त्याचे प्रमाणपत्र सदर करण्याचे बंधन आदेशात घालून उमेदवारांना "सफाई मजूर"(स्त्री/पुरुष) म्हणून वेतनश्रेणी रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० मध्ये शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहून नियुक्तीचे आदेश देण्यास मान्यता देण्यात येते. जर दोन वर्षात शैक्षणिक अर्हताधारण केली नाही तर पुढील २ वर्षापर्यंत मुदत वाढवून देण्यास ही मान्यता देण्यात येते.

तसेच दैनिक वेतनावरील ज्येष्ता यादीतील श्रेष्ठतेनुसारच जे कामगार ४५ वर्षापेक्षा जास्त वय धारण करीत आहे. त्यांना विशेष बाब म्हणून शासनाकडे मान्येतेसाठी शिफारस करुन शासनाची मान्यता मिळाल्यानंतर नियुक्ती देण्यास मंजूरी देण्यात येते, असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

## *दिनांक २० जुलै २००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" सभागृहात गुरुवार दिनांक २०/७/२००० रोजी सकाळी ११.३० वाजता मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील सन्माननीय स. नगरसेवक उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | स. सदस्य |
| ३) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ४) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ५) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ६) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ७) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ८) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ९) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १०) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| ११) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १३) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १४) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १५) स. स. श्रीमती किवलेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १७) स. स. श्रीमती डॉ आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १८) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| १९) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २०) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २१) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २२) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २३) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २४) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २५) स. स. श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २६) स. स. श्री अय्युबखॉ सरदारखॉ | -//- |
| २७) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| २८) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २९) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| ३०) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३१) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | -//- |
| ३२) स. स. सौ. रशिदा बेगम गफफार यार खॉन | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल | -//- |
| ३४) | स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब | -//- |
| ३५) | स. स. श्री स. मुमताज अली मोज्जम अली | -//- |
| ३६) | स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ३७) | स. स. श्री नासेरखान सरदार खान | -//- |
| ३८) | स. स. श्री थोरात दत्तात्रय (बाळासाहेब रामराव) | -//- |
| ३९) | स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास | -//- |
| ४०) | स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत | -//- |
| ४१) | स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक | -//- |
| ४२) | स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान | -//- |
| ४३) | स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव | -//- |
| ४४) | स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव | -//- |
| ४५) | स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव | -//- |
| ४६) | स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय | -//- |
| ४७) | स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | -//- |
| ४८) | स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग | -//- |
| ४९) | स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ५०) | स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष | -//- |
| ५१) | स. स. श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद | -//- |
| ५२) | स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर | -//- |
| ५३) | स. स. श्री अशरम मोतीवाला | -//- |
| ५४) | स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम | -//- |
| ५५) | स. स. सौ संगिता बाळू मैंद | -//- |
| ५६) | स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी | -//- |
| ५७) | स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर | -//- |
| ५८) | स. स. सौ दाणे चद्रभागाबाई भगीरथ | -//- |
| ५९) | स. स. श्री ओक जयवंत केशवराव | -//- |
| ६०) | स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ६१) | स. स. श्री स. सलीम स. युसुफ | -//- |
| ६२) | स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान | -//- |
| ६३) | स. स. श्री गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहमद | -//- |
| ६४) | स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली | -//- |
| ६५) | स. स. श्री शेख इसाक जैनोद्वीन शेख | -//- |
| ६६) | स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ | -//- |
| ६७) | स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ | -//- |
| ६८) | स. स. श्री लकडे भरत श्रीपती | -//- |
| ६९) | स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| ७०) | स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल | -//- |
| ७१) | स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान | -//- |
| ७२) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| ७३) | स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द | -//- |
| ७४) | स. स. सौ बबीता सुभाष कागडा | -//- |

७५) स. स. श्री सय्यद अली सलामी स. मिरा सलामी -//-
७६) स. स. सौ निखत परवीन इजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

सभागृहातर्फे ओरंगाबाद येथील प्रख्यात कवी व शिक्षणतज्ञ तसेच ऊर्दु साहित्याचे गाढे अभ्यासक पै. अखतरुज्जमा नासेर यांच आणि बिड चे माजी नगर अध्यक्ष काँग्रस अथर बाबर यांचे दुख:द निधना बद्दल २ मिनिटे उभे राहून व स्तब्धता बाळगून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**श्री सुदाम सोनवणे** मा. शिवसेना प्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांचेवर राज्य शासनाने कार्यवाही करण्यासंदर्भात पोलीस विभागाला दिलेल्या आदेशाच्या निषेधार्थ या सभागृहातर्फे निषेध ठराव घेण्यात यावा. त्यामुळे गेल्या ४ दिवसापासून जनजीवन विस्कळीत होऊन जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

**श्री तकीहसन खान** ही बाब पोलीस विभागाच्या संबंधात आहे. कायदा व सुव्यवस्थे (लॉ ॲन्ड ऑर्डर) बाबत आहे. हा पोलीसाचा प्रश्न आहे. उदा. मी गुन्हेगार झालो तर माझ्यावरही कार्यवाही होईल सभागृहात निषेध ठराव घेण्याची गरज नाही.

**श्री प्रकाश निकाळजे** हा प्रस्ताव या सभागृहाचा प्रस्ताव नाही.

**श्री अविनाश कुमावत** ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध दर्शवून मंजूर करावा.

**श्री कादीर मौलाना** ही बाब शासन पातळीवर असून शासन गुन्हेगारास ताकीद देऊ शकते. या सभागृहात निषेध करण्याची आवश्यकता नाही.

**श्री अफसर खान** निषेध ठराव मंजुर करता येणार नाही. शहाराच्या विकास दृष्टीने सभा बोलावली आहे. त्यावर चर्चा करावी.

**श्री नासेरखान सरदारखान** शहराचा विकास मागे पडत आहे. विकासाच्या दृष्टीने चर्चा करावी.

**श्री नंदकुमार घोडले, श्री सुदाम सोनवणे** निषेध ठराव मंजूर करण्यात यावा या अगोदर असे बरेच ठराव आपण पास केलेले आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** शिवसेना प्रमुखावर कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे तो कायदयाच्या चौकटीतच घेतला असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही होईल त्या संदर्भात या सभागृहात चर्चा करुन निषेध ठराव करणे योग्य नाही पोलीस विभाग कारवाई करण्यास सक्षम आहेत. संघटनेच्या मार्फत मा. अटलबिहारी वाजपेयी यांना विनंती केली होती. त्यांनी नकार दिला.

**श्री अंबादास दानवे** निषेध नोदंवण्यास हरकत नसावी.

**श्री अफसरखान यासीनखान** सभागृहात दिशाभूल करु नये अशा प्रकारचे ठराव म्हणून सभागृहात मान्यता घेणे चुकीचे होईल.
(याच वेळी आघाडीचे स. सदस्य गुन्हेगारावर कार्यवाही झाली पाहिजे तसेच शिवसेना भाजप स. सदस्य राज्य शासनाचा निषेध असो अशा मोठमोठयाने घोषणा प्रतिघोषणा देतात काहीही ऐकू येत नाही.)

**मा. महापौर** ०.५ मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते (वेळ ११.४५ वाजता) सभेला सुरुवात ११.५० वाजता.

**मा. महापौर** सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**श्री प्रकाश निकाळजे, श्री अफसरखान यासीनखान** सभा का तहकुब करण्यात आली याचा अगोदर खुलासा करावा सभा तहकुब करण्याची गरज काय?

**मा. महापौर** घोषणा प्रतिघोषणामुळे सभा तहकुब केली होती.

**श्री तकीहसनखान** सभा तहकुब नव्हती, महापौरांनी वाक आऊट केले होते.

**मा. महापौर** सर्व स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र.१९/१ :**

दिनांक २९/४/२००० ची विशेष सर्वसाधारण सभा व दिनांक २०/५/२००० च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करावे.

**संवाद**

**श्री तकीहसनखान** बऱ्याच सभा संपन्न झाल्या. परंतु फक्त दिनांक २९/४/२००० व २०/५/२००० च्या सभेचे इतिवृत्त सोबत जोडण्यात आले आहे बाकी सभेचे का देण्यात आले नाही. त्याचा खुलासा व्हावा व ते इतिवृत्त जो पर्यंत देण्यात येत नाही तोपर्यंत हे इतिवृत्त कायम करु नये.

**मा. महापौर** सचिव यांनी खुलासा करावा.

**नगरसचिव** ज्या सभांचे इतिवृत्त लघुलेखक यांच्यांकडून माझ्याकडे सादर झाले त्या सभांचे इतिवृत्त सोबत दिलेले आहे व काही इतिवृत्त टंकलेखन करण्याचे काम चालू असून, पुढील सर्वसाधारण सभेत सर्व इतिवृत्त देण्यात येईल.

**श्री तकीहसनखान** जो पर्यंत मागील इतिवृत्त देत नाही, तोपर्यंत पुढील कामकाज नियमाने सुरु करता येते का खुलासा करावा.

**श्री स. अली मिरा सलामी** मागील सभांचे सर्व बैठकीचे इतिवृत्त जोपर्यंत कायम करण्यात येत नाही तोपर्यंत पुढील कामकाज थांबवावे. दिनांक २९/२/२००० च्या बैठकी नंतर तीन सभा पार पउल्या त्या तीन सभांचे इतिवृत्त का देण्यात आले नाही. विभागात काय अडचण निर्माण झाली खुलासा करावा.

**मा. महापौर** सचिव यांनी सविस्तर खुलासा करावा.

**नगरसचिव** मागील ज्या ज्या सभा संपन्न झाल्या व त्यापैकी ज्या ज्या सभांचे इतिवृत्त कायम करण्यासाठी दिलेले आहेत. त्यावर विचार विनिमय होऊन कृपया ते कायम करण्यात यावे.

**श्री प्रकाश निकाळजे** ज्या सभांचे इतिवृत्त देण्यात आले नाही ते जाणून बुजून दिले नाही अशी शंका निर्माण होते व त्या इतिवृत्तात बदल करण्यात येऊन काही नसलेले ठराव टाकण्यात आले असे समजते.

**श्री कोकाटे काशीनाथ** दि. २९/४/२००० चे इतिवृत्त दिले त्यानंतर जी बैठक दिनांक २/५/२००० ला झाली त्या सभेचे इतिवृत्त दिले नाहीत. दिनांक २०/५/२००० चे इतिवृत्त देण्यात आले. मधील कालावधीचे म्हणजेच दिनांक २/५/२००० न देता, २०/५/२००० चे इतिवृत्त कायम करण्यास दिले असून महत्वाचे म्हणजे दिनांक २/५/२००० चे निवडणूकी संबंधीचे इतिवृत्त दिले नाही.

**श्री अफसरखान यासीनखान** दोन दिवसासाठी सभा तहकुब करावी व सर्व सभांचे इतिवृत्त देण्यात यावे व नंतर पुढील कामकाज करावे.

**श्री रतनकुमार पंडागळे** मागील सभामधील निर्णन न झालेल्या प्रस्तावामध्ये बदल केलेले असल्याने इतिवृत्त देण्यात आले नाही असे समजते.

**मा. महापौर** प्रस्तावामध्ये काय बदल केला तसे लेखी कळवावे व पुढील सर्वसाधारण सभेसाठी मागील दिनांक १४/६/२००० च्या सभांचे इतिवृत्त सोडून सर्व सभांचे इतिवृत्त देण्यात येईल. दिनांक १४/६/२००० रोजी सभापती स्थायी समिती पदासाठी बैठक बोलावली होती. त्यात वाद निर्माण झाल्यामुळे ते इतिवृत्त सिल करण्यात आलेले असून बाकी सर्व इतिवृत्त पुढील सर्वसाधारण सभसाठी देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी व नगरसचिव यांच्या कडील पूर्ण स्टाफ भरण्यात यावा. आता विषय क्र. २ वर चर्चा करावी. विषय क्र.१ मंजूर करण्यात येतो.

**श्री स. अली मिरा सलामी** विषयावर चर्चा करण्या अगोदर सर्वसाधारण चर्चा होऊ द्यावी.

**मा. महापौर** विषय अगोदर मंजूर करण्यात येतील नंतर जनरल चर्चेसाठी स्वतंत्र वेळ देण्यात येईल सचिव यांनी विषय क्र. २ वाचून दाखवावा.

**ठराव क्र. १९/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २९/४/२००० व दिनांक २०/५/२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**नगरसचिव** (विषय क्र. २ वाचून दाखवितात.)

**विषय क्र. २०/२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेसाठी आवश्यक असाणारी २०००-२००१ साठी तुरटी खरेदीचा प्रस्ताव रक्कम रुपये १५,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दिनांक २९/६/२००० अन्वये मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यास्तव शिफारस केलेली आहे.

सदरील प्रस्तावाचा खर्च हा सन २०००-२००१ आर्थिक वर्षा अंतर्गत रसायन सामुग्री खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. तरी रक्कम रुपये १५,४०,०००/- चा अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव/विचारार्थ सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव क्र. २०/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरणे केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेसाठी सन २०००-२००१ वर्षाकरीता तुरटी खरेदीसाठी चे रक्कम रुपये १५,४०,०००/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**नगरसचिव** (विषय क्र. ३ वाचून दाखवितात)

**विषय क्र. २१/३ :**

औरंगाबाद पाणी पुरवठा (जायकवाडी उद्‌भव) योजनेद्वारे ओरंगाबाद शहरासाठी जायकवाडी जलाशयातुन पंपाद्वारे दरमहा साधारणत: ४१२० दशलक्ष घनमीटर पाणी उपसा

केले जाते. या पाण्याच्या खरेदीपोटी औरंगाबाद महानगरपालिका रुपये ०.४५ प्रति १०,००० लिटर या दराने प्रतिमाह रुपये २,२२,०००/- (२०% रासायनिक कर धरुन) इतकी रक्कम पाटबंधारे विभागाकडे भरणा करीत असते.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांचे निर्णय क्र. गोमपाविम/ता.१/वि.सि.पा.पु. दर/२८५३/२ दिनांक २८/६/१९९९ नुसार पाटबंधारे मंडळाचा पाणी पुरवठा दर रुपये ०.४५ वरुन रुपये ०.९० प्रति दहा हजार लिटर्स इतका वाढविण्याचे कळविले असून त्यानुसार देयके तयार करुन औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झाली आहेत. या पाणी पट्टीतील दर वाढीमुळे औरंगाबाद महानगरपालिकेस पाणी पट्टी पोटी दरमहा अंदाजे रु. ४,६०,०००/-इतकी रक्कम पाटबंधारे मंडळास अदा करावी लागणार आहे. या दरवाढीमुळे देयकात प्रति वर्षी रुपये ५५,२०,०००/- इतकी रक्कम द्यावी लागणार आहे.

जुन्या दरानुसार दरवर्षी रुपये २६,६४,०००/- इतकी पाणी पट्टीची रक्कम पाटबंधारे मंडळाकडे महानगरपालिकामार्फत अदा करण्यात येत होती. पाटबंधारे मंडळाच्या वाढीव दरामुळे आता (जुलै १९९९ पासून) महानगरपालिकावर दरवर्षी रुपये २८,५६,०००/- इतका जास्तीचा बोजा पडणार आहे.

वाढीव दराने पाणी पट्टी दर मान्यतेसाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद**

**सौ. दाणे चंद्रभागाबाई** पाणीपट्टीत वाढ करण्यात येऊ नये. जी आहे तीच ठेवावी जो स्लम भाग आहे तेथील लोकांना पाणीपट्टी कमी आकारण्यात यावी वाढ केल्यास कुणीही लोक पाणीपट्टी भरणार नाही व तशी शासनाकडे मागणी करावी.

**मा. महापौर** पाणी पट्टी वाढी संदर्भात ज्या वेळेस अर्थसंकल्पीय बैठक राहील त्यावेळेस हा प्रश्न उपस्थित करावा.

**श्री स. अली मिरा सलामी** पाणी खरेदी पोटी रुपये ०.४५ प्रति वरुन रु. ०.९० प्रति इतका प्रति इतका दर वाढवून गोदावरी मराठवाडा विकास महामंडाळास भरणे. महानगरपालिकेला परवडणारे नाही. जे अगोदरचे रु. ०.४५ प्रति दर होते तेच जास्तीचे आहे. पुन्हा वाढ करणे योग्य नाही. या संदर्भात एक कमिटी पण नेमण्यात आली होती. १५-२० पैसे होते त्यावेळी शेतक-यांना ज्या दरात पाणी देण्यात येते होते, त्याच दराने महानगरपालिकेला देण्यात यावे. चर्चा करुन किती कमी करणार, पुन्हा एक कमीटी तयार करुन त्या कमीटीने दिलेल्या अहवाल नुसार आपल्या विभागाचे अधिकारी व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे अधिकारी यांचेशी चर्चा करुन महानगरपालिकेची कमकुवत बाजु मांडुन प्रशासनामार्फत या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये.

**श्री पांडुरंग तायडे** सिडकोत नेहमीच पाण्याची टंचाई जाणून येते. पाणी पट्टीत वाढ केल्यास लोक पाणीपट्टी भरणार नाही.

**मा. महापौर** दिनांक २७/७/२००० ला अर्थसंकल्पीय बैठक बोलावणार आहोत त्या बैठकीमध्ये हा मुद्दा उपस्थित करावा. चर्चा झाल्यानंतर पाणीपट्टी वाढीबाबत निर्णय घेणार आहेत.

**श्री प्रकाश निकाळजे** शहरात जो पाणी पुरव्ठा होतो त्याचा वापर योग्य प्रकारे होत नाही. नळ कनेक्शन कमी परंतु पाण्याचा जास्त वापर आहे. शहरात अनाधिकृत

नळे असून, तेथे पाण्याचा गैरप्रकारे वापर होतो. त्यामुळे महानगरपालिकेस जे उत्पन्न यावयास पाहिजे ते येत नाही. दुसरी बाब अशी की, विद्युत मंडळास दर महा ७५ लाख भरण्याऐवजी ९० लाख रु. दरमहा भरण्याची शिफारस स्थायी समितीने केली असून एवढी रक्कम देणे शक्य होईल काय? गोदावरी मराठवाडा विकास मंडळा सोबत मा. आयुक्त व इतर अधिकारी, पदाधिकारी यांनी चर्चा करुन प्रस्तावात दर्शविण्यात आलेली दरवाढ कमी करण्यास प्रयत्न करावे. जेणे करुन आपणास पाणी पट्टीत वाढ करणे योग्य होणार नाही व जनतेच्या दृष्टीनकोनातून महानगरपालिकेने त्यांचा फायदाच बघितला पाहिजे.

**श्री सुदाम सोनवणे** दरवर्षी २६ लाख ६४ हजार रक्कम कती वर्षापासून भरत आहे व झालेली वाढ कधी पासूनची आहे व या अगोदर किती रक्कम भरलेली आहे त्याचा खुलासा व्हावा. ३० कोटीचा तोटा सहन करावा लागतो ही दरवाढ आपणांस परवडणारी नाही. पुर्वीचेच दर कायम ठेवावे.

**श्री तकीहसनखान** यात दुप्पट वाढ करण्यात आलेली दिसून येते. केलेली वाढ ही २६/६/१९९९ पासूनची असून त्यावेळेस जे शासन होते ते सध्या नाहीत आता नवीन सरकार आहेत या संदर्भात पाटबंधारे मंत्री यांच्यांशी चर्चा करुन शहरास पाणी पुरवठा करतांना फायदा किती तोटा किती व ज्या ज्या अडचणी निर्माण होतात या दृष्टीकोनातुन झालेली वाढ कशी रद्द करता येईल या बाबत सविस्तर चर्चा करुन हा प्रश्न सोडवावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** दि. २८/६/१९९९ पासून पाटबंधारे विभागाकडून महानगरपालिका जे पाणी उचलते ते दि. २८/६/१९९९ पर्यंत रु. ०.४५ दराने व ०.४५ रु. वरुन रु. ०.९० प्रति दहा हजार लिटरर्स वाढविला आहे. मागील जून-१९९९ पर्यंत प्रती ०.४५ रुपये प्रमाणे सर्व पैसे मराठवाडा गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळास दिलेले आहेत व १ जुलै १९९९ पासून ही वाढ करण्यात आली असे पत्र संबंधित विभागाचे प्राप्त झालेले आहे व दोन वेळा पत्र देऊन या संदर्भात दोनवेळा पत्र व्यवहार केला. वाढ करण्यात आली ती जवळ जवळ दुप्पट आहे. महानगरपालिकेस विश्वासात न घेता वाढ केली आहे.

**श्री कोकाटे काशीनाथ** संबंधित विभागाकडे १ वर्षापूर्वीची आकारणी १ वर्षानंतर येत आहे. पाणी पट्टी वाढीसंबंधी या प्रस्तावातून उल्लेख करणे योग्य होत जी वाढ करण्यात आली त्यात दुप्पट केल्याचे दिसून येते. हा विषय सध्या स्थगित ठेऊन, विद्युत मंडळास आपण केलेली मागणी कृषी दराने विज दर आकारावे हीच मागणी व त्या संबंधीचे निवेदन तयार करुन राज्य शासनाकडे पाठवावे व त्यानुसार एक शिष्ट मंडळ करुन राज्य शासनास या संदर्भात भेटून विनंती करु की औरंगाबाद शहरास महानगरपालिकेकडून होणारा पाणी पुरवठयासाठी लागणारी वीज दर हे कृषी दराने आकारावे व त्यानुसार शासन काय मत प्रकट करते यावर अवलंबुन आहे. केलेली दरवाढ ही योग्य नसून हा ठराव मंजूर केल्यास पुढे अर्थ संकल्पाची बैठक येईल त्यात पाणी पट्टी वाढी संदर्भात प्रश्न उद्भवतील याचाही विचार व्हावा.

**श्री अंबादास दानवे** शासन पातळीवर चर्चा करतांना व्यवस्थित पणे कार्यवाही व्हावी. एकवर्ष का अंधारात ठेवले वर्ष उलटून गेल्या नंतर त्या संदर्भात सभागृहाला माहिती

मिळते. हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. एकदम एवढी वाढ करणे बरोबर नाही. सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गोदावरी मराठवाडा विकास पाटबंधारे महामंडाळातील अधिकारी यांचेशी महानगरपालिका आयुक्त तसेच संबंधित अधिकारी व यात पदाधिकारी व काही स. सदस्य असतील चर्चा करावी व प्रश्न मार्गी लावण्यात यावा.

**मा. महापौर** हा विषय पाणी पट्टीच्या संदर्भात येत असल्याने मा. आयुक्तांना मत मांडावयाचे आहे.

**मा. आयुक्त** या विषयाच्या संदर्भात २-३ महत्वाचे मुद्दे आहेत. १ वर्षापासून का प्रशासनाला मान्य नव्हती प्रशासनाकडून वाटाघाटी करुन कमी करण्याचा प्रयत्न आले. आज ही प्रयत्न करुन करता येतो का म्हणून पाहण्यात येते. त्यामुळे उशीर झाला आहे.

ही दरवाढ करायची किंवा नाही या तडजोडी १ वर्षापासून पत्र व्यवहार होतो. ती देखील स्टटरी कार्पोरेशन आहे. शासकीय खाते वेगळी या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना आहे. त्यांनी निर्णय घेतला. आपण पुन्हा चर्चा करु पदाधिकारी व अधिकारी पुन्हा नेमू दरवाढ फार तर काही प्रमाणात करावी लागते. त्यांचे सोबत तडजोड करण्याबाबत विचार करण्यात येईल.

**श्री जयवंत ओक** सध्या हा ठराव स्थगित ठेवावा. ज्या वेळेस अर्थसंकल्पीय बैठकीत पाणी पट्टीत वाढ करावीच लागले. असे प्रशासनाचे मत आहे. जर पाणी पट्टीत वाढ केल्या त्यानुसार या प्रस्तावावर नेमकी काय भूमीका घ्यावी. त्याचा निर्णय घेता येईल. अर्थ संकल्प जो मंजुर होत नाही. तोपर्यंत हा विषय स्थगीत ठेवावा पदाधिकारी मा. आयुक्त यांची संबंधित विभागाशी चर्चा झाल्या नंतर निर्णय घेण्यात यावा. पाणी पट्टीत वाढ करणार हे योग्य होणार नाही.

**श्री स. अली मिरा सलामी** जून १९९९ पर्यंत ०.४५ रुपये प्रमाणे मनापाला गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने पैसे भरलेले आहे. असा खुलासा आताच करण्यात आला. जुलै १९९९ पासून या संदर्भात सविस्तर चर्चा करुनच निर्णय घेण्यात यावा. या पाटबंधारे मंत्री यांचेसह भेट घ्यावी लागली तरी आपण भेट घ्यावी.

**मा. महापौर** पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. अर्थसंकल्पीय बैठकीत पाणी पट्टी संदर्भात चर्चा होणार आहे या प्रस्तावातील अपेक्षित वाढ कमी करण्यात स्थगिती देण्यात येते. या संदर्भात शासानासह पत्र व्यवहारात करण्यात यावा. तसेच मा. पाटबंधारे मंत्री यांना भेटून दरवाढ रद्द करण्याचा प्रयत्न करावा. मा. पाटबंधारे मंत्री महाराष्ट्र यांचेसह चर्चा करण्यासाठी सर्व पदाधिकारी, मा. आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी संयुक्तीक भेट घ्यावी. तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र. २१/३ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांनी दि. २८/६/१९९९ रोजी क्र. गोमपाविम/ता. १/वि. सि. पा. पु. दर/२८५३/२ नुसार पाटबंधारे मंडळाचा पाणी पुरवठा दर ०.४५ वरुन रुपये ०.९० प्रति १०,००० लिटर या केलेल्या वाढीच्या संदर्भात शासनासह पत्रव्यवहार करण्यात यावा. तसेच मा. पाटबंधारे मंत्री

यांनी भेटून दरवाढ रद्द करण्यासाठी प्रयत्न करावा व त्यांचेसह चर्चा करण्यासाठी सर्व मा. पदाधिकारी, मा. आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी संयुक्त भेट घ्यावी. तोपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. २२/१ :**

औरंगाबाद ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कर्मभूमि आहे. एक काळ असा होता, मराठवाडयातील युवक-युवतींना शिक्षणाची सोय उपलब्ध नव्हती. त्यामुळे मुंबई, पुणे यासारख्या शहरात त्यांना जावे लागे. त्या काळात अंधकारात चाचपडणाऱ्या मराठवाडयात बाबासाहेबांनी ज्ञानदिप प्रज्वलित केली. भारतरत्न या बहुमोल सन्मानास गौरव प्राप्त करवून देणा-या भारत भूमिच्या या लढवैय्या सुपुत्राचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ "बाबासाहेब" उच्च शिक्षणासाठी परदेशात प्रयाण करीत आहेत. या प्रसंगी आपल्या चाहत्यांना विमानात चढतांना अभिवादन करीत असलेली भावमुद्रा असलेला भव्य पुतळा उभारण्यात यावा. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शिल्पकारास वरील कामासाठी निमंत्रित करण्यात यावे. चालू आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात रु. ५० लाखाची तरतुद करण्यात यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सुचक | श्री गणेश रामचंद्र तांबे |
| अनुमोदक | श्री संजय सिरसाठ, सौ विजया रहाटकर, सौ चंद्रभागा दाणे, श्री राजु आर शिंदे, श्री मधुकर सांवत, श्री साहेबराव कावडे. |
| दिनांक | १२/७/२०००. |

**संवाद :**

**श्री कुमावत अविनाश** ५० लाखाची तरतुद न करता जेवढा खर्च येईल तेवढे देण्यात यावे.

**श्री जांबिदा दलबिरसिंग** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवनात घडलेल्या प्रसंगाच्या दृष्टीने वेगळया पध्द्तीचा आधार घेऊन योग्य असा पुतळा तयार करण्यात यावा. प्लेन मध्ये चढतांना फोटो आपल्याकडे आहे किंवा नाही.

**श्री स. अली मिरा सलामी** या प्रस्तावास कुणाचा विरोध असेल असे वाटत नाही. नामांतराच्या वेळेस ब-याच मान्यवरांनी प्रयत्न केले. त्यातील सभागृहात सुध्दा स. सदस्य श्री तकीहसनखान श्री निकाळजे हे असून मी देखील या चळवळीत होतो. डॉ. बाबासाहेबांची ही कर्मभूमी आहे. नामविस्तार करुन देखील करण्यात आलेले आहे. या ठिकाणी पुतळा होणे गरजेचे आहे. प्रस्ताव नुसते येतात. मंजुर होतात परंतु तात्काळ त्यांची अंमलबजावणी होत नाही जर प्रस्ताव मंजुर केला तर ताबडतोब काम चालू व्हावे. कारण या अगोदर ही संभाजी महाराज यांचा पूतळा बसण्याचा संदर्भिय निर्णय होऊन ३ ते ३.५० लाख रु. खर्च झाले. छावणी परिषदेने त्यांच्या जागेवर बसण्यात मनाई केली. त्यासाठी ज्या ठिकाणी पुतळा बसवावयाचा ती जागा पिपल्स एज्यूकेशन सोसायटीचे आहे ते जातात देतील काय या करीता एक कमीटी नेमावी व इतर सर्व गोष्टी प्रशासनाने हाताळून तसा प्रस्ताव प्रशासनामार्फत देण्यात यावा. तसेच या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठे कुलगुरु यांचेशी प्रशासनाच्या वतीने चर्चा करुन कार्यवाही करावी.

जेणे करुन भविष्यात वादविवाद निर्माण होणार नाही व महानगरपालिकाची बदनामी न होता जनतेने महानगरपालिकाची प्रशंसा केली पाहिजे. या सर्व कामाचे श्रेय महानगरपालिका सभागृहाला जावे.

**श्री जयवंत ओक** चार दिवसापूर्वी वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. या जागेवर पुतळा बसवण्यासाठी महानगरपालिका २० लाख रुपये देणार अशा बातम्या प्रसिध्द होतात. जर जागा आपली असेल कुलगुरु यांची मध्यस्थी घेण्याची गरज नाही या संदर्भातील सर्व जबाबदारी महानगरपालिकाने घ्यावी. आजच्या वृत्तपत्रात ही कुलगुरु यांनी भाष्य केलेले आहे. ८८ नगरसेवकांनी एकमताने ठरावे करुन प्रशासनाने याबाबत कार्यवाही करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** माझ्या माहिती प्रमाणे या संदर्भात विद्यापीठातील एका शिष्टमंडळाने मा. आयुक्त व सर्वपदाधिकारी व स्वत: आपणा बरोबर ही चर्चा केली आहे असे वाटते ज्या ठिकाणी पुतळा बसवावयाचा ती जागा कुणाच्या मालकीची आहे त्यासाठी पिपल्स सोसायटी महानगरपालिका व विद्यापीठातील लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी याची एक संयुक्त बैठक घेऊन माहिती घ्यावी. या अगोदर संभाजी महाराज याचां पुतळा छावणी येथे बसवण्याचा निर्णय झालेला होता. त्यासाठी सपाटीकरण व इतर कामासाठी २.५० ते ३ लाख रुपये खर्च झाला आहे. पुतळा शहरात आणलेल्या आहे व जागेचा वाद चालू झाल्याने तो पुतळा अदयाप बसविण्यात आलेला नाही व त्याचीच पूर्नवृत्ती जर या पुतळा बसविण्याच्या बाबतीत झाल्यास हे योग्य होणार नाही. या संदर्भात प्रशासनाची काय भूमिका आहे. ते जाणून घेणे आवश्यक आहे. नुसता प्रस्ताव मंजूर करुन त्यांची अंमलबजावणी वेळेवरच न होणे हे बरोबर होणार नाही. तात्काळ प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे व हा ठराव मंजुरीसाठी कुणाचे दुमत नाही.

**श्री तकीहसन खान** डॉ. बाबासाहेबांचा पुतळा बसविण्यास कुणाचाही विरोध असणार नाही. त्यांनी घटना लिहून महान कार्य केलेले आहे. यासाठी अगोदर विद्यापीठ, पिपल्स एज्युकेशन सोसायटी व महानगरपालिका यांची संयुक्त बैठक घेऊन एकमत करावे व संपूर्ण बाबींवर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा. पुतळा शोभणारा असावा. अरुण शौरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात लिखान केलेले आहे. त्यांनी लिहिलेल्या पुसतकावर असा फोटो आहे.

**श्री गणेश तांबे** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महान पुरुष होते. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव व न्याय या आधारावर देशाची राज्य घटना लिहिली व या देशाला महानता म्हणून गौरव मिळवून देण्याचे काम केले. हा पुतळा महानगरपालिकेच्याच जागेवर बसविण्यात यावा. ज्याप्रमाणे क्रांतीचौकी येथे शिवाजी महाराज तसेच भडकल गेट येथे डॉ. बाबासाहेबाचा पुतळा आहे ते महानगरपालिकेच्या जागेवर आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी व या संदर्भात कार्यवाही सुरु केली म्हणून विद्यपीठ व पिपल्स संस्थेस जाग आली. परंतु तेथील जागा ही महानगरपालिकाची असतांना तडजोडीचा प्रश्नच येत नाही. जेव्हा ते शिक्षणासाठी परदेशात विमानानेच गेले होते. हे स. सदस्यांना माहिती नसेल त्यांची भावमुद्र चित्र कुठे नाही असे बोलेले गेले. परंतु ते चित्र आमच्याकडे आहे व ते वेळेवर आम्ही सादर करु.

**श्री तकीहसनखान** अरुण शौरीचे पुस्तक मी पाहिले.

**श्री पंडगळे रतनकुमार** या प्रस्तावास कुणाचा विरोध नाही. स. सदस्या तकी हसनखॉ म्हणतात ते बरोबर आहे. अरुण शौरी यांचे पुस्तक हे आहे (अरुण शौरीच्या पुस्तकावर डॉ. बाबासाहेबांचे चित्र आहे ते सर्वांना दाखवतात.) याबद्दलची शंका सर्वांनी दुर कराव्या व जागे संदर्भात वाद निर्माण होणार नाही यासाठी विद्यापीठ पिपल्स शिक्षण संस्था व महानगरपालिका यांची संयुक्त बैठक घेऊन याचा निर्णय व्हावा.

**श्री प्रकाश निकाळजे** संभाजी महाराज यांचा पुतळा बसविण्याच्या कार्यवाहीस जो विलंब झाला त्या पध्द्तीने होऊ नये. यासंबंधी प्रशासनाची काय मत आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे. हा ठराव स. सदस्यांनी सादर केलेला आहे येणा-या अथसंकल्पाच्या बैठकीमध्ये या पुतळयासाठी किती खर्च येणार तशी तरतुद प्रशासनातर्फे करण्यात यावी. नंतरच योग्य निर्णय घेतला जाईल. प्रशासनाने शासकीय ठराव म्हणून सादर करावा.

**श्री जयवंत ओक** स. सदस्यांनी प्रस्ताव ठेवलेला आहे मंजूर करावा प्रशासनाची काय भूमिका आहे ते नंतर प्रशासन पाहून घेईल. ती जागा कुणाची काय याबाबत प्रशासन नंतर कार्यवाही करेल.

**श्री अफसरखान** ठराव मंजूर करावा विद्यापीठ गेटसमोर जी जागा मोकळी आहे. त्या जागेवर पुतळा बसविण्याबाबत कार्यवाही व्हावी. जेणे करुन येणा-या जाणाऱ्या यांना बसविलेला पुतळा दिसेल.

**श्री नंदकुमार घोडले** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचाही आर्थिक सहभाग असावा. त्यांची मदत घ्यावी.

**मा. आयुक्त** सूचना तत्वतः मान्य करण्यास हरकत नाही. दुसरे असे की, जागेच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी विद्यापीठ, पिपल्स शिक्षण संस्था यांचेशी चर्चा करुनच निश्चीत करावी लागेल. अर्थ संकल्पीय तरतुद ठेवावी लागेल. हा ठराव मान्य करण्यात यावा. आपणांस कुठे जागा योग्य व ती जागा कुणाची व योग्य खुलासा घ्यावा लागेल व तरतुद केल्यास त्यानुसार प्रशासनाच्या वतीने योग्य ती कार्यवाही करता येईल.

**श्री काशीनाथ कोकाटे** कुठल्याप्रकारचे प्रशासनाचे मत न घेता हा प्रस्ताव भावनेच्या भरात ठेवण्यात आलेला प्रशासनाचे मत घेतले असते तर ती जागा कुणाची पुतळा बसविता येतो का? हे समजून आले असते काही सांगितले की, संस्था सांगने विद्यापीठ गेट आत बसवावे. परंतु जागा आपली असतांना व महानगरपालिकाच्या जागेवर आपण हक्क प्राप्त होतो व त्यानुसार गेटच्या आत पुतळा न बसविता बजेट मध्ये तरतुद करुन प्रशासनाच्या वतीने लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

**श्री पंडागळे रतनकुमार** या संदर्भात कुलगुरु यांची चर्चा करुन हा पुतळा कुठे बसवावा. याबाबत निर्णय घ्यावा व तो कशा पध्द्तीचा असावा या बाबतीत ही माहिती घ्यावी.

**श्री अंबादास दानवे** चुकीच्या पध्दतीने शासकीय माहिती न घेता प्रस्ताव सादर केला असा आरोप घेतलेला आहे. तो चुकीचा आहे असे वाटते. दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या गेटवर पुजा केली जाते त्यामुळे गेटच्या समोरच पुतळा झाल्यास त्याच्या चरणावर पुजा होते म्हणुन भावनिक मत निर्माण होईल जो भावमुद्रा असलेल्या पुतळा बसविण्या बाबतचा ठराव घ्यावयाचा तो

मंजुर करावा व प्रशासनाच्या वतीन आर्थिक बाजू लक्षात घेवून तेथील जागेची पाहणी करुन पुढील कार्यवाही करावी.

**मा. महापौर** विद्यापीठ समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा पुतळा होण्याबाबत स. सदस्यांनी मांडलेला असून, यावर खूप चर्चा केलेली आहे. विद्यापीठाचे प्रतिनिधी, अधिकारी यांनी माझी व मा. आयुक्त यांची या संदर्भात भेट घेतली परंतु त्या अगोदर हा प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला होता. हा पुतळा विद्यापीठाच्या गेट समोरचा बसविण्याबाबत प्रस्ताव मंजूर करण्यात येतो व जागा निश्चीत असावी अशी भावना सभागृहाने व्यक्त केली आहे. लागणारे खर्चाची तरतुद येणा-या बैठकीमध्ये करण्याबाबत कार्यवाही होईल परंतु प्रशासनाने तात्काळ जागा बघुन हा पुतळा लवकरात लवकर कसा बसविता येईल तशी कार्यवाही करावी.

**ठराव क्र. २२/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात आलेल्या चर्चेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा डॉ. बाबासाहेब आंबेउकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेश द्वाराजवळ पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यात येते. जागा निश्चतीच्या संदर्भात प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी यासाठी अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतुद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र २३/२ :**

प्रभाग क्रं. २१ मधील टेलीफोन एंक्सेंज जवळील चौकास "स्वामी विवेकानंद चौक" नांव दयावे अशी नागरिकांची मागणी आहे. कृपया सदरील चौकास "स्वामी विवेकानंद चौक" असे नांव देणे बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सूचक | सौ साधाना गणेश सुरडकर |
| अनुमोदक | सौ विजया किशोर रहाटकर |
| दिनांक | १४/७/२००० |

**संवाद :**

**श्री रतनकुमार पंडागळे** उड्डाणपत्र होण्या बाबतचा प्रस्ताव दिलेला होता. सभागृहात सादर करण्यात आलेला नाही याचे कारण काय?

**मा. महापौर** काही प्रस्ताव संबंधित विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविलेले आहेत त्या विभागाचा खुलासा आल्यावर बैठकीत घेण्यात येतील.

**श्री काशीनाथ कोकाटे** काही प्रस्ताव पाठविले व काही अभिप्राय घेण्यासंबंधित असे पुरवणी विषय पत्रिकेवर आले यांचे कारण काय?

**श्री जयवंत ओक** या प्रस्तावास माझा विरोध नाही परत मागे एक ठराव घेता संभाजी महाराज यांचा पुतळा बसविण्याबाबत कार्यवाही चालू असतांना ३.५० लाख रु. खर्च करुन पुतळा शहरात आणण्यात आला व छावणी येथे बसविण्यात यावा व महानगरपालिकेने जागा घेण्याबाबत निर्णय झाला असतांना संबंधित जागेचे रक्कम महानगरपालिकेने न भरल्याने व तेथील जागेवर न बसविण्याबाबत छावणी परिषदेने प्रकरण न्याय प्रविष्ठ केले. जास्त रक्कमेची मागणी केली व प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर त्यास स्थगिती मिळाली त्यामुळे पुतळा जशाच्या तसाच आहे. १ महिन्यांच्या आत कुठे तरी

महानगरपालिकाच्या हद्दीत जागा बघुन तो पुतळा बसविण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा. महापौर** या संदर्भात महापौर दालनात छावणी परिषदेचे संबंधित अधिकारी (कुलसचिव) महानगरपालिकाचे अधिकारी छावणी परिषदेचे संबंधित अधिकारी यांनी मान्य केले. २२ लाख रुपयापैकी २ लाख महानगरपालिकेने भरावे व उर्वरित रक्कम २० लाख सार्वजनिक बांधकाम विभागाने भरावी व सर्व रक्कम भरल्यानंतर तेथे संभाजी महाराज यांचा पुतळा बसविण्याबाबत कार्यवाही होईल.

**श्री कशीनाथ कोकाटे** महानगरपालिकाने सार्वजनिक बांधकाम विभागास १,९०,०००/- एवढी रक्कम भरल्यास छावणी परिषद पुतळा बसवू देईल काय?

**मा. महापौर** महानगरपालिकेने २ लाख व सार्वजनिक बांधकाम यांनी २० लाख असे एकूण २२ लाख छावणी परिषदेला अदा करावे लागतील त्यांनतर ही कार्यवाही होईल.

**श्री काशीनाथ कोकाटे** छावणी परिषद केंद्र शासनाच्या अंतर्गत येते व परिषदेचे सचिव यांचेशी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांशी चर्चा करुन हा प्रश्न सोडवावा.

**मा. महापौर** पुतळा तयार आहे. जागेचे सपाटीकरण करणे, आर्थिक बाब आहे केंद्रसरकारच्या अधिकारातील बाब आहे. संरक्षणमंत्री यांचेसह चर्चा करुन जागा उपलब्ध करावी. या संदर्भात केंद्र सरकारला विनंती करावी.

**श्री रतनकुमार पंडागळे** उड्डाण पुलाच्या संदर्भात दिल्ली येथील कमिटी स्थळ पाहणीसाठी आलेले होते. त्यांनी काय अहवाल सादर केला. दुसरा आणखी एक प्रस्ताव मी दिलेला होता. एकतर्फी प्रस्ताव आलेले आहेत.

**श्री रगडे** माझा प्रस्ताव दिला होता परंतु घेण्यात आले नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** ठराविक नगरसेवकांचेच प्रस्ताव सभागृहात मंजूरीसाठी दाखल झालेले आहे. स. सदस्य श्री रगडे याचां हा प्रस्ताव आलेला नाही.

**मा. महापौर** स. सदस्य श्री रगडे यांचा गार्डन संबंधित प्रस्ताव होता. त्यांनी त्या प्रस्ताव संदर्भात शहर अभियंता यांचेकडे जाण्यास सांगितले व त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी संबंधित अधिकारी यांना पण घेऊन जावे व त्यांनी दिलेल्या माहिती नुसार प्रस्ताव सभेत मंजूर करुन कार्यवाही करता येईल. असे सांगितले.

**श्री प्रकाश निकाळजे** काही सदस्यांचे ठराव आले, काहीचे आलेच नाही. आपण पक्षपातीपणाचे धोरण अवलंबिले असे दिसून येते. स. सदस्यांनी प्रस्ताव दिल्यानंतर काही स. सदस्यांचे नंतर दिलेले प्रस्ताव मंजुरीसाठी सादर झालेले आहे. जे अभिप्रायासाठी पाठविण्यात आहे ते ही प्रस्ताव मागवून त्यावर चर्चा करुन मंजूर करण्यात यावे.

**श्री अंबादास दानवे** विषय क्र. ३,४,५ मध्ये सूचक व अनुमोदक यांची नावे पाहिल्यास सर्वच पक्षाचे स. सदस्यांची नावे दिसून येतील त्यामुळे सभागृहात पक्षपातीपणाने प्रस्ताव सादर केले असा आरोप करणे चुकीचे आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** केवळ सूचक व अनुमोदक म्हणून सर्वच पक्षाचे नगरसेवक आहेत व त्यामुळे पक्षपातीपणा झाला नाही. असे म्हणणे चुकीचे आहे. काहीच झाले नाही व नंतर दिलेले प्रस्ताव मंजुरीसाठी आलेले आहे.

**मा. महापौर** स. सदस्य श्री रगडे यांचा प्रस्ताव गार्डनसाठीचा होता तो अभिप्रायासाठी शहर अभियंता यांचेकडे पाठविला होता व त्यांचेशी चर्चा करुन स्थळ पाहणी करावी व त्यानंतर सभेत प्रस्ताव ठेवून निर्णय घेता येईल असे त्यांना सांगितले होते. आता विषय क्र. २ वर चर्चा करावी.

**श्री प्रकाश निकाळजे** नांव दयावयाचे असेल तर असे प्रस्ताव नामांतर कमीटीकडे दयावे असा ठराव आपण पास केलेला आहे. नविन कमिटी करण्यात यावी.

**मा. महापौर** प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यात येतो.

**ठराव क्र २३/२ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/३ :**

शहरातील गारखेडा परीसर अत्यंत झपाटयाने वाढतो आहे, विकसित होत आहे. अशा या भागात एकही स्विमींग पुल नाही, तेव्हा या भागातील नागरिकांच्या सोईसाठी व त्यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र. २२ ज्योतीनगर, शहानुरवाडी या भागात स्विमिंग पूल बांधण्यात यावा. असा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर. तरी येणाऱ्या अर्थसंकल्पात अशी तरतुद करण्यात आली.

सुचक १) सौ विजया किशोर रहाटकर
२) श्री दलबिरसिंग जबिंदा
अनुमोदक १) सौ साधना गणेश सुरडकर
२) सौ सुवर्णा उमेश चंद्राते
३) श्री अंबादास ए. दानवे
४) सौ संगिता बाळु मैद.

दिनांक १५/७/२०००

**संवाद**

**श्री अफसरखान** अर्थसंकल्प मंजूर व्हवयाचा त्या अगोदर अशा प्रकारचे प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवता येतात काय?

**श्री स. अली मिरा सलामी** गारखेडा येथे पोहण्याच्या तलावासारखे स्वरुप झाले आहे. पावसाळयात तेथे घरे तरंगतात प्रथम त्याचा बंदोबस्त करावा. आर्थिक बाजू पहावी. सर्वांना वाटते त्यांच्या वार्डात विकास व्हावा. बंगल्यावाल्यांचा विचार होत आहे. गरीबांचा विचार व्हावा. सामान्य लोकांची कशी सेवा करता येईल ते पहावे जो प्रस्ताव आला तो संपूर्ण चुकीच्या मार्गाने आलेला असून असे प्रस्ताव प्रशासनामार्फत यावयास पाहिजे व अगोदरच अशी कामे होण्याबाबत मंजुरी दिल्यास जे बजेट ठेवलेले आहे ते संपेल व जी विकासाची कामे करावयाची ती ही होणार नाही.

**श्री कादीर मौलाना** या प्रस्तावाचे सूचक नाहीत.

**श्री प्रशांत देसरडा** स्विमिंग पूल होणे आवश्यक आहे. यापासून महानगरपालिकेला लाखो रुपयाचा फायदा होईल. त्यामुळे ज्योतिनगर भागात स्विमिंग पुल होणे आवश्यक आहे.

**श्री अफसरखान** या प्रस्तावाच्या अनुषंगाने दुरुस्ती करावी की ३-४ वार्ड मिळून एक स्विमिंग पुल होण्याबाबतचे आदेश दयावे. हा प्रस्ताव मंजुर केल्यास एकूण ८३ वार्डात स्विमिंग पूल करणार काय?

**श्री प्रकाश निकाळजे** स्विमींग पूल बांधण्यासाठी जागा उपलब्ध आहे काय? दुसरे असे की, या कामासाठी आर्थिक तरतुद आहे का. सर्व सदस्यांना वस्तुस्थिती सांगावी.

**श्री तकीहसनखान** सुचक सभागृहात हजर नाही.

**श्री जयवंत ओक** प्रस्तावाबाबत ज्यांना सूचना करावयाच्या होत्या त्यांनी केलेला प्रस्ताव सादर केला त्यानुसार मंजूरी देण्यात यावी. प्रशासनास योग्य वाटेल तर कार्यवाही करतील. जर महानगरपालिकाचा फायदा होत असेल तर मंजूर करावयास हरकत नसावी व तेथील लोकांना लांब अंतरावर सिध्दार्थ उद्यानात यावे लागते.

**श्री तकीहसनखान** स्थायी समिती मध्ये बजेट मंजूर झालेले आहे.

**श्री कुमावत अविनाश** विषय क्र. ३ व ५ संदर्भात प्रशासनाकडून खुलासा घ्यावा.

**मा. महापौर** अति. शहर अभियंता यांनी खुलासा करावा शासनाकडून मदत मिळते का?

**श्री काशीनाथ कोकाटे** प्रस्ताव मंजुरीसाठी येण्याच्या अगोदरच प्रशासनाकडून खुलासा घ्यावयास पाहिजे होता. ज्योतिनगर वसाहत कोणी बसविली. जागा किती उपलब्ध आहे. ही माहिती देण्यात यावी.

**अति शहर अभियंता** स्विमिंग पूल बांधण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळेल परंतु निश्चित किमी मिळेल हे सांगणे शक्य नाही.

**श्री स. अली मिरा अली** या अगोदर हा प्रस्ताव अभिप्रायासाठी अति शहर अभियंता यांचेकडे का पाठविण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** बजेट मध्ये तरतुद करण्या संदर्भात संबंधित अधिकारी त्यांना माहिती देण्यात आली होती व स. सदस्य श्री रगडे याच्या प्रस्तावावर विचार केल्यास सध्या उदयानासाठी आपणाकडे तरतुद आहे. त्यातुन काम करता येईल.

**श्री काशीनाथ कोकाटे** ज्या जागेवर स्विमींग पूलाचे बांधकाम करावयाचे त्या जागेची संबंधित अधिकारी यांनी पाहणी केलेली आहे काय? व केलेल्या पाहणी नुसार कुणाला किती खर्च लागेल याचा खुलासा व्हावा.

**श्री जयवंत ओक** त्या भागात जर १००% विकास खर्च भरलेले आहे तर व त्यात महानगरपालिकाचा फायदा होत असेल तर हा दृष्टीकोण समोर ठेवून कमीशन पध्दतीने प्रशासनामार्फत तेथील नागरिकांनी केलेल्या सुचनांचा विचार करुन सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजे तेथील नागरीक १००% पाणी पट्टी व इतर कर भरत असतील तर त्यांच्या सुचनेनुसार स्विमींग पुल बांधकाम होण्याची कार्यवाही व्हावी.

**अति. शहर अभियंता** शासनाच्या क्रिडा विभागांर्गत यासाठी अनुदान मिळेल तशी कार्यवाही करता येईल.

**मा. महापौर** सर्वाच्या भावना लक्षात घऊन यासाठी शासनाकडुन ७० व ७५% अनुदान स्वरुपात रक्कम प्राप्त होते असे माझे मत आहे व जागेबाबत प्रशासन पाहणी करुन कार्यवाही करेल व तेथील जनतेच्या सुद्धा भावना लक्षात घेऊन येणा-या अर्थसंकल्पात या कामासाठी तरतुदर करावी. विषय क्र. ३ व ५ मंजूर करण्यात येतात.

**श्री तकीहसन खान** प्रस्ताव मंजूर करुन अनुदान प्राप्त होण्यासाठी शासन दरबारी पाठवावा व अनुदान मिळाल्यावर कार्यवाही व्हावी व प्रस्ताव क्र. ५ गरवारे स्टेडियम

येथे स्विमींग पुल होण्याबाबतचा आहे. सिडको हस्तांतरण होईपर्यंत हा प्रस्ताव मंजूर करता येत नाही. करावयाचा असल्यास मतदान घ्यावे.

**मा. महापौर** १० मिनिटासाठी सभा तहकुब करण्यात येते. (वेळ १.५६ वा. सभेला सुरुवात ३.०० वाजता).

**श्री कुमावत अविनाश, श्री दानवे अंबादास** मा. आयुक्त उपस्थित नाही कारण काय? खुलासा करावा. या अगोदर होते आता पण उपस्थित पाहिजे.

**मा. महापौर** मा. आयुक्त यांनी मला आत्ताच फोनवरुन सांगितले त्यांची तब्बेत बरोबर नाही. ते हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी जाणार आहे. तशी माहिती त्यांनी मला दिली आहे.

**श्री बाळासाहेब थोरात** सभागृहाचे कामकाज चालू असतांना मा. आयुक्त निघून जातात हा सभागृहाचा अवमान आहे. यापुढे असे होऊन नये. मा. आयुक्त यांनी मा. महापौर यांची परवानगी घेतली नाही असे दिसून येते.

**श्री कोकाटे काशीनाथ** सभेच्या स्थायी उपस्थित असतांना मा. आयुक्त यांनी सभा कामकाज सोडून गैरहजर राहणे चुकीचे आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** मा. आयुक्त यांचेकडे सध्या दोन खात्याचे चार्ज आहेत. ते आपणांस जाण्यासंबंधी सूचना करुन गेले ठिक आहे. विनंती की, त्यांनी सकाळी सिडको कार्यालयात थांबावे व दुपारी ३ ते ६ या वेळात महानगरपालिका कार्यालयात उपस्थित राहावे. जेणेकरुन जनतेचे प्रश्न समजावून घेऊन मार्गी लागतील व विकास कामे तात्काळ होण्यास मदत होईल.

**मा. महापौर** मा. आयुक्तांची तब्बेत बरोबर नसल्याने ते मला विचारुन गेलेले आहे. त्यांच्याकडे दोन विभागाचा पदभार असल्याने त्यांनी स. सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार सिडको कार्यालयात दुपारी जात असत परंतु मा. आयुक्त यांनी यापुढे सिडको कार्यालयात दुपारी न जाता सकाळी जावे व दुपारी महानगरपालिका कार्यलयात उपस्थित राहावे.

**श्री अफसरखान** ठराव क्र. ३ व ५ बद्दल पुन्हा रुलींग दयावी. काय निर्णय झाला कळले नाही.

**श्री कुमावत अविनाश** प्रस्ताव क्र. ३ व ५ मंजूर करुन शासनाकडून यासाठी स्पेशल ५०% ग्रॅण्ड मंजूर झाले तरच याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** स्पेशन अनुदान प्राप्त झाले तरच हे काम करण्यात यावे.

**मा. महापौर** ठराव क्र. ३ व ५ मंजूर करण्यात येते व तसा मंजूर प्रस्ताव शासनाकडे प्रशासनातर्फे व्यवस्थित पाठविण्यात यावा व यासाठी शासनाकडुन अनुदान मंजुर करुन आणावे व त्यातुन या कामाची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** त्या भागातुन महानगरपालिकाला चांगल्याप्रकारे उत्पन्न मिळते १००% कर भरतात नागरिकांच्या मागणीनुसार महानगरपालिकाच्या विकास निधी मधुन हे काम का करण्यात येऊ नये.

**मा. महापौर** ७० व ८०% शासन व २०% महानगरपालिकातर्फे खर्च करुन कार्यवाही व्हावी.

**श्री जयवंत ओक** शासन ५०% व महानगरपालिका ५०% अशा खर्चानुसार मंजूर करावे. मी सांगितल्याप्रमाणे आदेश दयावे नसता मी सभागृहात निषेध करुन बाहेर निघुन जाईल.

**श्री अफसरखान** ८०% शासनाचे व २०% महानगरपालिका याप्रमाणे खर्च करण्यात येईल अशी रुलींग झालेली आहे त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री जयवंत ओक** ५०% शासन ग्रॅण्ड देईल व ५०% महानगरपालिका खर्च करेल अशी रुलींग देण्यात यावी. नसता मी सभागृहाबाहेर निघुन जाईल. जर त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहेत व तेथील नागरीक १००% कर भरतात. पाणीपट्टी भरतात तर ५०% खर्च महानगरपालिकाने खर्च करण्यास काय हरकत आहे. या ठराव नामंजूर केल्यास उदया दुसरे आणखी प्रस्ताव येतील व त्यास विरोध होईल याचा विचार करुन वरीलप्रमाणे रुलींग घ्यावी.

**मा. महापौर** विषय क्र. ३ व ५ दोन्ही ही प्रस्ताव शासनाकडे पाठविले जातील व शासनाकडुन येणारे काही अनुदान व काही महानगरपालिका खर्च करेल व त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. २४/३ :**

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ज्योतीनगर येथे पोहण्याचा तलाव हा शासनाकडुन मिळणा-या अनुदानातुन बांधण्यात यावा व नियमाप्रमाणे महानगरपालिकाचा त्यात वाटा राहील. या कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चौक परिसरात दाऊदी बाहेर समाजाची वसाहत आहे व त्यांची रस्त्याभिमुख दुकाने ही आहेत तरी मोहल्ला चौक येथे रॉयल क्लॉथ स्टेअर सिटीचौक पासून ते बुऱ्हाणी नॅशनल शाळा यास "बुऱ्हाणी स्ट्रीट" असे नांव देणे.

१) शकील मेडीकल स्टोअर्स जुना बाजार ते सिटीचौक पोलिस स्टेशन या रस्त्यास "सैफी स्ट्रीट" असे नांव देण्यात येते.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| अनुमोदक | श्री सुरजीतसिंग खुंगर |
| | श्री अंबादास दानवे, श्री गणेश तांबे. |
| सुचक | सौ निखत परवीन इजाज अली |
| दिनांक | १७/७/२०००. |

**संवाद**

**श्री कुमावत** नामांतर कमेटीकडे पाठवावे.
**श्री कैसरखान** नविन कमेटी नियुक्त करावी.
**मा. महापौर** नामांतर कमेटीकडे पाठवावे.

**ठराव क्र. २५/४ :**

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव नामांतर कमिटीकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरवारे स्टेडीयम येथे जलतरण तलाव मंजूर करणे कारण सिडको-हडको-मुकंदवाडी, एमआयडीसी, चिकलठाणा हा खुप मोठा परिसर

आहे. तरी दोन ते तीन लाख लोकासंख्या आहे तरी येणा-या मिटींगमध्ये हा ठराव पास करावा येणाऱ्या अर्थसंकल्पात त्यास मान्यता दयावी.

| | |
|---|---|
| सूचक | १) श्री राजु शिंदे |
| | २) सौ मंदाबाई पवार |
| | ३) श्री अंबादास दानवे |
| | ४) सौ घायतिलक लिलावती |
| | ५) श्री भगवान रगडे. |
| अनुमोदक | १) श्री काशीनाथ कोकाटे |
| | २) श्री भगावान घडामोडे |
| | ३) सौ जयश्री कुलकर्णी |
| दिनांक | १०/७/२००० |

**ठराव क्र. २६/५ :**

सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने गरवारे स्टेडियम येथे पोहण्याचा तलाव हा शासनाकडुन मिळाणाऱ्या अनुदानातुन बांधण्यात यावा व नियमाप्रमाणे महानगरपालिकेचा त्यात वाटा राहील या कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## _ऐनवेळेचे विषय_

**विषय क्र. २७/१ :**

ब्रिजवाडी या ठिकाणी महानगरपालिकेच्या रिकाम्या जागेत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्यां पुतळया समोर व मनपा शाळेला लगत अंदाजे दोन ते अडिच एकर जामीन रिकामी असल्या कारणाने त्या जागेत वस्तीतील सर्व सांडपाणी येऊन या जागेत थांबते. त्यासाठी त्या ठिकाणी गटार बांधण्यात यावी व सांडपाण्याची विल्हेवाट लावावी. या जागेवर मोठया प्रमाणावर अतिक्रमण वाढत आहे. तरी त्वरीत संरक्षण भिंत बांधण्यास यावी व त्या ठिकाणी या जागेचा विकास व्हावा या करिता उद्यान व खेळणी बसवून एक गेट बसवून खड्डे भरतीने बसवून त्या जागेचा विकास करावा. या जागेत १०० x १०० चा एक भव्य असे मंगल कार्यालयासाठी इमारत बांधून देण्यात यावी.

| | |
|---|---|
| सूचक | श्री भगवान रगडे |
| अनुमोदक | सौ. लिलावती घायातिलक |

**संवाद**

**श्री कुमावत अविनाश** याबाबत प्रशासनाकडुन अभिप्राय घेण्यात यावा.

**श्री जयवंत ओक** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळ जे घाण पाणी आहे त्या बाबत कार्यवाहीचे आदेश घ्यावे. नागरिकांना त्रास होत असेल तर अशी कामे तात्काळ हाती घ्यावीत.

**मा. महापौर** प्रशासनाने अहवाल सादर करावा त्यानुसार या प्रस्तावावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**ठराव क्र. २७/१ :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत प्रशासनाने अहवाल सादर करावा. त्यानंतर या प्रस्तावावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २८/२ :**

वार्ड क्र. ७ नारेगांव मोहल्ला ब्रिजवाडी या ठिकाणाची लोकसंख्या ७ व ८ हजार असून या वस्तीमध्ये सुशिक्षितांची संख्या मोहल्ला प्रमाणावर आहे. परंतु येथील नागरिकांची व विद्यार्थ्यांची परिस्थिती बिकट असल्या कारणाने महागडी किंमती महत्वाची पुस्तके विकत घेऊ शकत नाही. त्यामुळे त्यांचा अभ्यास करण्याची इच्छा असून सुद्धा पुस्तका अभावी कुचबंना होते. त्यातल्या त्यात हे सुशिक्षित दलीत व मागासवर्गीय असून राहण्याची व अभ्यास करण्याची व्यवस्था नसल्याने त्यासाठी एका अभ्यासिका केंद्र व वाचनालयाची मान्यता द्यावी. या भागात तरुण वर्ग मोठया प्रमाणावर आहे. त्यांची व्यायाम करण्याची इच्छा असतांना देखील व्यायाम करण्यासाठी या भागात कुठलीस व्यवस्था नाही. करीत व्यायाम शाळेचे पूर्ण साहित्य उपलब्ध करुन या ठिकाणी एक अद्यावत इमारत बांधून देण्यात यावी ही इमारत डबल मजली ६० x ६० ची असावी.

सुचक श्री भगवान रगडे
अनुमोदक श्री शेख मुनाफ शख यासिन.

**संवाद**

**महापौर** प्रशासनाकडे अभिप्राय मागवला होता. अदयाप अभिप्राय प्राप्त नाही. अहवाल आल्यावर निर्णय घेता येईल.

**ठराव क्र. २८/२ :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत प्रशासनाने अहवाल सादर करावा. त्यानंतर या प्रस्तावावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २९/३ :**

नारेगांव या ठिकाणी जनसंख्या जवळपास २० ते २५ हजार पर्यंत पोहचली आहे. याच ठिकाणी मुख्य रस्त्यावर अतिक्रमण वाढत आहे व रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. याच रोडच्या बाजुला एक छोटासा नाला आहे. तो नाला बांधुन त्यावर सलाद टाकून त्यावर टपरी मार्केट (गाळे) बांधण्यात यावे. जेणेकरुन महानगरपालिकेला यापासून आर्थिक उत्पन्न मिळु शकते. करीता नाला बांधुन त्यावर टपरी मार्केट करण्यात यावे.

सूचक श्री भगवान रगडे
अनुमोदक श्री शेख इसाक शेख जैनोद्यीन

**संवाद**

**मा. महापौर** प्रशासनाने अभिप्राय मागविला होता. अदयाप अभिप्राय प्राप्त नाही अहवाल आल्यावर निर्णय घेता येईल.

**ठराव क्र. २९/३ :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत प्रशासनाने अहवाल सादर करावा. यानंतर या प्रस्तावावर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३०/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, क्रांतीचौक ते सिल्लेखान या रस्त्याचे रुंदीकरण, (खडीकरण) साईड गटार, रस्त्यामधोमध रस्ता दुभाजक टाकणेच्या

कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसर रु. १६,८४,७००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन २०००-२००१ या आर्थिक वर्षातील भांडवली कामे "खडी रस्ते" या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल.

तरी रु. १६,८४,७००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद**

**मा. महापौर** मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ३०/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते सिल्लेखाना या रस्त्याचे रुंदीकरण (खडीकरण) साईट गटार, रस्त्यामधोमध रस्ता दुभाजक टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रुपये १६,८४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१/५ :**

सौ रंजना महादु वरपे हया गणेश कॉलनी, औरंगाबाद येथील रहीवाशी असून तोडांचे कर्क रोगाने आजारी आहेत. त्यांचेवर शासकीय, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे उपचार चालू असून आजारावरील वैद्यकीय उपचारांसाठी १०,०००/- रुपये खर्च येणार असल्याबाबतचे रुग्णालयातील संबंधित डॉक्टारांनी प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यांची आर्थिक अत्यंत बिकट असल्यामुळे त्या एवढा खर्च करणेस असमर्थ आहे. त्यांनी नगरसवक स्वेच्छा निधी मधुन आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती केली आहे.

गत वर्षी महापालिकेतर्फे काही रुग्णांना स्वेच्छा निधी मधुन विशेष बाब म्हणून २५,०००/- रुपये आर्थित मदत देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर काही स. नगरसेवक त्यांना स्वेच्छानिधी मधुन आर्थिक मदत देण्यास तयार आहेत. त्यांची अत्यंत हालाखीची आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यांना तोडाचे कर्क रोगावरील वैद्यकीय उपचार तथा औषधोपचार व अन्य खर्चासाठी स. नगरसेवकांचे स्वेच्छा निधी मधून कमीत कमी २५,०००/- रुपये विशेष बाब म्हणून मंजूर करणेस प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| सूचक | श्री बाळासाहेब थोरात |
| | श्री अविनाश कुमावत |
| | श्री काशीनाथ कोकाटे |
| अनुमोदक | श्री अंबादास दानवे |
| | श्री जयवंत ओक |
| | श्री भरत लकडे |
| | श्री अफसर खान |
| दिनांक | १९/७/२०००. |

**संवाद**

**मा. महापौर** ठराव मंजुर करण्यात येतो. हा तोडांचा कॅन्सर असून आपल्या नियमावली नुसार फक्त ब्लड कॅन्सरसाठी आर्थिक मदत करता येते. २५ हजाराची

मदत मागविली, २५ नगरसेवक त्यांना पत्र देणार आहेत विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र ३१/५ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सौ. रंजना महाद वरपे यांना तोंडाचे कर्क रोगाने आजारी असून, त्यांचेवर शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय (घाटी) येथे उपचार चालू आहे. त्यांनी आजारवरील वैद्यकीय उपचारासाठी नगरसेवक स्वेच्छा निधी मधुन २५,०००/- रुपयाची आर्थिक मदतीची मागणी केल्यानुसार विशेष बाब म्हणून तोंडाचे कर्क रोगासाठी २५,०००/- रुपयाची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शबाना बेगम भ्र. मो. अली. रा. रेल्वेस्टेशन औरंगाबाद हे घाटी रुग्णालयात कर्क रोगाचे उपचार घेत आहे तसे घाटीचे डीन यांनी प्रमाणित केलेले आहे त्यांना कॅन्सर सविर्क्स या रोग असून त्यांना महानगरपालिका नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून रु. २५,०००/- विशेष बाब म्हणून अर्थ साहय करण्यासठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसाठी सादर.

| | |
|---|---|
| सूचक | श्री मो. इलियास किरभाणी |
| अनुमोदक | श्री शेख इसाक शेख जैनोद्यीन |
| | श्री गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहमद. |

**संवाद**

**मा. महापौर** श्रीमती बेगम यांना गर्भाशयाचा कॅन्सन झालेला असून हे आपल्या नियमात बसत नसल्याने सर्वसाधारण सभेपुढे हा प्रस्ताव आलेला असून या महिलेस नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून २५,०००/- रु. आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री सलीम पटेल, श्री स. अली मिरा सलामी** सर्व कॅन्सर रोगासाठी स्वेच्छा निधी देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**मा. महापौर** यासाठी नियमावलीत बदल करावा लागेल.

**श्री प्रकाश निकाळजे** काही लोक प्रमाणपत्राशिवाय स्वेच्छा निधीची मागणी करतात व डुप्लीकेट प्रमाणपत्र सादर करतात असे होता कामा नये. संबंधित रुग्णाकडे शासकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे अशा रुग्णांनाच स्वेच्छा निधीची रक्कम देण्यात यावी.

**मा. महापौर** स. सदस्यांचा भावना लक्षात घेता एखादया रुग्णाला कॅन्सर झाला तसे प्रमाणपत्र दिले असेल तसेच खर्चाचे प्रमाणपत्र दिले असेल व त्याची पूर्ण चौकशी मनपातील डॉक्टर यांनी किंवा घाटीचे डॉक्टर यांनी तपासणी केली असेल अशा सर्व रुग्णांनाच स्वेच्छा निधीतून रु. १५००/- देण्यात येईल व १५०००/- पेक्षा जास्त रक्कमेची मागणी असेल तर सर्वसाधाण सभेत तसा प्रस्ताव मांडण्यात यावा. सदर रुग्णास विशेष बाब म्हणून अर्थसाहय करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. ३२/६ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जमिती शबाना बेगम भ्र. मो. अली यांना कॅन्सर सव्हिर्स हा रोग असून सध्या त्या घाटी रुग्णालयात उपचार घेत असून, त्यांनी औषधोपचारासाठी नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधून आर्थिक मदतीची मागणी केल्या नुसार त्यांना कॅन्सर सविर्क्स (गर्भाशयाचा कर्करोग) साठी विषेष बाब म्हणून २५०००/- रुपये आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकातील प्राथमिक व पुर्व माध्यमिक शिक्षणचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिका शाळेच्या विदयार्थ्यासाठी शालेय पाठयक्रमाच्या व्यतिरिक्त इतर पुस्ताकंच्या माध्यमातून, जसे सराव पत्रिका इ. विदयार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास प्रयत्न करणे आवश्यक आहे. अलीकडेच युनीकेट प्रकाशक व वितरक पुणे यांनी इयत्ता १ ते ७ वी नव्याने अभ्यांसक्रमावर आधारित पुस्तके व सराव पत्रिका प्रकाशीत केलेली आहे, ही पुस्तके विदयार्थ्यांना व शिक्षकांना अत्यंत उपयोगी ठरेल कार्यनुभवावर हसत खेळत शिक्षण या शासनाचे धोरणावर आधारित पुस्तके व सराव पत्रिका तयार करण्यात आली आहेत. त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके विदयार्थ्यांचा वयोगट व त्यांची बौधीक क्षमता लक्षात घेऊन तयार केलेली आहेत. त्यामुळे विदयार्थ्यांवर येणारा बौधिक तणाव कमी करण्यास त्याची मदत होईल व या पुस्तकातील ज्ञान व माहिती विदयार्थ्यांना कायमस्वरुपी उपयोगात येऊ शकेल.

तरी महानगरपालिकेच्या शाळांतील विदयार्थ्यांना अशी पुस्तके मनपातर्फे उपलब्ध करुन देण्यासाठी इयत्ता १ ते ७ मराठी व उर्दु माध्यम या दोन्ही माध्यमातील शाळामध्ये युनीकेट प्रकाशक व वितरक पुणे यांच्याकडून खरेदी करण्यास पुणे महानगरपालिका, पिंपरी चिचवड मनपा, नाशिक, मनपा यांना ज्या सवलतीच्या दरात त्यांनी पुरवठा केला त्याख सवलतीच्या दरात औरंगाबाद महानगरपालिका यांना पुरवठा करावा या अटीवर औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे पुस्तके व सराव पत्रिका त्यांचेकडून घेण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक श्री अंबादास दानवे
अनुमोदक श्री काशीनाथ कोकाटे

**संवाद**

**श्री प्रकाश निकाळजे** जी पुस्तके वितरीत करणार त्यात किती टक्के सुट देणार माहिती दयावी. ३०% व ३५% सुट देत असेल तर मान्य करावे.

**श्री कुमावत अविनाश** पुणे, नाशिक, पिंपरी, चिचंवड मनपाला ज्या दराने पुरवठा केला त्याच किंमतीत औरंगाबाद मनपास पुरवठा करणार आहे. तशी मंजुरी देण्यात यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** सदर मनपाकडून कोणत्या रेटने या एजन्सीजकडून पुस्तके घेतली त्यांचा खुलसा घ्यावा व नंतरच पुढील कार्यवाही करावी.

**मा. महापौर** यात आपणाला लागतील तेव्हढीच पुस्तके घेता येतील व वरील पुणे, नाशिक, पिंपरी, चिचंवड मनपामध्ये कोणत्या रेटने पुस्तके या एजन्सीजने दिली. त्यांची माहिती उपआयुक्त (प्र.) यांनी घेऊन रेटस निश्चित करावे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री अफसरखान** एकाच एजन्सीज कडून पुस्तके मागवू नये. यासाठी निविदा काढण्यात त्यानुसार कार्यवाही व्हावी. या प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दयावी.

**मा. महापौर** सचिव यांनी या संदर्भात माहिती दयावी.

**नगरसचिव** युनीकेट पुणे एजन्सीज हे स्वतः प्रकाशक व वितरक असून, हे स्वतः पुस्तके छापतात व वितरित करतात असे प्रस्तावावरुन दिसते. त्यांची स्वतःची कंपनी असून पुणे, पिंपरी-चिंचवड व नाशिक मनपाला सवलतीच्या दरात पुस्तके दिलेले आहे.

**श्री अफसरखान** कोणात्या महानगरपालिकामध्ये काय दराने पुस्तके पुरवठा केला त्याचा संबंध नसून टेंडर पध्दतीने कार्यवाही व्हावी. महानगरपालिकेचा ज्यात फायदा आहे. त्यानुनसार कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर** या प्रस्तावात टेंडर मागवून कार्यवाही करावी.

**ठराव क्र. ३३/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या प्राथमिक व पुर्व माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी मनपाच्या शाळांतील विदयार्थ्यासांठी शालेय पाठयक्रमाच्या व्यतिरिक्त इतर पुस्तकाच्या माध्यमातून असे सराव पत्रिका इ. विदयार्थ्याचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी युनीकेट प्रकाशक व वितरक पुणे यांनी इयत्ता १ ते ७ नव्याने अभ्यासाक्रमावर आधारित पुस्तके व सराव पत्रिका प्रकाशित केलेली आहे त्या धरतीवर सराव पत्रिका इ. पुस्तके खर्रदी करण्यासाठी निविदा पत्रके मागविण्यात येऊन पुस्तके खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री सुभाष चाबुकसवार राहणार सिडको यांना हदयावरील शस्त्रक्रियेसाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधून रक्कम रुपये २५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) आर्थिक मदत देणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सूचक | श्री मोतीलाल जगताप. |
| अनुमोदक | श्री अंबादास दानवे |
| दिनांक | १७/७/२००० |

**मा. महापौर** विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात येते.

**ठाराव क्र. ३४/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री सुभाष चाबुकसवार यांना हदयावरील शस्त्रक्रियेसाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधुन विशेष बाब म्हणुन रु. २५,०००/- अर्थसाहय करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या स्थायी समितीस फक्त १० लाख पर्यन्तचे विकास कामाचे प्रस्ताव मंजुरीचे अधिकार आहेत. परंतु सध्याच्या काळात ३० लाखाचे

कामाची प्रस्ताव मंजूरीची क्षमता वाढविणेची अत्यंत गरज आहे जेणेकरुन शहराचे विकसात्मक कामे लवकर होणेस मदत होईल. तरी १० लाखाची क्षमता (अधकिार) वाढवून स्थायी समितीस (तीस लाख ) १० लाख पर्यंन्तचे प्रस्ताव मंजुर करण्याचे अधिकार देणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीसत्व सादर.

| | |
|---|---|
| सुचक | श्री विकास जैन |
| | श्री नंदुकुमार घोडेले |
| अनुमोदक | श्री अशरफ मोतीवाला. |
| दिनांक | १९/६/२०००. |

**संवाद**

**श्री प्रकाश निकाळजे** या विषयावर चर्चा झाली पाहिजे १० लाखाचे जे अधिकार आहेत. तेच ठेवण्यात यावे.

**श्री विकास जैन** नोव्हेंबर-डिसेंबर पर्यंत १० लाखाची कामे येतात १०-१० लाखाचे एकत्र वर्क ऑर्डर काढण्यात येतात. त्यासाठी १० लाख ऐवजी ३० लाखाचे जी कामे स्पील ओहर मध्ये जातात ती कामे लवकर होतील व १० लाख ऐवजी ३० लाखांचे अधिकार स्थायी समितीला देण्याची तरतुद असावी.

**श्री स. अली मिरा सलामी** या अगोदर ५ लाखाचे अधिकार स्थायी समितीला होते. १० लाख करण्यात आले आता ३० लाख केल्यास सर्वसाधारण सभेत प्रस्ताव येणार नाही. किंबहूना सर्वसाधारण सभेची आवश्यकताच नाही असे होईल. यासाठी १६ वार्ड एकत्र करुन वार्ड कमीटया कराव्यात त्या कमीटीत एक सभापती राहील. ५ ते ६ लाखापर्यंत प्रस्तावात मंजूरीचे अधिकार दयावेत परंतु स्थायी समितीलाच १० लाख ऐवजी ३० लाखाचे अधिकार प्राप्त करु नये. कोणतीच विकास कामे वेळेवर होणार नाही जे १० लाखाचे अधिकार आहेत तेच राहू दयावे.

**श्री विकास जैन** तुकडे करुन मंजूरी घेण्यात येते. एका प्रस्तावास २ तुकडे करुन मंजूरी घेतात. मागच्या वेळी ५ ते १० लाख केले. आता परत ५ लाख करावे.

**मा. महापौर** १० लाखाचे जे अधिकार आहेत तेच कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**श्री पंडगळे रतनकुमार** वार्डा कमीटीबाबत आतापर्यंत कार्यवाही झाली नाही. सभागृहाला माहिति दयावी.

**नगरसचिव** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) अन्वये १९९५ ला एकूण ४ प्रभाग समितीची निश्चित केलेली आहे व त्या संबंधीचे विशेष नियम तयार करुन शासनाच्या मंजुरीला पाठविलेले आहे व त्यास लवकरच मंजूरी येईल व कमीटी कार्यान्वित होण्याबाबत कार्यवाही होईल. ९५ मध्ये ४ वार्ड कमीटया करण्याची मंजूरी दिलेली असून, मनपाने जे नियम केले ते शासन मंजूरीला पाठविलेले आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** शासनाकडे केव्हा पाठवले. अदांजे कधी मंजूरी येणार आहे. ४ प्रभाग समित्या करणार एका वार्ड कमीटीमध्ये किती व कोणते वार्ड येणार याचा सविस्तर खुलासा करावा. अंमलबजावणी कधी करणार याचा पण खुलासा करावा.

**मा. महापौर** वार्ड कमीटीचे विशेष नियम तयार करुन शासन मंजूरीसाठी दिलेले आहे.

**श्री जयवंत ओक** इतर मनपामध्ये जे नियम आहेत त्या प्रमाणे कार्यवाही करावी. शासनाकडून मंजूरी येण्यासाठी ६ महिने, वर्षाचा कालावधी लागेल आता

कॉप मेंबरची निवडणूक घेतली या कमीटीमध्ये ते येणार आहेत किंवा काय? त्यानुसार पुन्हा वार्ड कमीटया तयार करण्यात याव्यात.

**नगरसचिव** १९९१ च्या जनगणनेवर आधारित १९९५ ला प्रभाग समित्या कार्यक्षेत्र निश्चीत झालेल्या होत्या एका प्रभाग समितीत २० ते २१ प्रभाग येतील. सुधारित वार्ड रचना झाली व आता ८३ वार्ड झाल्याने सुधारित वार्डानुसार प्रभाग समितीत कोणते वार्ड मोडतील त्याची तपासणी करावी लागेल वार्ड कमीटी शासनाकडे पाठवले नसून जे जादा नियम सभागृहाने मंजूर केलेले आहेत ते शासानाच्या मंजुरीच्या विचाराधीन आहे. तीन स्वीकृत सदस्यांची प्रत्येक वार्ड कमीटीत निवड करण्याची तरतुद आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** नवीन नियम तयार करण्याची गरज नाही, स्थायी समितीला जे नियम आहेत त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** शासनाकडे पाठविण्याची गरज नाही तो अधिकार आपले आहेत सभागृहाच्या समंतीने आपण निर्णय घ्यावा.

**मा. महापौर** प्रभाग समिती बाबतचा सविस्तर अभ्यास करुन पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

**ठराव क्र.३५/९ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्थायी समितीस १० लाख रुपयाचे कामाला मंजूरी देण्याचे अधिकार या अगोदर प्रदान केलेले आहे. त्यात कुठलीही वाढ न करता तेच अधिकार कायम ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६/१० :**

सौ शहालता जैन हया कॅन्सर सारख्या दुर्दश आजाराने ग्रस्त आहे त्यांच्या उपचारासाठी ३५ हजार रु. आवश्यकता आहे. आमच्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने एवढा खर्च करणे आवाक्या बाहेर आहे. त्या करिता माणुसकीची दृष्टीकोनातून आपणाकडे मदतीची अपेक्षा करीत आहे. अत्यंत नम्रतेची कळकळीची विनंती आहे. पवनकुमार.

सुचक श्री नंदूकूमार फलारी
अनुमोदक श्री वसंत नरवडे पाटील.

**मा. महापौर** ३५ हजार रुपया ऐवजी नियमाने २५,०००/- हजार रुपये विशेष बाब म्हणून आर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. ३६/१० :**

सभागृहातील चर्चेनुसार सौ. शहालता जैन यांना कॅन्सर सारख्या दुर्दश आजार झालेला असून, या आजाराच्या उपचारासाठी त्यांनी नगरसेवकाच्या स्वेच्छा निधी म्हणून अर्थसाहय मिळण्याची मागणी केल्यानुसार २५,०००/- रु. विशेष बाब म्हणून अर्थसाहय देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुख्यलेखा परिक्षक हे पद बऱ्याच दिवसापासून रिक्त असल्यामुळे अनेक काम खोळबंले असल्यामुळे या पदावर त्वरीत प्रतिनयुक्तीवर बोलविण्यात यावे कायम समावेश करु नाही. असा ठराव मंजूर करावा.

सुचक श्री रतनकुमार पंडागळे
अनुमोदक श्री दलबीरसिंग जाबिंदा

**मा. महापौर** मुख्यलेखा परिक्षक हे पद प्रशासनाने तात्काळ भरण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. ३७/११ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्यलेखा परिक्षक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/१२** सिडको विभागातील लोकसंख्या लक्षात घेता त्या ठिकाणी सिडको विभागाने एकही नाटयगृह बांधुन दिलेले नाही. परंतु सिडको विभागाकडुन नाटयगृहासाठी जागा आरक्षित केलेली आहे व ती जागा मनपाच्या ताब्यात देण्याची कार्यवाही चालू आहे. सदर जागेवर मनपाच्या वतीने लवकारात लवकर १८०० ते २००० क्षमतेचे अदयावत रंगमंदिर बांधुन जनतेची गैरसोय दूर करावी त्या करीता येत्या अंदाजपत्रकात ५० लाखाची तरतुद करावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक सौ जयश्री विजया कुलकर्णी
श्री सुदाम सोनवणे
अनुमोदक श्री राजु आर शिंदे
सौ लिलावती घायातिलक
श्री भगवान रगडे.

**ठराव क्र. ३८/१२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या वतीने सिडकोत अदयावत रंगमंदिर बांधण्यासाठी येत्य अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतुद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *सभागृहातील चर्चा*

**अफसरखान यासीनखान** नागपाल बिल्र्डरच्या संदर्भात ज्या संचिका सिल केलेल्या होत्या व प्रत्यक्ष सिल काढण्यात आल्यानंतर मा. आयुक्तांनी आश्वासन दिले की, जी जागा मनपाच्या संबंधित बिल्डरच्या ताब्यात गेलेली असेल ती घेण्यात येईल. जागा घेतली किंवा काय संबंधितात नोटीस दिली की नाही सविस्तर खुलासा करावा.

**मा. महापौर** ज्यांच्या साहयाने संचिका सिल केल्या होत्या त्यांना लेखी पत्र देवून त्याच्या पदाधिकारी यांच्या समक्ष संचिकाचे सिल काढले व त्या संचिका मा. आयुक्ताकडे चौकशीसाठी देण्यात आली मा. आयुक्तांनी याची माहिती

दयावी असे ठरले. १५ दिवसात अहवाल द्यावा. असे ठरले होते. जागा ताब्यात घेतली किंवा नाही.

**अफसरखान यासीनखान** संबंधितास नोटीस का दिलेली नाही याचा खुलासा करावा.

**स. अली मिरा सलामी** सिल सभागृहात केले व आपल्या दालनात सिल काढले आम्हास माहिती नाही. मोजक्या लोकांनां बोलावून उघडतात.

**मा. महापौर** सदर अहवाल १५ दिवसात येईल. दोषी असेल तर कार्यवाही करण्याचे आदेश मा. आयुक्तांना देण्यात येतील. नगररचनाकार यांनी माहिती द्यावी.

**नगररचनाकार-१** जागेची मोजणी भूमी अभिलेख खात्याकडून करण्यात येत आहे. मोजणी झाल्यानंतर ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**अफसरखान यासीनखान** सि. सर्व्हे कार्यालयातील सर्व कागदपत्र मागवून घेण्यात येईल. जो भाग आपला तो ताब्यात घेणे २४ तासात का कार्यवाही झाली नाही. मा. आयुक्तांनी स्पष्ट सांगितले होते. ताबडतोब ताब्यात घेण्यात येईल.

**मा. महापौर** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**नगररचनाकार-१** जागेची मोजणी ३० मार्चला झालेली आहे. जो नकाशा मिळाला त्यानुसार हद्द मार्क करुन देतील. जागा ताब्यात घेण्यात येईल.

**मा. महापौर** महानगरपालिकेच्या जागेवर कुणी बिल्डर जागा घेऊन अतिक्रमण करत असेल तर अशी जागा मनपाने ताबडतोब ताब्यात घ्याव्यात व उदयाच संबंधित नागपाल यांनी मनपाचे जागेवर केलेले अतिक्रमण मोजणी करुन मनपाची येणारी जागा ताबडतोब ताब्यात घ्यावी.

**श्री सुदाम सोनवणे** या अगोदर प्र. आयुक्त म्हणून असलेले चहल साहेब यांनी मनपाची फक्त ३२ हजार चौ. मी. जागा असल्याचे दाखविले परंतु ज्या संचिका सिल केल्या त्या यासाठी की, मनपाच्या जागा ५४ हजार चौ. मीटर निघते. आता सध्याचे आयुक्त सांगतात. कागदपत्र मागवून मोजणी करुन जागा घेण्यात येईल. त्यांनी जनतेसमोर किंवा पत्रकार परिषदेत सांगावे ५४ हजार चौ. मी. जागा असतांना ३२ हजार चौ.मी. फक्त मनपाची जागा आहेत असे दाखविण्यात येते. बाकीची जागा कुठे? याचा सविस्तर खुलासा होत नाही.

**मा. महापौर** संबंधित नगररचना विभागाचे अधिकारी यांनी संबंधित ठिकाणी जाऊन मोजमाप करुन द्यावे. तेव्हा मनपाची जागा किती निघते हे कळेल. संबंधित बिल्डरने घेतलेली जागा त्वरील ताब्यात घेण्यात यावी.

**श्री जाबिंदा दलबीरसिंग** जुने व नविन रेकॉर्ड सि. सर्व्हे मधील कार्यालयात बघावे त्यानुसार नेमकी किती जागा मनपाची आहेत ते समजेल.

**श्री काशीनाथ कोकाटे** पत्रकार परिषदेत त्यावेळी ५४ हजार चौ. फुट जागेवर अतिक्रमण होते, त्यापेक्षा कमी कसे होते, उलट जास्त निघावे, दबावाखाली येऊ नये.

**श्री रतनकुमार पंडागळे** मनपाच्या मालकीच्या जागा बिल्डरांनी अतिक्रमण करुन व इतर अतिक्रमण झालेल्या किती जागा आहेत याचा शोध घ्यावा. त्यामुळे मनपाचे नुकसान होणार नाही. चौकशी करावी.

**श्री स. अली मिरा सलामी** सर्वे नं. ९/२ च्या संदर्भात दै. मरावाडा वृत्तपत्रात बातमी आलेली आहे, की आयुक्तांनी स्थगिती देवून काम थांबविले ताब्यात घेण्याची कार्यवाही होत आहे. औरंगपुरा येथील एका जागेवर बांधकाम चालू होते. त्या संदर्भात सभागृहात चर्चा झालेली होती व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी असा निर्णय झाला होता. तरी पण काही कार्यवाही झालेली नाही.

सिटी सर्व्हे कार्यालय व काही बिल्डर्स रोकॉर्ड खालीवर करुन मनपाच्या मालकीच्या जागा गिळंकृत करत आहे.

**मा. महापौर** नागपाल बिल्डर्सने एकूण ५४ हजार चौफुट जागेवर अतिक्रमण केलेले आहे. अशी चर्चा झाली व या बाबतीत नगररचना विभागातील अधिकारी यांनी सदर जागेची तपासणी करुन मनपाची किती जागा संबंधित बिल्डर्सने घेतली याची चौकशी करावी. जर अतिक्रमण केलेले असेल तर ते तोडण्यात यावे व शहरातील मनपाच्या जागेवर ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे ते तात्काळ वाढण्यात यावे तसेच स. न. ९/२ मधील शहानुर वाडी येथील अतिक्रमण झालेले असेल तर मोजमाप करुन तात्काळ काढावे व औरंगपुरा जिजामाता कॉलनी येथेही बांधकामास नगररचना विभागाची परवानगी नसेल तर

झालेल्या बांधकामाची चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री स. अली मिरा सलामी** न्यायालयात प्रकरण आपणच नेले. खुलासा करावा, जिजामाता कॉलनी जागा एकाची व वाटाघाटी दुसऱ्या बरोबर.

**श्री सुनील वडागळे** कामगाराच्या भरतीत घोळ झालेला असून १९९१ पासून जे काम करत आहेत अशांना कायम नियुक्ती पत्रे दिली नाही. तसेच ९४-९५ ही काही कर्मचारी यांना नियुक्ती पत्र दिली नाही. सुनिल गोवर्धन खैरनार हे ९१ पासून बजाज कंपनी मध्ये काम करतात. त्यांना नियुक्ती पत्र दिले आहे. तसेच साहेबराव आनंदराव हे सतत गैरहजर असतांना त्यांना नियुक्तीचे कायम स्वरुपी आदेश दिले. ज्यांनी कामच केले नाही. त्यांना कशाच्या आधारावर नियुक्तीपत्रे दिली याची संपूर्ण चौकशी होऊन अहवाल सादर करावा.

**श्री अंबादास दानवे** विशेष सभा बोलावून २०० कामगार भरतीचा प्रश्न सोडविण्यासाठी निर्णय घेण्यात येऊन कामगारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली. दिलेल्या नियुक्ती पत्र संदर्भात बऱ्याचशा तक्रारी पदाधिकारी मा. महापौर, मा. आयुक्त व काही सन्माननीय सदस्यांकडेही प्राप्त झालेल्या आहेत. यात कामगारांचे वय ३० वर्षे ते २० वर्षापुर्वीच कामावर दाखविले. वयाच्या १० वर्षापासून कामावर होते का. एकाच्या नावांवर दोन काम एक करतो नियुक्ती दुसऱ्यास देण्यात येते. काही कर्मचारी १०,१२,१४ वर्षापासून रोजंदारीवर कामे करतात. त्यांची नियुक्ती झालेली नाही. काही कर्मचारी ४-५ वर्षापुर्वीचे असून सध्या कामावर नसतांना त्यांना आदेश देण्यात आले. अशा कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. दुसरे असे की, काही कर्मचारी यांचे जागेवर दुसरे कुणी काम करते असे दिसून येते व जे कामे करतात त्यांचे नांवासारखे दुसऱ्या कर्मचाऱ्यांना पती व वडील त्यांचे नांव न दाखविता नियुक्ती पत्रे देण्यात आली जे की, ते कर्मचारी न्यायालयाच्या ज्येष्ठेता यादील व सर्वसाधारण सभेच्या निर्णयामध्ये बसत नाही. जी यादी करण्यात आली ती मुळातच चुकीची असून संबंधित अधिकारी यांनी दिशाभूल केली व नियुक्ती पत्रे दिली. ती यादीनुसार नसून यादीत बदल केलेला आहे. असे माझे स्वत:चे मत आहे. नियुक्ती पत्रे देतांना अधिकारी यांच्यावर भ्रष्टाचार केलेल्या तक्रारी पण प्राप्त झालेल्या आहेत. या बाबतची संपूर्ण चौकशी व्हावी व तसे आदेश मा. आयक्त यांना देण्यात यावे. तसेच २०० पदांना शासनाने दिलेल्या मंजूरीच्या पत्रात वाल्मीकी समाजाच्या

लोकांना भरती करतांना जास्तीत जास्त प्राधान्य देण्यात यावे असे नमुद केलेले आहे. परंतु तशी काहीही कार्यवाही प्रशासनाने केलेली दिसून येत नाही. या सर्वच मुद्यांच्या व ज्येष्ठेता यादीच्या संदर्भात सविस्तर चौकशी करुन अहवाल सभागृहात मागवावा.

**श्री स. अली मिरा सलामी** जी ज्येष्ठता यादी तयार केली त्यात काहींची नांवे चुकीची आहे. काहींनी यासंबंधी तक्रारी केल्या तर अधिकारी स्वतः सांगतात न्यायालयात जावे. न्यायालयाच्या यादील बदल केलेला असून त्याच बरोबर अधिकारी सभागृहाची दिशाभूल करतात. काहीचे आडनांव तर काहीचे पतीचे जागेवर वडिलांचे तर काहीचे वडिलांच्या जागेवर पतीचे तर काहींच्या स्वतःच्या नावांत चूक झालेली दिसून येते. न्यायालयाने जी यादी केली. त्यानुसार भरती झालेली पाहिजे. एक कर्मचारी यादीत नांव असतांना व सन ८८ पासून झोन क्र. ३ मध्ये काम करीत असतांना यादीतून डावलण्यात आले व संबंधितास नियुक्ती पत्र देण्यात आले नाही. सदर व्यक्ती वाल्मीकी समाजाची आहे व काहींची अडवणुक करुन उपलब्ध नसलेल्या कागदपत्रांची मागणी करण्यात येत आहे. मुळ कागद पत्रांची मागणी करण्यात येते. या संदर्भात चौकशी करुन दोषींवर कार्यवाही व्हावी.

२. शिक्षण विभागामध्ये १० चौकीदार १७ वर्षापासून वेतनश्रेणीवर काम करतात. तीन महिन्यांपासून त्यांना आदेश देण्यात आले नाही. तशी त्यांनी तक्रार केली व या संदर्भात पत्रकार यांचेक्डेही सूचना केली व त्यानुसार वृत्तपत्रात बातमी ही प्रसिध्द झाली. यात मनपाची बदनामी होते व जे कर्मचारी १७ वर्षापासून वेतनश्रेणी प्रमाणे काम करतात व त्यांना कायम स्वरुपी आदेश का देण्यात येते नाही. त्यांची नियुक्ती वेतनश्रेणीवर कोणता निकष लावून केलेली होती. यांनतर देण्यात येणारे आदेश दैनिक वेतनावर देण्यात येणार आहे असे समजते व सदर चौकीदारांची पदे सध्या मंजूर नसल्यामुळे कायम करता येत नाही असे रिमार्कस (Remarks) काही अधिकाऱ्यांचे आले आहे असे समजते. तर त्यांना वेतनश्रेणीवर अगोदर कसे घेण्यात आले आता त्यांनी सेवाज्येष्ठेता यादी तयार करुन १० चौकीदार यांना कायम करण्यात यावे व त्यांचे सेवापट पुस्तक तयार करुन त्यांना कायम सेवा नियुक्ती पत्र देण्यात यावे. यापैकी एक पागल झाला आहे. आता ९ राहिले आहे. यात जी चुक झाली ती वॉचमनची नाही. शासनाला पाठवून करावा. आदेश काढण्याचे आदेश द्यावेत.

**श्री सुदाम सोनवणे** दोनशे कामगारांच्या भरतीमध्ये बरेच काही गैरप्रकार झाले. अधिकारी यांचेवर भ्रष्ठचाराचे आरोपही केले आहे. निर्दशनास आणुन देतो की, चार कर्मचाऱ्यांचे वय आजपर्यंन्त २६ ते २८ वर्षाचे असून १२ वर्षापासून सेवा करतात असे दाखविण्यात येते. त्यांचे ज्येष्ठेता यादीत नांव येऊन त्यांना नियुक्ती पत्रे देण्यात येते तर, यादीत नांव कसे आले याचा खुलासा व्हावा. या संबंधीची माहिती घेतली. असता व्यवस्थित उत्तरे मिळत नाही. या विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या हिताच्या दृष्टीने मंजूर म्हणून नियुक्ती असतांना शिपायाच्या नियुक्त्या केल्या. जे वयात बसत नाही. त्यांना कायम नियुक्तीचे आदेश दिले व ज्यांचे वय संपत आले अशांना कायमचे नियुक्ती पत्र दिले नाही. असे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी

चुकीच्या पध्दतीने भरती केले. या बद्दलची संपूर्ण चौकशी व्हावी व संबंधितांवर नियमाने योग्य ती कार्यवाही करावी.

**श्री सुनिल वडागळे** चौकशी करुन अहवाल सभागृहात सादर करावा. जे अधिकारी दोषी असल्यास त्यांच्यावर काय कार्यवाही करणार याचाही खुलासा व्हावा.

**श्री प्रकाश निकाळजे** कोणते कर्मचारी वयात बसत नसतांना नियुक्ती पत्रे दिली अशांची लेखी तक्रारीसह प्रशासनाकडे पत्र देण्यात यावे. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री जयवंत ओक** नियुक्त्या करतांना चुकीच्या पध्द्तीचा अवलंब केला. कामावरती व त्यांचे आदेश दुसऱ्याच्या नावांवर केले. बरेच कर्मचारी आमची ज्येष्ठता असतांनासुध्दा नांव नाही व नियुक्ती पत्र दिली नाही. म्हणून २० ते २५ कर्मचारी दररोज मनपाच्या आवारात दिसून येतात व ते पदाधिकारी महापौर मा. आयुक्त उप-आयुक्त (x) यांचेकडे लेखी निवेदन व मुळ कागदपत्रांच्या प्रती घेऊन आपली तक्रार मांडत आहेत. परंतु अधिकारी त्यांची तक्रार ऐकून घेण्यास तयार नाही. उप आयुक्त (प्र.) यांनी त्याच्याकडील मुळ कागदपत्र व त्यांची लेखी तक्रार घेऊन त्याचे निवारण करावे. त्यांचेवर जर अन्याय होत असेल तर त्यांना न्याय द्यावा. तक्रारी नोंदविलेल्या पैकी खरोखरच ज्येष्ठेता यादीत येतात काय याचा खुलासा करावा.

**श्री रतनकुमार पंडागळे** एक कर्मचारी यांनी कायमस्वरुपी आदेश मिळावे म्हणून मनपा कार्यालयासमोर उपोषणांस बसलेले होते. त्यांनी ७ दिवस उपोषण केले. ७ व्या दिवशी कामगार अधिकारी यांनी सांगितले. सुरत पॅटर्न मध्ये काम करीत होते. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याचे काही म्हणणे ऐकून न घेता कामगार अधिकारी यांनी त्यांच्या सहीने आदेश काढून सुरक्षा विभागातील काही सुरक्षा रक्षकांनी संबंधित कर्मचाऱ्यास धक्का बुक्की करुन उपोषण मागे घेण्यास लावले व तो कर्मचारी सध्या घाटी दवाखान्यात उपचार घेत आहे. माझ्या समक्ष ही घटना घडली असून संबंधित अधिकारी यांना स्वतःच्या सहीने आदेश काढण्याचे अधिकार कुणी दिले याचा खुलासा व्हावा.

**मा. महापौर** उप. आयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त** सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार २०० कामगारांची कायम स्वरुपी भरतीचे आदेश देण्यात यावे. त्यानुसार सन १९९५ च्या न्यायालयीन ज्येष्ठेता यादीनुसार २०० कर्मचाऱ्यापैकी १७४ कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती पत्रे देण्यात आलेले आहे. काही नियमात बसत नाही, काहींकडे कागदपत्रांची पूर्तता होत नाही म्हणून आदेश दिले नाही एक कर्मचारी दुसऱ्याच्या नावांवर काम करतो असे म्हणून आदेश देण्यात आले व ते निर्दशनास आल्याने रद्द करण्यात आले. ज्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही केलेली असून न्यायालयाच्या यादी व्यतिरिक्त कुणाचा समावेश करण्यात आलेल असेल तर ते आदेश रद्द ठरविण्यात येतील. त्याबाबतची संपूर्ण तपासणी चालू आहे व बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यांची चौकशी करुनच योग्य निर्णय घेता येईल. तसा अहवाल पुढील सभेत सादर करण्यात येईल.

**श्री जयवंत ओक** आता सध्या २० ते २५ कर्मचारी खाली मनपा आवारात उभे आहेत. ते १० ते १५ वर्षापासून काम करतात व ते १५ ते २० दिवसांपासून दरोरज

मनपा कार्यालयात चकरा मारतात त्यांचे म्हणणे उप आयुक्त (प्र.) यांनी बैठक संपल्यावर ऐकून घ्यावे व त्यांना योग्य न्याय द्यावा.

**उप. आयुक्त (प्र.)** काहींच्या तक्रारी घेतलेल्या आहेत. ज्यांच्या तक्रारी येतील त्या घेतल्या जातील व संबंधित कर्मचाऱ्यांचे काय म्हणणे आहे तेही ऐकून घेतले जाईल व जे न्यायालयाच्या यादीत बसत असतील तर त्यांना न्याय देण्यात येईल. दुसरे असे की, कामगार अधिकारी यांनी पाटोळे नावाच्या कर्मचारी यांच्याबाबतीत जे प्रकरण घडवून आणले त्या संबंधी सूचना केल्या. त्यांची सविस्तर प्रशासकीय पातळीवर चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल. कोणीही उपोषणाला बसावे व दबाव टाकावा हे योग्य नाही.

**श्री अफसरखान यासीनखान** श्रीमती नेहरी उपोषणास बसली होती. शनिवारी आदेश देण्यात येईल म्हणून तीचे उपोषण सोडायला लावले. आज गुरुवार अद्याप आदेश नाहीत का दिले नाही याचा खुलासा करावा. ११ अभियंत्यांना पुन्हा कामावर घेण्याचे आश्वासन दिले होते. कार्यवाही झाली नाही. तसेच २०० कामगारांच्या भरतीमध्ये झालेल्या गैरप्रकार व नावातील घोळ यासंबधी चौकशी करुन अहवाल देण्यात येईल असे सांगितले जाते. आतापर्यंत अधिकारी यांनी काय केले?

**श्री सुनिल वडागळे** चार कर्मचारी बऱ्याच दिवसांपासून सेवा करत आलेले आहे. त्यांना कायम आदेश देण्यात आलेले नाही. ज्यांना पैसे घेऊन कामावर घेतले अशा तक्रारीचे काय करणार?

**मा. महापौर** ज्या कर्मचाऱ्यांना या संबंधितांच्या तक्रारी द्यावयाच्या झाल्यास त्यांनी उप आयुक्त (प्र.) यांचेकडे द्याव्यात व ज्या तक्रारी आले त्यांचे ते माहिती देतील तक्रारींचे निवारण ते पाच पदाधिकारी, मा. आयुक्त यांचे समोर करतील. जर पैसे घेऊन कुणी नोकरी लावण्याचे आश्वासन दिले अशांची नांवे मा. आयुक्त यांचेकडे त्यांच्या नावांसहित लेखी तक्रार करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** सन्माननीय सदस्य यांनी कामावर न घेतल्याबाबत काही कर्मचाऱ्यांचे बाबतीत तक्रार केल्यामुळे पुन्हा पुन्हा तक्रारी येतच राहतील. ज्या ज्या तक्रारी येतील त्यांचे उप आयुक्त किंवा आपल्या दालनात सर्व तक्रारीचे निवारण करावे, सभागृहाच्या निर्णयांनुसार अंमलबजावणी व्हावी.

**श्री स. अली मिरा सलामी** शिक्षण विभागातील १० चौकीदारांचे आदेश काढले नाही. खुलासा व्हावा व त्यांना दैनिक वेतनावरील आदेश न देता वेतनश्रेणीवर कायमचे आदेश द्यावे.

**उप आयुक्त (प्र.)** चौकीदाराचे आदेश देण्या संदर्भात संचिका मा. आयुक्तांच्या मंजुरीला पाठविण्यात आलेली आहे. सदर १० चौकीदार १० वर्षापासून नियमित आदेश देण्यात आलेले आहे. लेखा परिक्षणात मंजूरी नसतांना पगार कसा दिला, शासनाची मंजूरी नाही. त्यामूळे पगार देय नाही. अशी टिप्पणी आली.

**श्री स. अली मिरा सलामी** ११ महिने २-२ दिवस खंड देवून या १० लोकांना एक व इतरांना एक असा प्रश्न आहे. आपण चूक केलेली आहे ती आपण निभवावी. ही पदे शासन मंजूरी नाही. इतर प्रकरणात सर्वसाधारण सभेचा निर्णय शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात येतो. शासनाच्या मंजूरीपूर्वी अंमलबजावणी होते. प्रशासनावर आर्थिक बोजा नाही. १५.२० रुपयांचा फरक पडणार आहे.

प्रशासनाने वेतनश्रेणी दिली. त्यावेळी त्याची मागणी नव्हती. आता मात्र दैनिक वेतनावर ओदश काढण्यात येते आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** शासनाची या पदांना मंजूरी नव्हती तर संबंधित कर्मचाऱ्यांना १० वर्षापासून वेतनश्रेणीप्रमाणे वेतन कसे देण्यात येते. पदे मंजूर होती काय? अगोदर वेतन श्रेणीवर आदेश द्यावयाचे व पदे मंजूर नाही. म्हणून दैनिक वेतनाचे आदेश देणे चुकीचा पायंडा आहे. ती जबाबदारी अधिकारी यांची येत नाही काय? यात दोष कुणाचा, त्याचप्रमाणे बालवाडी सेविकांचे झालेले आहे. किती कर्मचाऱ्यांचे आदेश काढले, कुणाचे काढले नाही, किती कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत आहे. याचा विचार करुन अधिकारी यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे. ज्या कर्मचाऱ्यांनी कामे केली आहेत त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला दिला गेला पाहिजे.

**मा. महापौर** जे नियमित सेवा करतात अशा कर्मचाऱ्यांचे वेतन थकित ठेऊ नये व नियमितपणे त्यांचे ज्या ज्या विभागाकडून आदेश पारित होण्याची कार्यवाही झाली पाहिजे व १० चौकीदार यांना अगोदर वेतनश्रेणीचे आदेश दिले व आता दैनिक वेतनावर घेणे योग्य वाटत नसून, यात दोष कुणाचा याबाबत मा. आयुक्त यांनी चौकशी करावी व यापुढे अशी चूक प्रशासनाने होऊ देऊ नये.

**मा. महापौर** सौ नेहरी हया आपल्याकडे कर्मचारी होत्या. त्यांना आदेश दिले नाही खुलासा करावा.

**उप आयुक्त (म)** सौ. नेहरी हया ज्या विभागात काम करत होत्या ते पद संपुष्टात आले त्या क्राप्टटिचा म्हणून काम करीत होत्या. त्यानंतर त्यांना कमी करण्यात आले होते. परंतु त्यांनी त्यावेळी निवडणूकांच्या काळात कामावरुन कमी केल्यामुळे उपोषण केले व त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार व त्यांच्या मागणी नुसार त्यांचे उपोषण मागे घेण्यात येऊन त्यांना ३ महिन्यासाठी आदेश देण्यात आले व तीन महिन्याचे आदेश संपल्यानंतर पुढील मुदतवाढ मिळत नाही म्हणून उपोषणास बसल्या व त्यांचे उपोषण मागे घेऊन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात पुन्हा आदेश देण्यात येतील असे आश्वासन दिल्यानुसार संबंधित मुदतवाढीची संचिका मा. आयुक्तांच्या मंजूरीला असून, कोणत्या विभागात जागा रिक्त आहे हे पाहून त्यांना लवकरच आदेश देण्यात येतील.

**मा. महापौर** प्रशासनाने त्यांचे त्वरीत आदेश पारीत करावे.

**श्री अंबादास दानवे** प्रश्न देऊन आस्थापना -१ विभागाकडून माहिती विचारली होती की, अस्थापनेवर वर्ग १ व २ चे किती कर्मचारी आहेत, किती जागा रिक्त आहे, किती कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने नेमणुका केल्या सध्या कोणकोणते अधिकारी प्रभारी अधिकारी म्हणून पदावर आहेत. यात असा खुलासा केला की, विधी सल्लागार हे पद ४-५ वर्षापासून रिक्त आहे व मला याबाबत असा खुलसा पाहिजे की, किती दिवस प्रभारी चार्ज म्हणून पद ठेऊ शकतो. प्रभारी अधिकारी म्हणून काम करीत असलेल्या पैकी, १) श्री गायकवाड, प्रभारी प्रशासकीय अधिकारी, २) सौ कुलकर्णी प्रभारी शिक्षणाधिकारी, ३) श्री शिरसाठ, प्रभारी विधी सल्लागार, ४) श्री सिकंदर अली, प्रभारी कार्य अभियंता (स्लम) आहेत काय? व विधी सल्लागार या पदासाठी मुलाखत झ ाली. त्यासंबंधी काय झाले, खुलासा व्हावा.

**मा. महापौर** वर्ग-१ व वर्ग-२ ची जी पदे रिक्त आहेत ती भरण्याची कार्यवाही व्हावी पदे न भरल्यास जनतेची कामे वेळेवर होणार नाही यांची जाणीव प्रशासनाने ठेवावी व विभागावाईज जी पदे रिक्त आहेत ती तात्काळ भरावी व विधी सल्लागार या पदाच्या संदर्भात खुलासा करावा.

**उप आयुक्त (म)** विधी सल्लागार श्री शिरसाठ, प्रशासकीय अधिकारी श्री गायकवाड, शिक्षणाधिकारी सौ कुलकर्णी इ. पदावर सध्या प्रभारी अधिकारी म्हणून चार्ज देण्यात आलेला असून यात कसल्याही प्रकारची ज्येष्ठता म्हणून ही पदे त्यांचेकडे सोपवलेली नाही. प्रतिनियुक्तीने मनपात उप आयुक्त-१, उपसंचालक नगररचना, मुख्य लेखा परिक्षक व शिक्षणाधिकारी या चारच पदावर शासनाने नेमून दिलेले अधिकारी येतात. शिक्षणाधिकारी या पदावर सक्षम व कायमचे अधिकारी असावे यासाठी स्वत: मा. आयुक्त यांनी मा. संचालक (शिक्षण) यांचेशी संपर्क कार्यवाही केलेले आहे. लवकरच या पदावर अधिकारी येतील.

**श्री स. अली मिरा सलामी** प्रभारी शिक्षणाधिकारी चांगले काम करत नाही. त्यांची बदली व्हावी.

**मा. महापौर** मनपामध्ये ज्या ज्या विभागात अधिकारी यांची पदे रिक्त आहेत ती नियमानुसार भरण्याची कार्यवाही व्हावी. त्यामुळे विकास कामांस हातभार लागेल व पदे भरण्याबाबत काय कार्यवाही केली याची संपूर्ण माहिती पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी द्यावी.

आता चुंबकीय गादया संदर्भातील अहवाल प्राप्त झालेला आहे. या अहवालानुसार चर्चा करावी.

**मा. महापौर** चुंबकीय गादया संदर्भात मागील बैठकीत कमीटी नेमली होती त्या कमीटीने गादया संदर्भात आकारण्यात आलेल्या जकात बाबत अहवाल द्यावा असे ठरले होते. सदर कमीटीने आपला अहवाल सादर केलेला आहे. बी-बीयाणे तसेच वतन टेक्स्टाईल्स यावर जकात आकारण्यात यावी असे त्या बैठकीत ठरले होते व गादयाबाबत अहवाल द्यावा असे ठरल्यानुसार सदर कमीटीने अहवाल सादर केला आहे. तो उप-आयुक्त यांनी निष्कर्ष सभागृहात वाचून दाखवावा.

(कमीटीने दिलेला अहवाल बंद लखोटयातून मा. महापौर उघडतात.)

**मा. उप आयुक्त (प्र.)** (कमीटीने सादर केलेला अहवाल वाचून दाखवितात.)

दिनांक २०/६/२००० रोजीच्या सर्वसाधारण सभेत मा. महापौर यांनी निर्देशित केल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत जपानी चुंबकीय गादया आयात केल्या जातात. परंतु त्यांची पूर्ण जकात भरली जात नाही यावी व इतर बाबतीत पुर्ण, कोल्हापुर महानगरापालिकेत काय परिस्थिती आहे. याची माहिती घेण्यासाठी एका समितीचे गठण करण्यात आले. त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री प्रकाश निकाळजे | सन्माननिय सदस्य |
| २) | श्री प्रशांत देसरडा | सन्माननिय सदस्य |
| ३) | श्री एम. वाय. कांबळे | उप आयुक्त (प्र.) |
| ४) | श्री महेंद्र खैरनार | मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री रविंद्र निकम | जकात अधिक्षक |

सदरील समितीची प्राथमिक बैठक दि. १२/७/२००० रोजी होऊन सदर बैठकीत दि. १७/७/२००० रोजी पुण व कोल्हापुर येथे दौरा निश्चित करण्यात आलेला होता. त्यानुसार समितीतील सर्व सदस्यांनी पुणे व कोल्हापूर येथील महानगरपालिका जकात विभागास भेट देवून ज्येष्ठ आधिकाऱ्यांशी समक्ष चर्चा केली. त्याचा अहवाल खालील प्रमाणे देण्यात येतो.

१) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये वेळोवेळी जपानी चुंबकीय गादया आयात झालेल्या असून त्यांची जकात मे. फ्रंटीइअर ट्रेंडींग कंपनीने दाखल केलेल्या साठा स्थलांतर देयकावर (स्टॉक ट्रान्सफर इन्व्हॉईस) दर्शविलेली किंमत ग्राहय धरुन नियमाप्रमाणे पुणे महानगरपालिकेने जकात कर वसुल केलेला आहे. सोबत स्टॉक ट्रान्सफर देयकाची पत्र व पुणे महानगरपालिकेची जकात भरणा पावती जोडली आहे.

२) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीत जपानी चुंबकीय गादंयाची आयात झालेली असून त्यांची जकात सुध्दा मे. फ्रंटीइअर ट्रेडींग कंपनीने दाखल केलेल्या साठा स्थलांतर देयकावर (स्टॉक ट्रॉन्सफर इन्हॉईस) दर्शविलेली किंमत ग्राहय धरुन नियमाप्रमाणे कोल्हापूर महानगरपालिकाने जकात कर वसुल केलेला आहे. सोबत स्टॉक ट्रॉन्सफर देयकाची पत्र व कोल्हापूर महानगरपालिकेची जकात भरणा पावती जोडलेली आहे.

**निष्कर्ष** पुणे व कोल्हापूर महानगरपालिके प्रमाणेच औरंगाबाद महानगरपालिकेने मे. फ्रंटीइअर ट्रेडींग कंपनीने दाखल केलेल्या साठी स्थलांतर देयकावर (स्टॉक ट्रॉन्सफर इन्हॉईस) दर्शविलेली किमंत ग्राहय धरुन नियमाप्रमाणे जकात कर वसुल केलेला आहे. करीता पुणे व कोल्हापुर महानगरपालिकेप्रमाणेच (स्टॉक ट्रॉन्सफर इन्हॉईस) साठा स्थालांतर देयकात दर्शविलेली किंमत ग्राहय धरणेकरिता मुळ बिल ऑफ इंट्री नुसार (स्टॉक ट्रॉम्सफर इन्हॉईस) साठा स्थलांतर देयकाची पडताळणी करुन संबंधित पार्टी मार्फत मालाची किंमत व डागाची संख्या व संदर्भात (डिकलेरेशन फॉर्म) डिकलेरेशन फॉर्म भरुन घेण्यात येवून जकात कर वसुलीची कार्यवाही करण्याची शिफारस समिति करीत आहे.

करीता अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (प्रकाश निकाळजे) | (प्रशांत देसरडा) | (एम. वाघ. कांबळे) |
| सन्माननिय सदस्य. | सन्माननिय सदस्य. | उपआयुक्त (प्र.) |

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (एम. पी. खैरनार ) | (रविंद्र निकम) |
| मुख्यलेखाधिकारी. | जकात अधिक्षक. |

**श्री सुदाम सोनवणे** शहरामध्ये किती जपानी गादया आलेल्या असून आतापर्यंन्त जकात म्हणून किती रक्कम वसुल करण्यात आली.

**श्री अफसरखान** सादर केलेल्या अहवालानुसार आपल्याकडील आलेल्या गादंयावर किती जकात आकारण्यात आली व जास्तीची जकात काढवयाचे झाल्यास आणखी

वसुली होऊ शकेल. मा. महापौर व मा. आयुक्त याची जपानी गादंया संदर्भात एक तास चर्चा झालेली आहे. जकात वसुली बाबत माहिती द्यावी.

**उपआयुक्त (प्र.)** शहरात एकूण ११० सेट्स झालेले आहे. त्यांची किंमत एकूण २० लाख ८६ हजार २५० होते व जकातीपोटी ८४ हजार रुपये ४% प्रमाणे आपण वसुली केलेली आहे. डिसेबंर नंतर काही गादया आलेल्या नाहीत. नंतर गादया वाळुजला ठेवलेल्या आहेत.

**मा. महापौर** अहवाल सादर केलेला असून त्यानुसार उदयापासून जो जकात संदर्भात अहवाल दिला आहे त्यानुसार गादयांवर जकात आकारणी करावी.

**श्री अफसरखान** जपानी गादया चोरुन आणतात. ७०० गादया आल्या आहेत. जकातीचे खाजगीकरण करण्यात यावे.

**मा. महापौर** जपानी गादया संबंधिचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आलेला आहे. उद्यापासूनच जकात आकारणी करण्यात यावी.

**श्री सुदाम सोनवणे** शहरामध्ये एकूण ६०० ते ६५० गादया आलेल्या आहेत. त्या सर्वावंर ८४,०००/- वसुली करण्यात आली. त्याची जकात ४ ते ५ लाख वसुल व्हावयास पाहिजे होती.

**मा. महापौर** सन्माननीय सदस्य श्री अफसरखान, श्री सुदाम सोनवणे यांनी शहरात ७०० गादया आल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले. याची चौकशी करण्यात यावी. उप आयुक्त (प्रशासन), जकात अधिक्षक व उप आयुक्त (महसुल) यांनी चौकशी करावी व गादया आढळून आल्यास १० पट आकारणी करावी.

**श्री सुदाम सोनवणे** स. न. ९/२ शहानुरवाडी येथील मनपाच्या आरक्षित जागेवर अतिक्रमण होत आहे. तशी बातमी वृत्तपत्रात असलेली आहे. यासाठी एक समिति नेमण्यात आली व त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री अंबादास दानवे** सदर जागा शाळा, गार्डनसाठी आरक्षित होती. अतिक्रमणे होऊ नये याबाबत दखल घ्यावी.

**मा. महापौर** शहानुरवाडी येथील स. ल. ९/२ अतिक्रमण केलेले आहे असे सन्माननीय सदस्य यांनी सूचना केल्यानुसार संबंधित अधिकारी यांनी प्रारुप माहितीसह अहवाल पुढील बैठकीमध्ये ठेवावा.

याबरोबरच "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २७ जुलै २००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक २७ जुलै २००० रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली मुख्य कार्यालयातील "कै प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" सकाळी ११.३० वाजता "वंदे मात्‍रम" या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | स. सदस्य |
| ३) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ५ स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| १०) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ११) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १३) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| १४) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १५) स. स. सौ मंदाबाई प्रभाकर पवार | -//- |
| १६) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १७) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १८) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १९) स. स. श्रीमती किवलेकर जयश्री सारंग | -//- |
| २०) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| २१) स. स. श्रीमती डॉ आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २२) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २३) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २४) स. स. सौ विजया किशोर राहाटकर | -//- |
| २५) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २६) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २७) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २८) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २९) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| ३०) स. स. श्री घोडले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३१) स. स. श्री अय्युबखॉ सरदारखॉ | -//- |
| ३२) स. स. श्री अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| ३३) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |

३४) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग -//-
३५) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३६) स. स. सौ रशिदा बेगम गफ्फार यासखॉन -//-
३७) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३८) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३९) स. स. श्री स. मुमताज आली मोज्जम अली -//-
४०) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
४१) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
४२) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४३) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४४) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४५) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४६) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४७) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४८) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४९) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
५०) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
५१) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
५२) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
५३) स. स. श्री अब्दुल कादीर मौलाना सय्यद -//-
५४) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५५) स. स. श्री अशरम मोतीवाला -//-
५६) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५७) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५८) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५९) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
६०) स. स. सौ दाणे चद्रभागाबाई भगीरथ -//-
६१) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
६२) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
६३) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
६४) स. स. श्री गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहमद -//-
६५) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
६६) स. स. श्री शेख इसाक जैनोद्वीन शेख -//-
६७) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
६८) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६९) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
७०) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
७१) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
७२) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान -//-
७३) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
७४) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
७५) स. स. श्री स. अली सलामी स. मिरा सलामी -//-

७६) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज -//-
७७) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**संवाद**

**श्री अंबादास दानवे** कारगील युध्दास एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. या युध्दा धारातिर्थी पडलेल्या सैनिकांना दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रध्दांजल अर्पण करण्यात यावी.
(कारागील युध्दात धारातिर्थी पडलेल्या जवानांना सभागृहात दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे** ३-४ दिवसापूर्वी शहरातील एका हॉटेलमध्ये काम करणाऱ्या बारबालेवर अत्याचार झाला ही घटना खेदजनक आहे. हा बारबालावर अन्याय आहे. याबाबत आपली भूमिका काय आहे. गरजू मुली या बारमध्ये काम करतात. बारमध्यील ५०/- रुपयाची दारु १५०/- रुपयात विकण्यासाठी हॉटेल मालक बारबालेचा वापर करतात. आम्ही सर्व २७ नगरसेविका या घटनेचा निषेध करतो.

**श्री प्रकाश निकाळजे** सामाजिक दृष्टीकोन ठेवून स. नगरसेविका बिनवडे यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत अशा प्रवृत्ती विरुध्द कार्यवाही करण्यात यावी असा ठराव घेण्यात यावा व तो शासनास पाठविण्यात यावा.

**श्री सावंत मधुकर** परमीट रुममधील बारवालांना काम करण्याची मंजूरी रद्द करण्यात यावी.

**सौ विजया राहटकर** ज्या हॉटेल्समधुन बारबाला काम करतात अशा हॉटेल्स बंद करण्यात याव्यात.

**श्री खुंगर सुरजितसिंग** लेडीज बार बंद करण्यात यावेत जेणेकरुन महिलावर अन्याय होणार नाही अशा प्रकरणात संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री अफसरखान यासीनखान** अशा प्रकरणात पोलीस आयुक्तांना एक निवेदन देण्यात यावे. ज्या हॉटेल्समधुन बारबाला काम करतात. त्या हॉटेल्सचे लायसन्स रद्द करण्यात यावेत.

**श्री नंदकुमार फुलारी** अशा हॉटेल्संना महापालिकेतर्फे लायसन्स दिले जाते का? अशा हॉटेल्सचे लायसन्स जप्त करावे.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे** हॉटेल्स मधून बारबांलाच्या सर्व्हिसेत बंद करण्यात याव्यात.

**सौ. विजया राहटकर** हॉटेल्समध्ये बारबाला गरज म्हणून काम करतात त्यांच्यावर असे अत्याचार होत असतील तर हॉटेल्स मधील या बारबालांच्या सेवा बंद करण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा.

**मा. महापौर** हॉटेल्सनां लायसन्स एक्साईज डिपार्टमेंट तर्फे दिले जाते मनपातर्फे लायसन्स दिले असेल तर सर्व सदस्यांच्या भावना जाणून घेऊन निर्णय घेण्यात येईल. ज्या बारमध्ये लेडीज काम करतात. अशा बारना परवानगी देऊ नये असे पत्र पोलीस आयुक्त व जिल्हाधिकारी यांना देण्यात येईल.

**श्री कोकाटे काशीनाथ** हॉटेल्सना प्रथम आपण लायसन्स देत असतो. त्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात.

**श्री अफसरखान यासीनखान** या हॉटेलला मनपाने लायसन्स दिले असेल तर ते कॅन्सल करण्यात यावे.

**श्रीमती पार्वतीबाई मानकापे** महिलावर मोठया प्रमाणावर अत्याचार होतात ही बाब निषेधार्ह आहे. लोक दारु पिऊन घरी जातात. घरातील स्त्रीसही त्रास देतात. अशा बाबींचा बंदोबस्त झालाच पाहिजे.

**मा. महापौर** महापालिकेने लायसन्स दिले असेल तर ते रद्द करण्याचे आदेश दिले जातील, लायसन्स बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** अन्नभेसळ प्रतिबंधात्मक फायदा १९५४ नुसार मनपा फुडचे लायसन्स देते. बीअर बारचे लायसन्स मनपा देत नाही.

**अ. कादीर मौलाना** या शहरात शांततेचे व चांगले वातावरण राहावे. येथे काही लोक आहे जे लेडीज बार चालवितात, असे बार बंद करण्याचा ठराव घेऊन तशी कार्यवाही करण्यात यावी.

**सौ. विजया रहाटकर** हॉटेल्संना मनपा पाणीपुरवठा करते, फुड लायसन्स देते. अशा हॉटेल्सचे लायसन्स पाणीपुरवठा बंद करण्यात यावा.

**श्रीमती मानकापे पार्वतीबाई** महिला प्रतिनिधी म्हणून आम्ही निवडून आलो आहोत व आम्ही आमच्या भावना सभागृहासमोर मांडत आहोत त्यावर कार्यवाही व्हावी.

**श्री स. अली मिरा सलामी** मनपा जो परवाना देते तो रद्द करण्यात यावा. महिलांच्या भावनांचा आदर करण्यात यावा. मनपा जर अन्न भेसळ कामा अंतर्गत परवान देत असेल तर तो रद्द करण्यात यावा.

**श्री नंदकुमार घोडेले** कायदयाच्या चौकटीत राहून परवाना रद्द करण्यात यावा.

**श्री अ. कादीर मौलाना** प्रथम या प्रश्नावर निर्णय घेण्यात यावा व नंतरच इतर प्रश्नावर चर्चा करण्यात यावी.

**मा. महापौर** या शहराची संस्कृती महिला प्रतिनिधींच्या भावनांशी सर्वजण सहमत आहेत.

**श्री जयवंत ओक** हा प्रकार निषेधार्ह आहे. कायदयाच्या चौकटीत राहूनच मनपा लायसन्स देते. एकदा हॉटेल उघडल्यानंतर काही काळाने तेथे बीअर बार चालू केले जाते. आपण शरातील सर्वच हॉटेल्स बंद करणार का? मनपा जे लायसन्स देते त्यापासून मनपास उत्पन्न मिळते ते आपण बुडवणार का? कायदयाच्या चौकटीत राहूनच निर्णय घेण्यात यावा. याबाबत कायदा तज्ञांचे मत घेण्यात यावे. बीअर बारसाठी कलेक्टर परवाना देतात. महिलांवर अन्याय होऊ नये यासाठी बीअर बारमधुन लेडीजंना काम करण्यासाठी परवानगी देण्यात येऊ नये असा ठराव घेऊन तो जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात यावा.

**श्री अफसरखान यासीनखान** सभागृहात फक्त लेडीज बीअर बार बाबत चर्चा चालू आहे. ज्या हॉटेलमध्ये ही घटना घडली. त्याचे लायसन्स रद्द करण्यात यावे.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा** महिलांच्या भावना लक्षात घेऊन त्यावर निर्णय घेण्यात यावा.

**श्रीमीती डॉ. आशा बिनवडे** बीअर बारमधुन महिला सेवा देतात. त्यांना संरक्षण देण्यासाठी मनपा एक सामाजिक संस्था म्हणून काय करु शकते हा प्रश्न आहे. इतर गोष्टींवर चर्चा होण्याचे कारण नाही.

**मा. महापौर** सर्व सदस्यांच्या भावना मी ऐकल्या आहेत. तीन-चार दिवसापुर्वी शहरात सदरची घटना झाली आहे. मनपातर्फे देण्यात आलेले सदर हॉटेलचे

लायसन्स रद्द करण्यात येईल. असे बार बंद करण्याबाबत पोलीस आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निवेदन पाठविण्यात येईल.

**विषय क्र. ३९/१ :**

सन १९९९-२००० चे सुधारीत व ३१ जुलै, २००० पर्यंतचे लेखा अनुदान आणि सन २०००-२००१ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

**मुख्यलेखाधिकारी** आज मनपाची विशेष सर्वसाधारण सभा १८ व्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी बोलविण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार समितीने तयार केलेले अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येते आहे. मा. सभापती, स्थायी समिती यांना विनंती की, त्यांनी सभागृहात उपस्थित पदाधिकाऱ्यांचे स्वागत करावे. मा. महापौरांना अंदाजपत्रक सादर करावे.

**मा. सभापती** औरंगाबाद महानगरपालिकेचे सन १९९९-२००० चे सुधारित व ३१ जुलै २००० पर्यंतचे लेखा अनुदान व सन २०००-२००१ चे मुळ अंदाजपत्रक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ९५, नुसार मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केले आहे. अंदाजपत्रकातील तरतुदीवर विचार विनिमय करणेसाठी दि. ११/७/२००० रोजी स्थायी समितीची विशेष सभा घेऊन ती अंदाजपत्रकावर सर्वकष चर्चा करण्यात आली व त्यामध्ये काही फेरबद्ल सुचवून मा. आयुक्तांना सादर केलेले अंदाजपत्रक ठराव क्र. २३/१, दि. ११/७/२००० अन्वये पारीत करुन ते सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची सन १९८२ साली स्थापना झाल्या-नंतरचा हा अठरावा अर्थसंकल्प असून लोक नियुक्त पदाधिकारी यांचे कालावधीतील दहावा अर्थसंकल्प सादर करतेवेळी मला मनस्ती आनंद होत आहे. शहरातील नागरिकांना प्राथमिक सुख सुविधा पुरविण्याकरीता या अर्थसंकल्पात प्रस्तातिव केलेले विशेष प्रस्तावातील काही ठळक बाबी नमुद करण्यात येत आहे व त्या प्रामुख्याने अर्थ संकल्पात दर्शविलेल्या आहेत.

१) प्रभावी मालमत्ता कर वसुली
२) संभाजी महाराजांचा पुतळा उभारणे
३) मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र
४) महानगरपालिकेसाठी विशेष न्यायालयाची स्थापना करणे.
५) अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह कार्यान्वित करणे.
६) बोल्ट पध्द्तीने व्यापारी संकुलाचा विकास.
७) जकातीचे खाजगीकरण करणे.
८) खाजगी संस्थेमार्फत शहरातील नळ जोडणी सर्वेक्षण.
९) मालमत्ता कराचे फेरमुल्यांकन करणे.
१०) नगरसेवक स्वेच्छानिधीतून केंद्र उभारणे.
११) नविन आरोग्य केंद्र उभारणे.
१२) विशेष आरोग्य सेवा.
१३) बायोमेडीकल वेस्ट.

तसेच खालील फेरबद्दल स्थायी समितीने सुचविले आहेत.

१. सिमेंट व लोखंडसाठा कार्यालयाकडून खरेदी न करता गुत्तेदारानेच खुल्या बाजारातून खरे करावे व त्या सर्व कामाचे दर्जा बाबत थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ठेवण्यात यावे.

२. खांडकी रस्ते हे आवश्यक त्या ठिकाणीत सर्व्हे करुन तयार करावे व अरुंद गल्लीमध्ये फक्त कॉंक्रीट रस्ते करणे.

३. शहरात खुल्या गटारी हया ज्या ठिकाणी नैसर्गिक उतार आहे. अशाच ठिकाणीच बांधण्यात याव्यात व नाल्यांची दुरुस्ती करण्यात यावी.

४. "महापौर क्रिडा चषक" स्पर्धेत हॉकीचा समावेश.

५. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास विद्युत देयकापोटी सध्या देण्यात येणारी रक्कम रु. ७५/- लाखाऐवजी रु. ९०/- लाख दरमहा अदा करणे.

६. देखभाल व दुरुस्ती करता फक्त रु. १५/- लाखापर्यंत पाईप खरेदी करण्यात येऊन ते फक्त देखभाल व दुरुस्ती या कामामध्येच वापरावे. मोठया कामासाठी गुत्तेदारानेच पाईप खरेदी करावी व थर्ड पार्टी इन्स्पेक्शन त्यामध्ये असावे.

७. स्वेच्छा निधीतून सुरु करण्यात येणारे संगणक प्रशिक्षण केंद्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रा ऐवजी टाऊन हॉल येथे सुरु करावे.

८. शिक्षाणाधिकारी हे पद कायमस्वरुपी तात्काळ भरण्यात यावे. रस्ते/ड्रेनेज/मेकॅनिक/विद्युत या विभागाकरीता स्वतंत्र दोन कार्यकारी अभियंता पदाच्या निर्मितीची कार्यवाही करण्यात यावी.

९. महानगरपालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याबाबत प्रशासनाने जास्त प्रयत्न करावेत.

१०. १५ ऑगस्ट पुर्वी विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात यावेत.

११. जकातीचे खाजगीकरण प्रक्रिया ही तात्काळ करण्यात यावी.

या व्यतिरिक्त प्रशासनाने सादर केलेल्या पाणी पट्टीच्या दराच्या वाढ प्रस्तावावर सर्वकष विचार विनिमय करुन खर्च व उत्पन्नाच्या तुलनेत वाढत जाणाऱ्या तुटीत काही प्रमाणात घट करणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येते आहे.

तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनाचा विचार करता प्रशासनाने सादर केलेले वाढीचे इतर प्रस्तावावर विचार विनिमय करुन त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात यावी.

लोकनियुक्त प्रतिनिधींचा हा दहावा अर्थसंकल्प सर्व नवनिर्वाचित स्थायी समिति सदस्यांच्य अभ्यासपुर्ण सहकार्याने प्रशासनातर्फे सादर केलेल्या, अर्थसंकल्पात काही फेर फारसह सन १९९९-२००० चे सुधारित अंदाजपत्रक व ३१ जुलै, २००० पर्यंतचे लेखा अनुदान आणि सन २०००-२००१ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु. १३३ कोटी ७० लाख ३५ हजार जमा व रु. १३३ कोटी ४८ लाख ९५ हजार खर्चाच्या आणि २ लाखांच्या शिलकी अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४५ चे कलम ९६ नुसार सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यात येवून सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. यावर सर्वकष विचार होऊन अंतिम मान्यता प्रदान करण्यात यावी.

पाणीपट्टी दरवाढ करण्याचा निर्णय स्थायी समितीने न घेता सदरचा प्रश्न सर्वसाधारण सभेपुढे ठेवला आहे. त्यावर सर्वसाधारण सभेत योग्य तो निर्णय व्हावा.

**मा. महापौर** मा. सभापती स्थायी समिती यांनी सन २०००-२००१ चा अर्थसंकल्प जो स्थायी समितीने मंजूर केला आहे. तो सर्वसाधारण सभेसमोर अंतीम मंजूरीस्तव ठेवला आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर काही सूचना व फेरबदल करुन स्थायी समितीने त्यास मंजूरी दिलेली आहे व अंतीम मंजूरीसाठी या सभागृहासमोर ठेवलेले आहे. कुठल्याही संस्थेत "अर्थ" महत्वाचा असतो. आपला शहराचा विकास करण्याची भूमीका जनतेची कामे करण्याची भूमिका घेऊन आपण सभागृहात निवडून आलेलो आहेत. आपआपल्या वार्डामध्ये शहराचा विकास करावयाचा असेल तर त्यासाठी पैसा हवा तो या अर्थसंकल्पातून सादर केलेला आहे. यामध्ये पूर्ण वर्षीभरात जमा व खर्च कशाप्रकारे केला जाणार आहे हे सर्व दाखविलेले आहे. अर्थसंकल्पात एकूण १३३ कोटी ७० लाख ३५ हजार ही जमे बाजू राहील. या वर्षात या मनपास एवढे उत्पन्न येणार आहे. १३३ कोटी ४८ लाख ९५ हजार खर्च या वर्षात विविध बाबींवर दाखविला आहे व शिलकीमध्ये २१ लक्ष ४० हजार रुपये राहणार आहेत हा खर्च व जमा करण्यासाठी प्रशासनास आपणा सर्वांची साय हवी आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टी, जकात व इतर कर हे जमा बाजूमध्ये येतात तर शहरातील मुलभूत सुविधा रस्ते, ड्रेनेज, पाणी, लाईट तसेच काही ऐतीहासिक बाबीवरील खर्च हे खर्चाच्या बाजूमध्ये येतात. आपणा सर्वांचा या अर्थसंकल्पावर चांगला अभ्यास झालेला असेल अभ्यासपूर्वक यावर चर्चा व्हावी. एक आगळा वेगळा अर्थसंकल्प म्हणून या शहरात नागरीकांनी जाण म्हणून या अर्थसंकल्पावर चर्चा व्हावी. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य मी अपेक्षीतो. सर्वप्रथम जमा बाजुवंर चर्चा होईल.

**श्री तकीहसनखान** अर्थसंकल्पाच्या पृष्ठ क्र. १९-२० वर प्रभावी मालमत्ता कराची वसुलीचा मुद्दा आहे. २०००-२००१ साठी झोनवाईजा डिमांड दिलेली आहे. यासाठी मागील वर्षीच्या अर्थसंकल्पातील मागणी पाहणे गरजेचे आहे. प्रत्येक विभागाची मागणी गतवर्षीच्या तुलनेत कमी झालेली आहे. मागील वर्षापेक्षा या वर्षाची मागणी दोन कोटीने कमी झालेली आहे. ज्या मालमत्ता कमीर्शियल आहेत त्या रेसीडेन्सीयल दाखविण्यात आलेल्या आहेत. याची चौकशी व्हावयास हवी चालू मागणी २५ कोटीने घसरली आहे. मागणीत ३ कोटीची वाढ करावयास हवी होती. या विषयात ५-६ कोटी घोटाळा झालेला असावा. मालमत्ता करात वाढ व्हावयास हवी असे माझे मत आहे. कराची वसुली पाहिजे तशी झालेली नाही. मागणी मध्ये धट झाली आहे. झोन क्र. २ मध्ये ३४ लाखाची घट झाली . झोन क्र. ३ मध्ये ४५ हजाराची घट, झोन क्र.४ मध्ये २३ लाखाची घट, झोन क्र.५ मध्ये १.१५ कोटी , झोन ६ मध्ये १.६ कोटी कमी, ९९-२००० ची मागणी १२.११ कोटी होती चालू मागणी ९.५६ कोटी आहे. म्हणजे ९.५६ कोटी आहे. म्हणजे २.५४ कोटीने मागणी घटले आहे. याबाबीची चौकशी व्हावयास हवी व दोषी अधिकाऱ्यावर कारवाई व्हावयास हवी डीमांड कमी होण ही सर्वसाधारण सभेसाठी मानहानीची घटना आहे. या बाबींचा खुलासा व्हावयास हवा.

**श्री कदिर मौलाना** मालमत्ता कराची वसुली कमी का झाली, मागणी कमी का झाली करामध्ये २.५ कोटीने वाढ व्हावयास हवी ती कमी का झाली याची माहिति देण्यात यावी.

**मा. महापौर** मालमत्ता कराच्या मागणीत कमी का झाली. स. स. तकीहसनखान यांची सभागृहात निवेदन केल्याप्रमाणे २.५ ते ३ कोटी मालमत्ता कराची मागणी कमी झाली आहे. मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी** मालमत्ता कराची मागणी निश्चित करत असतांना सर्व विभागीय अधिकाऱ्यांकडून थकबाकी व चालू मागणी याची माहिती भागविण्यात येऊन ती संकलीत करुन सभागृहासमोर ठेवण्यात आली मागील वर्षापेक्षा यावर डिमांड कमी झाली आहे असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. मागीलवर्षी विभाग क्र. २,३,४,५,६, यांच्याकडून आलेले आकडे व थकबाकीसह आलेले होते याचे पुनर्विलोकन करण्यात आले. त्यानंतर सुधारित मागणी सर्व विभागाकडून मागविण्यात आली. त्यानुसारच सभागृहासमोर आकडेवारी सादर केलेली आहे.

**श्री तकीहसनखान** १९९८-९९ मध्ये १८ कोटीची मागणी होती. १९९८-९९ मध्ये १०.२२ कोटी सिडको भागातील कर वसुल होत नसल्यामूळे ते वगळण्यात येते व उर्वरित मागणी ९९-२००० साठी ठेवण्यात येते असे म्हटले आहे.

**मुख्यलेखाधिकारी** १९९८-९९ या वर्षात मालमत्ता कराची १८.९० कोटी थकबाकी दर्शवून चालू मागणी १०.२२ कोटी दर्शविलेली होती. एकूण २९.१२ कोटी पैकी प्रत्येक विभागास उद्दीष्ट दिलेले होते. उद्दीष्टयापेक्षा प्रत्येक विभागाची मागणी जास्तीची आहे. मागीलवर्षी १८.९० कोटी थकबाकी होती. यावर्षी २१.९१ कोटी थकबाकी आहे. त्यामुळे ती कमी झालेली नाही.

**मा.आयुक्त** मा. आयुक्त म्हणून रुजू झाल्यानंतर पूर्ण बाबींची शहानिशा केली मालमत्ता कराचा आढावा घेण्यास सुरुवात केली त्यावेळी प्रत्येक आकडयामध्ये फरक आढळून यायचा लेखाधिकाऱ्यांनी प्रत्येक विभागास भेट देवून आकडेवारी तपासणी करावी असे आदेश दिले होते. याबाबत आपण शासनासही लिहिले होते. मागील ४-५ वर्षाच्या कामाचा लेखा परिक्षण विभाग नागपूर यांच्याकडून तपासणी झाली पाहिजे यास शासनाची मंजूरी मिळालेली आहे. लेखा परिक्षणीची कारवाई सुरु करण्यात येते आहे. मंजूर नळ कनेक्शन व प्रत्यक्षात असलेले नळ कनेक्शन्स यामध्येही फरक आहे. ते शोधण्याचे काम सध्या चालू आहे. यामध्ये जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री तकीहसनखान** तीन कोटीचा कर कमी दिसून येतो, त्यावर आपण काय कार्यवाही करणार चुकीचे बजेट आले आहे. गरिबावर अन्यायकारक आहे.

**उपआयुक्त (म.)** मालमत्ता कर कमी करण्यामध्ये काही संध्यास्पद हालचाली झाल्या का असा संशयास्पद प्रश्न काही स. सदस्यांनी उपस्थित केला. मालमत्ता कर कमी करण्यास माझा विरोध आहे हे माझे स्पष्ट मत आहे. मागील चार महिन्याच्या कालावधीत कोणाचाही मालमत्ता कर कमी केलेला नाही. मागील वर्षाच्या मालमत्ता करांच्या मागणीमध्ये थकबाकीसह आकडे दर्शविलेली होते. कमी झालेली तीन कोटीची डिमांड थकबाकीमध्ये वाढलेली आहे. चालू वर्षाची मागणी ही रिकन्साईल करुन घेतलेली आहे.

**श्री अफसरखान** काही मोठया प्रॉपर्टीजचा टॅक्स कमी करण्यात आलेला आहे काय, एका मालमत्तेचा कर पुर्वी ४७ हजार होता . तो २५ हजार करण्यात आला. अशी प्रकरणे किती याची माहिती देण्यात यावी. त्यामुळे मनपाचे किती नुकसान झाले.

**मा. आयुक्त** फरक येण्याची दोन कारणे आहेत. यासंदर्भाचे लेखा परिक्षक, नागपूर यांच्याकडून ऑडीट करवून घेण्यात येणार आहे. तसेच शहरातील मालमत्तांचा एक थर्ड पार्टी सर्व्हे करवून घेण्याचा एक प्रस्तावही अर्थसंकल्पात मांडलेला आहे. त्यामुळे नेमकी चोरी कोठे होते ते समजून येईल. प्रॉपर्टी टॅक्स अथवा पाणीपट्टी यातील चोरी थांबली पाहिजे.

**श्री जयवंत ओक** आपण आपले मनोगत व्यक्त केले आपले अधिकारी कर्मचारी निष्क्रीय आहेत काय थकबाकीत २१ कोटीची थकबाकी दाखविलेली आहे. १९८४-८५ पासूनचा अहवाल द्यावा. आमच्या नागरिकांना मुलभूत गरजा देण्यासाठी नागरिकांनी आम्हास निवडून दिलेले आहे. टॅक्स वसुल करणे ही प्रशासनाची बाजू आहे. येथे फक्त नागरी प्रश्नावर चर्चा व्हावी. १९८४-८५ पासूनच्या बजेट पुस्तीका तपासण्यात व एकदाच सोक्षमोक्ष होवू द्या. म्हणजे् चुका कोणाच्या आहेत हे समजून येईल. जनतेवर भूर्दंड बसू नये.

**मा. महापौर** सध्या मालमत्ता करावर चर्चा चालू आहे. सदस्यांना मालमत्ता करावरच बोलावे.

**श्री रतनकुमार पंडागळे** १९९२ मध्ये मा. नगरविकास मंत्र्यांनी घोषणा केली होती की, सिडकोतील मिळकती त्या सिडकोच्या आहेत. काय याप्रमाणे मालमत्ता कर वसुल करण्यात यावा.

**श्री अंबादास दानवे** मालमत्ता कराची चालू वर्षाची एकूण मागणी ३१.४८ कोटी आहे. सिडकोची मागणी १२ कोटीची आहे. ती वजा केली तर १८ कोटीची मालमत्ता कराची मागणी येते. यावर्षी १५ कोटीचे वसुलीचे उद्यीष्ट देण्यात आलेले आहे. मागील वर्षीही वसुलीचे उद्यीष्ट १५ कोटीचे ठेवण्यात आले होते. मागील पाच वर्षाचा वसुलीचा आढावा घेतला तर ५ ते १५ टक्केपेक्षा जास्त झालेली नाही. ९७-९८ मध्ये ७ टक्के, ९८-९९ मध्ये १५ टक्के ९९-२००० मध्ये १२% वाढ झालेली आहे. १५ कोटीचे उद्यीष्ट असतांना वसुली ७.६० कोटी झालेली आहे. म्हणजे उद्यीष्टाच्या फक्त ५०% वसुली झालेली आहे. आपण वसुलीत मागे राहण्याचे कारण काय, याची कारणे शोधली पाहिजेत शहरात अनेक अनाधिकृत वस्त्या वाढलेल्या आहेत. त्या वसाहतीतील मालमत्ता कर का लावला जात नाही. या वसाहतींना मुलभूत सुविधा पुरविलेल्या आहेत. कर लावण्यास मनपास काहीतरी उत्पन्न मिळू शकेल. शहरात मनपाने अनेक शॉपींग कॉम्प्लेकस बांधले आहेत. यावर मनपाने लाखो रुपये खर्च केलेला आहे. शॉपींग कॉम्प्लेकसची वसुली कशा प्रकारे होते. त्यांच्यापासून किती उत्पन्न मनपास मिळते. शहरामध्ये १.५ लाख मालमत्ता असल्याचे नमुद केलेले आहे. प्रत्यक्षात शहरात २ लाखाच्यावर मालमत्ता असाव्यात असा माझा अंदाज आहे. मालमत्तांचे फेरमुल्यांकन करण्यापूर्वी त्याची फेरतपासणी कारणे अत्यंत आवश्यक आहे. शहराच्या काही भागात मालमत्ता कराची वसुली होते तर काही भागात होत नाही. याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. वसुलीबाबत कठोरपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. काही मनपामधून चार-पाच वर्षाचा कर भरल्यास सवलत दिली जाते. ती योजना प्रभावीरित्या कर वसुलीसाठी राबविता येते का, हे ही तपासून पहावे. थकबाकीवर व्याजाची आकारणी करण्यात यावी. मालमत्ता कराची बरीचशी प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात या कार्यालयात निर्णयासाठी प्रलंबित आहेत. ही प्रकरणे निकाली निघाली पाहिजेत. केवळ

वर्षाच्या शेवटच्या २-३ महिन्यातील वसुली ही मोठया प्रमाणावर होते. मग वर्षभर ती का होत नाही. मनपा आर्थिक परिस्थिती अगोदरच विवंचनेत आहे. यासाठी वसुली संदर्भाने योग्य तो निर्णय होणे गरजेचे आहे.

**श्री अविनाश कुमावत** मालमत्ता करामध्ये तुट दर्शविण्यात आलेली आहे. स्थायी समितीमध्येही याबाबत चर्चा झाली होती. सिडको भागातून मालमत्ता करापोटी ११ कोटीचे येणे आहे. सभागृहात पूर्वीच निर्णय झालेला आहे कि, सिडको भागातील मालमत्तावरील कर हस्तांतरणाच्या दिवसापासून घेण्यात यावा.

**श्री स.अली मीरा सलामी** २०००-२००१ साठी अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे, १३३ कोटी चा अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. बजेटमध्ये आकडे वाढवून दाखविण्यात आलेले आहेत. मागील स्थायी समितीने १०६ कोटीचे बजेट मंजूर केले होते. त्यात दुरुस्ती करुन सर्वसाधारण सभेने ते ८८.३३ कोटीचे केले. वर्षाच्या शेवटी ते ८५ कोटीचे झाले मागील पाच वर्षापासून हे असेच चालू आहे. अस्थापनेवरील खर्च ४२% असावयास पाहिजे हा खर्च कोणत्या आकडयावर काढण्यात आला. अस्थापनेवर एवढया मोठया प्रमाणावर खर्च होत असेल तर, विकास कामे कशी करणार अस्थापनेवरील खर्च मुळ अंदाजपत्रवर काढला जातो की, अंतिम अंदाजपत्रकावर मागील वर्षी जकात उत्पन्नातही मोठया प्रमाणावर घट झालेली आहे. जकातीचे उत्पन्न ५३ कोटी धरले होते. नंतर ते ४८ कोटी करण्यात आले. प्रत्यक्षात ४४ कोटी वसुल झाले. ट्रक धारकांचा संप, आचारसंहिता यामुळे वसुली कमी झाल्याचे दाखविले जाते. आचारसंहितेत तर कोणी नगरसेवक कार्यालयात केवळ आकडे वाढवून दिले जातात. त्या वास्तविकता असावी. न्यायालयात जी मालमत्ता कराची प्रकरणे चालू आहेत त्यांना काही सवलत देऊन ती निकाली काढण्यात यावीत. त्यामुळे वसुलीतही वाढ होईल. एकाच प्रकारच्या वेगवेगळया मालमत्तांना वेगवेगळे कर लावण्यात आलेले आहेत. त्यामुळे वाद निर्माण होतात व लोक कराचा भरणा करत नाहीत. अशा प्रकरणात वाटाघाटी चर्चा करुन प्रकरणे निकाली काढावीत. जेणेकरुन वसुलीत वाढ होईल.

**श्री भगवान घडामोडे** बऱ्याचवेळापासून अर्थसंकल्पावर चर्चा चालू आहे. या अर्थसंकल्पातून शहराचा चेहरामोहरा बदलावयाचा आहे. जनतेला मुलभूत सुविधा देण्यासाठी अर्थसंकल्पाची बैठक चालू आहे. मालमत्ता कराची थकबाकी व तिच्या वसुलीची कारणे तर निवडणूक १२ महिने चालू होती का वसुली न होण्याचे हे कारण संयुक्तीक नाही निवडणुकीच्या कामात किती अधिकारी, कर्मचारी गुंतलेले होते. निवडणुकीसाठी मनपाचे अधिकारी नव्हते. शहरात किती प्रॉपर्टीज आहेत. बिल्डर्सच्या सर्व इमारतींना टॅक्स लावलेले आहे. काय विभागीय अधिकारी वसुलीकडे पाहिजे तसे लक्ष देत नाहीत. सारख्याच इमारतींना कराची आकारणी मात्र वेगवेगळी केली जाते. अशी प्रकारणे न्यायालयात जातात म्हणून वसुली होत नाही. अशा इमारतींचा सर्व्हे करण्यात यावा. सर्वच गोष्टींचे खाजगीकरण करावयाचे असेल तर विविध पदे व सुविधा कशासाठी देता. अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून कामे करवून घेण्यात यावीत. कामचुकार कर्मचाऱ्यांवर दंडनीय कार्यवाही करण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** शहरात जवळपास एक लाख पाच हजार मालमत्ता दाखविलेल्या आहेत. माझ्या माहितीप्रमाणे शहरात जवळपास २ लाखाच्यावर मालमत्ता आहेत. अर्थसंकल्पात एकूण मागणी ३१.४८ कोटी दर्शविली आहे. शहरातील झोपडपट्टया अनाधिकृत वसाहती यांच्यावर मालमत्ता कर लावली जात नाही. माजी आयुक्तांच्या काळात अनाधिकृत वसाहतीतील मालमत्तावर कर आकरणी करण्याबाबत निर्णय झाला होता. लीगल एरीयाज मध्ये ज्यांनी वाढीव बांधकामे केलेली आहेत. त्यांच्याही बऱ्याचशा मालमत्तावर कर लावण्यात आलेला नाही. महापालिकेच्या ज्या इमारती भाडयाने दिलेल्या आहेत. त्यांच्याकडील भाडेही बरोबर वसुल होत नाही. न्यायालयात अनेक मालमत्ता कराची प्रकरणे प्रलंबित आहेत. ती निकाली निघाली पाहिजेत. मालमत्तांना क्रमांक देण्यात यावेत जेणे करुन कोणत्या घरावर कर लागलेला नाही हे लक्षात येईल.

**श्री काशीनाथ कोकाटे** मालमत्ता कर लादणे व कराच्या वसुली बाबत सभागृहात अनेक सूचना मांडण्यात आल्या आहे. त्या वस्तुस्थितीस धरुन आहेत. मनपाच्या जमेत जकात, मालमत्ता अनुदान या बाबी प्रामुख्याने धराव्या लागतील मालमत्ता व इतर करांची वसुली चांगली व्हावी. यासाठी जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. मागील वर्षीच्या व या वर्षीच्या उद्यीष्टात कोणताही फरक नाही. मागील वर्षी १५ कोटीचे उद्यीष्ट ठेवलेले होते. परंतु वसुली ७.३० कोटीची झाली. वसुली कमी होण्यामध्ये निवडणुकीची कामे सांगितली जातात. ही बाब चुकीची आहे. शहरात जवळपास २ लाखापेक्षा जास्त प्रॉपर्टी शहरात आहेत. औरंगाबाद शहर हे अत्यंत झपाटयाने वाढणारे शहर आहे. शहरात अनेक वसाहती वाढत आहेत. जाधव वाडीत ५-७ वर्षापासून बांधकामे होऊनही तेथील मालमत्तांवर कर आकारणी करण्यात आलेली नाही. अधिकारी मागितलेली माहितीही बरोबर देत नाही. वसुलीचे उद्यीष्ट २० कोटी ठेवण्यात यावे. जनगणनेचे काम चालू असतांना कोणत्या घरांना टॅक्स लागला नाही हे पहावे, घर तेथे टॅक्स असावयास पाहिजे. बरीचशी प्रकरणे न्यायप्रतिष्ट आहेत. मागील ८ वर्षात मालमत्तांचे फेरसुल्यांकन झालेले नाही. ते व्हावयास हवे. वसुली बरोबर झालेली नाही म्हणून, विकासाची कामे बरोबर होत नाहीत. विभागीय अधिकारी यांच्या मार्फतच फेरमुल्यांकनाचे काम व्हावे. प्रायव्हेट एजन्सीस काम देण्यात येऊ नये. त्यांनी चुकीचे काम केले तरी, आपण काहीही कार्यवाही त्यांच्या विरुध्द करु शकणार नाही. मालमत्ता कर वसुलीचे उद्यीष्ट बदलून देण्यात यावे.

**श्री सुदाम सोनवणे** मागील वर्षी मालमत्ता कर वसुलीचे उद्यीष्ट १५ कोटी ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात ५०% वसुली झालेली आहे. यावर्षी परत १५ कोटीचे उद्यीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. अर्थसंकल्पात शहरात मालमत्ता एक लाख चार हजार दाखविल्या आहेत. या मालमत्ता १९८४ च्या सर्व्हेक्षणातील आहेत. आज सर्व्हेक्षण केले तर, उद्यीष्ट २० कोटीपेक्षा जास्त होईल नगर परिषदेच्या कालापासून १४२५ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. ती प्रकरणे निकाली निघाली तरी वसुलीत वाढ होईल. अनाधिकृत वसाहतींना मालमत्ता कर लावण्याच्या सुचना सर्वसाधारण दिल्या होत्या. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल. परंतु आज पावेतो त्याची अंमलबजावणी झालेली नाही. सिडको भागातील मालमत्तांवर हस्तांतरणाच्या तारखेपासून मालमत्ता

कराची अंमलबजावणी करावी. असा सर्वसाधारण सभेत ठराव झालेला आहे, असे असतांनाही अर्थसंकल्पात सिडको भागाची ११ कोटीची थकबाकी दाखविली जाते. ती वगळण्यात यावी. सिडकोचे हस्तांतरणे मनपाकडे होणार असल्याने चालु वर्षाची मागणीय बजेट मध्ये दाखविण्यात यावी. मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात यावे. प्रायव्हेट संस्थेस सर्व्हेक्षणाचे काम देतांना ही संस्था कोणताही दुजाभाव करणार नाही. आपण ठरवून दिलेल्या नियमानुसार ती काम करेल हे पहावे. मालमत्ता कर वसुलीचे उद्यीष्ट २१ कोटी ठेवण्यात यावे. मनपाच्या तिजोरीतच पैसा येणार नसेल तर विकासाची कोणतीही कामे होणार नाहीत.

**श्री स. सलीम स. युसूफ** शहरातील बऱ्याचशा मालमत्तामध्ये किरायेदार राहतात. अशा किरायेदार व भाडेकरुंची भांडणे आहेत. यामुळे कर वसुली होत नाही. २५-३० वर्षापासून अशा प्रकारची बरीचशी प्रकरणे प्रलंबित आहेत. ही निकाली काढण्यासाठी उपाययोजना करावयास हवी.

**श्री किशोर तुलसीबागवाले** अर्थसंकल्पात ठळक वैशिष्टयात प्रभावी मालमत्ता कराचा उल्लेख आहे. त्यात थकबाकीदारांवर व्याज लावण्याची सूचना आहे. ही चुकीची आहे. हा प्रस्ताव वगळण्यात यावा. न्यायप्रविष्ठ प्रकरणात संबंधिताशी वाटाघाटी करुन कर वसुल करुन घेण्यात यावा.

**श्री सुदाम सोनवणे** थकबाकीदारावर व्याज लावणे योग्यच आहे. त्यामुळे कराची वसुली होईल.

**श्री प्रकाश निकाळजे** निवडणुकांमध्ये मनपाचे कर्मचारी गुतल्यामुळे करांची वसुली होऊ शकली नाही असे मा. आयुक्तांनी सांगितले सिडको हडको भागाकडून १०-१२ कोटी रुपये थकबाकी येणे आहे. ही वसुली जर होतच नसेल तर ती अर्थसंकल्पात दाखविण्यात अर्थ नाही. बऱ्याचशा मालमत्तांचे भाडेकरु-घरमालक वाद चालू आहे. भाडेकरु मालमत्ता कर भरत नाहीत. बरीचशी प्रकरणे न्यायालयात चालू आहेत. लोकन्यायालय भरवून मालमत्ता कराची प्रकरणे निकाली काढावीत असे ठरले होते. परंतु तसे झाले नाही. तसे १२ कोटीची सिडकोची दाखविलेली थकबाकी अर्थसंकल्पातून वगळण्यात यावी. लोकन्यायालय भरवून मालमत्ता कर वसुलीची प्रकरणे निकाली काढावीत. शहरात ५२ झोपटपट्टया आहेत. या झोपडपट्टयातील जागांची खरेदी विक्री १० रुपयाच्या बॉन्ड पेपरवर होते. अशा खरेदी खतांची रजिष्ट्री होत नाही. म्हणून आपण अशा झोपडपट्टयातील मालमत्तेचे नामांतर करत नाही. हा नियम शिथील करण्यात यावा. त्यामुळे मोठया प्रमाणावरील कर वसुली होईल. अस्थापनेवरील खर्च दाखविण्यासाठी अर्थसंकल्पातील आकडे वाढवून दाखविले आहेत.

**श्री स. अली मिरा सलामी** थकबाकी वाढण्याचे कारण म्हणजे करांची आकारणी बरोबर झालेली नाही ही अनेक नागरिकांची तक्रार आहे. अनेक स. सदस्यांनीही अशा तक्रारी केल्या आहेत. त्यामुळे व्याज लावण्याची तरतुद रद्द करावी. व्याजाची आकारणी केल्यामुळे केवळ थकबाकी वाढत जाईल. करांची वसुली सुकरतेने झाली पाहिजे. जाधववाडी व इतर भागात अनेक नवीन इमारती तयार झाल्या आहेत. त्यांच्यावर करांची आकारणी का करण्यात येत नाही. बांधकामाची परवानगी लवकर दिली जात नाही. त्यामुळे अनाधिकृत

बांधकामे वाढत जातात. मालमत्ता कराचे उद्दीष्ट २० कोटी करण्यात यावे. त्यामुळे किमान १० कोटी तरी वसुल होतील.

**श्री नंदकुमार घोडेले** शहरात होर्डींग्ज, जाहीरात बोर्डस लावण्यासाठी मनपा परवानगी देत. तथापि, टेंडर्स अथवा दरपत्रेक मागवून परवानग्या दिल्या तर नक्कीच जाहीरात उत्पन्न करात वाढ होईल्.

**श्री रतनकुमार पंडागळे** सिडको भागातील नागरिकांकडून थकबाकी ११.२९ कोटी व चालू वर्षाची मागणी १.५६ कोटी असल्याचे दाखविले आहे. ही मालमत्ता कराची थकबाकी कोणाच्या नावांवर आहे हे आपणांस माहित आहे काय?

**मा. उपमहापौर** २०००-२००१ च्या अर्थसंकल्पावर ब-याचशा सदस्यांनी आप आपले मनोगत व्यक्त केले आहे. कर वसुलीसाठी उद्दीष्ट कोणत्या बाबींचा विचार करुन ठेवण्यात येते. यांची सभागृहात माहिती देण्यात यावी. थकबाकीदारांचे म्हणणे ऐकून घेऊन तसेच घरमालक व भाडेकरु यांच्यात समन्वय घडवून आणावा. कर वसुलीसाठी त्या त्या भागातील स. नगरसेवकांचेही सहकार्य घेण्यात यावे. नियमीत करांची वसुलीच बरोबर होत नाही, तर व्याज कसे वसुल करणार याचाही विचार व्हावा. घर तिथे कर ही योजना राबविण्यात यावी. बँकेच्या योजना असतात. त्याचप्रमाणे प्रथम थकबाकीदारांकडून मुद्दल वसुल करण्याचा विचार करावा. अनाधिकृत वसाहतीतील नागरिकांना सर्व मुलभूत सुविधा देतो. मग अशा वसाहतीतून करांची वसुली का केली जात नाही. सिडकोच्या काही भागांवर अनाधिकृत वसाहती बसलेल्या आहेत. सिडकोने पुंडलीक नगर व इतर भाग डीनोटीफाईड केले आहेत. अशा एरियांना मनपा सेवा सुविधा देते. यासाठी लागणारा पैसा मनपाने सिडकोकडून हस्तांतरणापूर्वी घ्यावा. याबाबत मी सिडको अध्याक्षासही बोललो आहे. जाधववाडी सारखे अनेक भाग विकसीत झाले आहेत. बिल्डर्सनी अनेक इमारती बांधल्या आहेत . परंतु ते कंप्लीशन सर्टीफिकेट घेत नाहीत. त्यामुळे अधिकारी कर आकारणी करीत नाहीत. यासाठी बांधकात परवाना देतांनाच त्यात इमारत पूर्ण करणचा कालावधी टाकण्यात यावा. जेणेकरुन त्या वेळेनंतर इमारत पूर्ण आहे किंवा नाही हे तपासता येईल.

**मा. आयुक्त** मालमत्ता कर वसुलीसंदर्भात ब-याचशा सूचना स. सदस्यांनी मांडल्या आहेत. स. श्री काशीनाथ कोकाटे, श्री अंबादास दानवे यांनी कर आकारणी व वसुली संदर्भाने काही मुलभूत प्रश्न विचारले आहेत. प्रत्येक चार वर्षांनी प्रापॅर्टीजचे रिव्हीजन झाले पाहिजे. अशी कायद्यातच तरतुद आहे. त्यानुसार रिव्हीजन झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. रिव्हीजनचे काम करण्यात येत आहे. त्यामुळे जर कोणत्या मालमत्तेस कर आकारणी झाली नसेल तर, त्यावर आकारणी होईल. स्टॅटयुटरी प्रोव्हीजन्सनुसार (statutory provisions) पुणर्विलोकन होणे आवश्यक आहे. अधिकारी कर्मचारीच जेव्हा सर्व्हेक्षणासाठी जातात. त्यावेळी त्यांच्यावर वेगवेगळे बंधने येतात यासाठी नि:पक्षपातीपणे सर्व्हे व्हावा म्हणून तो एखादया संस्थेमार्फत करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. थर्ड पार्टी सर्व्हे झाल्यास अशा अडचणी येणार नाहीत त्यात इम्पार्शॅलिटी राहील. एजन्सीने बरोबर काम केले नाही तर, आपण त्यांने कॉन्ट्रक्ट रद्द करु शकतो. त्यांच्यावर दंड लागू शकतो. १९८९ पासून रिव्हीजन झालेले नाही. हे होणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण

रेकॉर्डवर असलेला प्रॉपर्टीज व प्रत्यक्षात असलेल्या प्रॉपर्टीज यामध्ये फरक असू शकतो. हा फरक दुर झाला पाहिजे. मालमत्ता कराची वसुली काही प्रमाणात कमी झालेली आहे. उद्दीष्टाच्या प्रमाणात ती झालेली नाही. वसुली कमी होण्याची कारणेही दाखविलेली आहेत. यावर्षात ही परिस्थिती राहू नये. यासाठी अर्थसंकल्पात दोन तीन गोष्टी सुचविलेल्या आहेत. जे नागरीक करांचा वेळेवर भरणा करतात. त्यांना असे वाटले पाहिजे की, आपण नियमांचे पालन करतो त्याचा आपणास फायदा मिळला पाहिजे. यासाठी जे वेळेत करांचा, थकबाकीचा भरणा करतात त्यांना काही सूट देण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याचबरोबर ज्यांना असे वाटते की, आपण करांचा भरणा केला नाही तर काहीही होत नाही. अशा लोकांवर दंडात्मक कार्यवाही थकबाकीवर व्याज आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. यामुळे नागरिक करांचा भरणा करतील. कर भरण्याच्या बाबतीतही थोडी सक्ती करावी लागते. असे निर्दशनास आले आहे की, काही भागात करांची चांगली वसुली होते, तर काही भागात कराची वसुंली होत नाही. यासाठी सर्वसाधारण सभेने असा दृष्टीकोन ठेवला की, ज्यांनी मनपास वसुलीसाठी चांगला प्रतिसाद दिला आहे. अशांना काही सवलत दिली पाहिजे आणि ज्या भागातून करांची वसुलीच होत नाही. त्यांच्या बाबतही विचार व्हावयास हवा राष्ट्रीय पातळीवरही जेव्हा अर्थसंकल्प सादर होतो. तेव्हा ज्या राज्यांची वसुली चांगली आहे. त्यांना काही विशेष सवलती दिल्या जातात. काही इन्सेन्टीव्ह दिली जाते. अशीच पध्दती मनपाने अवलंबवली तर त्या वॉर्डात विकासात्मक कामे प्राधान्याने घेण्यात यावीत. नोटीस देऊनही जे करांचा भरणा करत नाहीत, त्यांचे नळ व ड्रेनेज कनेक्शन कट केले जातात. इतर महानगरपालिकामधुनही ही पध्दती अवलंबविली जाते. जानेवारी ते मार्च या काळात निवडणूकीची कामे असतांनाही कर भरणाऱ्या लोकांचे नळ कनेक्शन कट करण्यात आले होते. बरेचसे प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याचे बोलले गेले. मनपाच्या प्रकरणासाठी स्वतंत्र कोर्ट स्थापन करण्याची तरतुद आहे. त्यानुसार मनपाशी संबंधित प्रकरणे लवकात लवकर निकाली निघावित, यासाठी दोन वेगळया न्यायालयांची मागणी करण्याचे निर्णय घेतले जातात. परंतु अशा निर्णयांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात. जणगणनेत सर्व घरांना क्रमांक दिले आहेत. मालमत्तांच्या सर्व्हे करण्यासाठी या माहितीचा उपयोग करता येईल. परंतु जणगणनेची माहिती ही गोपनीय स्वरुपाची असते. ती इतर कोणत्याही कामासाठी वापरली जात नाही. यासाठी प्रथम जणगणना कार्यालयाकडून परवानगी घ्यावी लागेल, ती घेण्यात येईल. या सर्व प्रकारांमुळे वसुलीत वाढ होईल. सिडको भागातील मालमत्तांवर हस्तांतरणाच्या दिवसापासून कर लावावा. असा निर्णय झालेला आहे. सिडको हस्तांतरणाचा प्रश्नावर सध्या चर्चा चालू आहे. हस्तांतरण झालेच तर या भागातून किती उत्पन्न मालमत्ता करापासून मिळू शकते हे पाहण्यासाठी मी सांगितले होते. शहरात सिडकोच्या जमिनीवर काही अनाधिकृत वसाहती स्थापन झालेल्या आहेत. या वसाहतींना ज्या मुलभूत सुविधा द्याव्या लागणार आहेत. त्यासाठी एखादी पॉलीसी ठरवावी लागणार आहे. या वसाहतीच्या मुलभूत सुविधांसाठी सिडको अथवा शासनाने काही अनुदान द्यावे. अशीही मागणी केली होती. ज्या राखीव जागांमध्ये अनाधिकृत

वसाहती स्थापन झाल्या आहेत. त्यांच्याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. डेव्हलपमेंट प्लॅन बाहेर ज्या वसाहती निर्माण झाल्या आहेत. अशा वसाहतींवर टॅक्स लावता येईल. मनपाने ज्या जागा खुल्या ठेवल्या आहेत. त्या कशाप्रकारे विकसीत करावयाच्या याचाही विचार करावा लागणार आहे. अनाधिकृत वसाहती पूर्णपणे तोडता येत नाहीत. मात्र त्या इतरत्र हलविता येतील. रहीवासी भागात ज्या अनाधिकृत वसाहती झालेल्या आहेत. त्यांच्याकडून बेटरमेंट चार्जेस व इतर निधी वसुल करुन त्यांना सुविधा देता येतील. अनाधिकृत वसाहती रहिवासी जागेत शिफ्ट करता येऊ शकतील त्यासाठी स्लम ज्वेलर्सना बेसीक कास्ट भरावी लागेल. यासाठी हडको सारख्या संस्थाकडून कर्ज मिळू शकेल. मात्र राखीव व निवासी भागात निर्माण झालेल्या झोपडपटयाबाबत स्वतंत्ररित्या विचारा करावा लागेल.

**श्री जयवंत ओक** स्लममधील लोकांना रस्ते, पाणी, ड्रेनेज या सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. अधिकृत वसाहतीत सुविधा दिलेल्या आहेत. ५२ स्लम आहे. ५.६ स्लम ची वाढ झाली. परंतु घोषित झालेल्या नाहीत. मग त्या अनाधिकृत म्हणणार का? अर्धे शहर बाँडवर वसलेले आहे. जनता नगरसेवकांना मुलभूत गरजा मागणार आहेत. त्यांना आपण मुलभूत गरजा पुरविणार आहेत की नाही.

**मा. महापौर** सर्व सदस्यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक व गांभीर्यपूर्वक मालमत्ता कराबाबत चर्चा केलेली आहे. बऱ्याचशा मोलाच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यावर मा. आयुक्तांनी प्रशासनाची बाजू सभागृहासमोर ठेवलेली आहे. काही सूचनाही दिलेल्या आहेत. करांची वसुली ही झाली पाहिजे. त्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घ्यावी. कर वसुलीचे उद्दीष्ट १५ कोटी ऐवजी २० कोटी करावे. हे करत असतांना प्रत्येक तीन महिन्यांनी वसुलीचा आढावा घेतला जावा. आतापर्यंत वसुली ५०% होत होती. ती ८०% होणे गरजेचे आहे. स. नगरसेवक रतनकुमार पंडागळे यांनी सिडको भागातील टॅक्सबाबत प्रश्न विचारला होता. जोपर्यंत सिउकोचे हस्तांतरण होत नाही. तोपर्यंत त्या भागास टॅक्स लावू नये. असा या सभागृहातच निर्णय झाला आहे. सिडको भागाचे मनपाकडे हस्तांतरण झाल्यानंतर मालमत्ता कर वसुल केला जाईल.

**श्री रतनकुमार पंडागळे** सिडको भागातील मालमत्ता ही त्या नागरिकांची नसून सिडकोची आहे. सिडको कडून हा टॅक्स भरुन घेण्यात यावा.

**मा. महापौर** सिडको हस्तांतरणाचे वेळी त्या विषयावर चर्चा करण्यात येईल. मनपातर्फे मालमत्तांनी फेरतपासणी करण्यात यावी. नियमीतपणे कर भरतात त्या नागरिकांना सुट देण्याबाबतचा प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव मान्य करण्यात येतो. डीमांड नोटीसा देऊनही जे कर भरत नाहीत. त्यांच्यावर १०% व्याज आकारण्यात यावे. मात्र न्यायप्रविष्ठ प्रकरणांवर व्याज आकारण्यात येऊ नये. जे विभागीय कार्यालयातुन चांगल्या प्रकारे वसुली होते तर काही विभागीय कार्यालयातून ती होत नाही. जे विभागीय अधिकारी चांगल्या प्रकारे वसुली करतात. त्यांना प्रमाणपत्र व आगाऊ वेतनवाढ देण्यात यावे. मात्र जे चांगली वसुली करत नाहीत. त्यांना जबाबदार धरुन त्यांना दंड करण्यात यावा, त्यांची वेतनवाढ थांबविण्यात यावी. लोकन्यायालय स्थापन झाले पाहिजे. जी प्रकरणे बऱ्याच वर्षापासून न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यांची विभागनिहाय यादी बनविण्यात यावीत. न्यायालय स्थापन करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

**श्री काशीनाथ कोकाटे** थकबाकीदारावर १०% व्याज आकारण्याची तरतुद केलेली आहे. परंतु व्याज लावण्यात येऊ नये अशी त्यात सुधारण करावी.

**मा. महापौर** आपण परिस्थिती समजून घ्यावी. नोटीसा देऊनही नागरिक चार चार, पाच पाच वर्षे टॅक्स भरत नाहीत. त्यांच्या मालमत्ता कर आकारणी संदर्भाने कोणते वादही नाहीत. अशा नागरिकांना करांचा भरणा करावा यासाठी ही व्याजाची तरतुद आहे. शहरात काही झोपडपट्टया सिडकोच्या डिनोटीफाईड क्षेत्रात बसलेल्या आहेत. त्यांच्या विकासाबाबत सिडको अध्यक्षासी चर्चा झालेली आहे. या झोपडपट्टयांच्या विकासासाठी जो खर्च येणार आहे. त्यांची मागणी सिडकोकडे करण्यात यावी. सिडको भागासाठी किती पैसा देईल व मनपा किती खर्च करेल हे सिडको हस्तांतरणाच्या बैठकीच्या वेळी ठरविण्यात येईल. तसेच इतरही काही वस्त्या अनाधिकृत आहेत. या भागांना सुविधा देण्यासाठी तेथील नागरिकांनी २५% रक्कम भरावी व मनपा ७५% रक्कम खर्च करेल, असा पुर्वीच निर्णय झाला आहे. यावर पुढील सर्वसाधारण सभेत विचार व चर्चा करण्यात येईल. हा विषय बजेटमध्ये येत नाही.

**श्री जयवंत ओक** हा निर्णय नोटीफाईड एरीयासाठी होता.

**मा. महापौर** ही सभा एक तासासाठी तहकुब करण्यात येतो.

२.०० वाजता तहकुब केलेली सर्वसाधारण सभा दुपारी ३.१५ वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षेतेखाली परत सुरु झाली.

**मा. महापौर** मालमत्ता करासंदर्भाने जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. अशा प्रकरणातील निर्णय संबंधितांच्या विरुध्द गेला तर, त्यांच्याकडीला करावर १०% व्याज लावून कराची वसुली करण्यात यावी. कोर्टाचा निर्णय मालमत्ताधारकांच्या बाजूने लागला तर व्याजाची आकारणी करण्यात येऊ नये.

**श्री नंदकुमार घोडेले** मालमत्ता व पाणी पट्टीकराच्या वसुलीसाठी एका विशेष अधिकारी नेमण्यात यावा. बँकेच्या दराने व्याजाची आकारणी करावी.

**मा. महापौर** आपल्याकडे उपआयुक्त हे पद वसुलीसाठी निर्माण केलेले आहे.

**श्री गणेश तांबे** स्लममध्ये अनेक नागरीक घरांची खरेदी-विक्री करतात. परंतु त्यांच्या नावावर टॅक्स घेतला जात नाही तो घेण्यात यावा.

**श्री प्रकाश निकाळजे** एखादी झोपडपट्टी राखीव जागेवर बसलेली नसेल तर ती नियमित करण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** स्लम मधील घरे विकली गेल्यानंतर विकत घेण्याऱ्यांचे नावांवर तथापी त्या घोषित झोपडपट्टया आहेत त्यांच्यातील मालमत्तांची खरेदी विक्री नंतर नांमांतर करावे.

**मा. आयुक्त** घर विक्री करणाराची व खरेदी करणाराची दोघांचीही जबाबदारी आहे की, ज्यांनी तात्काळ व्यवहार होताच कर भरुन नामांतर करावयास हवे. परंतु स्टॅन्ड डयुटी द्यावी लागते म्हणून लोक रजिष्ट्री न करता बाँड पेपरवर व्यवहार करतात. खरेदी करणाऱ्यांनी खरेदी करतेवेळी लिहून द्यावयास हवे की, घराचा टॅक्स तो भरणार आहे. थकबाकी भरण्यास लोक तयार होत नाहीत.

**श्री प्रकाश निकाळजे** पूर्णपणे टॅक्स भरुन घेऊन नंतरच नामांतर करावे.

**श्री जयवंत ओक** नामांतर होत नाहीत व टॅक्स वसुलीच्या नोटीसा पाठविल्या जातात. घर मालक त्यांच्या स्वतःच्या नावाने नोटीस नसल्याने टॅक्स भरण्यात तयार होत

नाही. त्यामुळे मोठया प्रमाणावर थकबाकी वाढत आहे. नामांतर केल्यास थकबाकी वाढणार नाही तर वसुली होईल.

**मा. आयुक्त** रिफॉर्मींग ऑफ स्लम अशी शासनाची एक स्कीम आलेली आहे. यासाठी प्रत्येक स्लमचा सर्व्हे करावा लागेल. याबाबत मी जिल्हाधिकारी यांना लिहिलेले आहे. अशा स्लममध्ये राहणाऱ्या लोकांना पी.आर कार्ड द्यावे लागतील. स्लममधील ८०% मालमत्ता या तेथे राहणाऱ्या लोकांच्या नावावर नाहीत. काही स्लम एरिया शासनाच्या जागेववर काही म्हडाच्या जागेवर आहे. पी. आर कार्ड बनल्याशिवाय प्रॉपर्टी रेकॉर्डवर येत नाही. जे लोक टॅक्स भरण्यास तयार आहेत. त्यांच्या मालमत्तांचे नामांतर करण्याबाबत आदेश दिले जातील.

**श्री प्रकाश निकाळजे** जवळपास २२ वसाहती या सरकारी जागेवर वसलेल्या आहेत. नगरपरिषदेच्या काळात लोकांनी याबाबत मोर्चा काढला होता. आमच्या नांवावर जिल्हाधिका-यांमार्फत या भागांचा सर्व्हे झाला होता. आमच्या नावावर करही लागला होता. आमच्या नावावर जिल्हाधिका-यामांर्फत या भागांचा सर्व्हे झाला होता. आमच्या नावावर करही लागला होता. केवळ नामांतर होणे बाकी होते. मागील पाच वर्षात त्याबद्दल झालाच नामांतर करणे थांबविले गेले. या जमिनी शासनाच्या आहेत. त्याचा कॅउस्ट्राल सर्व्हे झालेला आहे. झोपडपट्टयातील मालमत्तांचे नामांतर व्हावे.

**श्री सुरजितसिंग खुंगर** जागांची खरेदी विक्री होण्यापूर्वी मनपाची ना हरकत घ्यावी. अशा सूचना द्याव्यात जेणे करुन त्याचवेळी टॅक्स वसुल करता येईल.

**मा. महापौर** या सुचनेची नोंद घेण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** घर तिथे कर लागलाच पाहिजे, अनाधिकृत वसाहती, डिनोटीफाईड एरिया, औकाफ बोर्डाच्या जागेवरील घरे यांना कर लावण्यात यावा. मात्र रस्त्यामध्ये ज्या झोपडपटया वसलेल्या आहेत. त्यांना कर लावण्यात येऊ नये.

**मा. महापौर** घर तिथे कर लावण्यात यावे. यासाठी विषेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करुन चर्चा करण्यात येईल.

पाणीपट्टीबाबत उद्या चर्चा करण्यात येईल. जलतरण तलावा विषयांवरती चर्चा करण्यात यावी.

## *जलतरण सभा*

**श्री स. अली मिरा सलामी** स्विमिंग पूल फायद्यात चालू असल्याचे सांगितले जाते. मग उत्पन्नापेक्षा खर्च जास्त कसा.

**मा. महापौर** प्रस्तावित केलेले चार्जेस जशास तसे मान्य करण्यात येतात.

**श्री तकी हसन खान** स्विमिंग पूलावर खर्च १७ लाख दाखविला आहे. जेवढा खर्च होणार आहे. तेवढीच वसुली व्हावी. अशा गोष्टी कमीत कमी तोटयात चालविण्यात येऊ नयेत. १२ लाख वसुली होणार असल्याचे दाखविली आहे.

**श्री सुदाम सोनवणे** १२ लाख रुपये वर्षाचे उत्पन्न आहे.

**श्री तकी हसन खान** या पोहण्याच्या तलावावर अनेक कॉम्पीटीशन्स होतात. त्यातून किती उत्पन्न होते याची माहिती देण्यात यावी. अशा सुविधा देण्यावर महानगरपालिकेचे नुकसान होऊ नये. स्विमींग पुलाच्या माध्यमातून किमान

२० लाख रुपये उत्पन्न मिळावे. स्विमींग पूलापासून उत्पन्न मिळते असे सांगितले जाते. मग ५ लाख रुपये खर्चापेक्षा उत्पन्न कमी का?

**श्री नंदकुमार घोडेले** २० लाखापेक्षा कमी उत्पन्न नको. माझ्या माहितीप्रमाणे स्विमींग पुलापासून ३० लाख वसुली होईल.

**अति. शहर अभियंता** मागील वर्षी ८.५७ लाखाचे उत्पन्न झाले होते. त्यावर १७ लाखाचा खर्च झालेला आहे. एप्रिल पासून मेंबर्सची संख्या वाढलेली आहे. या वर्षापासून पूर्वीच्या दराने सुध्दा १२-१३ लाख रुपये मिळतील. विद्यार्थ्यांची संख्याही वाढत आहे. प्रस्तावित केलेले दर लागू केले तर स्विमींग पूल नो लॉस प्रॉफीट मध्ये चालेले. एप्रिल ते जून पर्यंत ८.७५ लाख उत्पन्न झाले आहे पुढील ९ महिन्यात ३-४ लाख रुपये उत्पन्न होईल.

**श्री सुदाम पाटील सोनवणे** स्थायी समितीने मान्य केलेले दर बरोबर आहेत.

**मा. महापौर** यावर्षी स्विमींग पूलाचे मेंबर्स वाढलेले आहेत. मागील तीन महिन्याचे उत्पन्न ८.७५ लाख झालेले आहे. रेट वाढवले तर उत्पन्न नक्कीच वाढेल. आपला स्विमींग पूल शहरातील इतर स्विमींग पूलापेक्षा निश्चितच चांगल्या स्थितीत आहे. शहरातील इतर कोणताही स्विमींग पूल एवढा चांगला नाही. याबाबत नागरीक, विद्यार्थी, पालकांनीही मॅनेजमेंट बाबत समाधान व्यक्त केलेले आहे. शहरातील काही हॉटेलस मधूनही स्विमींग पूल आहे. परंतु, त्यांच्यापेक्षाही आपला स्विमींग पूल चांगला आहे. हॉटेलपेक्षा आपले रेट कमी आहेत.

**श्री तकी हसनखान** १२ लाखाऐवजी रु. १७ लाखाचे उत्पन्न अपेक्षित धरावे. तशी दुरुस्ती करावी. वर्षाची फीस एकदम घ्यावी.

**श्री भगवान घडामोडे** स्थायी समितीने मंजूर केलेले दर सभागृहाने मंजूर करावे. सामान्य नागरिकांसाठी ही सेवा उपलब्ध करुन द्यावी. कारण सर्वसामान्य माणूस महागडया हॉटेलामध्ये जाऊ शकत नाही.

**श्री अंबादास दानवे** शहरात इतरही काही ठिकाणी जलतरण तलाव आहेत. परंतु त्यांच्यापेक्षा महानगरपालिकाचा जलतरण तलाव अद्यावत सूसज्य व चांगल्या स्थितीत आहे. जलतरण तलाव हा मनपाने सुरु केलेला व्यवसाय नाही. स्थायी समितीने जो प्रस्ताव मान्य केलेला आहे तो, सर्वसाधारण सभेत मान्य करण्यात यावा. तेथील व्यायाम शाळाही लवकरात लवकर सुरु करावी.

**श्री प्रशांद देसरडा** स्विमींग पूलाच्या दरात आपण एकदम दुप्पटीने वाढ करत आहोत. पावसाळयात अगोदरच पूलावर गर्दी नसते. पूलच्या वर्षी दर वाढवावेत.

**श्री जयवंत ओक** स्थायी समितीने जे दर मान्य केलेले आहेत ते मान्य करण्यात यावेत.

**श्री अविनाश कुमावत** मागील सहा वर्षात स्विमींग पूलाचे दर वाढविलेले नाहीत. इतर स्विमींग पूलाच्या मानाने आपले रेट कमी आहेत. नो लॉस, नो प्रॉफिट तत्वावर पूल चालविण्यात येतो. प्रस्तावित दरांना स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे ते मान्य करण्यात यावेत.

**श्री काशीनाथ कोकाटे** स्विमींग पूलाच्या दरात केलेली वाढ समर्थनीय आहे. नो लॉस, नो प्रॉफीट तत्वावर तो चालविण्यात यावा. याबाबत संबंधित खात्याने योग्य ती खबरदारी घ्यावी.

**मा. महापौर** स्विमींग पूलावरील जीभ लवकरात लवकर सुरु करण्यात यावी. प्रस्तावित दरांना मान्यता देण्यात येते. स्विमींग पूलात कोणताही लॉस होऊ नये.

**श्री स. अली मिरा सलामी** स्विमींग पूलावरती ज्या स्पर्धा झाल्या त्यातून किती उत्पन्न मिळाले.

**श्री तकी हसन खान** पूलावर १७.५ लाख खर्च करता येणार आहे. या प्रस्तावास आमचा विरोध आहे. यावर वोटींग घेण्यात यावी.

**मे. कादीर मौलाना** नो लॉस नो प्रॉफीट पूल चालविण्यात यावा.

**अति शहर अभियंता** स्विमींग पूलावर सर्वात जास्त खर्च इलेक्ट्रीसीटी वर येतो. त्या ठिकाणी फिल्टेशनची अत्यंत आवश्यकता आहे. दरवर्षी इलीक्ट्रीसीटीचा खर्च ८-९ लाख येतो. तेथे १६ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्यावर ४-५ लाख रुपये पगारासाठी खर्च होतो. यावर्षी ब्लिचींग पावडर, इमारतीची किरकोळ दुरुस्ती यासाठी २-३ लाख रुपये खर्च येतो. ब्लिचींग पावडर पाणी पुरवठा विभागाकडून घेण्यात येते. तथापी या घेतलेल्या पावडरचा खर्च स्विमींग पूलाच्या नावांवर टाकण्यात येतो. या व्यतिरिक्त तेथे क्लोरीफीला वापरले जाते. उन्हाळयात मार्च ते जून पर्यंत २०००-२५०० मेंबर्स असतात. लहान मुलांना त्यांच्य वयोगटानुसार प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्यासाठी विशिष्ट वेळा ठरवाव्या लागतील.

**श्री दलबीरसिंग जाबिंदा** मेंबर्स कमी जास्त होऊ शकतात.

**श्री सुरजीतसिंग खुंगर** आता सांगितले की, १२ लाख उत्पन्न व १७ लाख खर्च होणार आहे. असे २९ लाख येतील. २९ लाख कसे येतील हे कोठे दाखविले आहे.

**मा.महापौर** स्विमींग पूलावर गर्दी वाढत आहे. यावर्षी उत्पन्न वाढेल आपण तेथे जीम चालू करणार आहेत. जीमसाठी वेगळी मेंबर्सशिप लावणार आहोत. जीमचे उत्पन्न वेगळे धरले तरी तेथील मेंबर्सशिप वाढली आहे. वाढविलेले रेट दुप्पटीपेखा जास्त आहेत. प्रस्तावित वाढ जशीच्या तशी करण्यात मंजूरी देण्यात येते. १७ लाखाचे उत्पन्न स्विमींग पूलापासून मिळू शकेल. मेंबर्स वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

## *अग्निशमन*

**मा. महापौर** सर्वानुमते प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

## *विकास निधी*

**श्री दलबीरसिंग जाबिंदा** या प्रस्तावामुळे इनलीगला कामांना चालना मिळेल. एवढया मोठया प्रमाणावर दर न वाढविता १००/- रु. दर करण्यात यावेत. यामुळे विकास निधी वसुल होईल.

**श्री भगवान घडामोडे** १९९४ पासून आतापर्यंत विकास शुल्क का वाढविण्यात आला नाही. आज एवढया मोठया प्रमाणात दर वाढ का सुचविण्यात येत आहे. यामुळे जनतेवर बोजा वाढेल. विकास शुल्क १००/- करण्यात यावा.

**श्री जयवंत ओक** १९९४ नंतर एवढया मोठया प्रमाणावर अडीच पटीने वाढ करण्यात येत आहे. या दरवाढीमुळे बांधकाम परवानगीसाठी कोणी महानगरपालिकाकडे येणार नाही. यामुळे अनाधिकृत बांधकामे वाढतील रु. १००/- दर ठेवण्यात यावेत.

**मा. उप महापौर** १९९४ पासून ७०/- प्रति चौ. मीटर विकास निधी होता. सिडकोही महानगरपालिकेकडे येणार आहे. एवढी मोठे दरवाढ न करता १००/- रुपये दर ठेवावेत. जेणेकरुन नागरिकांवर बोजा पडणार नाही.

**श्री अंबादास दानवे** मागील बऱ्याच वर्षापासून विकास निधीमध्ये वाढ झालेली नाही. परंतु एकदम अडीचपट वाढ करता येणार नाही. हे शहर झपाटयाने वाढणारे शहर आहे. अनेक लोक सहकारी संस्था प्लॉट्स घेऊन घरे बांधतात. अशा प्रकारे मोठया प्रमाणावर दरवाढ केली तर सर्वसामान्य माणूस घर बांधू शकणार नाही. सर्वसामान्य माणसास स्वस्तात घर मिळाले म्हणून शासनही योजना राबविते. अशा प्रकारच्या दरवाढीमुळे अनाधिकृत बांधकामे वाढतील. बांधकाम परवानगी लेआऊटची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. यांना कोणत्या दराने विकास निधी आकारणार. प्राप्त प्रकरणांना जुन्या दराने विकास निधी आकारावा. प्रस्तावित दरांना मान्यता न देता, रु. १००/- चे दर मान्य करावेत.

**मा. आयुक्त** विकास निधीच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या पैशातूनच रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा आदि विकासाची कामे हाती घेतली जातात हे दर जिल्हा दरसूची प्रमाणेच आहेत. आपण प्रस्तावित करतो. त्यापेक्षा दर जास्त आहेत. जिल्हा दरसूची प्रमाणे हे दर ५०% होतात. १९९३ पासून हे दर वाढविलेले नाहीत. ते वाढविले पाहिजेत.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा** एवढया मोठया प्रमाणावर वाढ करण्यात येऊन नये.

**मा. उप महापौर** मागील ५ वर्षात दरवाढ झाली नसेल तर त्याला कोण जबाबदार एवढी मोठी दरवाढ म्हणजे नागरिकांवर अन्याय आहे.

**सौ. सुवर्णा चंद्रात्रे** १९९४ पासून थोडीथोडी वाढ केली असती तर आज एवढया मोठया प्रमाणात दरवाढ करावी लागली नसती.

**मा. महापौर** सर्व स. सदस्यांच्य भावना लक्षात घेता, विकास निधी रु. ७०/- प्रति चौ. मीटर वरुन रु. १००/- प्रति चौ. मीटर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यत येते.

## _जे.सी. बी रोड रोलर_

**मा. महापौर** प्रस्तावित दरांना सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## _आरोग्य विभाग_

**श्री स. अली मिरा सलामी** यपूर्वीचे दर काय होते.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** यापूर्वी आपण काहीच शुल्क घेत नव्हतो. हे दर आताच प्रस्तावित केलेले आहेत.

**मा. महापौर** महापालिकेच्या दवाखान्यात उपचार घेण्यास येतात. या सर्वांचा विचार करुन रक्त, लघवी, थुंकी तपासण्यासाठी रु. ५/- प्रत्येकी रक्ताचे घटक काढणे व इतर रु. २५/- प्रत्येकी, इसीसी काढाणे रुपये २५/- प्रत्येकी, सर्वसाधारण प्रसुतीसाठी रु. ५०/- प्रति रुग्ण फिस आकारण्यात सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

सांयकाळी ४.३० वाजता मा. महापौरांनी घोषित केले की, आजची सभा २८/७/२००० रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येते.

याबरोबरच "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक २८ जुलै २००० रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**दिनांक २७ जुलै २००० रोजी तहकुब करण्यात आलेली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २८ जुलै २००० रोजी सकाळी १०.०० वाजता मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" सुरु झाली. या सभेला कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. नगरसेवक उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | स. सदस्य |
| ३) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ५ स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ६) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) स. स. श्री शे. इलियास किश्मानी शेख उमर | -//- |
| ९) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| १०) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| ११) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| १२) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १३) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| १४) स. स. सौ मंदाबाई प्रभाकर पवार | -//- |
| १५) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १६) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १७) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १८) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १९) स. स. श्रीमती डॉ आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २०) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २१) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २२) स. स. सौ विजया किशोर राहाटकर | -//- |
| २३) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २४) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २५) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २६) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २७) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २८) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २९) स. स. श्री अय्युबखॉ सरदारखॉ | -//- |
| ३०) स. स. श्री अ. रशिद अ. सत्तार | -//- |
| ३१) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| ३२) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |

३३) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३४) स. स. सौ रशिदा बेगम गफ्फार यासखॉन -//-
३५) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३६) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३७) स. स. श्री स. मुमताज आली मोज्जम अली -//-
३८) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
३९) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
४०) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४१) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४२) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४३) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४४) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४५) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४६) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४७) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४८) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
४९) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
५०) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५१) स. स. श्री अशरफ मोतीवाला -//-
५२) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५३) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५४) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५५) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
५६) स. स. सौ दाणे चद्रभागाबाई भगीरथ -//-
५७) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५८) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
५९) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
६०) स. स. श्री गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहमद -//-
६१) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
६२) स. स. श्री शेख इसाक जैनोद्वीन शेख -//-
६३) स. स. श्री अफसरखॉं यासिनखॉ -//-
६४) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६५) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
६६) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
६७) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
६८) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्दीन खान -//-
६९) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
७०) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
७१) स. स. सौ. बबीता सुभाष कागडा -//-
७२) स. स. श्री स. अली सलामी स. मिरा सलामी -//-
७३) स. स. श्री तनवाणी किसनचंद लेखराज -//-
७४) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास
२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**संवाद**

**श्री नंदकुमार घोडेले** महानगरपालिकाचे कर्मचारी श्री. बाळासाहेब कुलकर्णी यांचे काल दुखःद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.
दिवगंत बाळासाहेब कुलकर्णी यांना सभागृतर्फे दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यता यावी.

**मा. महापौर** गणपूर्ती अभावी १० मिनटांनसाठी सभा तहकुब करण्यात येते.
१०.०० वाजता तहकुब करण्यात आलेली सभा १०.३० वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.

**मा. महापौर** आज महानगरपालिकाच्या बजेटवर दुसऱ्या दिवशी चालू आहे. यामध्ये प्रामुख्याने आज पाणीपट्टी विषयावर आपण चर्चा करणार आहोत. महापालिका मुलभूत सेवा सुविधा जनतेस पूरवत असते. पाणी ही एक मुख्य सेवा सुविधा मात्र शहरास पाणपुरवठा जवळपास ६० की. मी. अंतरावरुन आणावे लागते. हे पाणी ॲन्टी ग्रॅव्हीटीने आणावे लागते. यासाठी मोठया प्रमाणावर इलेक्ट्रीसीटी वापरावी लागते. शहरात अधिकृत ७,९५,४३,६३५ व्यापारी तर १४ औद्योगिक करणासाठी दिलेली नळ कनेक्शन आहेत. विद्युत पंपाच्या साहाय्याने आपण शहरात पाणीपुरवठा करतो. यासाठी मोठया प्रमाणावर विद्युत खर्च येतो. एका वर्षात महानगरपालिकेस ३५.८० कोटी खर्च येतो. नागरिकाकडून वसुल होणारी पाणीपट्टी १७.६० कोटी आहे. प्रत्येक वर्षी मनपास पाणी पुरवठा योजनेवर २१.२० कोटी तोटा येतो. आपण प्रत्येक महिन्यास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास ७५ लाख रुपये विद्युत देयकापोटी देतो. त्यांची मागणी २,१० कोटीची आहे. आपणांस एकंदर ९८ कोटी रुपये विद्युत मंडळाचे देणे आहे. पाणी पुरवठ हा मुलभूत आहे. यासाठी आपण मनपासी सतत झगडत असतो. हे करत असतांना पाणीपट्टी वसुलीकउेही लक्ष देणे आवश्यक आहे. विविध व्यासाच्या नळ कनेक्शंना वेगवेगळे दर आकारले जातात. शहरात येणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरुन १४ कनेक्शन्स इंडस्ट्रीजला दिलेली आहेत. त्यांच्याकडून आपणांस ३.२५ कोटी रुपये मिळतात. पाणीपट्टीमध्ये वाढ करावी. असा प्रस्ताव प्रशासनातर्फे स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता. या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेने निर्णय घ्यावा असा निर्णय स्थायी समितीने दिलेला आहे. नागरिकांना पाणी परवडले पाहिजे. परंतु आपण मनपाचे ट्रस्टी आहोत. पाणी पट्टीवरती येणारा तोटा आपण भरुन काढू शकणार नाही. परंतु तो थोडाबहूत भरुन काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**श्री नासेरखान** जनतेकडून आपण जी पाणीपट्टी घेतो ती बरोबर आहे. शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन शोधून त्याच्याकडून पैसे वसूल करण्यात यावेत. तसेच जे मोठे थकबाकीदार आहेत. त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी.

हॉटेल्स, कंपन्या इंडस्ट्रीज हे १०००/- ऐवजी ४०००/- कर भरु शकतात. सर्वसामान्य नागरिकांवर पाणीपट्टी वाढ लावण्यात येऊ नये.

**श्री माणिक साळवे** पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यात येऊ नये. यापेक्षा शहरात जे अनाधिकृत नळ कनेक्शन्स आहेत. ते शोधण्यात यावेत. शहरात ५० पेक्षा जास्त स्लम मधुन गोरगरीब जनता राहते. पुणे महापालिका स्लममधील लोकांना कमी दराने पाणी पूरवठा करते. त्याचप्रमाणे आपणही स्लम मधील लोकांना कमी दराने पाणी पुरवठा करावा.

**सौ साधना सुरडकर** पाणीपुरवठा हा जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. तसेच ही मूलभूत गरजही आहे. प्रत्येकास पाण्याची गरज असते. या प्रश्नांवर संपूर्ण बाबीचां विचार करुन निर्णय घेण्यात यावा. शहरात केवळ ६२५ नळ कनेक्शनसच कर्मर्शियल आहेत का? जेवढया हॉटेल्सनां लायसन्स दिलेले आहेत. तेवढे कनेक्शन्स कमर्शियल असावयास हवेत, शॉप ॲक्ट नुसार किती दुकांनाना, हॉटेल्सना लायसन्स दिले. प्रशासनाने याबाबत व्यवस्थित अभ्यास केलेला दिसत नाही. शहराला जवळपास २ लाख मालमत्ता आहेत. तर ७९ हजार नळ कनेक्शन्स कसे. शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन्स प्रथम शोधण्यात यावेत. शहरात किमार ३५०० कनेक्शन्स कमर्शियल असावयास हवेत. केवळ पाणीपट्टीत वाढ करण्याऐवजी कमर्शियल व अनाधिकृत कनेक्शन्स शोधण्यात यावेत. जेणेकरुन मनपाचे उत्पन्न वाढेल. पाणीपट्टीत किमान २००/- रुपयांची वाढ करण्यात यावी.

**श्रीमती पार्वतीबाई** शहरात पाणीपूरवठा सुरळीत नाही. व्यवस्थीत पाणी येत नाही. शहरात बरेच गरब लोक आहेत. काही लोक गाडे चालवितात, मोलमजूरी करुन पोट भरतात. त्यांच्यावर पाणीपट्टी लावण्यात येऊ नये. हॉटेल, दुकाने यांच्याकडील टॅक्स वाढविण्यात यावा. श्री. सावे महापौर असतांना आम्ही घागर मोर्चा काढला होता.

**सा. संगिता मैंद** पाणीपट्टी वाढविण्यात येऊ नये. शहरात किती अनाधिकृत नळ कनेक्शन्स आहेत. याचा प्रथम शोध घेण्यात यावा. पाणीपट्टी वाढवू नये.

**श्रीमती डॉ. आशा बिनवडे** पाणी हा सर्वांचा विशेष महिलांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. नागरिकांना आपण व्यवस्थित पाणी देऊ शकत नाही. तरीही पाणीपट्टीमध्ये वाढ करण्याबाबत चर्चा केली जात आहे. महानगरपालिका पाण्यावर ३२.८० कोटी खर्च करते. महानगरपालिकेस दरवर्षी पाण्यामध्ये २१.२० कोटीची तूट येत आहे. महानगरपालिकेत ६० किलो मीटर अंतरावरुन विद्युत पंपाच्या सहाय्याने पाणी आणावे लागते. यासाठी मोठया प्रमाणावर विद्युत देयक येते. विद्युत मंडाळाची आपल्याकडे ९८ कोटीची थकबाकी आहे. विद्युत बिल सतत वाढतच जाणार आहे. परंतु यासाठी केवळ पाणीपट्टी वाढविणे बरोबर नाही. पाण्यातील तुट भरुन काढण्यासाठी पाणीपट्टीमध्ये एकदम दुप्पटीने वाढ करणे हे बरोबर नाही. यास माझा विरोध आहे. पाणीपट्टी मध्ये वाढ करण्यात येऊन नये. शहरातील पाण्याची वितरण व्यवस्था तितकीशी समाधानकारक नाही. यामुळे पाणीपट्टी वाढविण्यास नागरिकांचा दोष पत्कारावा लागेल. पाण्याबाबत विजेचा वापर काही प्रमाणात कमी करता येईल का याची तपासणी करण्यासाठी एखादी समिती नेमण्यात यावी अथवा टाटा सारख्या इन्स्टीटयुटकडून याबाबत सर्व्हे करण्यात यावा. शहरात अनेक अनाधिकृत नळ कनेक्शन्स आहेत त्यांचा प्रथम शोध घेण्यात यावा.

कमर्शियल बेसीसवर जे नळ कनेक्शन्स दिलेले आहेत. त्यांच्या दरात वाढ केली तर उत्पन्न वाढू शकेल. कर्मचाऱ्यांनी केवळ कार्यालयात बसून पाणीपट्टी वसुल न करता प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाणीपट्टी वसुली करण्यात यावी. प्रत्येक विभागात आपण जेवढा पाणीपूरवठा करतो. तेवढी वसुली व्हावी. यासाठी विभागीय अधिकारी यांना जबाबदार धरण्यात यावे. जे नागरिक नियमित पाणीपट्टी भरतात त्यांना त्यात सवलत देण्यात यावी.

**सौ चंद्राभागाबाई दाणे** सध्या आहे त्यापेक्षा पाणीपट्टी कमी करण्यात यावी ज्याच्याकडे कमर्शिल कनेक्शन्स आहेत. त्यांच्यावर पाणीपट्टी वाढविण्यात यावी. शहरात अनेक गरीब लोक राहतात. ते एवढी मोठी पाणीपट्टी भरु शकणार नाहीत.

**सौ साजेदा बेगम** पाणीपट्टी वाढविण्यात येऊ नये. शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन्स प्रथम शोधण्यात यावेत ते कनेक्शन्स लिगल करुन त्यांच्याकडून पट्टी वसुल करण्यात यावी.

**सौ निखत परवीन ईजाज अली** ज्यांच्याकडे कमर्शियल कनेक्शन्स आहेत, त्यांच्यावर पाणीपट्टी वाढविण्यात यावी. स्लम एरियासाठी पाणीपट्टी वाढविण्यात यावी. शहरात काही भागात पाणी येतच नाही. ज्यामुळे अशा भागातील लोक पाणीपट्टी भरण्यास विरोध करतात. पाणीपट्टी वाढ करण्यात येऊ नये.

**सौ कचराबाई लोखंडे** शहरात पाण्याचा पुरवठा बरोबर होत नाही. हांडे घेऊन नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागते. त्यासाठी पाणीपट्टी वाढवू नये.

**सौ लिलावती घायतिलक** पाणीपट्टी वाढी संदर्भाने प्रशासनाचा दृष्टीकोन योग्य असला तरी, यामुळे स्लम एरियासाठी कठीण परिस्थिती निर्माण होणार आहे. मागील वर्षी १०००/- रुपये पाणीपट्टी भरली नाही. म्हणून अनेकांचे नळ कनेक्शन्स तोडण्यात आले. आमच्या भागात १५ मिनीटेही पाणी येत नाही. तर एवढया मोठया प्रमाणात लोक पाणीपट्टी भरणार कसे अनेक वसाहतीत गरीब, मजूर लोक राहतात. त्यांना एवढया प्रमाणात पाणीपट्टी भरणे शक्त होणार नाही. झोपडपट्टीतील लोकांसाठी शासन अनेक योजना राबविते, सुविधा देते त्यांच्यावर एवढा मोठा कर लादणे योग्य वाटत नाही. ७००/- रुपये दर केल्या झोपडपट्टीतील लोक भरु शकतील झोपडपट्टीतील लोकांसाठी दर कमी करावा.

**सौ जयश्री कुलकर्णी** अयोध्यानगर बी. डी. सेक्टरमध्ये पाणी येत नाही. तसेच सिडके-हडको भागात अत्यंत कमी पाणी येते. १०००/- रुपये पाणीपट्टी घेतो तीही जास्त आहे. पाणीपट्टी कमी करण्यात यावी.

**सौ नुसरत बानो** माझ्यात वार्डात अनेक गरीब लोक राहतात. ५०% एरिया इनलिगल आहे. झोपडपट्टीतील नागरिक एवढी पाणीपट्टी भरु शकणार नाहीत. पाणीपट्टी वाढ करण्यात येऊ नये.

**श्री पांडूरंग तायडे** पाणीपट्टीत वाढ झाली तर लोक कर भरणार नाहीत. माझ्या वार्डात नियमित पाणी येत नाही. त्यासाठी पाणीपट्टी वाढविण्यात येऊ नये. प्रथम सिडको-हडको भागास चांगल्याप्रकारे पाणीपुरवठा करण्यात यावा. माझ्या वार्डात एका वर्षात केवळ ३२ दिवस पाणीपूरवठा झालेला आहे. त्यामुळे नेहमी टँकर आणावा लागतो.

**श्री इसाक जैनोद्दीन** आरोग्य अधिकारी यांना मी पत्र दिले होते की, किती हॉटेल्सनां आपण नळ कनेक्शन्स दिलेले आहेत. शहरात अनेक हॉटेल्स, म्हशींचे गोठे, सर्व्हीसींग सेंटर्स आहेत. त्यामुळे प्रशासनाने दाखविलेले आकडे बरोबर

वाटत नाहीत. कमर्शियल नळ कनेक्शन्स २००० पेक्षा जास्त असावयास पाहिजेत. याचा सर्व्हे करण्यात यावा. १०-१० मिनिटेही पाणी येत नाही. त्यामुळे १०००/- रुपयावरुन पाणीपट्टी ७००/- रुपये करावी. अशी लोकांची मागणी आहे.

**श्री भगवान रगडे** घोषित स्लम, झोपडपट्टयातून बरेचसे लोक दरिद्र रेषेखालील आहेत. त्यांना त्यांचे रोज पोट भरता येत नाही. ते एवढी मोठी पाणीपट्टी कशी भरतील. घोषित स्लमसाठी ५०% कर टॅकंरने कमी करण्यात यावा. मिसरवाडी भागात महानगरपालिकाद्वारे पाणीपुरवठा होता. दररोज पाठविण्यात येणाऱ्या १०-१२ टॅकंरवर महानगरपालिका २-३ लाख रुपये वर्षाला लागत असतील त्यासाठी याठिकाणी कायमची पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. पाणी पुरवठयासाठी ज्या लाईन्स टाकल्या जातात. त्या बरोबर नाहीत. काही ठिकाणी पाईपलाईन ४ इंची तर काही ठिकाणी ६ इंची टाकलेली आहे. अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे ५-६ वर्षापासून या भागातील टाकीत पाणी पडत नाही.

**श्री राजू शिंदे** शहरात अनेक अनाधिकृत नळ कनेक्शन्स आहेत. पाणीपुरवठा बरोबर होत नसतांनाही पाणीपट्टीत वाढ करणे हे बरोबर नाही. स्लम एरियासाठी ५०% टॅक्स माफ करण्यात यावा. त्यांना ५००/- रुपये चार्ज लावण्यात यावा. स्लम एरियासाठी स्टँड पोस्टची व्यवस्था करण्यात यावी. कमर्शियल नळ कनेक्शन्ससाठी दर दुप्पट करण्यात यावेत.

**श्री जयवंत ओक** (सभागृहात डोक्यावर पाण्याचा हंडा भरुन आणतात. ) पाणीपट्टी वाढ करु नये यासाठी सभागृहात घोषणा देतात. जनतेस मुबलक पाणी दया. नंतरच पाणीपट्टी वाढ करा.

**श्री प्रकाश निकाळजे** असे वर्तन सभागृहात बरोबर नाही. त्यांनी सभागृहाची माफी मागावी.

**मा. महापौर** सभागृहात पाणीपट्टी या विषयावरती ज्यांना आपले विचार मांडावयाचे असतील त्यांनी मांडावेत. अशा प्रकारचे वर्तन करु नये. मी अद्याप यावर निर्णय दिलेला नाही.

(सभागृहात दोन्ही बाजुनी घोषणा दिल्या जातात.)

**श्री जयवंत ओक** पाणीपट्टी दरवाढी संदर्भाने महिलांचे विचार मी ऐकलेले आहेत. पाणीपट्टी वाढीस सर्वाचा विरोध आहे. महानगरपालिकेने प्रथम भरपूर पाणीपुरवठा करावा व नंतरच पाणीपट्टीत वाढ करावी. केवळ १५ ते ४५ मिनिटे पाणीपुरवठा केला जाते. मग एवढया मोठया प्रमाणात दर कसे वाढविता. पाणीपट्टीत वाढ झाली तर लोक मला प्रभागात फिरु देणार नाही. अशा धमक्या मतरदारांनी मला दिलेल्या आहेत.

**श्री स. अली मिरा सलामी** पाणीपट्‌टी वाढीस सर्वांचाच विरोध आहे. सभागृहात बोलत असतांना सभासदांनी शिस्त पाळावयास हवी. सभापतींनी पाणीपट्टी वाढ करुन अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेसमोर पाठविले. त्यांचेच मेंबर्स त्यास विरोध करत आहेत. आपणास ६० मि.मी. वरुन पाणी आणावे लागत हे नेहमीच सांगितले जाते. शहरात नळ कनेक्शन्स किती, मालमत्ता किती याची माहिती देण्यात यावी. आपणास विद्युत बिलावर मोठा खर्च येतो. यासाठी मागे शासनास निवेदन देण्यात आले होते. त्यावर पूढे काय कार्यवाही करण्यात आली. सिडको-हडको भागातच जवळपास ३५००० प्रॉप्टीज आहेत. मग सर्व शहरात ७९००० नळ कनेक्शन्सच कसे जे

अनाधिकृत कनेक्शन्स असतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. पूर्वी पाणीपट्टी ३०० रुपये होती ती ५००/- केली गेली. नंतर ७०० व १०००/- केली गेली. या वाढीस शासनाने मंजूरी दिली का. पाच वर्षात तीन वेळा पाणीपट्टी वाढ केली गेली तरीही पाणीपुरवठा व्यवस्था तोटयातच आहे. असे सांगितले जाते. हा तोटा कमी कसा होईल. याबाबत आपल्याकडे काही उपाययोजना आहे काय? केवळ पाणीपट्टी वाढ हे त्यास उत्तर नाही. शहरात किमान १३००० कनेक्शन्स ईललीगल असावेत. काही प्लंबर्स पाणीपट्टी वाढ करु नये. म्हणून महानगरपालिका समोर उपोषनास बसलेले आहेत. ज्यांनी अनाधिकृत कनेक्शन्स दिले त्यांचे परवाने रद्द केले का? पाणीपट्टी वसुली ही कमी होते. पाणीपट्टी वसुलीचा आकडा पाहता केवळ मार्च मध्येच १२० लाख वसुली झालेली आहे. मग ११ महिन्यात वसुली का झाली नाही. वर्षभर वसुलीचे काम केले तर तोटा येणार नाही. खाजगी संस्थेमार्फत सर्व्हे करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. हे बरोबर नाही १९८४ ते ८५ मध्ये ड्रेनेज लाईन्स संदर्भाने सर्व्हे करण्यासाठी राहा कन्सल्टन्सी यांना काम दिले होते. त्यांच्या अहवालावर काय कार्यवाही झाली शहरातील प्रदुषण कमी करण्यासाठी उपाययोजना करता यावी. यासाठी एका संस्थेस काम दिले होते. त्यांच्या अहवालावर कार्य कार्यवाही झाली. अधिकारी/कर्मचारी बरोबर वसुली करत नाहीत. केवह दरवाढ करुन चालणार नाही. बिल्डींग इन्स्पेक्टर अनाधिकृत बांधकामे करणारास सांगतात की, नगरसेवक आपल्या कामाबाबत तक्रार करत आहेत. ते लोक आमच्याकडे येतात. खाजगी कंपन्यांना सर्व्हे करण्याचे काम देण्यात येऊ नये. यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांनांच सक्षम बनवावे. जायकवाडीतील पाणी पिण्यास न देण्याचा निर्णय शासनाने घेतला तर आपण काय करणार आहोत. यासाठी मनपाने स्वतःचाच एक तलाव बनवावा. यासाठी अभ्यास करण्यासाठी एक कमीटी स्थापन करावी. अर्थसंकल्पात या कामासाठी ५ कोटीची निधी ठेवण्यात यावा. हर्सुल तलाव बराच जूना झालेला आहे. त्यांतील गाळ काढून तो खोल करण्यात यावा. त्याची भिंत नवीन बांधण्यात यावी यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करता येईल काय याचा विचार करावा. यामुळे या तलावात भरपूर पाणी जमा होईल. मलिक अंबर नहर द्वारेही शहरात पाणी येते. बऱ्याच ठिकाणी नहर तोडून पाणी घेतात. याचा सर्व्हे व्हावा. या सर्व बाबीचा विचार करत पाणीपट्ीत वाढ करण्यात येऊ नये.

**सौ सुवर्णा चंद्रात्रे** शहरात केवळ ६२५ कनेक्शन्स कमर्शियल दाखविले आहेत. अनाधिकृत कनेक्शन्स कसे घेतले जातात. प्रशासन त्यावर काय कार्यवाही करते. कमर्शियल कनेक्शन्साठी वेगळे दर आकारण्यात यावेत. अनाधिकृत नळ कनेक्शन्स शोधण्यासाठी एखादया स्वतंत्र कमीटी नेमण्यात यावी. पाणीपट्टीत वाढ करणे अपरिहार्यच असेल तर थोडीबहुत वाढ करण्यात यावी. स्लमभागाचा यात विचार करण्यात यावा. क्रांतीचौक वार्डातील १००% नागरिक कराचा भरणा करतात. तथापी या भागात ज्या प्रमाणात सुविधा मिळत नाहीत. त्यांमुळे त्यांच्यावर कराचा बोजा पडतो. बंडू ओक यांनी केलेले कृत्य योग्य नसेल तरी त्यांनी केले ते योग्यच केले.

**श्री मोतीलाल जगताप** सभागृहात सर्वच स. सदस्यांनी पाणीपट्टीत वाढीस विरोध केलेला आहे. महानगरपालिकात जी १८ खेडी समाविष्ट करण्यात आली आहेत.

त्यांना अद्यापही मुलभूत सुविधा प्राप्त झालेल्या नाहीत. या खडयामंध्ये कमी व्यासाच्या पाईपलाईन्स टाकलेल्या आहेत. या भागातील जलकुंभही लहान आहेत. त्यामुळे या भागात पूरेसे पाणी मिळत नाही, खेडी व स्लम एरियासाठी पाणीपट्टीत वाढ करु नये. हॉटेल्स व इतर औद्योगिक उद्योगधंदे यांच्या पाणीपट्टीत वाढ करण्यात यावी. काही ठिकाणी मोटारी लाईन पाणी घेतले जाते व त्या पाण्यावरच घरोसमोर उद्याने विकसीत केली जातात त्यांच्याविरुध्द उपाययोजना करण्यात यावी.

**मा. महापौर** पाच मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते.

११.४५ वाजता तहकुब झालेली सभा १२.०० वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली परत सुरु झाली.

**श्री अफसरखान** सध्या आहे तेच पाणीपट्टी दर ठेवण्यात यावेत. महानगरपालिकेचे किती शॉपींग सेटंर्स आहेत. ते किरायाने दिले जातात की नाही, किती एजन्सीजंना होर्डींग्ज लावण्याचे परवाने देण्यात आली, किती अनाधिकृत आहेत. याची माहिती देण्यात यावी. होर्डींग्ज आपण टेंडर पध्द्तीने देणार होतो त्याचे काय झाले. मागील ८-१० वर्षात किती नविन इमारती, हॉटेल्स, दुकाने बांधण्यात आली. त्यांच्यावर कराची आकरणी करण्यात आली काय हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. पाणीपट्टीत वाढ करुन गरीब जनतेवर कराचा बोजा टाकण्यात येऊ नये. पाणीपट्टीत वाढ केली तर आम्ही सभागृहात त्यांचा निषेध करु.

**सौ विजया रहाटकर** पाणीपट्टी वाढी संदर्भाने शहरात, उलटसुलट चर्चा चालू आहे. पाणी प्रश्नावर महिलांच्यां तीव्र भावना आहेत. कारण पाण्यासाठी महिलांनाच तोंड द्यावे लागते. पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यात येऊ नये. उत्पन्नच मिळाले नाही, तर विकास कामे करता येणार नाहीत. हे खरे आहे परंतु त्यावर पाणीपट्टी वाढ हा उपाय नाही. शहरात अनेक अनाधिकृतनळ कनेक्शन्स आहेत. त्यांचा शोध प्रशासनाने घ्यावा. जेणेकरुन महानगरपालिकाचे उत्पन्न बुडणार नाही. प्रथम लोकांना स्वच्छ व मुबलक पाणी द्या. नंतर पाणीपट्टीत वाढ करा. शहरात अनेक दवाखाने, हॉटेल्स्, प्रोफेशनल इन्सिटीटयुटस आहेत. मग कमर्शियल नळांची संख्या केवळ ६२५ कशी. उत्पन्न वाढीसाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना करुनही तोटा होत असेल तर पाणीपट्टीत वाढ करण्यात यावी. त्यास आम्हीही मदत करु. घरगुती कनेक्शन्स सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था अशी वर्गवारी करण्यात यावी. स्लम एरियासाठी पाणीपट्टीत वाढ करण्यात येऊ नये. पाणीपट्टी वाढीमुळे पाणी चोरीत वाढ होईल. महिला वर्गाचा हीत लक्षात ठेवून पाणीपट्टीत वाढ करण्यात येऊ नये.

**श्री स. सलीम स. युसुफ** शहरात अनाधिकृत नळ कनेक्शन्स किती नागरिकांकडे थकबाकी किती ती प्रथम वसुल करण्यात यावी. पाणीपट्टीत वाढ करण्यात येऊ नये.

**श्री नंदकुमार फुलारी** सिडको-हडकोत पाणी प्रश्न गंभीर आहे. या भागात वेळेवर पाणीपुरवठा होत नाही. अधिकाऱ्यांला विचारणा केली असता, ग्रॅव्हीटी आली नाही. अशी कारणे सांगितली जातात. सिडको-हडको भागात २५ मिनिटेही पाणीपुरवठा होत नाही. हॉटेल्सला लावलेली पाणीपट्टी कमी करण्यात यावी.

**श्री नारायण सुरगोणीकर** बऱ्याचशा फॅक्टऱ्यांमध्ये काम करणारे कामगार सिडको भागात राहतात. मागील बऱ्याचशा फॅक्टचा बंद झालेल्या आहेत. एवढी वाढ केली

तर हे लोक पाणीपट्टी भरु शकणार नाहीत. १०००/- रुपये पाणीपट्टीत ठेवण्यात यावी.

**श्री प्रशांत देसरडा** वसुली होत नाही, म्हणून दरवाढ करणे हे बरोबर नाही. विद्युत बिला संदर्भाने मागील वर्षी सर्वसाधारण सभेत एक ठरात पारीत केला गेला होता की, पाणीपुरवठा लाईट बिलासाठी शेतकी दराने आकार लावण्यात यावा व यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. यावर माजी उपमुख्यमंत्री मुंढे यांनी महानगरपालिकाने थकबाकी पोटी रु. ७५/- लाख महानगरपालिकाने विद्युत मंडळास द्यावे असे आदेश दिले होते. ते आदेशच पाळण्यात यावेत. पाणीपट्टीची वसुली व्यवस्थित करण्यात यावी. घरे तेथे नळ योजना राबविण्यात यावी. त्यामुळे अनाधिकृत व अधिकृत नळ कनेक्शन्स हा मुद्दा उपस्थित होणार नाही. महानगरपालिकाने ज्या हॉटेल्स् दवाखान्यांना परवान्या दिलेल्या आहेत. त्यांची संख्या पाहता केवळ ६२५ कमर्शियल नळ कनेक्शन्स आहेत. हे म्हणजे संयुक्तीक वाटत नाही. यासाठी एखादी कमीटी नेमण्यात यावी व दर महिन्यांनी कामाचा आढावा देण्यात यावा. गोदावरी विकास मंडळाबाबत महानगरपालिकाने विचार करावा. वसुलीसाठी प्रयत्न केले तर पाणीपट्टी दरवाढ करण्याची आवश्यकत राहणार नाही. शासकीत कार्यालयांना जे नळ कनेक्शन्स दिलेले आहेत. त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी.

**श्री नंदकुमार घोडेले** पाण्यावरील ७० ते ७५% खर्च विद्युत देयकाचा आहे. पूर्वी सभागृहाने निर्णय घेतला होता की, विद्युत देयक कृषी दराने आकारण्यात यावी. हा ठराव परत पालकमंत्र्यांकडे पाठविण्यात यावा व त्याचा पाठपुरावा करावा. स्लम विभागासाठी ५०% सवलत देण्यात यावी. तसेच सेवाभावी संस्था करीता वेगळे दर आकारण्यात यावेत. महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या १८ खेडयांत जी पाणीपुरवठा लाईन टाकण्यात आलेली आहे. त्यांची पाहणी करण्यात यावी. पाणीपट्टी थोडीबहूत वाढ करण्यात यावी.

**श्री सुरजितसिंग खुंगर** केवळ पाणीपट्टी न वाढविता सोर्सेस कसे वाढतील. याबाबत प्रथम विचार व्हावा. जायकवडी पेक्षा जवळून आपण पाणी घऊन शकतो काय? यासाठी आपण काही योजना आखली आहे काय. बरेचसे कमर्शियल नळाधारक घरगुती वापरासाठी असलेल्या नळ कनेक्शनच्या दराने पैसे भरतात. उत्पन्न वाढावे यासाठी अनाधिकृत नळ कनेक्शन्स शोधण्याचा यावेत. हे सर्व प्रयत्न केले तर पाणीपट्टीत वाढविण्याचा प्रश्न येणार नाही. शहरात किती होर्डीग्ज आहेत पाहणी करण्यात यावी. होर्डीग्जना नंबर्स देण्यता यावेत. जेणेकरुन त्याचा कालावधी व ते अधिकृत की अनाधिकृत हे दिसून येईल. पाणीपट्टीत वाढ करण्यात येऊ नये.

**श्री तकी हसन खान** पाणीपट्टीत वाढ करणे आवश्यक आहे किंवा नाही ही वेगळी बाब आहे. मुळातच शहरास होणारा पाणीपुरवठा कमी आहे. माझ्या माहितीप्रमाणे शहरास १२० एमएलडी पाणी मिळते. दरवाढ केल्यानंतर सध्या पुरवठा होत असलेल्या पाण्यापेक्षा जास्त पाणी मिळू शकेल काय? पाणीपट्टी वाढविली जाणार असेल तर, वाढीव मिळावयास हवे ५०% पाणीपुरवठा वाढविता तरी लोक आनंदाने पाणीपट्टीत भरतील. पाणी पुरवठयावर होणारा खर्च किती व उत्पन्न किती हेही पाहणे गरजेचे आहे. विद्युत मंडळाकडे प्रतिमहा १ कोटी रुपये भरले जावेत. असा प्रस्ताव आलेला आहे. त्याऐवजी ७५/- लाख

रुपयेच भरण्यात यावेत. सिडकोस २७ एमएलडी पाणी जाते यासाठी सिडकोने ५ कोटी रुपये द्यावयास हवेत. महानगरपालिका व जनता यांच्यापैकी कोणावरही बोजा पडणार नाही. असा मार्ग काढण्यात यावा. काही प्रमाणात पाणीपट्टी वाढवावी काही प्रमाणात पाणी वाढवावे. आपणच न्याय करावा.

**श्री भगवान घडोमोडे** पाणीपुरवठयार महानगरपालिकेस दरवर्षी २१ कोटींचा तोटा येतो. महानगरपालिकाचे प्रतिनिधी व प्रशासन ही या स्थायी दोन चाके आहेत. ही दोन चाके बरोबर चालली तर शहराचा विकासही बरोबर होईल. बऱ्याच ठिकणी वॉल्स मधून हजारो लिटर पाणी लिकेज होऊन वाया जाते. अशा लिकेज होणाऱ्या वाल्सची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. ज्यामुळे शहरास होणाऱ्या पाणी पुरवठयातील पाणी वाया जाणार नाही. सिडको-हडकोसाठी २७ एमएलडी पाणी पुरवठा होतच नाही. तसेच सिडको भागातील सर्व कनेक्शन्स वैध आहेत. सिडकोत घर देतानांच नळ कनेक्शन्स दिले जाते. त्यामुळे तेथील कनेक्शन्स अनाधिकृत असण्याचा प्रश्न येत नाही. जायकवाडी जलवाहिनी नेहमी फुटते त्यामुळे वारंवार पाणीपुरवठा खंडीत होतो. याबाबत तात्काळ उपाययोजना करावयास हवी आहे. त्याचप्रमाणे पाणीपट्टी ठेवावी.

**श्री प्रकाश निकाळजे** पाणी ही सर्वांचीच अत्यावश्यक गोष्ट आहे, काही स. सदस्यांना वाटते की, पाणीपट्टी वाढी संदर्भाने मी बोलेलो नाही, तर लोकांना मला उत्तर द्यावे लागेल. आपण लोकप्रतिनिधी आहोत तसेच महानगरपालिकाचे ट्रस्टीही आहोत. पाणीपुरवठयाबाबत महानगरपालिका सध्या २१ कोटी तोटयात आहे. यामुळे विकासाची कामे होत नाहीत. एखादा दिवस पाणी नाही आले तर, आपण सर्वजण भांडतो. परंतु दोन-दोन दिवस विज आली नाही तर आपण बोलत नाही. आपण चैनीच्या गोष्टीवर दरमहा २०० रुपयापर्यंत खर्च करतो. पाण्यावर आपण रोज एक रुपया खर्च केला तरी भरपूर आहे. आताच्या दराने ४५ पैसे दर लिटर एवढा खर्च प्रत्येक घरास येतो. एका घरात एक नळ कनेक्शन देण्यात येते. मात्र एका एका कूटूबांत १०-२० लोक राहतात. त्यांना पाणी पूरत नाही. २५ पैसे प्रति लिटरचे पाणीपट्टीत वाढ करण्यात हरकत नाही.

**मा. महापौर** दोन तासासाठी सभा तहकुब करण्यात येते.

१.० वाजता तहकुब झालेली सभा दुपारी ३.०० वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली परत सुरु झाली.

**श्री जयवंत ओक** सभागृहात पाणीपट्टी दरवाढी संदर्भाने चर्चा चालू आहे. पाणीपट्टीत वाढ करण्यास माझा विरोध आहे. पाणीपट्टीत वाढ करत असतांना जनतेस मुबलक पाणी देतो का, याचाही विचार होणे आवश्यक आहे. स्वच्छते संदर्भाने जशी आपण शहराची पाहणी केली तशीच पाणीपुरवठया संदर्भानेही करावी. सिडको-हडको भागात २-३ दिवसाआड पाणी येते. आपण जनतेच मुबलक प्रमाणात पाणी देऊ शकत नसून तर पाणीपट्टी वाढवयाचे कारण काय? अनाधिकृत वसाहती, जुने शहर, गारखेडा भाग, १८ खेडी या भागास आपण मुबलक पाणी देतो का, हा प्रश्न आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन्सचा आपणे जो सर्व्हे करणार आहात. त्याबाबत आपले अभिनंदन अनाधिकृत नळ कनेक्शन्स व प्रॉपर्टी टॅक्स यांचा एकत्रीत सर्व्हे करण्यात यावा. हा सर्व्हे

आपल्या अधिकाऱ्यामार्फतच करण्यात यावा. त्यासाठी आवश्यक ती कर्मचारी वर्ग देण्यात यावा. त्यामुळे सर्व्हेवर होणारा खर्च टळेल. अनाधिकृत नळ कनेक्शन्स घेणारांवर कार्यवाही करण्यात यावी. शहरात मलिक अंबर नहरचे पाणी, तसेच थत्ते हौदाचे पाणी वापरले जाते. मलिक अंबर नहरचा मी सभापती असतांना सर्व्हे केला होता. यासाठी शासनाकडे ५ कोटी रुपये मिळावे, म्हणून पत्र पाठविले होते. बऱ्याच ठिकाणी ही नहर बंद आहे. मलिक अंबर नहरसाठी बजेटमध्ये १ कोटी रुपयाची तरतुद करण्यात यावी.

**श्री राधाकृष्ण गायकवाड** सभागृहात अनाधिकृत नळ कनेक्शन्स संदर्भाने बरीचशी चर्चा झालेली आहे. केवळ चर्चा होण्यापेक्षा अंमलबजावणी काय झाली हे पाहणे आवश्यक आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन्स शोधणे हे वाटते तेवढे सोपे नाही. तथापी अनाधिकृत नळ कनेक्शन्स शोधले तर महानगरपालिकाचे उत्पन्न वाढेल. राशनकार्ड एवढेच महत्व पाणीपट्टी बिलासही असावयास हवे. विद्युत मंडळाच्या देयकापोटी १ कोटीची तरतुद दर्शविली आहे. तथापी सध्या आपण देत असलेले रु. ७५ प्रमाणेच देयक देण्यात यावे. विद्युत देयकावर शासनाकडून ५०% सबसीडी मिळविली तर उत्पन्नात वाढ होईल. नविन लाईन्स टाकात असतांना आपण बेटरमेंट चार्जेस घेतो. नविन कामात ११ कोटी वाचवू शकतो.

**श्री सुदाम पाटील सोवनणे** शहरास ६० किमी अंतरावरुन पाणीपुरवठा करावा लागतो हे नेहमीच सांगितला जाते. त्यामुळे पाणीपुरवठयावर महानगरपालिकास तोटा सहन करावा लागत आहे. २८/७/२००० ला मी पत्र दिले होते की, शहरात नळ कनेक्शन्स किती आहेत. मला उत्तर मिळाले की, शहरात ७८६५० नळ कनेक्शन्स आहेत. बजेटमध्ये माल ७९५७३ एवढी संख्या दाखलेली आहे. ही आकडयाची तफावत कशी शहरात स्थायी मालमत्ता किती अशी मी विचारणा केली असता १९८९-९० च्या सर्व्हे प्रमाणे १,०५४०० मालमत्ता असल्याचे मला उत्तर देण्यात आले. यानुसार ३०,००० मालमत्तांना नळ नाहीत असे दिसून येते. जेवढया मालमत्ता तेवढे नळ कनेक्शन्स असावयास पाहिजेत. स. सदस्य श्री तकीहसनखान यांनी मुद्दा उपस्थित केला की, सिडको-हडको भागात २७ एमएलडी पाणी दिले जाते. प्रत्यक्षात सिडकोस ११ ते १३ एमएलडी पाणी दिले जाते. सिडकोस २२ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. पाणीपट्टीत वाढ केल्यास तेवढे वाढीव पाणी आपण देणार का? मागे मुंढे साहेब उपमुख्यमंत्री असतांना त्यांना निवेदन दिले होते की, औरंगाबाद महानगरपालिकेस कृषी दराने पाणीपुरवठा विद्युत देयक आकारण्यात यावे. त्यावेळी उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, हेच दर इतर महानगरपालिकांनाही लावावे लागतील. आपण या प्रश्नाकडे लक्ष देऊन तो निकाली काढावा.

**श्री सुनिल वडागळे** पाणीपट्टी वाढवित असतांना आपण इतर मुलभूत सुविधा देणार आहोत का? आपण प्रत्येक नळास ७००-८०० लिटर पाणी देतो का, याची माहिती दयावी. गरीब लोक १०००/- रुपये कर भरु शकत नाहीत, मग ते १९००/- रुपये कोठून भरतील. बऱ्याचाशा कर्मचाऱ्यांकडे थकबाकी आहे ती वसुल करण्यात यावी. अधिकारी नळ कनेक्शन्स घेतात का? ते कराचा भरणा करतात का? स्लम भागासाठी १०००/- दर न ठेवता तो कमी करावा.

**श्री रतनकुमार पंडागळे** अनेक स. सदस्यांनी पाणीपट्टी वाढीस विरोध केलेला आहे. पाण्यापोटी महापालिकेत २१ कोटीची तुट आहे. ५३ स्लमसाठी पाणीपट्‌टी कमी करता येईल काय याचा विचार करावा.

**श्री आनंद तांदुळवाडीकर** पाणीपट्टी वाढीस माझा विरोध आहे. माझ्या वार्डातील पुर्ण लोक करांचा भरणा करतात. तरीही मुबलक प्रमाणात पाणी मिळत नाही. मुबलक प्रमाणात पाणी पुरविण्यात यावे तर पाणीपट्टी वाढीस माझी सहमती राहील. पाणीपट्टीची वसुली इतकी कमी का? माझा खुलासा व्हावा. अनाधिकृत नळ कनेक्शन्स शोधले तर उत्पन्नात वाढच होईल.

**सौ नुसरत बानो** जायकवाडी जलवाहीनीवरुन जेवढें कनेक्शन्स डायरेक्ट घेतलेले आहे असे दर्शविलेले आहे, त्यापेक्षा जास्त कनेक्शन्स दिलेले आहेत. शासनाने पाणीपुरवठयासाठी कृषी दराने विद्युत देयक आकारावे अशी विनंती करण्यात यावी. शहराचे पालकमंत्री पाटील साहेब तसेच उर्जामंत्री दर्डा साहेब यांच्याकडे परत निवेदन द्यावीत व थकबाकी माफ करण्याचा प्रयत्न करावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** पाणीपट्टी प्रश्नावर सभागृहात विस्तृत चर्चा झालेली आहे. पाणीपट्टी संदर्भाने काही सूचना प्रशासनाने केल्या आहेत. शहरास जायकवाडी व हर्सुल तलावातून पाणीपुरवठा केला जातो. सिडको-हडको भागात २८,४,३६ नळ कनेक्शन्स आहेत. तर काही संपूर्ण शहरात ७९,५,४३ व इतर कमर्शियल कनेक्शन्स आहेत. म्हणजेच १/३ कनेक्शन्स हे फक्स सिडको भागातच आहेत. सिडको भागास २२ एमएलडी पेक्षा जास्त पाणी मिळावयास पाहिजे. आपण शहरास ५० एमएलडी व सिडकोस २५ एमएलडी पाणी दिले तरी चालते. एकूण येणाऱ्या पाण्यापैकी किती पाणी शहरास मिळत नाही, किती पाणी चोरीस जाते हे मात्र प्रशासनातर्फे सांगितले जात नाही. १२५ एमएलडी पाण्याचे वितरण कशाप्रकारे होते. याची माहिती सभागृहास देण्यात यावी. सर्वसामान्य जनतेस पाणी मिळत नसून मोठया उद्योगपतींना पाणी दिले जाते. अशा लोकांकडून किती वसुली झाली याची माहिती देण्यात यावी. स्लम भागात राहणारांची संख्या जास्त आहे. त्यांच्यावर पाणीपट्टी वाढीचा बोजा टाकण्यात येऊ नये. आपण पाणीपट्टी वाढवित आहात ती विद्युत देयक देण्यासाठी गेल्या शासनाने उद्योजकांना ८८१ कोटी रुपये माफ केली आहेत. शहरात येणारे पाणी सर्व टाक्यांवरील नोंद पाहिले तर किती आहे हे दिसून येईल. कृषी दराने पाण्याच्या विद्युत देयकाची आकारणी करावी. अशी आपण मागणी केलेली आहे. त्याचा शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. ७५ लाख रुपये विद्युत मंडळास देण्यात यावेत. आघाडीचे सरकार सर्व जनतेचे सरकार आहे.

**मा. महापौर** शहरात पाण्याची चोरी किती होते, अधिकृत, अनाधिकत नळ कनेक्शन्स किती याची प्रशासनाने पाहणी करावी, पाणीपट्टी किती असावी ते सांगावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** पाण्याची २० एमएलडीची चोरी होते. १२५ एमएलडी पाणी शहरास मिळत नाही. हे मी जबाबदारीने बोलतो. पाणी कोठे चारले जाते याचा प्रशासनाने शोध घ्यावा. पाणीपूरवठा सुधारेल हे प्रशासनातर्फे सांगण्यात येत असेल तर, पाणीपट्टी वाढविण्यात हरकत नाही. प्रशासनाने मत परत विचारण्याची आवश्यकता नाही. कारण त्यांनी आपल्या समोर प्रस्ताव मांडलेला आहे. जनतेच्या भावना लक्षात घेऊन पाणीपट्टी ठरविण्यात यावी. पाण्याबाबत वारंवार प्रश्न विचारुनही त्यावर कार्यवाही होत नाही.

**श्री अंबादास दानवे** जवळपास ३६ सदस्यानी पाणीपट्टी प्रश्नावर आपले विचार मांडले आहेत. या अनंक प्रकारचे मुद्दे आपल्यासमोर ठेवले आहेत. पाणीपट्टीत वाढ होऊ नये. अशी भावना अनेक सदस्यांनी व्यक्त केली. शहरात एकूण ६२५ कमर्शियल कनेक्शन्स दाखविण्यात आली आहेत. ३१ डिसेंबर ९९ अखेर शहरात २७,००० व्यापारी संख्या ३,३२४ हॉटेल्स ८३ इतर करमणूकीचे सेंटर्स नोंदविलेले आहे. आपणाकडे ६२५ कमर्शियल कनेक्शन्स दाखविले आहेत. शहरात किमान ४१,०० कमर्शियल कनेक्शन्स असावेत. अनाधिकृत कनेक्शन्स, अनाधिकृत कमर्शियल कनेक्शन्स यांचा शोध घेण्यात यावा. शहरात तर ४७,००० नळ कनेक्शन्स आहेत तर त्याप्रमाणात शहरात किती पाणी पुरवठा होतो, हेही पाहिले पाहिजे. पाण्याचेही लेखा परिक्षण सुरु होण्याची आवश्यकता आहे. सिडको भागात जास्त कनेक्शन्स असतांनही पाणी कमी दिले तो सर्वसाधारण सभेत ठराव झालेला असतांनाही पाणीपट्टीत दुप्पट वाढ दर्शविली आहे. विद्युत मंडळास देयकापोटी आपण ७५ लाख प्रतिमहा देतो. आपली आर्थिक परिस्थिती पाहता आपण विद्युत मंडळास ७५ लाख रुपयेच द्यावेत. प्रस्तावित पाणीपट्टी दराबाबत सर्व सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. पाणीपट्टीत किती वाढ होते. याबाबत जनतेलाही उत्सुकत आहे. नगरसेवक या नात्याने आपली जबाबदारीही मोठी आहे. महापालिकेची आर्थिक परिस्थिती व झालेली चर्चा पाहता तसेच शहराचा विकास झाला पाहिजे यासाठी वसुली होणे गरजेचे आहे. प्रस्तावित केलेले दर पूर्णपणे न स्विकारता आपणास योग्य वाटतील अशा काही प्रमाणात स्विकारावेत. एका मोठया फाईव्ह स्टार हॉटेलला रेसीडेन्सीयल दराने पाणीपूरवठा केला जातो याची पाहणी करण्यात यावी. झांबड इस्टेटमध्ये ३६ प्लॅट्स आहेत मात्र नळ कनेक्शन्स एकच आहे.

**मा. महापौर** सर्व सदस्यांच्या भावना मी ऐकल्या आहेत. शहरास ६० किमी अंतरावरुन जायकवाडी जलाशयातून पाणीपूरवठा केला जातो. शहरात व्यवस्थितरित्या पाणी वितरीत होत नाही. अशा सर्वांनी भावना व्यक्त केल्या. सिडको सोडून बाकी शहरात मालमत्ता जास्त आहेत परंतु नळ कनेक्शन्सची संख्या कमी आहे. प्रशासनाने व्यापारी पध्द्तीने दिलेले नळ कनेक्शन्स ६२५ दाखविले आहेत. परंतु ही संख्या बरोबर वाटत नाही. प्रशासनाने परत सर्व्हे करुन कमर्शियल बेसीसवर दिलेल्या नळांची संख्या, निश्चित करावी. पाणी लिकेजचा प्रश्नही मोठा आहे. वारंवार सांगूनही त्यावर कार्यवाही होत नाही. याबाबत कार्यकारी अभियंता यांना सांगूनही ते याकडे लक्ष देत नाहीत. मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा झाला असता तर पाणीपट्टी वाढीस विरोध झ ाला नसता. पाणी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. यासाठी कोणीही दरवाढ स्विकारण्या तयार नाही. पाण्याबाबत तक्रार करुनही तक्रारीची दखल घेतली जात नाही. त्यावर कार्यवाही केली जात नाही. अशी सदस्यांची भावना आहे. प्रशासनातर्फे दर्शविलेलली पाणीपट्टी वाढ मोठी आहे. संस्था, कार्यालयांना कोणत्या दराने पाणीपुरवठा केला जातो. मालमत्तांचा न नळांचा सर्व्हे एकत्रितपणे करण्यात यावा. हर्सुल तलावाच्या सुधारणेसाठी काय करता येईल. यासाठी प्रशासनाने विचार करुन उपाययोजना आखावी. पानचक्की मलिक अंबर नहर मधून पाणी मोठया प्रमाणात वाया जातो ते वापरता येईल काय हेही तपासून पहावे. महानगरपालिकेस विद्युत मंडाळाचे

९८ कोटी थकबाकी देणे आहे. आपल्या पालकमंत्र्याकडेच उर्जा विभागाचा चार्ज आहे. त्यांना या संदर्भाने एक निवेदन सादर करुन विद्युत देयक, थकबाकी माफ करण्याबाबत विनंती करण्यात येईल. आपले पाणीपुरवठा पंप रात्रदिवस चालू असतात. रात्रीच्या वेळी चालणाऱ्या पंपासाठी ५०% चार्ज आकारण्यात यावयास पाहिजे. फारोळा येथे पाणी शूध्दीकरण केले जाते. हया ठिकाणी ४-५ एमएलडी पाणी सोडून दिले जाते. पाणी सोडून न देता ते परत वापरता यावे. यासाठी प्युरीफीकेंशन प्लॅट तेथे वापरणे गरजेचे आहे. यासाठी साधारणत: ३ कोटीचा खर्च येईल असे सांगण्यात आले. त्यासाठी प्रशासनाने तरतुद करावी. जायकवाडीतून येणाऱ्या पाईपलाईनवरती १४ डायरेक्ट कनेक्शन्स दिलेले आहेत. त्यांच्याकडून ॲडव्हान्समध्ये पैसे घेण्यात यावेत.

**श्री स. अली मिरा सलामी** १८ खेडयातून विहिरीचे पाणी वापरण्यात येते. नहर व अशा विहीरींची दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** पाणीपुरवठयाबाबत कृषी दराने विद्युत देयक आकारले जाते. यासाठी ८८ नगरसेवकांचे शिष्टमंडळ घेऊन पालकमंत्र्यांची भेट घेण्यात यावी.

**मा. महापौर** पिण्यासाठी ज्या विहिरीतील पाण्याचा वापर केला जातो. त्या स्वच्छ करण्यात याव्यात. पाणीपट्टी वाढी संदर्भाने सभागृहात चर्चा झालेली आहे. मी स्वत:ही अनेक स. नगरसेवकांशी बोललो आहे. १९००/- रुपये पाणीपट्‌टी ठेवण्यात सर्वांच्या विरोध आहे. सर्व बाबींचा विचार करता मी या निर्णयास आलो आहे की, अर्धा इंच नळ कनेक्शन्ससाठी २००/- रुपयांनी सध्याच्या दरात वाढ करण्यात यावी.

**मा. महापौर** सभा१० मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते.

४.०० वाजता तहकुब झालेली सर्वसाधारण सभा ४.३५ वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली परत सुरु झाली.

**मा. महापौर** पत्रकारांचा काही गैरसमज झालेला आहे. जे या सभागृहाचे सभासद नसतील त्यांनी सभागृहाबाहेर जावे असे आयुक्तांनी सांगितले होते. यामध्ये पत्रकारांचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतो. पाणीपट्टी बाबत सर्वांच्या सूचना ऐकल्या आहेत.

**श्री काशीनाथ कोकाटे** आयुक्तांनी पत्रकारांना अपशब्द वापरले असतील तर ते परत घ्यावेत.

**मा. महापौर** आयुक्त सभा तहकुब झाल्यानंतर खाली परत जात होते. त्यावेळी सभागृहात छायचित्रकारांना बोलले हे समजल्यावर आपण त्यांच्याशी यावर चर्चा केली ते तसे बोलले नाहीत.

**मा. आयुक्त** पत्रकारांच्या काहीतरी गैरसमज झाल्याचे दिसते. आपण कोणास गेट आऊट म्हणालो नाही. सभागृहाचे सदस्य नसलेले बाहेरचे कोणी सभागृहात आली असतील तर, त्यांना बाहेर जाण्यास सांगावे असे आपण म्हणालो. काही सभासद मा. महापौरांसमोर जमतात व पाणीपट्टी विषयांवर मतदान घेण्याची करतात. घोषणा देतात.

**मा. महापौर** ज्या सदस्यांच्या पाणीपट्टी वाढीस विरोध असेल त्यांचा विरोध नोंदविण्यात येईल जे सदस्य खाली बसले आहेत. त्यांच्या पाणीपट्टी वाढीस विरोध समजण्यात येईल.

## *प्रशासकीय खर्च*

**श्री भगवान घडामोडे** पाणीपुरवठा पाईप्सची खरेदी ठेकेदाराकडून न करता ती महानगरपालिकानेच करावी.

**मा. आयुक्त** या प्रश्नावर स्थायी समितीतही चर्चा झालेली आहे. टेंडर्स काढत असतांनाच आपण त्यात शेडयुल्ड ए व बी दिलेले असते. शेडयूल बी मध्ये कामाचे आयटेम्स काय काय आहेत याची माहिती दिलेली असते. तर शेडयुल्ड ए मध्ये महापालिका काय काय पुरवठा करणार आहे याची माहिती दिलेली असते. मागील वर्षी सिमेंट, लोखंड यांच्या खरेदीत अनेक अडचणी आलेल्या होत्या. वेळेवर साठा उपलब्ध झाला नाही. त्यामुळे विविध कामांची मुदतवाढ करुन द्यावी लागली पाईप्स टाकण्यापूर्वी त्यांचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करण्यात येईल. याबाबत स्थायी समितीने घेतलेला निर्णय योग्य वाटतो.

**श्री अविनाश कुमावत** एकदा पाईप्स टाकले तर नवीन आहेत की जून हे कळणार नाही. याबाबत या विषयावर फेर विचार व्हावा.

**मा. आयुक्त** हा विषय स. सभासदांच्या मतानुसार घेतलेला आहे. पाईपलाईन टाकण्यापुर्वी त्याचे थर्ड पार्टी इन्सपेक्शन करण्यात येईल. हा निर्णय मान्य केल्यास बराच फायदा होईल.

**श्री सुदाम पाटील सोनवणे** सिमेंट व पाईप्स कोणत्या कंपनीचे असतील ते ठरविण्यात आले आहे काय? पाईप्सलाईनच्या सेव्ही थर्ड पार्टी म्हणजे कोण करणार.

**मा. आयुक्त** स्टील, सिमेंट यासाठी स्टँडर्ड कंपन्या ठरविण्यात येतील.

**मा. महापौर** प्रशासकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री नंदकुमार फुलारी** प्रशासकीय खर्च जास्त आहे. अधिकाऱ्यांना पेट्रोलच्या गाडया न देता, डिझेलच्या गाडया देण्यात याव्यात.

**श्री जयवंत ओक** महापौर चषकामध्ये हॉकीबरोबर बुध्दीबळ स्पर्धाचाही समावेश करण्यात यावा. विद्यार्थ्यासाठी आपण गणवेश घेणार आहात की, कपडा घेऊन गणवेश शिकवणार आहात.

**श्री रतनकुमार पंडगळे** पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यासाठी ६ कोटीची तरतुद आहे मात्र आपण ३ कोटी देणार आहोत. २ वर्षापासून कर्मचाऱ्यांना थकबाकी दिलेली नाही. सर्व रक्कम एकत्रीत द्यावी.

**श्री गणेश तांबे** कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम एकत्रीत देण्यात यावी.

**मा. उपमहापौर** प्रशासनावर ९९-२००० साली ३३.३९% खर्च होता. २०००-२००१ साली तो ३३.७८% अपेक्षीत आहे. कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाची थकबाकी देणे बाकी आहे. सध्या दर्शविलेली ३ कोटीची तरतुद बरोबर आहे. शहराच्या विकासासाठीही पैसा लागणर आहे.

**श्री रतनकुमार पंडागळे** पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी ६ कोटी रुपये एकत्रीतच देण्यात यावेत.

**मा. महापौर** ६ कोटीची थकबाकी एकत्रीत दिली तर शहरातील विकासाच्या कामासाठी पैस राहणार नाही. तुर्त तीन कोटी द्यावेत. सहा महिन्यानंतर ३ कोटी देण्यात येतील.

**श्री भगवान घडामोडे** प्रशासनावरील खर्च किती राहणार आहे. याचा प्रथम खुलासा व्हावा.

**श्री अंबादास दानवे** अपरिहार्य कारणे कोणती दर्शविलेल्या प्रशासकीय खर्चात थोडीफार वाढ होऊ शकते. असे म्हटले आहे. ही वाढ होण्याची कारणे कोणती, प्रशासनाचा खर्च सिमीत ठेवण्यात यावा.

**श्री तकीहसनखान** महानगरपालिकाचे पोलीस सेवेवर २० लक्ष रुपये खर्च करत आहे. त्यांच्या पासून आपणास फार काय. जेव्हा पोलीसांच्या सेवेची आवश्यकता भासते. तेव्हा त्यांना बोलण्यात यावे. त्यामुळे महानगरपालिकाची १५-१७ लाखाची बचत होईल.

**श्री अफसरखान** आपणांस आवश्यकता भासेल तेव्हा पोलीसांची मदत घेण्यात यावी. त्यांना परत त्यांच्या सेवेत पाठविण्यात यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** पोलीसांचे वेतन आपण देतो तर मग प्रत्येक वेळेस पोलीस आयुक्तांच्या परवानगीची आवश्यकता काय. आपण त्यांचा पगार देतो. तर त्यांच्यावर महानगरपालिका आयुक्तांचेच नियंत्रण असावयास हवे.

**श्री सुदाम पाटील सोनवणे** पोलीस डिपार्टमेंट मध्ये जे निष्क्रीय पोलीस आहेत त्यांना महानगरपालिका सेवेत पाठविले आहे. अस्थापनेवरील खर्च म्हणजे केवळ पगारावरील खर्च आहे काय?

**मा. उप महापौर** आपण काही अधिकाऱ्यांना गाडयांसाठी लोन दिलेले आहे. अशा किती अधिकाऱ्यांच्या गाडयांवर ड्रायव्हर काम करतात. ज्या अधिकाऱ्यांनी लोन घेतलेले आहे. त्यांच्या गाडीवर ड्रायव्हर देऊ नये. असे ठरले होते.

**मुख्य लेखाधिकारी** सन २०००-२००१ या वर्षासाठी १३३ कोटी ७० लाख ३५ हजार जमा व १३३ कोटी ४८ लाख ९५ हजार खर्चाचे असून २१.४० लाख शिल्लकीचे आहे. प्रशासकीय खर्च हा महसुली उत्पन्नावर आहे. त्यामुळे दाखविलेली टक्केवारी बरोबर आहे. या अधिकाऱ्यांना चार चाकी वाहन घेण्यासाठी लोन दिलेले आहे. त्यांनी स्वतःच ड्रायव्हरची व्यवस्था करावयाची आहे. मात्र वर्ग-२ मधील एखादा अधिकारी वर्ग-१ मध्ये पदोन्नत झाला तर त्यास प्रशासनातर्फे वाहन देण्यात येते. तसा शासनाच्या जी. आर. आहे. अस्थापनेवरील खर्चाची आकडेवारी अपेक्षित उत्पन्नावरील आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** अस्थापनेवरील खर्च ४२% पेक्षा जास्त नसावयास पाहिजे.

**मुख्यलेखाधिकारी** अस्थापनेवरील खर्च १०५ कोटी अपेक्षीत आहे. अर्थसंकल्पात सर्वसामान्य विभागाच्या खर्चाचा माहिती टक्केवारीसह स्वतंत्ररित्या दिलेली आहे. येत्या वर्षात ४२% पेक्षा अस्थापनेवरील खर्च जास्त जाणार नाही.

**मा. आयुक्त** पोलीस दला संदर्भाने मी पोलीस आयुक्तांशी चर्चा झालेली आहे. पोलीसांकडून आपणांस विविध प्रकारची कामे घेतली जाऊ शकतात. मालमत्ता कर वसुलीसंदर्भाने आपणास त्याची मदत घेता येईल. पोलीसांवर किती खर्च झाला त्यांनी किती काम केले याची माहिती देण्यात येत आहे.

**स. अली मिरा सलामी** दोन वर्षापूर्वी जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा पोलीसांच्या सेवा घेत होतो. मागे सर्वसाधारण सभेत निर्णय झाला होता की, महानगरपालिकेत पोलीस चौकी असावी. पोलीस दलावर महापालिका किती खर्च करते. याचा खुलासा व्हावा. अनाधिकृत बांधकाम धारकांकडून पोलीस अनाधिकृतरित्या पैसा वसुल करतात. त्यांच्याबाबत अनेक तक्रारी आलेल्या आहेत.

**मा. महापौर** महापालिकेने अतिक्रमण हटाव नोटीस हाती घेतल्यानंतर पोलीस बंदोबस्त पुरविण्याबाबत पोलीस आयुक्तांना विनंती केली जात असे. परंतु बऱ्याच वेळा पोलीस बंदोबस्त येत नसल्यामुळे अतिक्रमणे हटविले जात नव्हते. त्यामुळे सर्वसाधारण सभेने ठराव घेऊन महानगरपालिका अस्थापनेवरच पोलीसांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात याव्यात व त्यानुसार पोलीसांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या आहेत. शहरातील अतिक्रमणे

अनाधिकृत बांधकामे हटविण्याची त्यांची मदत घेतली जाते. त्यांच्याकडून कशा प्रकारे काम घ्यावे हे आपण पहावयास पाहिजे.

**श्री अफसरखान** आजही पोलीस दलाचा वापर करण्यासाठी पोलीस आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते, तर पोलीस आपणाकडे असण्याचा फायदा काय. त्यांना परत पाठविण्यात यावे. तेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा त्यांच्या सेवा घेण्यात याव्यात.

**मा. महापौर** आपण जेव्हा जेव्हा मागणी केली तेव्हा तेव्हा पोलीस सेवा उपलब्ध झाल्या नाहीत, म्हणून अतिक्रमण हटाव पथक काम करु शकते नाही, हा अनुभव पाहून आपण त्यांच्या सेवा घेतलेल्या आहेत. त्यांनी काय काम केले हे आपण पाहू.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा** वर्षभरात किती अतिक्रमणे हटविली याची सभागृहास माहिती देण्यात यावी.

**मा. महापौर** अतिक्रमण पथकाने वर्षभरात काय काम केले याची माहिती देण्यात यावी तसेच पोलीस मदतीची आपणास आवश्यकता आहे. याची माहिती प्रशासनाने पूढील बैठकीत द्यावी. त्यानंतर या प्रश्नावर निर्णय घेतला जाईल.

**श्री अय्युबखान** प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्यात यावी. त्यांच्या जागी अतांत्रिक अधिकारी नेमावा.

**मा. महापौर** कर्मचाऱ्यांना थकबाकीपोटी ३ कोटी ऐवजी ४ कोटी देण्यात यावेत. प्रशासकीय खर्च सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**श्री गणेश तांबे** आपण केवळ आश्वासन देणार आहात काय आश्वासने देऊनही काम होत नाही. विभाग क्र. १ साठी स्वच्छता निरीक्षक वांरवार मागणी करुनही देण्यात येत नाही. स्थायी समितीही प्रशासकीय पद तांत्रिक असावे की, अतांत्रिक असा प्रश्न विचारला होता.

## *पाणी पुरवठा व्यवस्था*

**सौ विजया रहाटकर** महापालिकेवर याबाबत एकूण कर्ज किती आहे. आपण ते कसे फेडणार आपण कशासाठी कर्ज घेतले होते.

**मा. महापौर** कर्जाबाबतचे डिटेलस दिलेले आहेत. पाणीपुरवठा योजनेवरील घेतलेल्या कर्जाची परतफेड ११ कोटी ऐवजी ३/४ परत करावे म्हणजे १/४ रक्कम विकास कामासाठी वापरता येईल.

**सौ डॉ बिनवडे आशा** पाणी वितरणाची व्यवस्था असमाधानकर आहेत. बऱ्याचशा पाईपलाईन्स या २०-२५ वर्षापूर्वी टाकलेल्या आहेत. यासाठी १० कोटीची व्यवस्था करण्यात यावी.

**मा. महापौर** सूचना चांगली असती तरी तीची अंमलबजावणी करता येईल का याबाबत शंका आहे.

**श्री मोतीलाल जगताप** जलकुंभ वाढविणे आवश्यक आहे. लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढलेली आहे त्याप्रमाणात जलकुंभ वाढविण्यात यावेत.

**श्री सुदाम सोनवणे** पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्तीसाठी जायकवाडीवर ३.५० कोटी व किरकोळ खर्च ४.८५ कोटी दाखविला आहे हा वेगवेगळा खर्च कशाचा?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** रु. ३.५० कोटीची तरतुद पाणीपुरवठा वितरण व्यवस्था व देखभालीवर केलेली आहे. विविध व्यासाच्या जलवाहिन्या दुरुस्त करण्यासाठी ही तरतुद आहे. जायकवाडी ते औरंगाबाद शहरापर्यंत पाणी

आणण्यासाठी मोठया प्रमाणावर मशिनरी अहोरात्र चालू असते या मशिनरीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी ४.५० कोटीची तरतुद केलेली आहे.

**श्री घडामोडे भगवान** पाईप लाईन फुटली अशी तक्रार केल्यानंतर किती दिवसात त्यावर कार्यवाही व्हावयास पाहिजे. लिकजेसमुळे मोठया प्रमाणावर पाणी वाया जाते ते थांबले पाहिजे.

**मा. महापौर** फारोळा वॉटर ट्रीटमेंट प्लॉट येथे पाणी शुध्दीकरण केले जाते. त्याठिकाणी जवळपास ५ एमएलडी पाणी वेस्ट जाते. या वाया जाणाऱ्या पाण्याचे शुद्धीकरण केले तर ५ एमएलडी पाणी शहरात जास्त मिळेल. त्यासाठी योग्य नियोजन करुन करण्यात यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** या ठिकाणी ५ एमएलडी पाणी किती दिवसापासून वाया जात आहे.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.)** फारोळा येथील ५ एमएलडी पाणी वाया जात नाही. फिल्ट्रेशन प्लॅन्ट रोज साफ करावा लागतो त्यातील हे घाण पाणी वाया जाते. हे पाणी प्रक्रीया करुन शुध्द करुन परत वापरता येईल.

**श्री काशीनाथ कोकाटे** मागे एक कमीटी स्थापन केली होती. काही ठिकाणी मर्यादेपेक्षा जास्त पाणी सोडले जाते.

**मा. महापौर** पाणी वाया जाणार नाही. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. फिल्ट्रेशन प्लॅन्ट बांधून पाण्याचा योग्य वापर करण्यात यावा.

## *भूमिगत जलनि:सारण योजना*

**श्री तकी हसन खान** या प्लॅन्टमध्ये पाणी शहरातील सोडणार की केवळ सिडकोस त्याचा फायदा होणार यासाठी तेथे किती जागा उपलब्ध आहे. सिडकोच्या ड्रेनेजची जिम्मेदारी महापालिकेची नाही.

**श्री अफसरखान यासिनखान** हा प्लॅन्ट सिडकोने बांधलेला आहे. त्यास फक्त लाईन मिळविणे आहे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** महानगरपालिका हद्दीतील ती खेडी आहेत, त्यांच्या सीवरेज ट्रीटमेंट करण्यासाठी हा प्लॅन्ट आवश्यक आहे. या प्लॅन्टचे दोन भाग केलेले आहेत. भौगोलिक बाबींचा विचार करता एका भागाचा प्लो झाल्य्टाकडे घेतलेला आहे. यासाठी आपण सात एकर जागा घेतलेली आहे. सिडकोने स्वतंत्र प्लॅन्ट बांधलेला आहे.

**श्री सुदाम पाटील सोनवणे** महानगरपालिका हद्दीतील खेडयांना फायदा व्हावा यासाठी १९९५ मध्येच अशा स्वरुपाच्या प्लॅन्टला मंजूरी दिलेली आहे. तेव्हापासून यावर तरतुद करण्यात येत आहे. मात्र कार्यवाही होत नाही. कार्यवाही होत नसेल तर तरतुद काढून टाकावी.

**श्री प्रकाश निकाळजे** या भागातील वस्त्यांच्या मैला नदीत सोडलेला आहे. या भागातील लोकांनी मध्यतंरी एक मोर्चाही काढला होता. या भागातील लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्लॅन्ट आवश्यक आहे.

**श्री जयवंत ओक** हा प्लॅन्ट होणे गरजेचे आहे. यासाठी केलेली ७५ लाखाची तरतुद कमी आहे. या प्लॅन्टसाठी १ कोटीची तरतुद ठेवण्यात यावी. आपल्या शहरातील नाल्यांची अवस्था वाईट आहे. नाल्यामधूनच ड्रेनेज लाईन्स टाकण्यात आलेल्या आहेत. या ट्रीटमेंट प्लॅन्टसाठी किती पैसा लागणार आहे याचा खुलासा व्हावा.

**श्री भगवान घडामोडे** हा प्लॅन्ट होणे गरजेचे आहे. तरतुद करुनही आता पर्यंत हा प्लॅन्ट का सुरु झाला नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** झाल्टा ट्रीटमेंट प्लॅन्टसाठी ७५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. १९९५ पासून या प्लॅन्टसाठी तरतुद करण्यात येत आहे. मागे कामासाठी निविदा काढली होती. चिकलठाणा, अशोकनगर, मसनतपूर या भागासाठी हा प्लॅन्ट उपयोगी पडणार आहे. तरतुद करुनही पाच वर्षापासून हा प्लॅन्ट चालू झालेला नाही. या प्लॅन्टसाठी २ कोटीपेक्षा कमी खर्च लागेल असे वाटत नाही. सिडकोने जरी या भागात प्लॅन्ट बांधला असला तरी हे पाणी पंपींग करुन आणावे लागेल. त्यामुळे एकाच ठिकाणी मेन्टेनंन्स करावा लागेल.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** झाल्टा येथील हा प्लॅन्ट १०.५८ एमएलडी कॅपेसीटीचा बांधावयाचा आहे. सध्या असलेल्या लोकसंख्या हिशोबाने ५ एमएलडीचा प्लॅन्ट बनविण्यात येणार आहे. यासाठी १.५० कोटीचा खर्च येणार आहे. या वर्षी ७५ लाखाचे काम करुन पुढील वर्षी ७५ लाखाची तरतुद करण्यात येईल.

**श्री जाबिंदा दलबिरसिंग** या कामासाठी टेंडर काढले होते का? त्याचे काय झाले.

**श्री सुदाम पाटील सोनवणे** पूर्वी १.३५ कोटीचे टेंडर काढले होते त्याचे काय झाले.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** सिडकोने एअर पोर्टच्या बाजूस एसडीपी प्लॅन्ट बांधलेला होता. सिडको भागाची वाढ लक्षात घेता, हा प्लॅन्ट बनविण्यात आलेला आहे.

**मा. आयुक्त** पूर्वी या कामाचे टेंडर काढण्यात आले होते. त्यात काही तांत्रिक त्रुटी होत्या. या कामासाठी जास्त दर असल्यामुळे ते रद्द करण्यात आले हे टेंडर्स मंजूर केले असते तर त्यात बऱ्याच त्रुटी राहून काम व्यवस्थित झाले नसते.

**मा. महापौर** परत टेंडर काढावे.

## *झोपडपट्टी विकास कार्यक्रम*

**श्री रतनकुमार पंडागळे** घरकुल योजनेसाठी ५० लाख ठेवण्यात यावेत व ही योजना राबविण्यात यावी शहरात एकूण ५३ स्लम आहेत. मात्र पुस्तकात ५१ अधिकृत स्लम दाखविलेले आहेत.

**श्री अविनाश कुमावत** झोपडपट्ट्यांमधुन खांडकी रस्ते न करता सिमेंट काँक्रीटचे रस्ते तयार करण्यात यावेत, अशी मी स्थायी समितीतच सूचना केलेली होती.

**श्री अंबादास दानवे** केंद्र शासनाने झोपडपट्टी विकास कार्यक्रम हाती घेतलेला आहे. त्याची महानगरपालिकेने अंमलबजावणी करावी.

**मा. महापौर** ५३ घोषित झोपडपट्ट्यात अशी दुरुस्ती करण्यात यावी. केंद्र व राज्य शासनाने झोपडपट्टी विकास विषयक ज्या योजना आखल्या असतील, त्या योजनानुसार कामे करावीत. प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *मेमोरियल संशोधन केंद्र*

**श्री जाबिंदा दलबिरसिंग** शिख समाजात समानतेस ३०० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने उस्मानपुरा चौकात एक स्मारक उभारण्याचे काम महानगरपालिकाने हाती घेतले होते ते अर्धवट आहे. हे काम पूर्ण का होत नाही.

**मा. महापौर** उस्मापूऱ्यातील चौक सुशोभिकरण्यांतर्गत जे काम चालू आहे ते तातडीने पूर्ण करण्यात यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** एकदा काम चालू झाल्यानंतर ते मध्येच का थांबविले जाते. काम पूर्वी करण्यासाठी कालमर्यादा टाकण्यात यावी.

**अति शहर अभियंता** उस्मापुऱ्यातील ७५% काम पूर्ण झालेले आहे. केवळ लाईटींगचे काम शिल्लक आहे. शिल्लक काम तात्काळ पूर्ण करवून घेण्यात येईल. ठेकेदारास सांगून त्याने काही कामे केलेली नाहीत. त्यामुळे कामात दिरंगाई झाली.

**मा. आयुक्त** शिल्लक राहिलेले काम तात्काळ पूर्ण करुन घेण्यात येईल.

**मा. महापौर** उस्मानपूरा चौकातील काम तातडीने पूर्ण करुन घेण्यात यावे.

**श्री रतनकुमार पंडागळे** छत्रपती शिवाजी महाराज म्यूझियमसाठी २५ लाख, अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी ७५ लाख तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी १० लाखाची तरतुद आहे. असे का डिसेंबर मध्ये डॉ. बाबासाहेब आंबडेकर संशोधन केंद्राचे उद्घाटन झालेले आहे. उद्घाटानानंतर तेथील कामे थांबलेली आहेत. ती पूर्ण करण्यात यावीत.

**मा. महापौर** रिसर्च सेंटरसाठी बजेट ठेवलेले आहे. प्रकल्प संचालक यांनी जेवढया बजेटची मागणी केली होती तेवढे बजेट ठेवण्यात आलेले आहे.

**मुख्यलेखाधिकारी** छत्रपती शिवाजी महाराज म्युझियममधील काही कामे बाकी आहेत, काही कंत्राटदाराची देयके अदा करणे आहे, त्यासाठी ही तरतुद आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर रिसर्च मधील कामे पूर्ण झालेली आहेत. तेथील पूस्तके, एनसायक्लोपीडीया खरेदी झालेले आहेत.

**मा.आयुक्त** छत्रपती शिवाजी महाराज म्युझियममधील काही कामाची देयके देणे बाकी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर मधील काम पूर्ण झालेली आहेत. एकदा या सेंटर्समध्ये काय काय ॲक्टीव्हीटीज घ्यावयाच्या हे ठरले म्हणजे त्याचप्रमाणे पुढील तरतुद करता येईल.

**श्री अंबादास दानवे** स.न.से. रतनकुमार पंडागळे यांचा प्रश्न बरोबर आहे. मोठया प्रमाणावर खर्च करुन इमारती बांधल्या गेल्या मात्र छ. शिवाजी महाराज म्युझियमची वास्तू गळत आहे. सहाच महिन्यापूर्वी या इमारतीचे उद्घाटन झालेले गळत आहे, मग ती गळते कशी. तेथील प्लायवूडला वाळावी लागलेली आहे. त्यामुळे तेथील मौल्यावान वस्तु खराब होत आहेत, या वास्तुची व्यवस्थित निगा राखली नाही तर महानगरपालिकाने खर्च केलेला पैसा वाया जाईल.

**मा. उपमहापौर** छत्रपती शिवाजी महाराज म्युझियमवरती २५ लाख रुपये खर्च झालेले आहेत. त्या ठिकाणी पार्कींग नाही. येणाऱ्या विद्यार्थ्यांना थांबविण्यासाठी रोड नाही. यासाठी जवळच्या नेहरु उद्यानात व्यवस्था करण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** म्युझियमच्या बाजूस शासकीय महाविद्यालयाची जागा आहे ती उपलब्ध करुन घेण्यात यावी.

**श्री तकीहसनखान** डॉ बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेटंर मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेटंर या ठिकाणी आपण नेमक्या ॲक्टीव्हीटीज घेणार आहोत. त्या ठिकाणी कशाप्रकारची पुस्तके ठेवण्यात येणार आहेत. तेथे नेमके कोणत्या विषयावर रिसर्च होणार आहे. याचा काही प्लॅन आपल्याकडे आहे का? या रिसर्च सेटंरांना रोज किती लोक भेटी देतात.

**मा. महापौर** डॉ बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेटंरमध्ये कोणत्या ॲक्टीव्हीटीज बाबत याबाबत यापूर्वीही चर्चा झालेली आहे. मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेटंरचे काम प्रगती पथावर आहे. या ठिकाणी काय ॲक्टीव्हीटीज याबाबत

संपूर्ण चर्चा केली जाईल. छत्रपती शिवाजी महाराज म्युझियमजवळ पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. डॉ. बाबासाहेब आंबेडर रिसर्च सेंटरसाठी १५ लाखाची तरतुद करण्यात येईल.

*रस्ते*

**श्री प्रकाश निकाळजे** एखादया रस्त्याचे एकदा डांबरीकरण झाल्यानंतर परत त्या रस्त्याचे डांबरीकरण केव्हा व्हावे. याबाबत काही नॉर्म्स ठरलेले आहेत काय?

**अति शहर अभियंता** एकदा डांबरीकरणाचे काम केल्यानंतर तीन वर्षानंतर सिलींग करावयास पाहिजे.

**श्री प्रकाश निकाळजे** रस्ते तयार झाले की, लगेच त्यावर खड्डे होतात. डांबरीकरणाचा दर्जा बरोबर नाही. शिवाजीनगर मधील रस्त्याचे दोनदा डांबरीकरण झालेले आहे मात्र रस्ता बरोबर झालेला नाही.

**अति शहर अभियंता** शिवाजीनगर भागात ट्रॅफीक जास्त आहे. नवीन डब्लयुबीएम केल्यामुळे तो रस्ता पीच रस्त्यावर झालेला आहे.

**श्री जाबिंदा दलबिरसिंग** तेथील डांबरीकरणाचा दर्जा बरोबर नाही. रस्त्याचा स्लोप बरोबर काढलेला नाही. त्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचते.

**श्री जयवंत ओक** शिवाजीनगर रस्त्याचे काम बरोबर झालेले नाही, कारण पूर्वी या रस्त्याखाली शेती होती त्यामुळे ही शेतीची जागा आहे. कामासंदर्भाने एकदा रस्त्याचे इन्स्पेक्शनही झालेले आहे. परंतु ती कामे चांगली झाली ती चांगलीच म्हणावयास हवीत. व्हीआयपी रोडवर फुटपाथची सोय करण्यात यावी.

**श्री भगवान घडामोडे** शहरातील रसते बरेच खराब झालेले आहेत. त्यामुळे महापालिकेची बेईज्जती होते. रस्त्याची कामे चांगली झाली पाहिजेत.

**मा. आयुक्त** मागीलवर्षी डांबरीकरणाची जी कामे झाली त्यातील काही कामे असमाधानकारक होती. काही ठिकाणी पाहिजे तेवढी डांबरीकरणाची पातळी नव्हती. त्यामुळे काही कॉन्ट्रक्टर्सवर दडंही लावलेला आहे. २-३ रस्त्याचे काम बरोबर झाले नसल्यामुळे माझ्याकडे तक्रार आलेली आहे. अशा कामांची चौकशी करण्यात येईल. संबंधित कॉन्ट्रक्टरास दंडनीय कार्यवाही करण्यात येईल. या कामामध्ये एखादा अधिकारी अथवा कर्मचाऱ्याकडून दुर्लक्ष झाले असेल, तर त्यांच्यावरती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री जाबिंदा दलबिरसिंग** कॉन्ट्रक्टरला दोषी का ठरविता, अधिकारी, कर्मचारी यांनी कामावर नियंत्रण ठेवावयास हवे. दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**श्री जयवंत ओक** महानगरपालिकाने काही कंत्राटदारांना ब्लॅक लिस्ट केलेले आहे ते दुसऱ्याच्या नावावर कामे करतात. त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात.

**मा. महापौर** ब्लॅक लिस्ट कॉन्ट्रक्टर्सवर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री अंबादास दानवे** शहर झपाटयाने वाढत आहे. शहरात काही ठिकाणी उड्डाण पुल भुमिगत रस्ते आवश्यक आहेत. उड्डाणपुल, भुमिगत रस्ते यांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी एखादी एजन्सी फिक्स करावी. त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात यावी.

**मा. आयुक्त** श्री करंदीकर विभागीय आयुक्त असतांना त्यावेळी एक कमीटी स्थापन

झाली होती. त्या कमीटीचा अहवालही आलेला आहे. पून्हा कमीटी स्थापन करण्याऐवजी या अहवालावर अंमलबजावणी करण्यात यावी.

**श्री स. अली मिरा सलामी** बी ॲन्ड सी मध्ये कंत्राटदाराने काम केल्यानंतर २०% बिल सहा महिन्यासाठी थांबवून ठेवण्यात येते. कामात काही बिघाड असेल तर, त्यातून रक्कम वसुल केली जाते. आपल्याकडेही तशी पध्द्ती अवलंबवावी.

**मा. महापौर** श्री सलामी यांची सूचना चांगली आहे. महानगरपालिकेही पध्द्ती अवलंबवावी.

**मा. उपमहापौर** रस्त्याच्या बाजुस फुटपाथची तरतुद ठेवावी. खांडकी ऐवजी कॉंक्रीटचे रस्ते बांधण्यात यावेत. कंत्राटदाराची थकित बिले देण्यात यावीत.

**श्री जाबिंदा दलबिरसिंग** पॅचवर्कची एकंदरील कामे पाहता या कामासाठी अंदाजपत्रकात दाखविलेली तरतुद जास्त आहे.

**मा. महापौर** पॅचवर्कसाठी रु. ७० लाख ठेवण्यात येतात.

**मा. आयुक्त** फुटपाथसाठी तरतुद करण्यात येईल.

**श्री अंबादास दानवे** जालना रोडचे काम पीडब्लूडी कडून होत आहे. या रसत्यावर आपलेही लक्ष असावयास पाहिजे.

**श्री प्रशांत देसरडा** जालना रोडचे सुरु असलेल्या कामात कंत्राटदाराने काही ठिकाणी पाण्याची पाईपलाईन फोडली आहे. सदरची लाईन कॉन्ट्रक्टरच्या चुकीमुळे फुटलेली आहे. सहा वेळा आतापर्यंत ही लाईन फुटलेली आहे. याची नुकसान भरपाई कोण देणार.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** जालना रोडवरील कामे सुरु होण्यापूर्वी या रस्त्याखाली येणाऱ्या लाईन्सबाबत चर्चा झाली होती. एकूण तीन ठिकाणी जलवाहिनी फुटलेली होती. ती महानगरपालिकेने दुरुस्ती केलेली आहे. यासाठी झालेला खर्च पीडब्लयूडीने द्यावा असे त्यांना तत्वत पत्र दिलेले आहे. त्यास पीडब्लयूडीने तत्वत मान्यता दिलेली आहे.

**मा. महापौर** दुरुस्त्यांसह प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *विद्युत*

**मा. महापौर** श्री जयवंत ओक यांनी सूचना केली की, महानगरपालिकेतर्फे एमएसईबीला पैसे भरले जातात. स. नगरसेवक आपल्या वॉर्डात पोल लावावेत. अशी विनंती करतात तर विद्युत मंडळ पोल लावत नाही. आपण किती पोलसाठी त्यांच्याकडे पैसे भरले आहेत.

**मा. आयुक्त** या विषयावरती एक वेगळी बैठक आपण ठेवू विद्युत मंडळ अधिकाऱ्यांना बोलावून याबाबत चर्चा करण्यात येईल.

**श्री जयवंत ओक** ५००-६०० पोल्सची मागणी आहे. विद्युत मंडळ अधिकाऱ्याबरोबर लवकरात लवकर बैठक बोलवावी.

**मा. महापौर** विषयास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *इतर अस्थायी अग्रीम*

**मा. महापौर** सदर हेडखाली ११ लाखाची तरतुद ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

*सुलभ सौचालय*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

*नविन उद्याने*

**मा. महापौर** नविन उद्यानांसाठी २० लाखाऐवजी ३० लाखाच्या तरतुदीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

*इतर विकास इमारती*

**श्री तकीहसनखान** स्माशान भूमी विकासा बरोबरच कब्रस्तान विकासाठी प्रस्तावात समावेश व्हावा. मागील वर्षी ज्या कब्रस्तानासाठी तरतुद केली त्यांचा विकास झाला काय?

**श्री स. अली मिरा सलामी** क्रांती चौक कब्रस्तानासाठी तरतुद करण्यात यावी.

**मा. महापौर** स्माशनभुमी व कब्रस्तान अशी तरतुद करण्यात यावी. ६० लाखाची तरतुद करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**सौ जयश्री कुलकर्णी** सिडको भागातील नाटयगृहासाठी एक लाखाची तरतुद करण्यात यावी.

**मा. आयुक्त** सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण होईल त्यावेळी सिडको यासाठी पैसा देणार आहे.

**श्री गणेश तांबे** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयासाठी अंदाजपत्रकासाठी तरतुद करण्यात यावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** इतर महापालिकांनी उत्पन्न वाढविण्यासाठी व्यापारी संकुले बांधली आहेत. आपल्या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे. यासाठी व्यापारी संकुले बांधण्यासाठी तरतुद करण्यात यावी.

**श्री सुनिल वडागळे** स्लम भागातील नागरिकांसाठी दवाखान्याची आवश्यकत आहे. स्लम भागासाठी दवाखान्याची सोय करण्यात यावी.

**मा. महापौर** शहरात दवाखाने कोठे कोठे बांधावेत, ते किती असावेत यासाठी सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात येईल.

**श्री तकीहसनखान** बिफ मार्केटसाठी १० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. ती वाढविण्यात यावी.

**श्री अंबादास दानवे** कत्तलखान्यासाठी १० लाखाची तरतुद केलेली आहे. पडेगाव येथे महानगरपालिकेने सुरु केलेला कारखाना अद्यावत नसल्याने सिल्लेखाना भागात काही प्रमाणात कत्तल चालू असते. ते बंद करण्यात यावेत.

**मा. महापौर** स्माशानभूमी व कब्रस्तान विकासासाठी ६० लाखाची तरतुद करावी. यासह प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

*इतर भांडवली कामे*

**श्री जाबिंदा दलबिरसिंग** शहरात अनेक चौकात सौदर्यकिरणा अंतर्गत कारंजे बसविलेले आहेत ते बंद पडलेले आहे.

**श्री काशीनाथ कोकाटे** शाहू महाराज जयंतीच्या वेळी शहरातील पुतळयांची अवस्था आपणासर्वा समोर आलेली आहे. पुतळयांची निगरानी बरोबर राखली जात नाही. शाहू महाराजांच्या पुतळयाचा एक हात हालत आहे. पुतळयांची

निगरानी व्यवस्थितरित्या व्हावयास हवी. किमान महिन्यातून एक वेळ पुतळे स्वच्छ करण्यात यावेत.

**मा. महापौर** शहरात ज्या ज्या ठिकाणी पुतळे बसविलेले आहेत व चौकांचे सुशोभिकरण केलेले आहे त्यांची देखभाल व्यवस्थितरित्या केली जात नाही. शाहू महाराजांच्या पुतळयाची मी स्वतः पाहणी केलेली आहे. प्रत्येक जयंतीस पुतळयास हार घालण्यात यावेत. प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येते.

## *कमकुवत घटक*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *नविन वाहन खरेदी*

**श्री जयवंत ओक** कचरा उचलण्यासाठी जादा गाडया घेण्यात याव्यात. शववाहिनी घेण्यात यावी.

**मा. महापौर** सूचना मान्य करण्यात येते. नविन वाहन खरेदीसाठी रु. २० लाख ऐवजी ३० लाखाची तरतुद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *दारीद्रय निर्मुलन*

**मा. महापौर** योजना राबविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *कर्ज परतफेड*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *स्वेच्छा निधी*

**श्री सुरजिसिंग खुंगर :** नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीचा गैरवापर होत. अशी लोकात प्रतिमा आहे. नगरसेवकाने एखादया गोष्टीवर खर्च करण्यासाठी संमती दिल्यानंतर प्रशासनातर्फे ती कार्यवाही केली जाते व खर्चावर नियंत्रण ठेवले जाते. नगरसेवकांना शहराचा विकास करावयाचा असतो व स्वेच्छा निधीच्या माध्यमातून नगरसेवक हे कार्य असतो. नगरसेवक स्वेच्छा निधीसाठी केलेली तरतुद ही अपूरी आहे. प्रत्येत नगर सेवकासाठी २.२० कोटी ऐवजी ५ लाखाची तरतुद ठेवण्यात यावी. या निधीचा वापर कसा कासा होतो. यावर प्रशासनाने लक्ष ठेवावे. नगरसेवक हे त्यांच्या संबंधित वार्डातील विकासाची कामे करत असतात. मात्र स्विकृत सदस्यास संपूर्ण शहरात कोठेही विकासात्मक कार्य करता येते. यासाठी स्विकृत सदस्यांस १० लाख रुपये स्वेच्छा निधी ठेवण्यात यावा. स्विकृत सदस्यांसाठी महापालिकेने नियम बनविलेले आहेत. प्रशासन चांगल्या प्रकारे चालावे यासाठीच हे नियम आहेत. स्विकृत सदस्य ८३ वार्डात कोठेही काम करु शकतो. नगरसेवकांना कॉम्प्युटर प्रशिक्षणही देण्यात यावे. शहरात अनेक महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. नगर सेवकांकडे मदत कार्यासाठी अनेक संस्था, मंडळे येतात. जयंत्यासाठी ५ हजारापर्यंत खर्च करण्याची तरतुद आहे ती २५ हजार पर्यंत करण्यात यावी. कॉम्प्युटर प्रशिक्षणा बरोबरच ज्यांना इच्छा असेल त्यांना इंटरनेटचीही माहिति देण्यात यावी.

**श्री जयवंत ओक** नगरसेवक स्वेच्छा निधीसाठी २.२० कोटीची तरतुद दर्शविलेली आहे. स्वेच्छा निधी वापरावर बंधने असावयास हवीत. अनाधिकृत वसाहतींना आपण मुलभूत नागरी सुविधा देणार आहात काय? टी. बी. ब्रेन टयूमर या आजारांसाठी स्वेच्छा निधीतून मदत देण्यास परवानगी देण्यात यावी. इतर काही महापालिकामधून नगरसेवकांचा स्वेच्छा निधी ५ लाख रुपये आहे. आपल्या मनपातही नगरसेवक स्वेच्छा निधी ५ लाख करण्यात यावा.

**श्री सुरजितसिंग खुंगर** स्वेच्छा निधी ५ लाख नगरसेवकांसाठी व १० लाख स्विकृत सदस्यांसाठी ठेवण्यासाठी कोणीही विरोध केलेली नाही. तेव्हा तो मान्य करण्यात यावा.

**श्री प्रकाश निकाळजे** नगरसेवकांना तातडीचे कामे करता यावीत यासाठी स्वेच्छा निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. हा निधी कसा वापरावा यासाठी काही निर्देशही दिलेले आहेत. महानगरपालिकेचे उत्पन्न कमी व खर्च जास्त आहे. यासाठी स्वेच्छानिधीसाठी करण्यात आलेली २.५ लाखाची तरतुद बरोबर आहे.

**श्री अविनाश कुमावत** स्थायी समितीने २.५ लाखाची तरतुद नगरसेवक स्वेच्छा निधीसाठी केलेली आहे. ती ३ लाख प्रत्येकी करण्यात यावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** स्थायी समितीने २.५ लाखाची तरतुद सुचविलेली आहे. तातडीची विकासाची कामे व्हावीत यासाठी हा निधी खर्च करत असतांना नगरसेवकांना बदनाम केले जाते. एखादया कामासाठी एजन्सी नेमणे, बिल काढणे, ही कामे प्रशासनातर्फे पाहीली जातात. सर्व स. नगरसेवकांचा विचार घेऊन आपण याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

**श्री अंबादास दानवे** स्वेच्छा निधी संदर्भाने अनेक सुचना आलेल्या आहेत. स्वेच्छा निधीमधून एक संगणक प्रशिक्षण केंद्र टाऊन हॉल येथे सुरु करणे असा प्रशासनाने प्रस्ताव मांडला आहे. शहराचा वाढता विस्तार पाहता एकाच ठिकाणी प्रशिक्षण केंद्र ठेवले तर लोकांना लांबून यावे लागेल. यासाठी पर्वीच्याच पध्द्तीने प्रशिक्षण देण्यात यावे. स्वच्छा निधी खर्चासंबंधाने अनेक गैरसमज आहेत. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी वाढविता येणार नाही. असे आयुक्तांचे म्हणणे वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेले आहे. नगरसेवक स्वेच्छा निधी ३ लाख रुपये ठेवण्यात याव्यात. स्वेच्छा निधीचा गैरवापर होत आहे असे वाटत असेल तर, नियमावलीतील तरतुदी कडक करण्यात याव्यात.

**श्री वसंत नरवडे** नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून तीन लाखाची तरतुद योग्य आहे. संगणक प्रशिक्षण पूर्वीप्रमाणेच देण्यात यावे. प्रशिक्षण देण्यासाठी संस्थाकडून टेंडर भागविण्यात यावे.

**मा. आयुक्त** मनपाचे २०००-२००१ चे १३५ कोटीचे अर्थसंकल्प आहे. प्रस्तावित पाणीपट्टीमध्ये कमी केल्यामुळे तेवढे उत्पन्न कमी प्रमाणात मिळणार आहे. हा तोटा कसा भरुन काढणार याचाही विचार करणे आवश्यक आहे. स्वेच्छा निधी वाढवावयाचा असेल तर दुसऱ्या एखादया हेडमधील निधी कमी करावा लागेल. संगणक प्रशिक्षणात संदर्भाने काही स. सदस्यांनी सूचना मांडलेल्या आहेत. सर्व निधी एकत्र करुन एक सेंटर विकसीत केल्यास ते चांगले होईल. यामुळे मनपाचाही एक प्रकल्प तयार होईल. स्थायी समितीने या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे.

**मा. महापौर** स्वेच्छा निधीतून कामे हाती घेत असतांना त्यास आयुक्तांची परवानगी लागते. २५,०००/- रुपये प्रशिक्षणसाठी ठेवलेले आहेत. २५०० कॉम्प्यूटर ट्रेनींगच्या प्रत्येक सेंटरसाठी असतील. एक सेंटर सिडकोमध्ये तर एक टाऊन हॉल येथे सुरु करण्यात यावा. स्वेच्छा निधी ३ लाख रुपये करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यास येते. अनाधिकृत वसाहतीतील कामांसाठी नियमावली केली जाईल.

## *पुर नियंत्रण*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *क्रिडा संकुले*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *क्रिडा स्पर्धा*

**श्री वसंत नरवडे** सर्वप्रकारच्या खेळासाठी केलेली १५ लाखाची तरतुद अपूरी वाटते. यासाठी तरतुद वाढविण्यात यावी.

**श्री भगवान घडामोडे** महानगरपालिकेच्या वतीनेच हे कार्यक्रम घेण्यात यावेत. कोणत्याही संस्थेस पैसे देऊन त्यांच्याकडे पूर्णपणे कार्यक्रम सोपवू नये.

**श्री जयवंत ओक** या स्पर्धामध्ये बुध्दीबळ स्पर्धेचा उल्लेख करण्यात यावा.

**श्री अंबादास दानवे** संबंधित संलग्नीत संघटनामार्फत स्पर्धा घेण्यात याव्यात.

**मा. आयुक्त** अशा स्पर्धा डिस्ट्रीक्ट लेव्हलच्या असोसिएशन यांच्या सोबत व्यवस्था केली जाते. मात्र योजना महापालिकाच कार्यान्वित करत असते.

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## *शासकीय अनुदान*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानमुते मंजूरी देण्यात येते.

**श्री वसंत नरवडे** ७ कोटी रुपयाच्या विनीयोगासाठी कोणत्या योजना आखल्या याची माहिती देण्यात यावी.

**मा. आयुक्त** या संदर्भाने आपण शासनाकडे एक स्किम पाठविली आहे ती मंजूर झाली तर त्यावर हा खर्च होईल.

## *सांस्कृतिक कार्यक्रम*

**मा. आयुक्त** काही दिवसापूर्वी रंग मंदिरात एका कार्यक्रमात काही लोकांनी दारु पिऊन धिगांना केला. या कार्यक्रमास विभागीय आयुक्तही तेथे हजर होते. रंग मंदिरात प्रवेश देतांना थोडी सक्ती करावी लागणार आहे. अशा प्रकारच्या संस्थाना पूढे कार्यक्रमास परवानगी नाकारली पाहिजे.

**मा. उपआयुक्त (म.)** क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा एकत्रितपणे घेण्यात येऊ नयेत. दोन्ही स्पर्धा वेगवेगळया घ्याव्यात.

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

*घर बांधणी अग्रीम*

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

*शिक्षण*

**श्री अविनाश कुमावत** मनपा शाळेतील विद्यार्थ्यासांठी स्वाध्याय मालेची पुस्तके घेण्यात यावीत.

**मा. आयुक्त** महाराष्ट्र शासनाने प्रीस्क्राईब केलेली पुस्तके चांगली आहेत ती घेण्यात यावीत. यास हरकत नाही.

**श्री दलबिरसिंग जबिंदा** यावर्षी ७००० विद्यार्थी मनपा शाळामधून कमी झाले. अशी वृत्तपत्रात बातमी आहे ती, खरी आहे काय शाळेत विद्यार्थ्यांना बेंचेस नाहीत.

**श्री तकीहसनखान** ऊर्दू शाळेतील विद्यार्थ्यांनीनां फ्रॅाक व सलबार गणेवषाअंतर्गत द्यावी.

**श्री भगवान घडामोडे** मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी का झाली संबंधित अधिकाऱ्यास यासाठी जबाबदार धरण्यात यावे.

**श्री प्रकाश निकाळजे** शिक्षण विभागासाठी अर्थसंकल्पात एकूण किती तरतुद केलेली आहे. याचा उल्लेख नाही, याची माहिती देण्यात यावी.

**मुख्यलेखाधिकारी** शिक्षण विभागासाठी ९.२१ कोटीची तरतुद केलेली आहे.

**मा. महापौर** शाळेतील बेंचेस खरेदीसाठी ४ लाखाची तरतुद केलेली आहे. विद्यार्थ्यांना बसविण्यासाठी चटई घेतली जाणार नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** आपल्या शाळामधून पुरेसे विद्यार्थी का नसतात, बालवाडीतील मुलांची संख्या कशी वाढेल, याचा विचार व्हावयास हवा. बऱ्याचशा शाळांना कंपॅाड वॅाल, पाण्याच्या टाक्या नाहीत, अशा शाळांना या सुविधा देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डयुवेल उेस्क देण्यात यावेत. शिक्षकांच्या पगारासाठी शासनाकडून ५०% अनुदान मिळते. तर शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत. त्या का भरल्या जात नाहीत. मागील वर्षी कला-क्रिडा शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी मान्यता देण्यात आली होती. अद्यापही या जागा भरल्या गेल्या नाहीत. याची ताबडतोब अंमलबजावणी करण्यात यावी.

**श्री प्रकाश निकाळजे** महापालिकेतील शिक्षकांची, अधिकारी/कर्मचाऱ्यांची मुले मात्र महानगरपालिकाच्या शाळेत जात नाहीत. याचा अर्थ आपल्या शाळातून दिले जाणारे शिक्षण निकृष्ट दर्जाचे आहे. आपल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांनी महानगरपालिका शाळेत शिक्षण घ्यावयास हवे, अन्यथा त्यांना पगार देण्यात येऊ नये. अशी मी सूचना करतो. आपण विद्यार्थ्यांना अनेक सवलती देतो. तरीही आपल्या शाळांमध्ये विद्यार्थी का येत नाहीत.

**श्री मोतीलाल जगताप** आपल्या शाळांमधील दर्जा सुधारण्यासाठी स्टडींग कमीटीतही चर्चा झाली होती. शिक्षणाधिकाऱ्याची पूर्ण वेळ नियुक्ती करावयास पाहिजे त्याचे काय झाले. शिक्षणाधिकाऱ्याची पूर्णवेळ नियुक्ती करण्यात यावी.

**मा. उपायुक्त** शिक्षण सचिवांचा महापालिकेत शिक्षाणधिकारी नेमण्याबाबत पत्र दिले आहे. मी लवकरच मुंबईस जात आहे. त्यावेळी याचा पाठपुरावा करेन.

**सौ साधना सुरडकर** आपल्या शाळातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना अद्यापही पुस्तेके दिलेली नाहीत. विद्यार्थ्यांना गणवेश व पाठयपुस्तके शाळा सुरु होतानांच घ्यावयास हवीत विविध शाळांमधून कॅाम्प्यूटर प्रशिक्षण देण्यात येते. आपल्या किती शाळांमधून विद्यार्थ्यांना

आपण प्रशिक्षण देतो. आपल्या शाळेत ३०,००० विद्यार्थी संख्या दाखविलेली आहे. मात्र केवळ १०० विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्ती मिळते. विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

**श्री अंबादास दानवे** शिक्षण विभागासाठी ठेवण्यात आलेलया तरतुदीतील ८ कोटी रुपये वेतनावर खर्च होणार आहेत व प्रत्यक्ष शिक्षणावर ७६ लाख रुपये खर्च होणार आहेत. ३५ लाख रुपये गणवेशावर खर्च होणार आहेत. बऱ्याचशा शाळांमधुन ४ थी पर्यंतच्या वर्गासाठी एकच शिक्षक आहे. यामुळे शिक्षणाचा दर्जा वाढणार नाही. प्रत्यक्ष शिक्षणाचा दर्जा वाढेल अशी, तरतुद अर्थसंकल्पात नाही विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे प्रवृत्त करावयास हवे. शिक्षकही विद्यार्थ्याकडे पाहिजे तसे लक्ष देत नाही. इतरही खाजगी शाळांमध्ये कमी शिक्षक असतांना शिक्षणाचा दर्जा चांगला राहतो. महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. शिक्षणाधिकारी पद कायम स्वरुपी भरावे अशी शिफारस स्थायी समितीने केलेली आहे. महानगरपालिकेतील मात्र लोकांमधूनच हे पद कायमस्वरुपी भरण्यात यावे. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचवावा यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळी पुस्तके साधने उपलब्ध करुन द्यावीत.

**श्री भगवान रगडे** ब्रिजवाडी येथे सातवी पर्यंत शाळा आहे. त्या ठिकाणी किती शिक्षक आहेत. नारेगांव येथे १२०० मुले शिकतात. परंतु त्या ठिकाणी किती शिक्षक आहेत. ते केव्हा पासून आहेत. वारंवार सांगूनही शिक्षक का दिले जात नाहीत.

**श्री काशीनाथ कोकाटे** नारेगांव शाळेची बाब आपल्या निर्दशास असलेली आहे. आपल्याकडे शिक्षक संख्या कमी असेल तर, शिक्षकांची भरती का केली जात नाही.

**मा. महापौर** शहराच्या विकासासाठी सदस्यांनी चांगल्या सूचना मांडल्या आहेत. महापालिकेच्या शाळेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे. यासाठी विचार मांडले. आपल्या शाळांचा दर्जा अपेक्षित नाही. याची सर्वांना कल्पना आहे. शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापक यांच्यामध्ये एखादे पद असावयास हवे. आपल्याकडे केंद्र प्रमुख नाहीत. महानगरपालिका शाळातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तक, गणवेश व इतर सुविधा देतो तरीही महानगरपालिकाच्या शाळातून मुले शिक्षण घेत नाहीत. जून-जूलै महिन्यात काही शाळांमधून मुलांना प्रवेश मिळत नाहीत. तर आपल्या शाळेसाठी विद्यार्थी मिळत नाहीत ही परिस्थिती आहे. आपल्या शाळांवर पाहिजे तेवढे आपले सुपरव्हिजन नाही. विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. उपायुक्तांनी शिक्षण विभागाकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे. स. नगरसेवकांनीही आपल्या वार्डातील शाळांमध्ये जाऊन पाहणी करावी. जे शिक्षक काम करत नसतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. शिक्षणाच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व बाबी मा. आयुक्तांनी कराव्यात. मराठी, हिंदी, ऊर्दू भाषातील पुस्तके घेतली तर विद्यार्थ्यांना त्याची मदतच होईल. ज्या शाळांमध्ये शिक्षक कमी आहेत. अशा शाळांची नोंद घेऊन सर्वत्र समान शिक्षक देण्यात यावेत. कला-क्रिडा व क्राप्ट टिचर्स घ्यावेत असा ठरावा पूर्वीच पारीत झालेला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. शासनाकडे तो ठराव पाठविला असल्यास त्यास मंजूरी देण्यात यावी.

गणवेष योजना

**मा. महापौर** प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

विकास आराखडा

**मा. महापौर** प्रस्तावात दर्शविल्यानुसार २.२५ कोटी ऐवजी ३.२५ कोटीची तरतुद करण्यातस सर्वानुमते मंजूरी देण्यात देते.

**मा. महापौर** सहकारी कर्ज परतफेड या लेखाशिर्षांतर्गत स्थायी समितीने १,१०,००० तरतुद ठेवण्यात आली आहे. सर्वसाधारण सभेने पाणीपट्टी वाढीबाबत ५५,००० रक्कम कमी केल्यामुळे रु. ४६,००० सरकारी कर्ज परतफेड कमी करावी. अशी दुरुस्ती करुन विविध लेखाशिर्षांतर्गत बदल करुन मुख्यलेखाधिकारी यांनी दुरुस्ती तक्ता तयार करुन कार्यवाही करावी.

**ठराव:**

स्थायी समितीने शिफारस करुन सर्वसाधारण सभेपूढें दाखल केलेल्या सन १९९९-२००० पर्यंतचे सुधारित व माहे जुलै-२००० पर्यंतचे लेखा अनुदान तसेच सन २०००-२००१ चे मुळ अंदाजपत्रकावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे दुरुस्त्या करुन सन २०००-२००१ चे मुळ अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | विवरण | स्थायी समितीने संमत केलेली तरतुद | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली तरतुद | फरक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कमी | जास्त |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **जमा बाजू** | | | | |
| १. | जलतरण तलाव | ११०० | १७०० | -- | ६०० |
| २. | पाणीपट्टी | १८,०००० | १२,५००० | ५५,००० | -- |
| | **एकूण** | **१८,१,१००** | **१२,६,७००** | **५५,०००** | **६००** |
| | **खर्च बाजू** | | | | |
| १. | पाहूणचार भत्ता (मा. महापौर) | ४० | ६० | -- | २० |
| २. | विविध समारंभ व अतिथी पाहूणचार खर्च | -- | ४९५ | -- | ४९५ |
| ३. | खडी रस्ते नविन | २०,००० | १८,००० | २,००० | -- |
| ४. | उड्डाणपुल/भुयारी रस्ते सर्वेक्षण | -- | २,००० | -- | २,००० |
| ५. | वाचनालय | १५,०० | २,००० | -- | ५०० |
| ६. | स्माशान भूमी/कब्रस्तान विकास | ४,००० | ६,००० | -- | २,००० |
| ७. | स्वेच्छा निधी | २२,००० | २६,४०० | -- | ४४०० |
| ८. | नविन उद्याने | ३,००० | ४,००० | -- | १,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र | १,००० | १५०० | -- | ५०० |
| १०. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण थकबाकी | २५,००० | २०,००० | ५,००० | -- |
| ११. | म. रा. वि. मंडळ देयके | १,२८००० | १,१०,००० | १,८००० | -- |
| १२. | सरकारी कर्ज परतफेड | १,१०,००० | ६४,००० | ४६,००० | -- |
| १३. | पाणीखरेदी देयके (गोदावरी विकास महामंडळ | ३,००० | ८,००० | -- | ५,००० |
| १४. | वाहतुक सांकेतांक | -- | १,००० | -- | १,००० |
| | **एकूण** | **३१,७,५४०** | **२६,३,४५५** | **७१,०००** | **१६,९१५** |

**इतर दुरुस्ती**

१) जलतरण तलाम बोल्ट (बोल्ट) पध्द्तीने तयार करण्यात यावेत.
२) सिडको नाटयगृह बोल्ट (बोल्ट) पध्द्तीने करण्यात यावेत.
३) झोपडपट्टी भागात घरकुलांसाठी झोपडपट्टी सुधारणे अंतर्गतच्या तरतुदतून योजना हाती घ्याव्यात.
४) मालमत्ता दराची फेर पडताळणी (रिकन्सीलेशन) करुन सुधारण व्हावी व सुधारित डिमांड निश्चित करावी.
५) शहरातील व्यापारी संकुले बोल्ट (बोल्ट) पध्द्तीने विकसित करण्यात यावेत.

**पाणीपट्टी दर**

| **घरगुती जोडणी** | | |
|---|---|---|
| विवरण | स्थायी समितीने मंजूर केलेले दर | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले दर |
| १/२" | १,९००/- प्रतिवर्ष | १,२००/- प्रतिवर्ष |
| ३/४" | ४,२००/- प्रतिवर्ष | १,९५०/- प्रतिवर्ष |
| १" | ६,२००/- प्रतिवर्ष | ४,५५०/- प्रतिवर्ष |

| **व्यापार जोडणी** | | |
|---|---|---|
| १/२" | ८,०००/- प्रतिवर्ष | ४,८००/- प्रतिवर्ष |
| ३/४" | ९,०००/- प्रतिवर्ष | ५,८५०/- प्रतिवर्ष |
| १" | २१,०००/- प्रतिवर्ष | १३,६५०/- प्रतिवर्ष |

या व्यतिरिक्त इतर व्यासाच्या व इतर उपयोगी नळ जोडणीचे दर स्थायी समितीने शिफारस केलेल्या दराप्रमाणेच आकारवेत व या सर्व दरांची अंमलबजावणी दि. १/४/२००० पासून अंमलात येईल.

**बिन लेखाशिर्ष**

१) उड्डानपुल/भुयारी रस्ते सर्वेक्षण खर्च
२) वाहतुक सांकेतांक
३) विविध समारंभ व अतिथी पाहूणचार खर्च

**दुरुस्ती लेखाशिर्ष**

१) रॉयल्टी जायकावाडी प्रकल्प ऐवजी गोदावरी विकास महामंडळ पाणी खरेदी.

उपरोक्त फेरफारसह जमा रु. १२८ कोटी २६ लाख ३५ हजार व खर्च १२८ कोटी ०८ लाख १० हजार नुसार १८.२५ लाखाच्या शिलकी अर्थ संकल्पास सर्वानुमते स्वीकृतीसह मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सर्वांचे आभार मानून रात्री ९.१५ वाजता "जण गन मन" या राष्ट्रगिताने सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक १९/८/२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**शनिवार दिनांक १९/८/२००० रोजी मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | स. सदस्य |
| ३) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ४) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ५ स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | स. सदस्य |
| ६) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ७) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ८) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ९) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| १०) स. स. श्री रगडे भगवान दगडूजी | -//- |
| ११) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| १२) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| १३) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १४) स. स. सौ मंदाबाई प्रभाकर पवार | -//- |
| १५) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १६) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १७) स. स. श्री शिंदे रुक्मीणी राधाकिशन | -//- |
| १८) स. स. श्री किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १९) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| २०) स. स. श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल | -//- |
| २१) स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| २२) स. स. श्रीमती मानकापे पार्वती लहानू | -//- |
| २३) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| २४) स. स. सौ विजया किशोर राहाटकर | -//- |
| २५) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २६) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २७) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २८) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २९) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| ३०) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| ३१) स. स. श्री अय्युबखॉ सरदारखॉ | -//- |
| ३२) स. स. श्री जैन विकास रतनलाल | -//- |
| ३३) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |

३४) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर -//-
३५) स. स. सौ रशिदा बेगम गफ्फार यासखॉन -//-
३६) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल -//-
३७) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३८) स. स. श्री स. मुमताज आली मोज्जम अली -//-
३९) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
४०) स. स. श्री थोरात दत्तात्रय (बाळासाहेबा) -//-
४१) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
४२) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
४३) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४४) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४५) स. स. सौ मोरे जयश्री कुमारराव -//-
४६) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४७) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
४८) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
४९) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
५०) स. स. श्री अशरम मोतीवाला -//-
५१) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५२) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५३) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
५४) स. स. सौ दाणे चंद्रभागाबाई भगीरथ -//-
५५) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५६) स. स. श्री स. सलीम स. युसुफ -//-
५७) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
५८) स. स. श्री गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहमद -//-
५९) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
६०) स. स. श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख -//-
६१) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
६२) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६३) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
६४) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
६५) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
६६) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्दीन खान -//-
६७) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
६८) स. स. श्री जगदीश कव्हैय्यालाल सिध्द -//-
६९) स. स. सौ. बबीता सुभाष कागडा -//-
७०) स. स. श्री स. अली सलामी स. मिरा सलामी -//-
७१) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-
७२) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-

**स्विकृत सदस्य**

१) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास

२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

सभागृहातर्फे अमरनाथ यात्रेत मृत्यू झालेले व स. सदस्य श्री शे. शकील बुढण पटेल यांच्या मातोश्री पै. अमिनाबी बुढण पटेल यांचे दुखःद निधन झाले. तसेच अमरनाथ यात्रेत बॉम्ब स्फोट होऊन मृत्यू पावलेल्यांना २ मिनिटे उभे राहून व स्तब्धता बाळगून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**संवाद**

**श्री जयवंत ओक** सिध्दार्थ उद्यात मधील प्राणी संग्रहालायातील शंकर नावाच्या हत्तीचा मृत्यू कोणत्या कारणाने झाल. प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री कुमावत अविनाश** चर्चा अगोदर की, विषय अगोदर घेणार.

**मा. महापौर** विषय पत्रिकेवर बरेच विषय असून अगोदर विषयावर चर्चा करावी नंतर जनरल चर्चेसाठी वेळ देण्यात येईल. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र ४०/१ :**

दिनांक २०/४/२०००, २/५/२०००, २०/६/२०००, २६/६/२००० व २०/७/२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**मा. महापौर** विषय क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात येते.

**ठराव क्र.४०/१:**

दिनांक २०/४/२०००, २/५/२०००, २०/६/२०००, २६/६/२००० व २०/७/२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ४१/२ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक ७२ "शॉपींग सेंटर" ची जागा १९७६ साली संपदन केली आहे. १९८० साली सदर जागा ११ महिन्यांसाठी मराठा शिक्षण संस्थेस नगरपरिषदेच्या काळात भाडयाने देण्यात आली. या बाबत शासनास कळविण्यात आले. त्यानंतर शासनाने सदर जागा तीन वर्षासाठी देणेबाबत आदेश दिला. त्यानंतर सहाय्यक संचालक नगर रचना मुल्यांकन औरंगाबाद यांचे तर्फे १९८१ साली रु. १९,०००/- (एकोणीस हजार फक्त) दरवर्षाचे भाडे ठरविण्यात आले. १९८३ साली संस्थने भाडे भरण्यास असमर्थता दर्शविली. सन १९८३ साली शासनाने सदर भाडेपट्टा रद्द करण्याचे कळविले. असे संस्थेस महानगरपालिकेतर्फे कळविण्यात आले. त्यावर महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ८१ (ब) ची सूचना भाडेकरु संस्थेस दिली. त्यावर शासनाने दिनांक १२/४/१९८५ साली पुन्हा कळविले की, सदर संस्थेस जागा दयावी. त्या पत्रानुसार महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्रमांक ५२६ दिनांक १४/१०/१९८५ रोजी मान्य केले. त्यानुसार महानगरपालिकेसाठी ४७ मी.X१५ मी. एवढी जागा ठेऊन उर्वरित जागा एक एकर बारा गुंठे मराठा शिक्षण संस्थेत भाडयाने देण्याची मान्यता घेण्यात आली. त्याच बरोबर मंजूर विकास योजनेत सदर १५X ४७ मीटरची जागा "शॉपींग सेंटर" म्हणून व उर्वरित

जागा शैक्षणिक वापर म्हणून करणेस्तव म. प्रा. व न. चे अधिनियम १९६६ चे कलम ३७ खालील तरतुदी नुसार किरकोळ फेरबदल करण्याची मान्यता घेण्यात आली. हया बाबतच्या मान्यतेप्रमाणे कार्यवाही करुन सदर प्रस्ताव शासनाकडे फेरबदलास्तव पाठविण्यात आला. तो अदयाप मान्य झालेला नाही.

सदर संस्थने दिनांक १/४/१९८० ते १/४/१९९९ पर्यंन्तचे भाडे भरलेले आहे. औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दी करीता तयार केलेली प्रारुप सुधारित विकास योजना महानगरपालिकेने शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सन १९९८ मध्ये सादर केली असून, त्यास शासनाकडून अदयाप मंजूरी मिळालेली नाही. वरील विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ७२ "शॉपींग सेंटर" ऐवजी "प्राथमिक शाळा" असे आरक्षण बदलण्यात आले आहे.

मराठा शिक्षण संस्थने १९८० पासून वरील जमिनीचे भाडे महानगरपालिकेने अंतिम केले असून, त्यानुसार रुपये २६,०७८/- प्रतिवर्ष या दराने त्यांनी सन १९९९ पर्यन्त भाडे भरले आहे. त्यामुळे सन १९८० हे वर्ष धरुन त्यापासून ९९ वर्षाकरिता भाडेपट्टा/करारनामा महानगरपालिकेने संस्थेस करुन दयावा व भाडयाची रक्कम रु. २६,०७८/- प्रतिवर्ष अशी मान्य करण्यात यावी.

वरील करारनामा महानगरपालिकेने संस्थेबरोबर केल्यावर त्याच वेळी महानगरपालिकेला ४७x२२ मीटर जागा संस्थेकडून महानगरपालिकेला हस्तांतर करण्यात येईल. तसेच दाखल केलेले न्यायालयीन दावे मागे घेण्यात येतील, असे संबंधित संस्थेने त्यांच्या पत्रात नमुद केले आहे.

सध्याच्या धोरणानुसार आपण ३० वर्षाकरिता भाडेपट्टा करतो व त्यानंतर नव्या भाडे दराने त्याचे नुतनकरीणाची अट करारनाम्यात नमुद करतो. त्यामुळे संस्थेची ९९ वर्षाच्या कराराची विनंती मान्य करता येणे शक्य नाही. महानगरपालिकेने सन १९९९ पर्यंत रु. २६,०७८/- प्रतिवर्ष भाडे संस्थेकडून मान्य केले असल्यामुळे, १९८० पासून ३० वर्षाचा करारनामा त्याच भाडे दराने करावयास हरकत नाही.

वर नमुद केल्यानुसार प्रारुप विकास योजना शासनाकडे मंजूरीसाठी सादर केली असल्यामुळे, वरील आरक्षणाबाबत बदल करणे (४७ मी.x२२ मी. दुकान केंद्र व उर्वरीत शैक्षणिक विभागात दर्शविणे) हे शासनाचे अखत्यारीत असल्यामुळे ३७ ची कार्यवाही करणे आवश्यक वाटत नाही. भाडेपट्टयाची मुदत व रक्कमही महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणाप्रमाणे ठरविण्यात येईल व ती संबंधितांवर बंधनकारक राहील. शासन विकास योजनेस मंजूरी देतांना आरक्षणाबाबत जो निर्णय होईल तो महानगरपालिका व संबंधितांना मान्य करावा लागेल वत्या अनुषंगाने करारात कोणताही बदल करण्याची अधिकार महानगरपालिका प्रशासनास राहतील. या अटीवर संबंधित संस्थेकडून ४७ मी.x२२ मी. जागा महानगरपालिकेस हस्तांतरित करुन घेऊन उक्त जागेबाबत करारनामा व भाडेपट्टा करण्यास परवानगी देण्यात यावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**संवाद**

**श्री अविनाश कुमावत** या विषयावर सविस्तर खुलासा करण्यात यावा. नमुद केल्याप्रमाणे २ वर्षापासून हे प्रकरणे चालू आहे.

**मा. महापौर** नगररचना विभागाचे अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री सुदाम सोनवणे** ही जागा कोणती सध्या या जागेवर बांधकाम चालू आहे काय? आणि सदर जागा कधीपासून भाडयाने दिली खुलासा करावा.

**उपअभियंता (नगररचना)** सदर प्रकरणातील जागा १९८१ पासून संस्थेस प्रतिवर्षी १९,०००/- हाजार रुपये या भाडेपट्टयाने दिलेली असून, संस्थने १९९९ पर्यंत भाडे भरलेले आहे.

**श्री अफसरखान** कधीपर्यंत भाडे घेण्यात आले. शासनाची मंजूरी होती काय? नसल्यास मंजूरी नव्हती तर भाडे कसे वसुल केले, खुलासा करावा.

**उपअभियंता (नगररचना)** सदरचे भाडे शासनाचे नगररचना विभागातील सहाय्यक संचालक नगररचना यांनी ठरविले होते.

**श्री अविनाश कुमावत** त्या ठिकाणचे बांधकाम किती झाले. ठराव १९८० ला झाल. ८१ ला मुदत संपली. नुतनीकरण केले का ११ महिन्याचे भाडे होते. भाडे कसे घेतले.

**उपअभियंता (नगररचना)** सदर जागा खुली आहे. दि. १/४/१९९९ पर्यंतचे भाडे घेतलेले आहे.

**मा. महापौर** या संदर्भात मालमत्ता अधिकारी यांनी माहिती दयावी किती भाडे घेतले केव्हापासून घेतले.

**श्री स. अली मिरा सलामी** प्रस्तावात विरोध आहे किवा विरोध होतो आहे, असे नाही. परंतु जो प्रस्ताव ठेवण्यात आला गोलमोल पध्द्तीने सादर केलेला आहे. १९९९ पर्यंत भाडे वसुल केले असे दाखविले. १९८० मध्ये शासनाची मंजूरी नाही. तरीही १९९९ पर्यंत भाडे वसुल केले. संबंधित संस्था कॉप्यूटराईज केल्यानंतर न्यायालयातील दावे मागे घेतील असे दाखविले. या संबंधी कोर्टात केसेस चालू असून, भाडे वसुली करण्यास शासनाची मंजूरी नाही काही केसेसमध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार टपरीचे भाडे वसुल होत नाही, तर शासनाची मंजूरी नसतांना भाडे वसुली कशी केली. प्रस्तावात अलग दाखविण्यात आले व कार्यवाही वेगळीच होत आहे. यासाठी मनपाचे नियम काय आहेत. न्यायालय पण आदेश काय होतील. त्यानुसार सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करावा.

**श्री सुदाम सोनवणे** १९८० ला ठराव घेऊन ११ महिन्याचा करारवर १९८१ ला भाडे वसुली करण्याची मुदत संपली तर पुढील १९९९ पर्यंत भाडे कोणत्या आधारे वसुली केले व सध्या त्या जागेवर दुकानाचे बांधकाम चालू असून, नेमकी जागा कोणती आहे, त्याचा सविस्तर खुलासा करावा.

**श्री अफसरखान** जागा किती आहे, खुलासा करावा शासनाची मंजूरी नाही तर भाडे कसे घेतले.

**मा. महापौर** जागा किती संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता (नगररचना)** १ एकर १२ गुंठे जाग आहे. १९८५ लाच गौण फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला.

**श्री सुदाम सोनवणे** संबंधित अधिकारी हे सभागृहाला व्यवस्थीत माहिती देऊ शकत नाही जे नवीन सहा. नगररचनाकार आलेले आहे ते सुट्टीवर आहे काय? त्याचेकडून माहिती घेऊन खुलासा करावा. माझ्या मते बरेच अधिकारी सभेस उपस्थित नाही जे उपस्थित नाही. त्यांनी आपल्याकडे लेखी दिलेली आहे काय खुलासा करावा.

**मा. महापौर** मा. आयुक्तांचा मला फोन आला होता. त्यांची प्रकृती बरोबर नाही. त्यामुळे ते येणार नाही. त्यांचे जागी उपआयुक्त (म.) बसलेले आहे. तसंच आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी माझ्याकडे लेखी सूचना केली आहे.

**श्री सुदाम सोनवणे** सर्वसाधारपणे १९, २० तारखेलाच अधिकारी आजीरी पडतात असे दिसून येतात.

**श्री तकीहसन खान** नगररचनाचे अधिकारी यांचेकडून व्यवस्थीत खुलासा होत नाही. संबंधित विभागाचे अधिकारी यांना वेळ दयावा व सविस्तर माहितीसह खुलासा व्हावयास पाहिजे. वेळ दिल्यास सत्य बाजू उघडकीस येईल. यावर चर्चा न करता, सविस्तर माहिती मागवावी.

**मा. महापौर** हे प्रस्ताव संबंधित विभागाने सविस्तर मांडलेला नाही. नेमकी किती जागा आहे. कशाच्या आधारे जागा संस्थेस दिली. किती भाडे ठरविलेले होते. किती दिवसासाठी व किती भाडे आतापर्यंतचे घेतलेले आहे याची सविस्तर माहितीसह प्रशासनातर्फे प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

**श्री अविनाश कुमावत, श्री नंदकुमार घोडेले** जागा देऊ नये. मनपाची जागी परत घ्यावयाची असेल, तर माहितीच कशासाठी मागावावयाची हा प्रस्तावाच रद्द करावा. महानगरपालिकाच्या बऱ्याच शाळा भाडयाच्या इमारतीमध्ये भरतात, शाळेसाठी या जागेचा उपयोग होईल.

**श्री स. अली मिरा सलामी** अधिकारी यांनी गोलमोल प्रस्ताव सभागृहात सादर केला व सभागृहाची दिशाभूल करुन सभागृहात अधिकारी वेळ वाया घालवितात याची शिक्षा म्हणून, अधिकारी यांचेवर काय कार्यवाही करणार त्यांना कारणे दाखवा. नोटीस दयावी.

**मा. महापौर** या प्रस्तावाबाबत ज्या त्रुटी आहेत त्या सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा. सध्या या विषयावर चर्चा स्थगित करण्यात येत आहे. आता पुरवणी विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**ठराव क्र. ४१/२** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्तावासंबंधी प्रशासनामार्फत सविस्तर माहितीसह प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

## *पुरवणी विषय*

**विषय क्र. ४२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारतामधील अनाथ व गोरगरीबाची माता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारत रत्न मदर तेरेसा हे जगातील एकमेव व्यक्ती असून, वार्ड क्र. ३७ मधील लिटीलफ्लॉवर हायस्कुल समोरील चौकात त्यांचा भव्य पुतळा उभारण्यात येऊन त्यांच्या स्मरणार्थ त्या चौकास मदर तेरेसा असे नांव देण्यात यावे. सदरील वार्ड क्र. ३७ मधील सर्व नागरिकांची इच्छा आहे. करीता सदरील पुतळा उभारणेत यावा. करिता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात यावा.

सूचक श्री सुनिल वडागळे
अनुमोदक १) श्री अंबादास दानवे
२) श्री सुदाम सोनवणे
३) श्री शे. इसाक शे. जेनोद्यीन
४) श्री सलीम पटेल समशेर पटेल

दिनांक ८/८/२०००

**संवाद**

**सौ चंद्रभागाबाई दाने** मिलींदचौक अनेक वर्षापासून असून, मदर तेरेसा यांचा आम्हाला आदर आहे, मदर तेरेसा यांचा पुतळा व्हावा यासाठी चौकात पाटी लावण्यात

आली होती, परंतु सदरील चौकाजवळील नॅशनल हॉलेचे मालक व स. सदस्य श्री गौतम खरात व साळवे यांनी एकमेकांविरुध्द पोलीस गुन्हा दाखल केला होता व या प्रस्तावानुसार वादाचा प्रश्न निर्माण होणार नाही. म्हणून या प्रस्तावावर विचार करुन निर्णय व्हावा.

**श्री सुनिल वडागळे** मदर तेरेसा हया भारतातच नव्हे तर, सर्व जगात नावाजलेल्या असून, त्यांना आतापर्यंत बरेच पुरस्कार मिळाले, नोबेल पुरस्कार पण मिळालेला असून गोरगरीब तसेच मागास लोकांसाठी त्यांनी मोलाचे कार्य केलेले असून, येथील वसाहतीतील सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन हा पुतळा होण्यास साथ देतील करीता, विनंती या प्रस्तावास मान्यता दयावी. या वसाहतीत ख्रिश्चन समाजांचे लोक जास्त आहे, प्रस्ताव मंजूर करावा.

**मा. महापौर** या प्रस्तावाबाबत कायदेशीर बाबी पाहण्यात येतील. मदर तेरेसा यांचा पूतळा करायचा किंवा कसे हे नामांतर कमीटी ठरविले हा प्रस्ताव नामांतर कमीटीकडे पाठविण्यात येतो.

**ठराव क्र. ४२/१ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हा प्रस्ताव नामांतर कमीटीकडे पाठविण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री सय्यद शकील अख्तर, रा. आरेफ कॉलनी, औरंगाबाद यांना ऱ्हद्यरोग आजार असून, त्यांचा उपचान "कमलनयन बजाज हॉस्पीटल" औरंगाबाद येथे सुरु असून या आजरास्तव रु. १,५०,००० इतका खर्च अपेक्षित आहे. श्री सय्यद शकील अख्तर हयांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असून, ते इतका खर्च पेलू शकत नाही. त्यांना विशेष वैद्यकीय मदत म्हणून रु. ४०,०००/- आर्थिक मदत देणेस मान्यता व्हावी. करीता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात यावा.

सूचक श्री कैसनखान
अनुमोदक श्री नासेरखान
श्री काशीनाथ कोकाटे

दिनांक १६/८/२०००.

**मा. महापौर** १५,०००/- हजाराच्या वर आर्थिक मदत हवी असेल तर, सर्वसाधारण सभेस प्रस्ताव येतो. त्यानुसार प्रस्ताव सादर झालेला असून, सर्वसाधारण सभेस अधिकार असल्याने नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधून आर्थिक मदत देण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव क्र. ४३/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सय्यद शकील अख्तर हे ऱ्हद्य रोगाचे रुग्ण असून, त्यांच्या ऱ्हद्य रोगाच्या उपचारासाठी स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधून विशेष बाब म्हणून रुपये ४०,०००/- आर्थिक सहाय्य देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/३ :**

वार्ड क्र. १२ संजयनगर, मुंकुदवाडी हा अती मागासलेला व शिक्षणापासून वंचीत असलेला प्रभाग आहे. तसेच या वार्डातील लोकसंख्या ही २० ते २५ हजारापर्यंत आहे. त्यामुळे या ठिकाणी मुलंवर चांगले संस्कार व्हावे. जेणेकरुन येथील जनता ही सुसंस्कारापासून वंचीत राहणार नाही. तरी मा. साहेबांनी माझ्या वार्डात एक बालसंस्कार केंद्र बांधून देण्यात मंजूरी दयावी.

सूचक सौ लिलावती घायतिलक
अनुमोदक श्री काशीनाथ कोकाटे
दिनांक १७/७/२०००

**संवाद**

**श्री तकीहसन खान** कनीष्ठ अभियंताना पत्र दयावे असे प्रस्ताव ठेवण्यात आलेले आहेत.

**मा. महापौर** मागच्यावेळी माझ्यावर आरोप करण्यात आले की, महापौर ठराव ठेवत नाही म्हणून जे ठराव अभिप्रायासाठी पाठविले होते ते सर्वच प्रस्ताव आजच्या बैठकीत ठेवण्यात आले. चर्चा करुन निर्णय घ्यावा. विषय क्र. ३ मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४४/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १२ संजयनगर, मुकुंदवाडी येथे एक बालसंस्कार केंद्र बांधून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/४ :**

संजयनगर मुकुंदवाडी वार्ड क्र. १२ येथील जनता ही अती मागासलेली असून त्यांना आर्थिक पाठबळ नाही. आजच्या महागाईच्या काळात माझ्या प्रभागात एक सुशोभित मंगल कार्यालय बांधून दयावे. जेणे करुन गरीब जनतेला लग्नकार्य किंवा इतर कार्यक्रम करण्यास गरीब जनतेला सोयिस्कर होईल. तरी मा. साहेबांनी एक मंगल कार्यालय बांधून देण्यास मंजूरी दयावी करीता प्रस्ताव मंजूरीस्वत सादर.

सूचक सौ लिलावती घायतिलक
अनुमोदक श्री काशीनाथ कोकाटे
दिनांक १७/७/२०००.

**संवाद**

**मा. महापौर** मंगल कार्यालय बांधण्यासाठी जागा आहे काय? शहर अभियंता यांनी अभिप्राय दयावा.

**शहर अभियंता** हा प्रस्ताव ऐनवेळेचा कालच प्रस्ताव आमच्याकडे प्राप्त झालेला आहे. या प्रस्तावासंबंधी स्थळ पाहणी करुन पुढच्या वेळेस अहवाल सादर करण्यात येईल.

**श्री अविनाश कुमावत** अशी कामे करण्यास अंदाजपत्रकात तरतुद आहे काय? शासनाकडे पाठवावे.

**शहर अभियंता** तरतूद केलेली असून, या प्रस्तावात नमुद केल्यानुसार नावानिशी तरतूद नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** मंगल कार्यालय बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसेल ती उपलब्ध करुन देण्यात येईल व या वसाहतीमध्ये दुर्बल घटकातील लोक जास्त प्रमाणात असून, कामगार लोक राहतात. त्याचे गरजा पूर्ण करण्यासाठी समाज मंदिर तसेच मंगल कार्यालय बांधणे अत्यंत गरजेचे आहे व सभागृहाने या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दयावी.

**श्री अविनाश कुमावत** ८३ वार्डात जागा उपलब्ध असेल तर, मंगल कार्यालय बांधणार काय सर्वच वार्डात मंगल कार्यालय करावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** तेथील वसाहतीतील लोकसंख्येचा विचार करुनच प्रस्ताव सादर केलेला आहे. वास्तविकतेला सोडून असेल तर रद्द करावा.

**मा. महापौर** प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४५/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर, मुकुंदवाडी वार्ड क्र. १२ येथे मंगल कार्यालय बांधून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/५ :**

महानगरपालिका औरंगाबाद हद्दीत वार्ड क्र. ४६ मध्ये मो. नेहरुनगर हत्तेसिंगपूरा बाबर कॉलनी व कटकट गेटचा मागील भाग या परिसरात छोटे रस्ते व कच्चो रोड आहे. सदरील परिसरात गोर गरीब नागरीक राहतात. सदरील रस्ते फार बिकट व खराब झालेले आहे. पुढे पावसाळयाचे दिवस येणार असून, सदरील परिसरात रस्त्यातून येणे जाणेसाठी चिखल व मोठे मोठे खड्डे असल्यामुळे नागरिकांना येणे जाणेसाठी फार त्रास होत आहे. म्हणून सदरील परिसरात डब्ल्यू. बी. एम. रोड व त्यावर डांबरीकरण रस्ता तयार करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री. काशीनाथ कोकाटे
अनुमोदक : सौ. नुसरत बानो
दि. २३-०५-२०००

**संवाद**

**मा. महापौर** प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. अनाधिकृत वसाहत आहे काय हे बघूनच कायदेशीर कार्यवाही करावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** पुंडलीकनगर व इतर ही काही अनाधिकृत वसाहतीमध्ये खासदार निधीतून विकासाची कामे केलेली आहे व काही वसाहतीमध्ये कायदेशीर बाबी कशासाठी.

**ठराव क्र. ४६/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ मध्ये मो. नेहरुनगर हत्तेसिंगपूरा, बाबर कॉलनी व कटकट गेटच्या मागील भाग इ. परिसरात डब्ल्यू. बी. एम रोड व त्यावर डांबरीकरण रस्ता तयार करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तथापी या संबंधित कायदेशीर बाजू तपासूनच पुढील कार्यवाही करण्यास यावी. असे सर्वानुमते ठरले आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-११ दिपनगर, द्वारकानगर स्मशान भूमी जवळील चौकास "सौभाग्य चौक" नांव देण्यात यावे. अशी येथील नागरिकांची मागणी असल्यामुळे या चौकास "सौभाग्य चौक" नाव देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सूचक श्री भगवान घडामोडे
अनुमोदक श्रीमती डॉ. आशा बिनवडे
दिनांक १७/६/२०००.

**मा. महापौर** या प्रस्तावाचे सूचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. ४७/६ :**

प्रस्तावाचे सूचक सभागृहात उपस्थित नसल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. ४८/७ :**

महानगरपालिका औरंगाबाद हद्दीत वार्ड क्र. ४६ मध्ये मो. हत्तीसिंगपुरा व रहेमानीयॉ कॉलनीचा मध्य भागातून नाला आहे. सदरील नालाचा दोन्ही बाजूने नागरिकांच्या वस्ती आहे, पूढे पासाळाचे दिवस येणार असून, सदरील नालापासून नाल्याजवळ असलेल्या घर धारकांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. यासाठी सदरील नाल्याच्या दोन्ही बाजूने संरक्षण भिंत बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री काशीनाथ कोकाटे
अनुमोदक श्रीमती नुसरत बानो
दिनांक २३/५/२०००.

**मा. महापौर** सर्व कायदेशीन बाबी तपासूनच कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ४८/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ मध्ये मो. हत्तीसिंगपुरा रहेमानियॉ कॉलनीया मध्य भागातून जाणाऱ्या नाल्याच्या दोन्ही बाजूने संरक्षण भिंत बांधण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तथापि या संबंधात सर्व कायदेशीर बाबी तपासूनच पुढील कार्यवाही करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद ते जळगांव हा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ताब्यात आहे आणि याच रस्त्यावरील हर्सुल गांव मात्र मनपाच्या ताब्यात आहे. मात्र रस्त्यावर मनपाची पाणी पुरवठा लाईन आहे. तसेच ड्रेनेज लाईनसुध्दा आहे. त्यामुळे याची दुरुस्ती करतांना मनपाला रस्ता खोदणेसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे परवानगीसाठी कामाला उशिर होतो तसेच या रस्त्यावर जे खड्डे आहेत. (खोदकामोच वेळेचे) ते बी ॲण्ड सी तर्फे अदयाप दुरुस्त न झालेमुळे या ठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

सदरील रस्ता महानगरपालिकेने विकासाच्या व पुढील दृष्टीकोनातून ताब्यात घेणे आवश्यक व जरुरीचे आहे. तरी सदरील रस्ता महानगरपालिकाचे ताब्यात घेणे करीता

प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर. सदरील रस्ता हा मारोती मंदीर ते पुलापर्यंत अंदाजे १/२ कि. मी. ताब्यात घ्यावा.

सूचक श्री रावसाहेब पा. औताडे
अनुमोदक श्री वसंत नरवडे पाटील

**संवाद**

**श्री स. अली मिरा सलामी** सविस्तर प्रस्तावाबाबत माहिती दयावी व मंजूर करावा.

**मा. महापौर** हा रस्ता बां ॲण्ड सी चा असून माझ्या माहितीप्रमाणे काम करण्यासाठी ३० लाख मंजूर झालेले आहे. हा रस्ता सध्या हस्तांतर न करता सार्वजनिक बांधकाम खात्याने काम केल्यानंतर कार्यवाही करता येईल.

**श्री सुदाम सोनवणे** ज्या मालमत्ता रस्त्यामध्ये येतात. त्या हस्तांतरण करणे गरजेचे आहे.

**मा. महापौर** सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा रस्ता संबंधित विभागाकडेच येतो. या वस्त्यांमधील असलेल्या मालमत्ता संपादन व दुरुस्ती करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी. सभागृहाच्या भावना सार्वजनिक बांधकाम विभागात कळवावे.

**श्री काशीनाथ कोकाटे** या रस्त्यामधून महानगरपालिकाच्या पाणी ड्रेनेज लाईन गेलेल्या आहेत. सदर रस्ता सिमेंट क्रॉन्क्रेटचा करुन देण्यास सार्वजनिक बांधकाम खाते तयार आहे. या संबंधी माझ्या माहितीप्रमाणे एक ठरावही या अगोदर पास झालेला आहे असे वाटते. रस्ता दुरुस्ती देखभाल संबंधित विभागा करणार आहे. परंतु महानगरपालिकेच्या मालकीच्या पाईपलाईन कशा पध्द्तीने बाजूला घेता येईल. त्याबाबतची कार्यवाही व्हावी व तसे आदेश करावे.

**श्री तकीहसन खान** या रस्त्यावर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलवाहीन्या व ड्रेनेज लाईन्स असून, काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याची परवानगी घेऊन कार्यवाही करावी लागते व संबंधित विभागाची वेळोवेळी तात्काळ परवानगी मिळत नाही. करीता रस्ता मनपाकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही व्हावी. असे प्रस्तावावरुन दिसून येते.

**मा. महापौर** या रस्त्यावरील ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याच्या ज्या पाईप लाईन आहेत. त्याबाबतीत देखभाल दुरुस्ती व नवीन पाईप टाकण्याची गरज पडल्यास ही जबाबदारी महानगरपालिकाची असून संबंधित अधिकारी श्री एम. डी. सोनवणे यांनी तशी कार्यवाही करावी व संबंधित विभागाला तसे कळवावे व या विभागाने या रस्त्याचे संपूर्ण काम केल्यानंतर महानगरपालिकाकडे हा रस्ता हस्तांतरण करण्याची कार्यवाही होईल.

**ठराव क्र. ४९/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद ते जळगांव हया रस्त्यावरील हर्सुल गावा अलीकडील महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या पाणी पाईप लाईन व ड्रेनेज लाईन संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याला रस्ता दुरुस्त करावयाचा असल्याने रस्त्यामध्ये येत असलेल्या पाणी व ड्रेनेज लाईन देखभाल दुरुस्तीची कार्यवाही करण्यासंबंधी तसे मनपातर्फे संबंधित विभागास कळविण्यात येऊन सदर रस्त्याचे संपूर्ण काम केल्यानंतरच महानगरपालिकाकडे रस्ता हस्तांतरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

*चर्चा*

**श्री स. अली मिरा सलामी** पत्रकार कक्षात पोलीस येऊन बसले कालच्या स्थायी समिती सभेच्या वेळी सुध्दा पत्रकार कक्षात पोलीस येऊन बसले होते. मा. सभापती मा. महापौर यांनी त्यांना परवानगी दिलेली आहे काय? पत्रकार कक्षात पत्रकाराशिवाय कुणीही बसू शकत नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** पत्रकार कक्षात कुणीही येऊन बसावे हे योग्य नसून हा सभागृह व मा. महापौर याचा अवमान आहे. सभागृह मा. महापौर चालवितात. त्यांनीच अशा बाबींकडे लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

**मा. महापौर** : जनसंपर्क अधिकारी यांनी पत्रकारा व्यतिरिक्त कोणालाही पत्रकार लक्षात बसू देऊ नये व यापूढे काळजी घ्यावी.

**विषय क्र. ५०/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. जयसिंगपुरा येथील सि. स. न. ३०५/३०६/२८७/२८८ या मिळकतीच्या दक्षिणेला लहान गल्या आहेत. त्यामुळे या घरांना योग्य रुंदीचा रस्ता उपलब्ध होत नाही व वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या गल्याच्या दक्षिणेला पूर्ण मोकळी जागा असून विदयापीठ गेट कडून येणारा १०० फूट रस्त्यापासून म्हणजेच सि. स. न. ३०६ पासून सि. स. न २८७ पर्यंत दक्षिणेला असलेल्या मिळकतीतून किमान २५ फूट रुंद रस्ता तयार करण्यासाठी दक्षिणेकडील खुल्या जागेतून जागा संपादन करण्यास व त्याचा ताबडतोब विकास करण्यात प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सूचक | सौ. साजेदा बेगम |
| अनुमोदक | श्री तकीहसन खान |

**संवाद**

**मा. महापौर** ही जागा कुणाची आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री अफसरखान** ही जागा कुणाची ही नसून खाजगी व्यक्तीची आहे. या अगोदर दोन वर्षापूर्वी या संबंधीचा ठराव झालेला आहे.

**मा. महापौर** हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ५०/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जयसिंगपुरा येथील सि. स. न. ३०५/३०६/२८७/२८८ ला लागून दक्षिणेस लहान गल्या आहेत. या मिळकतीच्या दक्षिणेस विदयमान गल्यासह खाजगी मिळकतीतून २५ फूट रुंद रस्ता तयार करण्यासाठी विद्यमान गल्लीच्या दक्षिणेकडील मिळकतीतून जमीन संपादन करण्यास व त्यास येणाऱ्या खर्चासही सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१/१० :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास आरखडयातील चंपा मस्जीद ते रोशनगेट हा रस्ता रुंद करण्यात आलेला आहे. परंतु रोशनगेट ते मौलाना आझाद चौक पर्यंतचा रस्ता अदयाप ही रुंद करण्यात आलेला नाही. शरीफ कॉलनी आणि किराडपुरा येथील काही घरे या रस्त्यामध्ये बाधीत होत आहेत. बाधीत होणाऱ्या मालमत्ता धारकांनी बाजार भावाप्रमाणे

(शासनाच्या) मोबदला देऊन जमीन संपादन करण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच लवकरात लवकर जमीन संपादीत करावी. याकरीत अर्ज देखील दिलेले आहेत.

करीता, रोशनगेट ते मौलाना आझाद चौक पर्यंतचा रस्ता त्वरील रुंद करण्यात यावा. तसेच या रस्त्याच्या मधोमध रस्ता दुभाजकाचे काम करण्यात यावे.

सूचक श्री शेख इसाक शेख जैन
अनुमोदक श्री सुरजीतसिंग खुंगर.

**ठराव क्र. ५१/१० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट ते मौलाना आझाद चौक पर्यंतचा रस्ता रुंद करण्याच्या दृष्टीने रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या शरीफ कॉलनी किराडपुरा येथील मालमत्ता धारकांना शासनाच्या नियमाने मोबदला देऊन जमीन संपादन करण्यास व दुभाजकाचे काम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/११ :**

प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी संपूर्ण प्रभागासाठी एकही आरोग्य केंद्र नाही. त्यामुळे तेथील रहिवाश्यांची गैरसोय होत आहे. सदरील विभागात मध्यमवर्गीय लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळे खाजगी रुग्णालयात आजारांवर उपचार घेणे परवडत नाही.

संपूर्ण प्रभागासाठी कांचनवाडी विभागात एक आरोग्य केंद्राची निर्मिती करण्यात आली.

सूचक श्री नंदकुमार घोडले
अनुमोदक श्री अंबादास दानवे, श्री सुदाम सोनवणे,
श्री आनंद तांदुळवाडीकर, श्री रतनकुमार पंडगळे,
श्री वसंत नरवडे पाटील.

दिनांक ६/६/२०००

**संवाद**

**श्री स. अली मिरा सलामी** माझ्या वार्डात आरोग्य केंद्र होण्याबाबत प्रस्ताव ३ वर्षा पासून दिला कार्यवाही केली नाही.

**मा. महापौर** आपण प्रस्ताव ठेवावा. मंजूर करण्यात येईल, हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ५२/११ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी येथील नागरिकांना आजारावर उपचार घेणेचे दृष्टीकोनातून संपूर्ण प्रभागासाठी कांचनवाडी विभागात एक आरोग्य केंद्राची निर्मिती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहागंज येथील भाजी बाजार व पुर्वीचे आठवडा बाजार भरत होता. त्या जागेच्या मालकी बाबत पुर्वी या जागेवर "अठोले बाग" असे संबोधण्यात येत होते. सदरील मिळकतीचे मालक श्री मयत महाराजा किशन प्रसाद हैद्रबाद

"१३५३ फसली" मध्ये नगरपरिषदेस (पुर्वीच्या लोकल फंडला) ९९ वर्षाच्या कराराने रक्कम रुपये १५०/- प्रति वर्षाप्रमाणे लिज डीडवर दिली होती. तथापी सन १९५३ मध्ये नगरपरिषदेने सदरील कराराचे उल्लघंन करुन उपरोक्त जागेवर प्लॅट्स पाडून वेगवेगळया लोकांना जाहीर लिलावाद्वारे विकले असून, या बाबत नगर परिषदेने वादीची कोणतीही परवानगी घेतलेली नाही किंवा माहिती दिलेली नाही.

वरील जागेचा नगर भूमापन क्र. १०,२६८ व १०,२७२ आहे. सदरील जागेबाबत संबंधित जागेचे मालक व महानगरपालिकेची दिनांक २४/११/१९९५ रोजी बैठकही झालेली आहे. तरी या प्रकरणी सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करुन, जागेचे मालक/मूख्यार आम यांना बोलून चर्चा करावी व जागा संपादन करणे बाबत निर्णय घेण्यात येणे बाबत कार्यवाही करण्यात यावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री सुदाम पाटील सोनवणे
अनुमोदक श्री भगवान घडामोडे
दि. /८/२०००

**श्री तकीहसन खान** या जागे बाबत महाराजा किशन प्रसाद व महानगरपालिका यांचे भांडण चालू असून आम्ही कोणाचे एजेन्ट नाही.

**श्री सुदाम सोनवणे** संबंधितास बोलावून त्यांचेशी चर्चा करुन निगोशिएशन करावे. काही तरी निर्णय होईल.

**श्री अफसरखान** ज्याची जागा आहे ते सद्यःस्थितीत जिवंत नाही या जागेचे मालक कुणीच नाही.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा** महाराजा किशन प्रसाद यांच्या शहरामध्ये बऱ्याच प्रॉपर्टी असून दुसरेच लोकांनी तया बळकावून घेतल्या आहे. त्यात असेच होत आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** ज्यांची जागा आहे ती मिळविण्यासाठी संबंधित न्यायालयात जातील खरी काय परिस्थिती आहे. ती दाखविील कागदपत्रे दाखवितील त्यानुसार कोर्ट निर्णय देईल. महानगरपालिकाच्या अनेक जागेवर लोकांनी स्वतः हक्क प्रस्तावीत केले व कुणास ही तडजोडीसाठी बोलावले नाही. सर्वांना न्यायालयाचे दार उघड आहे. उदया कुणीही प्रस्ताव घेऊन येईल कुणीही सांगेल ही जागा माझी आहे. ठराव मंजूर करणार काय? ठराव रद्द करावा.

**श्री सुदाम सोनवणे** चर्चेस बोलावे असे माझे म्हणणे आहे. प्रस्तावात नाव टाकले नाही. न्याया मिळत नाही. म्हणून वाटाघाटीने लवकर निर्णय होऊ शकेल. या अगोदर महानगरपालिकाचे अधिकारी यांचे समावेत एक बैठक झालेली आहे.

**श्री तकीहसन खान** जागेचे मालक जिवंत नाही. कुणी बोलणी करावयास आल्यावर बोलणी करु असा निर्णय घ्यावा.

**श्री अफसरखान** जागा ज्याची असेल त्यांनी कोर्टात जावे. न्यायालयात झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावी.

**श्री सुदाम सोनवणे** महानगरपालिकेच्या विरोधात दावा चालू आहे. प्रकरण निकाली निघावे म्हणून प्रस्ताव ठेवला आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** या प्रकरणात महानगरपालिकेचा काय फायदा, खुलासा करावा.

**श्री शे. इसाक जैनोद्दीन शेख** या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्दयावर खुलासा करावा.

१. १३५३ ला "फसली लोकल फंडने" करारनामा कुणाकडून करुन घेतला.

२. करारनाम्याच्या अटी काय होत्या, करारनाम्याची प्रत कोठे आहे.

३. नगर भूमापन क्र. १०२६८ व १०२७२ चे या जमिनीचे एकूण क्षेत्रफळ किती एकर आहे.

४. मुळ मालकाने १९५३ पासून या प्रकरणाचा पाठपुरावा का केला नाही.

५. नगरभूमापन कार्यालयात महानगरपालिकेच्या नावाने नामांतर करण्यात आले तेव्हा आक्षेप का घेण्यात आले नाही.

६. २४/११/१९९५ रोजी झालेल्या बैठकीची माहिती दयावी.

७. हैद्रबादहून कित्येक लोक जी.पी.ए. घेऊन येतात. कोणते जी. पी. ए. अधिकृत आहे.

८. जी. पी. ए. घेणारा व देणारे कोण?

९. महानगरपालिकाने सदरची भाडयाची रक्कम कुणास दिली.

१०. विधी सल्लगार यांचेकडून सल्ला घेण्यात यावा.

११. सदरचा प्रस्ताव अशासकीय असल्याने रद्द करावा किंवा स्थगित ठेवावा.

**श्री अंबादास दानवे** या प्रस्तावासंबंधी सर्व कायदेशीर बाबी बघून निर्णय व्हावा. संबंधित मालकाकडे सर्व कागदपत्रे आहेत काय? न्यायालयाचा निर्णय कधी लागणार व महानगरपालिकेला कायदेशीरदृष्टया या प्रकरणामध्ये काय करता येईल या सर्व बाबीचा विचार करुन निर्णय घ्यावा.

**श्री काशीनाथ कोकाटे** या जागेचा मुळ मालक कोण? या संदर्भात त्या मालकाला जागेची गरज पाहिजे. गरज म्हणून त्यांनी महानगरपालिकाकडे तसा अर्ज केलेला होता काय? याची माहिती दयावी व शहरामध्ये संबंधित मुळ मालक यांनी जागा इतराच्या नावांवर जहागीरदारी, सालाबाद प्रमाणे केलेलया असतांना ठरावात त्यांचे नांव न दाखविता, मुळ मालकाचे नांव दाखवून व प्रस्तावाबाबत काही सविस्तर माहिती नसतांना प्रस्ताव ठेवला. तो प्रस्ताव होऊ शकत नाही.

**श्री तकीहसन खान** हा प्रस्ताव कुणाच्या वतीने आला. यास जबाबदार कोण मुळ मालक जिवंत की मयत याची माहिती दयावी.

**मा. महापौर** हा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येतो.

**श्री स. अली मिरा सलामी** आपणाकडे मुळ मालकाचा कसल्याही प्रकारचा अर्ज दाखल नसतांना असे प्रस्ताव ठेवणे. योग्य नाही स्थगित न ठेवता, रद्द करावा.

**श्री भगवान घडामोडे** हा प्रस्ताव स्थगित ठेऊन या प्रकारणाचे मुळ मालक आहे किंवा याची सविस्तर माहिती सभागृहाला देण्यात यावी.

**ठराव क्र. ५३/१२ :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ५४/१ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ४१ मधील नागरी सुविधासाठी लायब्ररी, शादीखाना, पाण्याची टाकी बांधणे व दवाखाना बांधण्यात यावे, मो. आरेफ कॉलनी येथे मनपा व आरेफ हाऊसिंग सोसायटीची मोकळी जागेत लायब्ररी व शादीखाना बांधण्यात यावा, तसेच मो. आसेफिया कॉलनी हे स्लम विभागात असल्याने येथे एक नागरिकांच्या आरोग्याची हित लक्षात घेता, वैद्यकीय रुग्णालय बांधण्यात यावे.

तसेच वार्ड क्र. ४१ हा शहराच्या उंचीचा ठिकाण असल्यामुळे पाणी पुरवठा कमी दाबाने होतो, या करीता माझ्या वार्डात एक पाण्याची टाकी बांधण्यात यावे. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव.

सूचक श्री नासेरखान (बब्बु)
अनुमोदक श्री काशीनाथ कोकाटे, श्री स. मुमताज अली, श्री आनंद तांदुळवाडीकर
दि. १३/६/२०००.

**मा. महापौर** : या प्रस्तावाबाबत कायदेशीर बाबी बघून कार्यवाही करावी मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ५४/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४१ मध्ये लायब्ररी, शादीखाना, पाण्याची टाकी व दवाखाना बांधणेसाठी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/१ :**

हिपाटायटीस-बी (कावीळ-बी) या घातक रोगा महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना कायमची मुप्त व्हावी, यासाठी महावीर इंटरनॅशनल औरंगाबाद यांच्या मदतीने सवलतीच्या दरात (४० रु. फक्त) कावीळ प्रतिबंधक लसची सोय उपलब्ध करुन कावीळ मुक्त औरंगाबाद कार्यक्रमात सहभागी व्हावे. करीता, हा प्रस्ताव.

सूचक सौ. साधना गणेश सुरडकर
अनुमोदक श्रीमती जयश्री किवळेकर, सौ जयश्री कुलकर्णी
दि. १७/७/२०००.

**श्री स. अली मिरा सलामी** लसीकरण आवश्यक आहे. प्रस्तावात एकाच नावाचा उल्लेख केला. लायन्स क्लब विनामुल्य लसीकरण करुन देते. त्याची मागणी करावी माझ्याकडे ट्रस्ट आहे ते ३८ रुपयाने देते. ३८ ने घेणार की, ४०/- रुपयाने.

**श्री प्रकाश निकाळजे** शहरात बऱ्याच संस्था आहे. त्यांचेकडून कमी दराने लसीकरण करुन घ्यावे. शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या पाहता प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे खूप खर्च येईल व महानगरपालिकेला परवडणारे नाही.

**श्री जगदीश सिध्द** प्रस्तावात नमुद केलेल्या लसीची बाजारातील किंमत प्रती डोस १० वर्षा खालील मुलासाठी ८० ते १५० रु. किमंत आहे. तोच डोस ४० रु. मध्ये ठेवलेला असून, प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी.

**श्री भगवान घडोमोडे** हा ठराव मंजूर करावा जो कुणी विना मुल्य किंवा कमी दराने लसीकरण करुन देण्यास तयार असेल तसा निर्णय घ्यावा.

**श्री प्रकाश निकाळजे** मी माहिती घेतली एक वेळेस दयावयाचे नसून, ३ वेळेस डोस दयावयाचे आहे. महानगरपालिकेला ते परवडणारे नाही आणि कावीळ निर्मुलन १००% करावे सभागृहाचा विचार घेऊन निर्णय घ्यावा. एखादी संस्था विनामुल्य सेवा करीत असेल तर मागणी करावी.

**मा. महापौर** लसीकरण करावयाचे झाल्यास साधारणतः ३३ हजार विदयार्थी असून, एका विदयार्थ्याला ३ डोस म्हणजेस ४०x३=१२० हा प्रत्येक विदयार्थ्यासाठी खर्च

होईल. विदयार्थ्याच्या संख्येचा विचार करुन नेमकी कोणती शाळा लसीकरणसाठी निवडणार व खर्चाचा बोजा जास्त होईल. म्हणून सध्या हा प्रस्ताव स्थगीत ठेवण्या येत असून, एखादी संस्था (फ्रि) विनामुल्य कावीळ लसीकरण करु देत असेल तर, त्या संस्थचे आपण अभिनंदन करुन सत्कार करु या बाबत अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**ठराव क्र. ५५/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिपोटायटीस-ब (कावीळ-बी) चे प्रतिबंध लसीकरणाची महानगरपालिकेवर जास्त आर्थीक बोजा पडणार असल्याने हा प्रस्ताव तूर्त स्थगीत ठेवण्यात येतो. तथापी संस्था विनामुल्य लसीकरणाची सोय उपलब्ध करुन देत असेल, तर महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांना त्याचा लाभ घेण्यास व अशा संस्थेचे अभिनंद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/१५ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ४१ येथे अस्तित्वात असलेली खाम नदीवर रिटेनिंग वाल बांधण्यात यावे. या करीता मी स्वत: (नासेरखान नगरसेवक) सन १९९१ पासून अनेक अर्ज देऊन पाठपुरवा करीत असून, गेल्या पावसाळयात मा. महानगरपालिका आयुक्त, मा. पोलीस आयुक्त, मा. जिल्हाधिकारी यांनी अनेक वेळा पाहणी केलेली आहे.

करीता, वार्डातील नागरिकांचे हित व संरक्षण करीता, खाम नदीवर रिटेनिंग वॉल बांधणे जरुरीचे आहे. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर. गेल्या तीन वर्षापासून पावसाच्या पाण्यामुळे आरेफ कॉलनीच्या लोकांचे घरे पावसामूळे वाहून जातात. त्याची जिंवीत व वित्त हानी होऊ नये. म्हणून संरक्षण भिंत बांधणे जरुरी आहे.

सूचक श्री नासेरखान (बब्बु)
अनुमोदक श्री मिराहिदायत अली, श्री संजय सिरसाठ
दि. १३/६/२०००.

**संवाद**

**श्री अंबादास दानवे** आजूबाजूला वसाहत आहे. असे नमुद केले. ही अनाधिकृत वसाहत आहे काय? हे सुध्दा पाहणे जरुरी आहे व नदीवर रिटेनिंग वाल बांधता येत का? याचा तपास घ्यावा.

**श्री अफसरखान** या अगोदर नदीवर अशा प्रकारची कामे झालेली आहे. बस स्टॅण्ड जवळील नदीवर रिटेनिंग वाल केलेली आहे. त्याप्रमाणे हे काम करावे.

**श्री गणेश तांबे** शहराच्या विकास कामावर पैसा खर्च करावा. काम करता येत असेल, तर कार्यवाही व्हावी. प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)** सदरील वस्ती खांम नदीच्या काठावर असून, या खाम नदीवर रिटेनिंग वाल बांधणे हे तांत्रिक दृष्टया संयुक्तीक नाही. नागरीकांच्या संरक्षणार्थ दुसरी व्यवस्था करण्यात येईल.

**श्री स. अली मिरा सलामी** खाम नदी कोठून कुठ पर्यंत येते. याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.)** खाम नदी जटवाडयाहून निघून या वसाहतीपासून ५०० ते ६०० मीटर दूर वर हर्सूल डॅम आहे. हीच नदी डॅम पासून आरेफ कॉलनी, मकई गेट पाणचक्की बनेवाडी मार्गेपुढे वाळूज जाते.

**श्री स.अली मिरा सलामी** मकईगेट बारापुल्ला पर्यंत रिटेनींग वाल केले. त्यापुढील भागात बऱ्याच वेळा लोकांच्या घरात पाणी गेले. पाहणी करण्यात आली जे बांधण्यात आले. त्यावेळेस अधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचण दाखविली नाही.. योग्य खुलासा व्हावा.

**श्री गणेश तांबे** गेल्या २० वर्षात या नदीला किती वेळेस पाणी आले, पाणीच नसेल तर रिटेनिंग वाल कशासाठी पाहिजे. भावसिंगपूरा येथे ही रिटेनींग वाल बांधण्याची आवश्यकता नसतांना जवळपास १ कोटी रुपये खर्च केले. हाच पैसा इतर विकास कामासाठी खर्च व्हावयास पाहिजे होता. अनावश्यक खर्च झाला आहे. यापुढे रिटेनिंग वाल कुठेही बांधु नये. जेथे करावयाचे तेथील जागेचा सर्व्हे करावा पाणी येते की, नाही. तपासणी करावी नंतर नियमाने कार्यवाही व्हावी.

**श्री स. अली मिरा सलामी** ३ वर्षाचे पेपर देतो. लोकांच्या घरात पाणी शिरते याची त्यांना माहिती नाही. ज्या ठिकाणी आवश्यकता नव्हती तेथे बांधण्यात येते व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तेथे अधिकारी तांत्रिक अडचणी दाखवितात हे बरोबर नाही.

**श्री भगवान घडामोडे** लोकांच्या घरात पाणी जाते. म्हणून रिटेनींग वालचे बांधकाम करण्यात येते. तेथील राहणारे लोक पुढे पुढे येऊन अतिक्रमण करतात व नाला अरुंद होता व पुन्हा महानगरपालिकेच्या नावाने ओरडण्यात येते. असे प्रस्ताव येऊन चुकीचा पायंडा पडत असून, खरोखरच घरात पाणी जाते काय, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. आवश्यकता असेल तर तशी कार्यवाही करण्यात यावी.

**श्री काशीनाथ कोकाटे** अधिकारी यांनी खुलासा केला. तांत्रिकदृष्टया करु शकत नाही. परंतु या अगोदर याच नदीवर ४० ते ५० लाख रुपयाचे काम केले आहे. १९९४ यावर्षी पावसाच्या पाण्याच्या मोठया प्रमाणात नागरिकास त्रास झाला. मा. जिल्हाधिकारी मा. आयुक्त माननीय विभागीय आयुक्त जवळ पास १५ दिवस तळ ठोकून होते. निसर्ग कधी काम करेल सांगता येत नाही. नागरिकांच्या संरक्षणासाठी शक्य होईल त्या दृष्टीकोनातून तेथील स्थळ पाहणी करुन तत्वतः मान्यता दयावी.

**श्री प्रकाश निकाळजे** शहरातील मोकळया जागेवर मग ती जागा नदी नाल्याच्या काठावर असली तरी गरीब लोकांनी घरे केलेली आहे. त्यामुळे नदीचे रुपांतरे आता नाल्यात होऊ लागेल व पावसाचे पाण्याने अशा जागेवर घरे बांधून राहणाऱ्यांना धोका निर्माण होतो व अशा वेळी त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. या ठिकाणी बऱ्याच स. सदस्यांनी आपआपल्या भावना प्रगट केल्या. प्रतिष्ठेचा प्रश्न न करता, उपआयुक्त यांच्या सोबत ४ स. सदस्यांची कमीटी करुन पाहणी करावी व पुढील कार्यवाही करावी.

**मा. महापौर** या ठिकाणी रिटेंनिंग वालची खरोखरच आवश्यकता आहे का? यासाठी सदर ठिकाणी स्थळ पाहणीसाठी कार्यकारी अभियंता (पा.पु.) उपआयुक्त (म.) तसेच अति शहर अभियंता हे तीन अधिकारी राहतील व स. सदस्यांपैकी

संबंधित वार्डाचे नगरसेवक व विरोधी पक्षनेता स. स. प्रकाश निकाळजे स. स. श्री तांबे तसेच भगवान घडामोडे व सभागृहनेता श्री. दानवे यांनी पाहणी करुन अहवाल दयावा. त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**ठराव क्र. ५६/१५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वार्ड क्र. ४१ मध्ये खाम नदीवर रिटेनिंग वाल बांधण्यासाठी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यासाठी उपआयुक्त (म.), कार्यकारी अभियंता (पा.पू.), अति शहर अभियंता तसेच विरोधी पक्ष नेता, स. स. प्रकाश निकाळजे व श्री. तांबे व सभागृह नेता तसेच संबंधित वार्डाचे नगरसेवक या सर्वांची कमिटी स्थळ पाहणीसाठी नेमण्यात येते व स्थळ पाहणी झाल्यानंतरच या संबंधात पुढील कार्यवाही करता येईल. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७/१६ :**

महानगरपालिका औरंगाबाद क्षेत्रातील कित्येक भूखंड, महानगरपालिकेने आरक्षीत झोनमधून तसेच विविध रेखांकने मंजूर करतांना संपादित केलेले आहेत. कित्येक भूखंडाचे औरंगाबाद महानगरपालिकेने खरेदीखत देखील करुन घेतले आहे. तसेच करारनाम्या आधारे देखील भूखंड संपादीत करण्यात आलेले आहेत. परंतु नगर भूमापन कार्यालयामध्ये अदयापही या भूखंडाचे नामांतर महानगरपालिकेच्या नावांर करण्यात आलेले नाही. महानगरपालिकेने जमीन संपादीत केली असली तरीही नगर भूमापन कार्यालयात मुळ मालकाचेच नाव आहे. त्यामुळे मुळ मालक नगर भूमापन कार्यालयातील नोंदीचा गैरफायदा उचलीत आहे. करीता औरंगाबाद महानगरपालिकाने संपादीत केलेल्या भूखंडावर, मंजूर रेखांकनामधील खुल्या जागांवर, रस्त्यामध्ये बाधीत झालेल्या भूखंडावर औरंगाबाद महानगरपालिका असे नामांतर नगर भूमापन कार्यालयात करावे.

सूचक श्री शे. इसाक शे. जैनोद्दीन
अनुमोदक श्री सुरजीतसिंह खुंगर
दि. ३/६/२०००.

**संवाद**

**मा. महापौर** हा प्रस्ताव महानगरपालिकेच्या फायदयाचा असून चांगला प्रस्ताव स. सदस्य यांनी ठेवला आहे. या प्रस्तावाचे सूचक व अनुमोदक यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करतो. अशा महानगरपालिकेच्या मालकीच्या किती जागा आहे. जेथे जागा असतील, सभागृहाला तशी माहिती दयावी. जेणे करुन महानगरपालिकेला त्या जागा हस्तांतरण करुन घेता येईल.

**श्री शे. इसाक शे. जैनोद्दीन** सभागृहातर्फे अभिनंदन केल्या बद्दल मी अत्यंत आभारी आहे.

**श्री अंबादास दानवे** चांगल्या पध्द्तीने प्रस्ताव मांडलेला असून, दोन्ही स. सदस्य जे सुचक व अनुमोदक आहेत. त्याचे टाळया वाजून अभिनंदन करावे (याचवेळी टाळयाचा आवाज येतो) ठराव फार उशीरा आलेला असून, या अगोदरच आला असता, तर योग्यच झाले असते. या अगोदर ठराव का करण्यात आला नाही हा ठराव स. सदस्यांनी आणला तो मांडावा लागला. जागा नावांवर करण्या संदर्भात १९८७ ला वृत्तपत्रात जाहीर प्रगटन करण्यात आले होते. आज २००० साल चालू असून यास जवळ जवळ १५ वर्ष झाले.

प्रशासनाने का कार्यवाही केली नाही. शहरातील कित्येक कॉलनी, आजही मुळ मालाकाच्याच नावावर असून महानगरपालिकेच्या नावावर का करण्यात आले नाही खुलासा करावा.

**मा. महापौर** प्रस्तावानुसार अशा जागा किती आहे. मालमत्ता अधिकारी नगररचना विभागचे अधिकारी यांनी सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत दयावी. महानगरपालिकेच्या जागेवर किती अतिक्रमणे झालेली आहेत. तसेच कोर्टात किती केसेस याची सविस्तर माहिती संबंधित दोन्ही विभागाचे अधिकरी यांनी पुढील बैठकीत दयावी.

**श्री. स. अली मिरा सलामी** महानगरपालिकने ॲक्वायर केलेल्या जागेवर बांधकामे चालू आहे ते थांबवावेत परवानगी दिलेली आहे काय?

**श्री काशीनाथ कोकाटे** एक जागेवर बांधकाम चालू असून, निवेदन प्राप्त आहे. नागरिक या संबंधी मा. आयुक्त यांना भेटण्यास गेले निवेदन दिले. काम थांबत नाही. निवेदन दिल्या नंतरही अतिक्रमण करुन बांधकाम होत असेल तर कोणत्या मार्गाने महानगरपालिकेच्या जागा ताब्यात घेण्यार व घेता येतील का?

**मा. महापौर** प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. सध्या त्या ठिकाणी काम चालू आहे काय बंद आहे. खुलासा करावा. निवेदन केल्यानंरत काय कार्यवाही केली.

**श्री जयवंत ओक** निर्णय घेतांना सदरील जागा आपल्या मालकीची आहे का हे बघावे. बांधकाम परवानगी कशी दिली जाते. तक्रार करतांना नियमाने करावी. माहिती नसतांना तक्रार करुन सभागृहाची दिशाभूल करु नये. बांधकाम परवानगी कशी दिली. निवेदन दिले त्यावर तेथीलच जनतेच्या सहया आहे का? ते पहावे बोगस सहया आणून कुणी ही म्हणेल आमची जागा योग्य नाही. खुलासा करावा. महानगरपालिकेच्या व्यक्तीची ती जागा असून परवानगी दिली आहे.

**श्री स. अली मिरा सलामी** दिलेल्या निवेदनात प्रतिष्ठित व्यक्ती डॉक्टर इंजिनिअर, स्वातंत्र्य सैनिक व सिल्लोडचे माजी आमदार यांचे सहया आहेत.

**मा. महापौर** प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. निवेदन दिल्यानंतर प्रशासनाच्या वतीने काय कार्यवाही केली.

**प्रशासकीय अधिकारी** मी आज रोजी स्थळ पाहणी केली सि. स. न. २९८१ वर नगररचना विभागाने बांधकाम परवानगी दिली. त्याची मुदत २१/३/२००० पर्यंत होती व पुढील नुतनीकरण न केल्याने सदरील बांधकाम सध्या थांबविले आहे.

**श्री अफसरखान** सदर जागा महानगरपालिकचे मालकीची खुली जागा आहे. त्या संदर्भात हायकोर्टामध्ये केसेस ही चालू होती. या जागेवर परवानगी कुणी व केव्हा दिली त्या अधिकाऱ्यांना निलंबीत करावे. न्यायालयात चुकीच्या पध्दतीने कागदपत्र बनवून दिलेली आहे असे दिसते. कोणाच्या सांगण्यावरुन परवानगी दिली खुलासा करावा.

**श्री जयवंत ओक** --- चुकीची माहिती सभागृहात पुरवितात. बोगस सहयाचे निवेदन देतात (याचवेळी स. सदस्य यांनी मुळ मालकाचे जागेचा परवाना दाखवितात. बांधकाम परवानगी कागदपत्र सभागृहात दाखवितात.)

**श्री अफसरखान** स. सदस्यांनी---- शब्द वापरला तो त्यांनी मागे घ्यावा. (याच वेळी बरेच स. सदस्य शब्द मागे घेण्यासाठी मा. महपौर यांचे डायस जवळ जाऊन मोठमोठयाने बोलतात व स. सदस्य अफसरखान यांनी राजदंड वर हाताने

मारतांना दिसून येते. सभागृहात मोठमोठयाने बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

**मा. महापौर** स. सदस्य श्री (बंडू) जयवंत ओक यांनी --- शब्द बोललेला मागे घ्यावा व स. सदस्य श्री अफसरखान यांनी राजदंडावर मारले बद्दल सभागृहात दिलगीरी व्यक्त करावी व साला शब्द इतिवृत्तातून वगळावा.

**श्री जयवंत ओक** आताच दोन स. सदस्यांनी चांगल्या प्रकारे प्रस्ताव ठेवला म्हणून, अभिनंदन केले कोणताही निर्णय घेतांना ती जागा महानगरपालिकेची आहे का? ती जागा फिरोजखान नलीनी बन्सीले यांच्या मालकीची असून, बांधकाम परवानगी दिलेली आहे. जर हे चुकीचे वाटत असेल तर मी बोललेले शब्द मागे घेतो.

**श्री अफसरखान** मा. महापौर यांनी आदेश केल्यानुसार मी दिलगीरी व्यक्त करतो.

**मा. महापौर** आता या विषयावर चर्चा करु नये. हा ठराव मंजूर करण्यात येतो. सदरील ठिकाणी नुतणीकरण नसल्याने प्र. प्रशासकीय अधिकारी यांनी बांधकाम थांबविले आणि ते थांबवावेच ते चालू होऊ देऊ नये. याची खबरदारी घ्यावी व नगररचना विभागाने ती जागा ओपन स्पेस होती काय? परवानगी कशी दिली याची माहिती पुढील बैठकीत दयावी.

**श्री स. अली मिरा सलामी** झोन क्र. २ मध्ये पान क्र. ५३ वर सदरील जागा महानगरपालिकेची आहे. नोंद आहे. रजिस्टर मागवावे.

**मा. महापौर** सदरचे बांधकाम थांबवूनच ठेऊन व झोन क्र. २ चे सदरील जागेची नोंद असलेले रजिस्टर पुढील बैठकीत सादर करावे. जर महानगरपालिकाची जागा असेल तर, बांधकाम बंद राहील. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. ५७/१६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महनगरपालिकेने विविध कारणासाठी मंजूर विकास योजनेतील व मंजूर विकास योजने व्यतिरिक्त लोकोपयोगी कामासाठी जमिनी संपादन केलेल्या आहे. तसेच रेखांकनातील खुल्या जागा महानगरपालिकेच्या असतात या सर्व संपादित केलेल्या जागावर व महानगरपालकामध्ये विहीत होणाऱ्या सर्व जागावर महसुल अभिलेखातील मालकी हक्क रकान्यात महानगरपालिकेचे नांव नोंदविण्याची कार्यवाही नगर भूमापन कार्यालय व तहसील कार्यालयात महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८/१७ :**

वार्ड क्र. १७ मो. काबरानगर येथे महानगरपालिकाची ओपन स्पेसमध्ये आरोग्य केंद्र उभारण्याकरीता फार मोठी जागा उपलब्ध आहे. सदरील वार्डात कोठेही महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र नाही. नागरिकांच्या सोय सुविधासाठी सदरील ठिकाणी वीस खाटाचा आरोग्य केंद्र बांधून त्वरीत सुरु करण्यात यावे. तसेच माझ्या वार्डात मा. गारखेडा येथील कब्रस्तानाला संरक्षण भिंत बांधून त्यावर तार कुंपन करण्यात यावे व त्यामध्ये एक वाचमन रुम, पाण्याचा हप्सा व टिन शेड बांधण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री शे. शकील बुढण पटेल
अनुमोदक श्री कोकाटे काशीनाथ हरीभाऊ

श्री नासेर खान कुरैशी
दि. ३/६/२०००.

**ठराव क्र. ५८/१७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १७ मो. काबरानगर येथे आरोग्य केंद्र उभारण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच मो. गारखेडा येथील कब्रस्तनला संरक्षण भिंत बांधणे व त्यावर तार कुंपन करण्यास तसेच या ठिकाणी वाचमन रुम व पाण्याचा हप्साव टीम रोड करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिका कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/१८ :**

प्रस्तावात सादर करते की, जळगाव टि-पॉईंट सिडको बसस्टँड जवळ कै. वसंतरावजी नाईक यांचा पुतळा उभारावा अनेक नागरिकांच्या निवेदन आपणांस प्राप्त झाले आहेत व ते हरीत क्रांतीचे प्रणेते आहेत. तरी हा पुतळा उभारण्याचा ठराव घेण्यात यावा.

सूचक श्री काशीनाथ कोकाटे, श्रीमती जयश्री किवळेकर
सौ जयश्री कुलकर्णी, श्री प्रशांत देसरडा
श्री भाऊसाहेब वाघ
श्री वसंत नरवडे पा.,श्री अंबादास दानवे

अनुमोदक श्री अश्रफ मोतीवाला, सौ साधना सुरडकर
सौ विजया रहाटकर, श्रीमती आशाताई बिनवडे
श्री साहेबराव कवडे, श्री गणेश तांबे
श्री स. अली मिरा सलामी

**संवाद**

**नगरसचिव** विषय पत्रिकेवर दिलेला या प्रस्तावातील नावे वगळता अशाच प्रकारचा एक प्रस्ताव सादर झालेला असून, त्याचे सूचक श्री काशीनाथ कोकाटे तर अनुमोदक म्हणून स. स. अश्रफ मोतीवाल व स. अंबादास दानवे आहेत व एकाच स्वरुपाचा प्रस्ताव असल्याने मुळे प्रस्तावात सूचक व अनुमोदक म्हणून त्यांचे नांव टाकणे योग्य राहील.

**मा. महापौर** : दुरुस्तीसह ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र.५९/१८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जळगांव टी पॉईंट सिडको बसस्टॅण्ड जवळ कै "वसंतरावजी नाईक" याचा पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६०/१९ :**

श्री मकरंद व्यकंटेश काटे हे बेगमपूरा येथील रहिवासी असून, त्यांच्या दोन्ही किडन्या खराब झाल्या आहेत. त्यांच्यावर धुत हॉस्पिटल येथे किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करावयाची असून त्यासाठी २,५०,०००/- रु खर्च येणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. त्यामुळे ते एवढा खर्च करणेस असमर्थ आहे. त्यांनी नगरसेवक स्वेच्छा निधीमधून आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केली आहे.

त्यांची अत्यंत हालाखीची परिस्थिती विचारात घेता, त्यांना किडनी प्रत्यारोपणाकरीता, वैद्यकीय उपचाराकरीता स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून प्रत्येकी रक्कम रु. १०००/- प्रमाणे २५,०००/- रु. विशेष बाब म्हणून मंजूर करणेस प्रस्ताव विचारार्थ सादर.

सूचक सौ विजया किशोर रहाटकर
अनुमोदक सौ जयश्री किवळेकर, सौ साधना सुरडकर, सौ जयश्री कुलकर्णी

**ठराव क्र. ६०/१९** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री मकरंद व्यकंटेश काटे हे बेगमपूरा येथील रहिवासी असून, त्यांच्या दोन्ही किडन्या खराब झाल्या आहेत. त्यांच्यावर धुत हॉस्पिटल येथे किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करावयाची असून, त्यासाठी २,५०,०००/- रु खर्च येणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. ते एवढा खर्च करणेस असमर्थ आहे. त्यांनी नगरसेवक स्वेच्छा निधीमधून आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती केली आहे.

त्यांची अत्यंत हालाखीची परिस्थिती विचारात घेता, त्यांना किडनी प्रत्यारोपणाकरीता, वैद्यकीय उपचाराकरीता नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून प्रत्येकी रक्कम रु. १०००/- प्रमाणे २५,०००/- रु. विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याते येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१/२०:**

बेगमपुरा येथील संत श्री. आसाराम बापू आश्रम परिसरात आश्रमाचे गेट ते आंब्याचे झाड असा १०० मीटर लांब व २० फुट रुंदीचा रस्ता ट्रस्टीच्या मालकीचा आहे. सदरील रस्ता अत्यंत खडबडीत झालेला आहे. या रस्त्याची संबंधित अभियंता यांचे समवेत पाहणी करण्यात आलेली आहे. त्यासाठी खडीकरण करणेचा खर्च अंदाजे ६०,०००/- रु. अपेक्षित आहे. हा खर्च मी माझ्या स्वेच्छानिधीमधून करावयास तयार आहे. रस्त्याचे खडीकरण करणेसाठी सर्वसाधारण सभेत ठराव पारीत करणे आवश्यक आहे. कारण रस्ता ट्रस्टीच्या मालकीचा आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यास ट्रस्टीचे तसे पत्र घेण्यात येईल.

करीता बेगमपुरा येथील संत श्री आसाराम बापू आश्रम परिसरात आश्रमाचे गेट ते आब्यांचे झाड (१०० मीटर लांब व २० फुट रुंद रस्ता) माझ्या स्वेच्छा निधीमधून खडीरकण करणेचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर
अनुमोदक सौ. साधना सुरडकर
श्री अंबादास दानवे.

**ठराव क्र. ६१/२० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा येथील संत श्री. आसाराम बापू आश्रम परिसरात आश्रमाचे गेट ते आंब्याचे झाडपर्यंत (१०० मीटर लांब व २० फुट रुंदी) ट्रस्टीच्या मालकीचा रस्ता स. नगरसेवक सौ. ताराबाई जेजूरकर यांच्या स्वेच्छा निधीतून खडीकरण करण्यास व त्यासाठी रक्कम रु. ६०,०००/- च्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२/२१ :**

प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी मधील कांचनवाडी गाव येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा अर्धाकृती पुतळा महानगरपालिकतर्फे उभारणे बाबत नागरिकांची मागणी आहे. तद्अनुषंगाने नागरिकांनी केलेली मागणी विचारात घेता, कांचनवाडी गाव येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा अर्धाकृती पुतळा उभारणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक श्री नंदकुमार राधाकिसन घोडेले
अनुमोदक श्री वसंत नरवडे पाटील, श्री सुदाम सोनवणे,
श्री अंबादास दानवे, श्री रतनकुमार पंडागळे.
दिनांक ६/६/२०००.

**मा. महापौर** हा प्रस्ताव कमीटीकडे पाठविण्यात येतो. असता, परत कमीटी मी जाहीर करत आहे. या कमीटीमध्ये ५ पदाधिकारी व सदस्य सचिव म्हणून अति. शहर अभियंता राहतील व ज्या वार्डातील प्रस्ताव असेल, ते स. सदस्य राहतील व मागच्या कमीटीमध्ये याच पध्दतीने नेमणूक केलेली होती.

**ठराव क्र. ६२/२१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात थोर पुरुषाचे पुतळे उभारण्यासाठी पाच पदाधिकारी, सदस्य सचिव म्हणून अति शहर अभियंता आणि ज्या प्रभागात पुतळा उभारण्यात येणार आहे. तया प्रभागाचे स. सभासद यांचा समावेश असलेली उप समिती नियुक्त करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३/२२ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत वार्ड क्र. ४१ येथील नागरिकांच्या सुविधासाठी वार्डात खालील ठिकाणी डांबरीकरण करणे जरुरीचे आहे. मोहल्ला आसेफिया कॉलनी, बऱ्हानिया कॉलनी, बिसमिल्ला कॉलनी, आरेफ कॉलनी, जलाल कॉलनी, अल-हिलाल कॉलनी सदरील ठिकाणी सुमारे पाच वर्षापासून डांबरीकरणाचे काम झालेले नसून, काही ठिकाणी असेलेले डांबरीकरणात खड्डे होत आहे. सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने वार्डात चिखल होऊन रहदारीस, वाहतुकीस फार त्रास होत आहे.

तसेच मो. जलाल कॉलनी व अल-हिलाल कॉलनी येथे पाणी पुरवठा कमी होत असल्याने, तेथे पाणी पुरवठा करणारी जास्त व्यासाची लाईन टाकण्यात यावे व ड्रेनेज लाईन नागरिकांच्या सोयी-सुविधा करण्याकरीता ड्रेनेज लाईन तात्काळ टाकण्यात यावे. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक श्री नासेरखान (बब्बु)
अनुमोदक श्री अंबादास दानवे, श्री शे. इसाक शे. जैनोद्यीन
दिनांक १३/६/२०००.

**ठराव क्र. ६३/२२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आसेफिया कॉलनी, बऱ्हानिया कॉलनी, बिसमिल्ला कॉलनी, आरेफ कॉलनी, जलाल कॉलनी, अल-हिलाल कॉलनी या ठिकाणी डांबरी रस्ता

करण्यास, तसेच जलाल कॉलनी व अलहिलाल कॉलनी येथे पाणी पुरवठा व ड्रेनेजची जास्त व्यासाठी पाईललाईन टाकण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/२३:**

प्रभाग मधील समर्थनगर भागात महापालिके मार्फत करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठा अनियमीत व अत्यंत कमी दाबाने होत असून, येथील रहिवाशांची पाण्या अभावी अत्यंत गैरसोय होत आहे. येथील रहिवाशांनी नियमित व उच्च दाबाने पाणी पुरवठा करणेस मागणी केली आहे. प्रभागातील सर्वही वसाहतीमध्ये पाण्याची तीव्र टंचाई विचारात घेता, समर्थ नगर येथील माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे मालकीची जलकुंभ उभारणेसाठी लागणारी जागा भूसंपादन करुन सदर जागेवर जलकुंभ उभारणेत यावा, जेणे करुन प्रभागातील सर्वही वसाहतीमध्ये नियमित व उच्च दाबाने पाणी पुरवठा करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक श्री अंबादास दानवे, श्री नंदकुमार घोडेले, श्री सलीम पटेल.
दिनांक १६/६/२०००.

**ठराव क्र. ६४/२३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर भागात नियमित व उच्च दाबाने पाणी पुरवठा करण्यासाठी माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे मालकीची जलकुंभ उभारण्यासाठी लागणारी जागा संपादन करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

*ऐनवेळेचे विषय*

**मा. महापौर** काही प्रस्ताव ऐनवेळी सादर झालेले आहे. त्यात रुग्णांना आर्थिक मदत देण्या संबंधीचे आहे. स्वेच्छा निधीतून सहाय्य करण्यास मंजूरी देण्यात येते. या प्रस्तावाची महानगरपालिकेच्या नियमावली प्रमाणे कार्यवाही करावी. ऐनवेळेचे प्रस्ताव मंजूरी करण्यात येते.

**विषय क्र. ६५/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सुलताना बी. करीम पठाण रा. गारखेडा परिसर यांना कॅन्सरच्या उपचारासाठी डॉ. जे. सी. पटेल के. ई.एम. हॉस्पीटल मुंबई-१२ येथे सुरु असून सदरील आजारास्तव रुपये ७०,०००/- सत्तर हजार खर्च अपेक्षीत आहे. संबंधितांनी आर्थिक परिस्थिती फार बिकट असून, इतका खर्च पेलू शकत नाही. त्यांना विशेष वैद्यकीय मदत म्हणून रु. ४०,०००/- चाळीस हजार रुपये आर्थिक मदत देण्यास मान्याता व्हावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री शे. शकील शे. बुढण पटेल
अनुमोदक श्री काशीनाथ कोकाटे

**ठराव क्र. ६५/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती सुलताना बी करीम पठाण, गारखेडा यांना कॅन्सरचे उपचारासाठी नगर सेवक स्वेच्छानिधीतून रक्कम रुपये ४०,०००/- ची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु. अनिता सोनार ही माझ्या वार्डातील रहिवासी असून, तीला "स्पीनल कार्ड टयुमर" हा आजार आहे. तरी नगरसेवक स्वेच्छा निधीतून रुपये २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. म्हणून प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री नंदकुमार घोडेले
अनुमोदक श्री अंबादास दानवे, श्री विकास जैन

**ठराव क्र. ६६/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु. अनिता सोनार हीला "स्पीनल कार्ड टयुमर" हा आजार झाला असून, औषधउपाचार करण्यासाठी नगरसेवकाच्या स्वेच्छा निधीमधून विशेष बाब म्हणून रुपये २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) आर्थिक सहाय्य देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. २५ उस्मानपुरा येथील गुरुद्वारामध्ये रात्रदिवस भावीकांची वर्दळ चालू असते. याशिवाय रात्री अपरात्री बाहेरगावचे भावीक या ठिकाणी येतात. अशा वेळी भावीकांचे सोईच्या दृष्टीने उस्मापुरा येथील गुरुद्वाराचे समोर पांढरा प्रकाश देणारी नवीन प्रकारची विद्युत रोशनाई करण्यात यावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री दलबीरसिंग जबींदा, श्री सुरजितसिंग खुंगर
अनुमोदक श्री भगत लकडे, श्री किशोर तुळशीबोगवाले,
श्री सलीम पटेल

**ठराव क्र. ६७/३:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २५ उस्मानपुरा येथील गुरुद्वारामध्ये भावीकांची रात्रंदिवस वर्दळ चालू असते. त्या दृष्टीने गुरुद्वाराचे समोर पांढरा प्रकाश देणारी नवीन प्रकारची विद्युत रोशनाई करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नक्षत्रवाडी प्रभागातील रहिवाशी श्री दत्तात्रय साहेबराव महानोर वय २० वर्षे हे दि. ८ जून २००० रोजी एका अपघातात गंभीर जखमी होवून, त्यांच्या पोटातील सर्व अवयव निकामी झाल्याचे मोठी शस्त्रक्रिया औरंगाबाद येथील शासकीय रुग्णालयात करण्यात आली. परंतु ती यशस्ती न झाल्याने शासकीय रुग्णालयाच्या

सल्याने त्यांना दि. १८ जुलैला मुंबई येथील "सायन" रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार चालू आहेत. श्री साहेबराव महानोर यांची परिस्थिती हालाखीची असल्याने व पुढील उपचार व शस्त्रक्रिया महागडी असल्याने, "सायन" रुग्णालय मुंबई यांचे पुढील औषधोपचाराचा खर्च अंदाजे रु. ५०,०००/- येणे अपेक्षित असल्याने, श्री दत्तात्रय साहेबराव महानोर मंजूर करण्यात यावा ही विनंती.

सुचक श्री नंदकुमार घोडेले, श्री अय्युबखॉ
अनुमोदक श्री अंबादास दानवे, श्री गाजी सादोद्दीन.

**ठराव क्र. ६८/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अपघात होऊन गंभीर जखमी झालेले नक्षत्रवाडी प्रभागातील रहिवाशी श्री दत्तात्रय साहेबराव महानोर यांना यांच्यावर तातडीची शस्त्रक्रिया करण्यासाठी मुंबई येथील सायन रुग्णालयात हलविण्यात आले असून, पुढील औषधोपचारासाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून ५०,०००/- रुपये आर्थिक सहाय्याक करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु. साफीया खातून पिता मजिद खान पठाण यांना ऱ्हदय रोगाच्या आजारासाठी डॉ. जी १,५०,०००/- एवढा खर्च येणार असून, पत्र दिलेले आहे. परंतु एवढी मोठी रक्कम खर्च करण्यास त्याची ऐफत नाही, म्हणून स. नगरसेवकांनी एकूण २८ पत्राद्वारे आर्थिक मदत देण्यासाठी रक्कम रुपये २८,०००/- अठ्ठावी स हजाराची स्वेच्छानिधीचे पत्र दिलेले आहे. तरी संबंधितांना नगरसेवक निधीतून रक्कम रुपये २८,०००/- अठ्ठावीस हजार मंजूरीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक श्री मीर हिदायत अली
अनुमोदक श्री अश्रफ मोतीवाला, श्री काशीनाथ कोकाटे,
श्री स. अली मिरा सलामी

**ठराव क्र. ६९/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु. साफिया खातून पिता मजिद खान पठाण यांना ऱ्हदय रोगाचा आजार असून, औषधोपचार करण्यासाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून विशेष बाब म्हणून २८,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *सभागृहातील चर्चा*

**मा. महापौर** आताच एक बंद पॉकीट प्राप्त झालेले आहे. ज्या संचिका सिल करण्यात आल्या होत्या, त्या संदर्भातील माहिती यामध्ये आहे. संचिका सिल करुन त्यावर पदाधिकारी व काही स. सदस्यांच्या सहया घेतलेल्या होत्या व त्यासंबंधी मा. आयुक्त यांना अहवाल मागविला होता तो प्राप्त झालेला आहे व हे बंद पॉकीट माझ्या (मा. महापौर) दालनात फोडणार असून ज्यावेळेस संचिका सिल केल्या व त्यावर त्यांच्या ज्यांच्या सहया आहेत. त्या सर्व समक्ष हे पॉकीट काढण्यात येईल. लवकरच त्यासंबंधी बैठक बोलविणार आहे. नंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री सुदाम सोनवणे** स. नगर सेवकांच्या निधी अनाधिकृत वस्त्यांमध्ये वापरण्याची परवानगी द्यावी.

**श्री भगवान घडामोडे** सिडको मध्ये देखील स्वेच्छा निधी वापरण्यात येईल.

**श्री प्रकाश निकाळजे** महानगरपालिकेच्या जागेवर विकासात्मक खर्च करता येईल. अशी मान्यता द्यावी.

**श्री स. अली मिरा सलामी** शहरामध्ये विदेशी नागरिकांना टपऱ्यासाठी जागा देण्यात आलेली आहे. त्यांना जागा देण्यास येथील जनतेचा विरोध होता व संबंधित लोकांनी भारत सरकारकडे जागा मिळविण्यासाठी सवलत मागविली व त्यानुसार सरकारने मान्यता दिल्यानुसार विदेशी लोकांना टपऱ्यासाठी जागा देण्यात आल्या व ६ महिन्याची परवानगी दिली व त्यानंतर त्यांच्या जागी दुसरेच फायदा उचलतात. भारत सरकारने त्यांना सवलत देण्याच्या आदेशाचा आपण सन्मान करतो. एक विदेशी नागरिक म्हणून विरोध केला नाही, मदत केली. परंतु आजच्या परिस्थितीचा विचार केल्यास संबंधित विदेशी नागरिकांच्या एकाच व्यक्तीकडे स्वतःच्या नावावर १७-१७ दुकाने आढळून येतात. त्यातील काही दुकाने पत्नी, मुलगा व त्यांच्या कडील नोकरांच्या नावाने आहेत. एका नागरिकांसाठी एक टपरी या पध्दतीचा अवलंब करावा. त्यांचेकडे असलेल्या नोकरांच्या नावावरील दुकाने काढून घ्यावी व शहरातील बऱ्याच सुशिक्षित बेरोजगार यांनी १९९५ पासून टपरी साठी जागेची मागणी केलेली, त्यांना देण्यात याव्यात. त्यातल्या त्यात विशेष म्हणजे तेथील संबंधित वार्डातील बेरोजगार लोकांना देण्याची कार्यवाही करावी, एकाच नागरिकांच्या नावाने आसपासच्या जवळच्या शहरात दुकाने असून, त्यावर नोकर ठेवून सर्वांशी संपर्क साधून सदर विदेशी लोक व्यवसाय करत आहे, त्यामुळे मुळ स्थानिक सुशिक्षित बेरोजगार यांना व्यवसाय करण्याची इच्छा असतांना फायदा घेता येईना.

**श्री गणेश तांबे** शहरातील काही लोक टपऱ्या टाकतात. महापालिकेची परवानगी घेत नाही. टॅक्स भरत नाही. परंतु विदेशी लोक ४ महिने व्यवसाय (धंदा) करतात. वर्षाचा टॅक्स भरतात.

**श्री सुदाम सोनवणे** मी महापौर असतांना प्रत्येक भागात सर्व्हे करुन मालमत्ता अधिकारी यांना तसे आदेश दिले होते व सर्व्हेही केला होता व ज्या जया प्रभागात सुशिक्षित बेरोजगार यांना जागा मिळवून देण्याची कार्यवाही केलेली असून बऱ्याच लोकांना टपऱ्यासाठी जागा दिल्या, परंतु काहींनी तिबेटी (विदेशी) लोकांना दिलेल्या टपऱ्यांच्या जागेची येथील स्थानिक बेकार लोकांनी मागणी केली होती. उपोषणे केले. संबंधित तिबेटी व्यवसायिक यांना सुध्दा माझ्या दालनामध्ये चर्चेसाठी बोलावले होते. तणाव वाढला पोलीस हस्तक्षेप करावा लागला. संबंधित तिबेटी लोकांना ९९ दुकाने दिलेली असून, जर कुणाच्या नावावर १ पेक्षा जास्तीचे दुकाने असेल तर त्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. महापौर** आपण केलेल्या सुचनेशी मी सहमत आहे, जर एकाच व्यक्तीच्या नावावर १ पेक्षा जास्त दुकाने असतील तर, चौकशी करावी. या संदर्भातील वाद न्यायालयात चालू आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार आपणास कार्यवाही करता येईल. न्याय प्रविष्ट प्रकरण असल्याने या विषयावर जास्त चर्चा करणे योग्य होणार नाही.

**श्री स. अली मिरा सलामी** शिक्षण विभागामध्ये बालवाडी शिक्षीकांना प्रशिक्षण देण्याबाबतचे आदेश दिले. त्याबाबत २५-३० रुपये फिस पण ठेवण्यात आलेली असून, यापुढे हे प्रशिक्षण घेणे जरुरी आहे. असू नमूद केले या अगोदर अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता पडली नाही. बालवाडी शिक्षकांवर अन्याय होतो. एकतर सदर शिक्षकांना ३-३, ६-६ महिने मुदत वाढीचे आदेश मिळत नाही. मिळाले तरी वेतन कमी आहे फीस आकारणी करुन हे प्रशिक्षण ठेवणे योग्य नाही. त्यांचेवर अन्याय होतो आहे, तसेच शिक्षण विभागातून प्रशिक्षण देण्याबाबतचे जे आदेश काढले. त्या आदेशात शिक्षणाधिकारी यांनी घरचे नियम आहेत का? तसेच संभाजीनगर, औरंगाबाद असे छापले ज्याला, औरंगाबाद खंडपिठामध्ये याचिका दाखल होऊन संभाजीनगर नांव संबोधण्यात न्यायालयाची स्थगिती आहे ते नांव ओदशात टाकले याचा अर्थ न्यायालयाचा अवमान केला. तसेच विना परवानगीने प्र. शिक्षणाधिकारी यांनी बिनधास्त सिनेमामध्ये काम केले, कार्यलयाची कोणातीही परवानगी घेतलेली नाही, नियमाच्या विरोधात काम करणाऱ्या प्र. शिक्षणाधिकारी यांना पदावरुन हटवावे, त्यांचे कॅडर चेंज करुन दिलेच कसे व त्यांच्या जागी महपालिकेच्या शाळामधील ज्येश्ट मुख्याध्यापक यांना ओदश द्यावेत. प्र. शिक्षणाधिकारी यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी.

**शिक्षणाधिकारी** शिक्षण विभागामार्फत वेळोवेळी बालवाडी शिक्षिकांचे शिबीर घें्तले जाते. त्यात शिक्षिकांनीच प्रशिक्षण घेण्या बाबत मागणी केली व हे प्रशिक्षण कशा पध्द्तीने घ्यावे हा प्रश्न पडला व त्यानंतर शहरातील विद्या प्रतिष्ठाण ही मोठी शाखा आहे. त्या संस्थेच्या माध्यमातून हे प्रशिक्षण देण्याचे ठरविले व या शाखेची नोंद संभाजीनगर औरंगाबाद असे संस्थेच्या लेटर पॅड वर असल्याने आदेश देतांना त्यावर त्या पध्दतीचा नावाचा उल्लेख केलेला आहे.

**श्री अफसरखान** एखादी संस्था पाकिस्तानच्या नावाने पत्ता देईल. मग त्याप्रमाणे आदेशात उल्लेख करणार काय? (यावेळी या वक्तव्यावरुन सभागृहात भाजप-शिवसेना सदस्यांनी गदारोळ केला व मोठमोठयाने बोलणे सुरु केले. स. सदस्य, श्री अफसरखॉन यांनी पाकिस्तानाचे नांव घेतले ते घेण्याची गरज काय त्याचे सदस्यत्व रद्द करावे. अशा मोठमोठयाने आवाज येत होता. काही ऐकू येत नव्हते. वेळ ५.५० वाजता.)

**श्री अफसरखान** मी या ठिकाणी फक्त उदाहरण देत आहे, त्याचा कोणी गैर अर्थ घेऊ नये.

**मा. महापौर** स. सदस्य, श्री अफसरखान यांनी "पाकिस्तान" शब्द वापरता तो वापरण्याची गरज नव्हती. एखादी संस्था संभाजीनगरच्या नावाने असू शकते, मोहल्याचे नाव असू शकते. सभागृहात त्यामुळे गदारोळ झाला म्हणून त्यांचे १ (एक) दिवसासाठी सभासदस्य रद्द करण्यात येते. त्यांनी सभागृहा बाहेर जावे.

(याच वेळी स. सभासद श्री अफसरखान यासीनखान सभागृहाबाहेर जातात. वेळ ५.५५ वाजता.)

**श्री प्रकाश निकाळजे** प्र. शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केल्या नंतर लगेचच स. सदस्य, अफसरखान यांचे तोडांतून अनावधानाने "पाकिस्तान" असा शब्द निघाला सभागृहाने समजदारी बाळगावी. ते उदाहरण देत होते.

**श्री अंबादास दानवे** बेगमपुरा भागात संभाजीनगर कॉलनी आहे. एखाद्या भागाचे, कॉलनीचे संभाजीनगर नांव असू शकते व त्या नावांने संस्था असू शकेल. "पाकिस्तान" शब्द वापल्या वरुन आम्ही निषेध केला. विरोधी पक्षाच्या स. सदस्यांनी निषेध केला नाही.

**श्री काशीनाथ कोकाटे** या ठिकाणी स. सदस्य यांनी भावना व्यक्त केली. त्याचप्रमाणे दिलगीरीही व्यक्म केली. आम्ही भारतीय आहोत. याचा आम्हास स्वाभिमान आहे.

**मा. महापौर** यापुढे जास्त चर्चा न करता, बैठक समाप्त करुन, या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याने मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*
## *दिनांक ३१/८/२००० रोजी संपन्न झालेल्या तातडीची सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त*

**गुरुवार दिनांक ३१ ऑगस्ट २००० रोजी महानगरपालिकेची तातडीची सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. श्री भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री वसंत पांडूरंग नरवडे | मा. उपमहापौर |
| २) स. स. श्री अंबादास एकनाथराव दानवे | -//- |
| ३) स. स. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ४) स. स. श्री वाणी ठकुजी रामसिंग | -//- |
| ५) स. स. श्री तांबे गणेश रामचंद्र | -//- |
| ६) स. स. सौ साजेदा बेगम विखार अहमद | -//- |
| ७) स. स. श्री शे. इलियास किरमानी शे. ऊमर | -//- |
| ८) स. स. श्री औताडे रावसाहेब ममतु पाटील | -//- |
| ९) स. स. श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | -//- |
| १०) स. स. श्री शिंदे राजू रामराव | -//- |
| ११) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| १२) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १३) स. स. श्री घायतिलक लिलावती बाळासाहेब | -//- |
| १४) स. स. श्री जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| १५) स. स. श्री किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| १६) स. स. सौ कचराबाई उत्तमराव लोखंडे | -//- |
| १७) स. स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे | -//- |
| १८) स. स. सौ साधना गणेश सुरडकर | -//- |
| १९) स. स. सौ विजया किशोर राहाटकर | -//- |
| २०) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | -//- |
| २१) स. स. सौ ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे | -//- |
| २२) स. स. श्री जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | -//- |
| २३) स. स. श्री साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| २४) स. स. श्री निकाळजे प्रकाश भाऊराव | -//- |
| २५) स. स. श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन | -//- |
| २६) स. स. श्री अय्युबखॉ सरदारखॉ | -//- |
| २७) स. स. सौ कांबळे निर्मला विठ्ठल | -//- |
| २८) स. स. श्री शिरसाठ संजय पांडूरंग | -//- |
| २९) स. स. श्री आनंद विनायकराव तांदुळवाडीकर | -//- |
| ३०) स. स. सौ रशिदा बेगम गफ्फार यासखॉन | -//- |
| ३१) स. स. श्री वडागळे सुनिल बुथवेल | -//- |

३२) स. स. श्री शिंदे किशोर रावसाहेब -//-
३३) स. स. श्री स. मुमताज आली मोज्जम अली -//-
३४) स. स. श्री पंडागळे रतनकुमार नारायणराव -//-
३५) स. स. श्री नासेरखान सरदार खान -//-
३६) स. स. श्री थोरात दत्तात्रय (बाळासाहेब) -//-
३७) स. स. श्री सोनवणे सुदाम रामदास -//-
३८) स. स. सौ खरात कुसुमबाई दौलत -//-
३९) स. स. श्री ताठे भाऊसाहेब पुडंलिक -//-
४०) स. स. सौ नुसरत बानो फिरोज खान -//-
४१) स. स. श्री तायडे पांडूरंग यशवंतराव -//-
४२) स. स. श्री फुलारी नंदकुमार माधवराव -//-
४३) स. स. सौ कुलकर्णी जयश्री विजय -//-
४४) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-
४५) स. स. सौ राजपुत विमलबाई भिकनसिंग -//-
४६) स. स. श्री देसरडा प्रशांत सुभाष -//-
४७) स. स. सौ ताराबाई सुधाकर जेजुरकर -//-
४८) स. स. श्री अशरफ मोतीवाला -//-
४९) स. स. श्री गायकवाड राधाकृष्ण राजाराम -//-
५०) स. स. सौ संगिता बाळू मैंद -//-
५१) स. स. श्री नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी -//-
५२) स. स. सौ शाहिन जफर महमुद जफर -//-
५३) स. स. सौ दाणे चद्रभागाबाई भगीरथ -//-
५४) स. स. श्री ओक जयवंत केशवराव -//-
५५) स. स. श्री स. सलीम म. युसुफ -//-
५६) स. स. श्री तकीहसन खान कासीम हसनखान -//-
५७) स. स. श्री गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहमद -//-
५८) स. स. श्री मिर हिदायत अली मिर बसारत अली -//-
५९) स. स. सौ नफिसुन्नीसा बेगम हबीबखा -//-
६०) स. स. श्री शेख इसाक जैनोद्दीन शेख -//-
६१) स. स. श्री अफसरखाँ यासिनखॉ -//-
६२) स. स. सौ सुलताना बेगम चॉद खॉ -//-
६३) स. स. श्री लकडे भरत श्रीपती -//-
६४) स. स. श्री शेख मुनाफ शेख यासीन -//-
६५) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल -//-
६६) स. स. श्री कैसरखॉन बद्रोद्यीन खान -//-
६७) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
६८) स. स. श्री स. अली सलामी स. मिरा सलामी -//-
६९) स. स. री तनवाण किसनचंद लेखराज -//-
७०) स. स. सौ निखत परवीन ईजाज अली -//-

**स्विकृत सदस्य**
१) स. स. श्री घडामोडे भगवान देवीदास

२) स. स. श्री खुंगर सुरजीतसिंग तिलकाराज
३) स. स. श्री धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स. स. सौ सलमा बानो मिर मो. अली

**विषय क्र. ७०/१ :**

रिट याचिका क्र. २५५३/२००० मध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ३०/८/२००० रोजी दिलेल्या आदेशानुसार स. सदस्य श्री अशरफ युनुस मोतीवाला यांची स्थायी समिती सभापती पदी निवड घोषित करणेबाबत.

**संवाद**

**मा. महापौर** न्यायालयाच्या निर्णयानुसार स. सदस्य श्री. अशरफ युनुस मोतीवाला यांना देण्यात आलेली तीन (३) अवैध मते, न्यायालयाने वैध ठरविल्याने त्यांनी एकूण बेचाळीस ४२ मते होतात. स. सदस्य श्री अविनाश कुमावत यांना चाळीस (४०) मते असल्याने स्थायी समितीच्या सभापती पदी स. सदस्य श्री अशरफ युनुस मोतीवाला यांची वरील निर्णयानुसार निवड झाल्याचे घोषित करण्यात येते.

**ठराव क्र. ७०/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रिट याचीका क्र. २५५३/२००० मध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ३०/८/२००० रोजी दिलेल्या आदेशानुसार स. सदस्य श्री अशरफ युनुस मोतीवाला यांनी देण्यात आलेली तीन अवैध मते न्यायालयाने वैध ठरविल्याने त्यांची एकूण ४२ मते होतात. तर स. सदस्य श्री अविनाश कुमावत यांना ४० मते असल्याने स्थायी समितीच्या सभापती पदी स. सदस्य श्री अशरफ युनूस मोतीवाला यांची निवड इ ााल्याचे घोषित करण्यात येवून, त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याने मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद. |